आमचे स्वातंत्र्य-लढे



दा. न. शिखरे

आमचे स्वातंत्र्य-लढे

भाग १ ते ५

लेखक

दा. न. शिखरे
एम्. ए.

★

मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणें २.

मूल्य तीन रुपये

लेखकाची भूमिका

कोणतीहि युद्ध–कथा रम्य असतेच, पण स्वातंत्र्यासाठीं लढल्या गेलेल्या युद्धाची कथा स्फूर्तिप्रद असते; त्यांतहि, सर्व जगांत अपूर्व असा जो अहिंसक संग्राम भारतानें आपल्या स्वातंत्र्यासाठीं केला, त्याचा इतिहास म्हणजे नानाविध उदात्त गुणांची खाणच. त्यांत उज्ज्वल ध्येयनिष्ठा आहे, अपार त्यागबुद्धि आहे, अकुंठित साहस-वृत्ति आहे, निस्सीम देशभक्ति आहे–सर्व कांहीं आहे.

या गुणांची गरज स्वातंत्र्य संपादण्यासाठीं जितकी होती, तितकीच तें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं व वाढविण्यासाठींहि आहे. आतां भारतांतील प्रत्येक नागरिकाच्या मुखावर स्वातंत्र्याची झळाळी दिसली पाहिजे. तो जितका स्वावलंबी तितकाच सहकारी, जितका स्वाभिमानी तितकाच नम्र, जितका विचारी तितकाच कार्योत्सुक असा असला पाहिजे. व्यक्ति-स्वातंत्र्याचा भोक्ता असूनहि तो समाजनिष्ठ असला पाहिजे. देशाभिमानी असूनहि तो जागतिक दृष्टीचा असला पाहिजे. संस्कृतिनिष्ठ असूनहि तो नव्या विचारांचें स्वागत करणारा असला पाहिजे.

स्वतंत्र भारतांतील असा नवा नागरिक निर्माण कसा होईल ? इतर स्वतंत्र देशांतील शूर, ज्ञानी, कष्टाळू, धाडसी, बाणेदार व प्रामाणिक नागरिकांच्या मांडीस मांडी लावून तो कसा बसूं शकेल ? हाच खरा आतां आपल्यापुढें प्रश्न आहे. तो सोडविण्याचा सुलभ असा एक उपाय म्हणजे ही स्वातंत्र्य-युद्ध-माला गुंफणें. गेल्या दीडशें वर्षांत नाना पक्षांनीं, नाना मार्गांनीं पण एका स्वातंत्र्याच्याच प्राप्तीसाठीं जे भगीरथ प्रयत्न केले; त्यांचा इतिहास नव्या पिढीनें ऐकला, तर ती पिढी भारतीय स्वातंत्र्याचें संगोपन व संवर्धन करण्यास समर्थ अशी खचित निघेल अशी माझी श्रद्धा आहे. रामायण-भारताच्या श्रवणानेंच


श्रीशिवाजीमहाराजांस स्वातंत्र्य-संपादनाची स्फूर्ति मिळाली ना ? तसाच पण अल्पसा उपयोग या मालेचा व्हावा ही अपेक्षा आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा सांगोपांग इतिहास रचण्यासाठीं भारत सरकारनें तज्ज्ञांची एक स्वतंत्र समितीच नेमली आहे. त्यापुढें हा प्रयत्न म्हणजे काय ? सूर्यापुढें दिवे किंवा समुद्रापुढें कालवे ! पण दिव्यांचा आणि आणि कालव्यांचाहि उपयोग असतोच कीं ! भारतीय स्वातंत्र्य–संग्रामाची तोंडओळख एकत्र करून देणारीं पुस्तकें तरी मराठींत कोठें आहेत ? ती उणीव भरून काढण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे. १९०८, १९२०, १९३० व १९४२ या सालांतील एकएका आंदोलनाला या मालेंतील एक एक पुष्प वाहिलेलें असून क्रांतिकारकांच्या चळवळींचें वर्णन एका स्वतंत्र पुस्तकांत दिलें आहे. पुस्तकाच्या पृष्ठसंख्येच्या मर्यादेंत, जितका वृत्तान्त जितका साधार मला देतां आला, तितका मीं दिला आहे.

या मालेचें प्रकाशन अंगावर घेऊन माझे स्नेही श्री. नानासाहेब जोशी व श्री. अण्णासाहेब लोखंडे यांनीं सध्यांच्या काळांत एक प्रकारचें धाडसच केलें आहे. स्वच्छ, शुद्ध व सुबक छपाई आणि रेखीव चित्रें यांची जोड देऊन त्यांनीं ही जी साहित्य–सेवा केलेली आहे, ती स्वातंत्र्य–सेवा म्हणूनहि राष्ट्रमातेच्या चरणीं रुजू होईल असा विश्वास मला वाटतो.

'महात्मा' कार्यालय, पुणें २.
ता. २ ऑक्टोबर १९५३

दा. न. शिखरे



लढ्याची तुतारी

ढगांचा पहिला गडगडाट शेतकऱ्याच्या कानीं आला कीं, त्याला केवढा हर्ष वाटतो!–किती आशा त्याच्या डोळ्यांपुढें खेळूं लागतात! चार महिन्यांचा उन्हाळा एका क्षणांत नाहींसा करणारी पावसाची पहिली सर आतां येणार, आपली शेती पिकविणार आणि आपलें पुढील सारें वर्ष सुखाचें करणार अशीं मनोराज्यें त्याच्या चित्तांत खेळूं लागतात.

असाच हर्ष, अशीच आशा आणि हींच मनोराज्यें कोडों हिंदवासियांच्या अंतःकरणांत एकाच शब्दानें फुलविलीं. तो


शब्द कोणता ? ज्या एका शब्दासाठीं कांहीं मुत्सद्दी हिंद-पुत्र इंग्लंडमध्यें जाऊन आपल्या जिवाचें रान करूं लागले व दुसरे कांहीं वीर तेथील अधिकाऱ्यांचा जीव बेचैन करूं लागले आणि खुद्द हिंदुस्थानांतील शेंकडों शूर तरुण–कोणी तुरुंगांत गेले, कोणी फटके खाल्ले तर कोणी फासाच्या फळीवर चढले, तो मृतप्राय राष्ट्राला संजीवनी देणारा शब्द म्हणजे— स्वराज्य !

आपल्या साठ हजार पितरांचा उद्धार करण्यासाठीं भगीरथानें स्वर्गांतून पृथ्वीवर गंगेचा लोट आणला. विष्णूला विनवीत, शंकराला शमवीत, जन्हू राजाचे आर्जव करीत आणि त्याचबरोबर पहाड फोडीत, दऱ्या ओलांडीत, तट बांधीत, गंगेचा उद्धारक प्रवाह या पृथ्वीतलावर भगीरथानें आणून सोडला; तसे प्रार्थनेचे, आर्जवाचे, युक्तिवादाचे आणि त्याबरोबरच लोक-जागृतीचे, जागृत लोकांच्या संघटनेचें आणि त्या संघटित लोकांच्या शौर्याचे नाना उपाय योजून स्वदेशाला स्वराज्य मिळवून देणारे अनेकानेक भगीरथ हिंदुस्थानांत निघाले. त्यांचे स्वराज्याचे प्रयत्न हे, कोणत्याहि युद्ध-कथेइतके, रमणीय व रसपूर्ण, रोमांचकारक व स्फूर्तिदायक असेच आहेत.

इंग्रज लोक १६०० सालीं हातांत तागडी घेऊन येथें आले, १७५७ सालच्या प्लासीच्या लढाईपासून त्यांनीं तागडीऐवजीं तरवार हातीं घेतली आणि १८१८ सालीं तख्त बळकावून त्यांनीं शनिवारवाड्यावर आपलें निशाण रोवलें. त्या क्षणापासूनच हिंदुस्थानानें आपल्या स्वातंत्र्याचा लढा पुकारला. बहुसंख्य

भोळ्याभाबडया जनतेला इंग्रजांचें राज्य म्हणजे ईश्वरी वरदान वाटले; कारण त्यांनीं सर्व देशभर शांतता व स्वास्थ्य निर्माण केलें आणि पोष्ट–रेल्वेसारख्या नव्या नव्या भौतिक सुधारणा येथें आणल्या. पण जे विचारी होते, दूरदर्शी होते, जगाचा इतिहास जाणणारे होते, त्यांनीं मनाशीं खूणगांठ बांधली कीं, स्वराज्याची सर सुराज्याला कधींच येणार नाहीं. आज ना उद्यां आपण हें पारतंत्र्याचें जोखड झुगारून देणार अशी प्रतिज्ञा त्यांनीं केली. त्यांपैकीं ज्याची जशी श्रद्धा, ज्याची जशी शक्ति, तशीं त्याचीं कार्यें त्या त्या साधनांनीं, पण एका स्वराज्य–प्राप्तीच्याच दिशेनें सुरू झालीं.

स्वातंत्र्याचा लढा केव्हां सुरू होतो ?
स्वातंत्र्याचा अस्त होतो त्या क्षणींच! आणि
स्वातंत्र्याचा लढा संपतो कधीं ?
स्वातंत्र्याचा लाभ झाल्यानंतरच !



चौफेर उठावणी

परतंत्र भारताची सर्वांगीण सुधारणा व्हावी, अशी तळमळ न्या. रानडे, राजा राममोहन राय प्रभृति पुढाऱ्यांना लागली होती. म्हणून त्यांनीं एका हातानें राजकीय व्यूह रचीत असतांनाच, दुसऱ्या हातानें सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक वगैरे सुधारणांचींहि बीजें रोवलीं. राजा राममोहन राय तर १८३१ सालींच इंग्लंडास गेले होते. हिंदी जनतेला लष्करी शिक्षण द्यावें, वरिष्ठ नोकऱ्या द्याव्यात, रयतेला जमिनीवर कायमचा हक्क मिळावा, इत्यादि मागण्या त्यांनीं ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारी–वर्गास सादर केल्या. सत्तावन सालच्या क्रांतियुद्धापूर्वीची ही गोष्ट! महाराणी व्हिक्टोरियाचा अंमल

सुरू होण्यापूर्वींच्या या मागण्या ! एका ब्रिटिश व्यापारी कंपनीच्या कारकीर्दीच्या काळांतील या आकांक्षा ! राय यांची लंडन येथील कॉमन्स-सभेच्या कमिटीपुढें जी साक्ष झाली, ती हिंदी स्वातंत्र्याच्या सनदशीर चळवळीची सलामीच होय.

राममोहनांना स्वातंत्र्याबद्दल अपार प्रेम वाटे. हिंदुस्थानचें असो, फ्रान्सचें असो, नेपल्सचें असो—सर्वांच्या स्वातंत्र्याविषयीं त्यांना मोठी आस्था वाटे. आशिया खंडांतील व युरोप खंडांतील सर्व देश स्वतंत्र झालेले आपल्या ह्यातींत आपल्या डोळ्यांनीं पहावयास मिळावेत अशी तीव्र तळमळ त्यांना लागलेली होती. ते १८३० सालीं इंग्लंडला जाण्यास निघाले तेव्हांची गोष्ट. त्यांचें जहाज केप ऑफ गुडहोप येथें आलें होतें. त्या बंदरांतच एक फ्रेंच जहाज उभें होतें. त्यावर स्वातंत्र्याचा झेंडा फडकत होता. तो पहातांच राममोहनांच्या हृदयांत स्वातंत्र्य-भक्तीच्या लाटा उचंबळूं लागल्या. त्या स्वातंत्र्य-ध्वजाला वंदन करण्यासाठीं ते निघाले. त्या-पूर्वीं एका शिडीवरून पडल्यामुळें ते बरेच जखमी झाले होते. तरीसुद्धां ते लंगडत लंगडत निघाले, त्या जहाजावर गेले आणि त्यांनीं त्या स्वातंत्र्य-ध्वजाला अभिवादन केलें. त्या वेळीं त्यांच्या मनांत आलें असेल, 'माझ्या मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा ध्वजहि असाच केव्हां फडकेल ? ' तेथून निघतांना त्यांनीं ' स्वतंत्र फ्रान्सचा जयजयकार असो ' अशी आरोळी आनंदानें ठोकली.

पुढें स्पेनमध्यें लोकसत्ताक राज्य स्थापन झालें, हें वृत्त कळतांच त्यांनीं कलकत्ता येथें आनंद प्रदर्शित केला.

ज्यूरी बिल असो किंवा मुद्रण-नियंत्रण असो, सरकारच्या अन्यायावर व जुलुमावर राममोहन निर्भयपणें तुटून पडत. पार्लमेंटकडे अर्ज पाठवून हिंदुस्थान-सरकारचा अविचार ते सडेतोड भाषेंत जगजाहीर करीत. मुद्रण-नियंत्रणाच्या निषेधार्थ त्यांनीं आपलें एक वृत्त-पत्र बंद ठेवलें होतें. त्यांच्या इंग्लंडमधील बाणेदार वर्तनाचा परिणाम तेथील लोकांवर काय झाला, हें एका इंग्रज लेखकानें लिहून ठेवलें आहे. तो म्हणतो, " हे जित लोक विद्वान असून त्यांची वृत्ति बाणेदार आहे, ते बुद्धिमान व भक्तिमान आहेत, हें राममोहनांनीं येथील लोकांच्या दृष्टीस आणून दिलें. "

तसेंच १८४८ मध्यें लोकहितवादींनीं (सरदार गोपाळराव हरि देशमुख यांनीं) ' हिंदुस्थानच्या देशांत पार्लमेंट ठेवावें ' अशी सूचना सरकारास केली होती. त्यांनीं आपल्या देशबांधवांना असा उपदेश केला कीं; " आजपासून सर्व गरिबांनीं व श्रीमंतांनीं एकत्र होऊन विलायतेंतील राणीसाहेबांस तपशीलवार एक अर्ज करावा कीं, हल्लीं राज्यपद्धति आहे, तीपासून आमचा फायदा नाहीं व आमचे राज्यसंबंधीं हक्क चालत नाहींत. " अशी सूचना करून त्यांनीं " हिंदु लोक जसें, तसेंच इंग्रज लोक मनुष्यें आहेत. " अशी समानतेची भावनाहि स्पष्ट शब्दांत मांडली आणि हिंदी व इंग्रज यांच्यांतील भेदभाव नाहींसा करण्याची सूचना केली.

फार काय, सुमारें शंभर वर्षांनीं जगभर गाजलेली, हिंदुस्थानची

' चले जाव ' ची घोषणाहि लोकहितवादींच्या ' पत्रां ' त बीजरूपानें आढळते. ते असें भविष्य वर्तवितात कीं, " ज्या काळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू करावयाचा आग्रह धरतील, त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील; आणि इंग्रजास सांगतील कीं, " **तुम्ही आपले देशास जावें.** "

असा काळ येण्यास दोनशें वर्षें लागतील असा अंदाज लोकहितवादींनीं केला होता; पण वैद्याच्या अटकळीपेक्षां जल्द एकादा रोगी सुधारावा, त्याप्रमाणें हिंदुस्थानानें तो काळ शंभर वर्षांतच उभा केला ! अंगीं प्रतिकार-शक्ति खेळत असल्याचीच ही खूण नव्हे काय ?

श्री. वासुदेव बळवंत फडके यांच्यासारख्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या डोळ्यांपुढेंहि ' प्रजासत्ताक राज्याचें " च चित्र खेळत होतें. ' मालाकार ' चिपळूणकर यांचा ' कल्पना-विहंग ' तर "पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे." चिपळूणकरांचा विशेष गुण म्हणजे, हें मनोराज्य सत्यसृष्टींत उतरण्यासाठीं त्यांनीं आपल्या अल्प आयुष्यांत महान कृति करून दाखविली.

आपलें राष्ट्र, आपली संस्कृति, आपली भाषा यासंबंधीं शास्त्रीबुवांनीं महाराष्ट्रांत कडकडीत अभिमान निर्माण केला. स्वत्वाची जागृति हें त्यांचें जीवित-कार्य होय. इंग्रजांच्या झगझगीत

सुधारणांमुळें येथील सुशिक्षितांना जें मानसिक पारतंत्र्य आलेलें होतें, तें उडवून लावण्याइतका प्रबल झंझावात निबंधमालेनें निर्माण केला. स्वतंत्र वृत्त-पत्रें, स्वतंत्र शाळा; स्वतंत्र पुस्तकालय,—असा पूर्ण स्वातंत्र्याचा बाणा त्यांनीं सर्वत्र मिरविला.

ते सरकारी खात्यांत शिक्षकाच्या नोकरीवर होते. पण या स्वातंत्र्य-वृत्तीमुळें त्यांनीं त्या नोकरीची रुपेरी बेडी ताडकन् तोडून टाकली आणि रत्नागिरीहून पुण्यास येऊन आपली स्वतंत्र शाळा उघडली. या वैयक्तिक स्वातंत्र्याचा आनंद आपल्या भावास कळवितांना शास्त्रीबुवा एका पत्रांत लिहितात, "आतां मी माझ्या शृंखला तोडण्याचा आनंद उपभोगणार. येत्या जानेवारीपासून आमचें निशाण फडकवणार ! टिळक–आगरकर–प्रभृति पदवीधरांच्या तोफखान्यापुढें सरकारी हायस्कूल हां हां म्हणतां जमीनदोस्त होईल !"

हें शास्त्रीबुवांचें केवळ मनोराज्य होतें असें नाहीं. बुद्धिमान, पदवीधर व राष्ट्राभिमानी तरुण एकत्र येतात, सरकारी शिक्षण-पद्धतीला तुच्छ लेखतात आणि जनतेला जागृत करण्यासाठीं स्वतंत्रपणें शिक्षण देऊं इच्छितात, या घटनेचा भावार्थ मुंबईच्या 'टाइम्स' नें तेव्हांच ओळखला व त्या वेळीं असें लिहिलें कीं, 'ही शाळा म्हणजे क्रांतीचें बीज आहे !'

हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजवटीवर ज्या अनेक तोफा डागण्यांत आल्या; त्यांत शास्त्रीबुवांची निबंधमाला म्हणजे 'मुलुखमैदानच' होय. त्यांनीं स्वाभिमानी, स्वावलंबी, निर्भय

व प्रतिकारशाली अशा स्वातंत्र्यभक्त लोकसेवकांची नवी परंपराच महाराष्ट्रांत सुरू केली. पश्चिमेकडे सहस्र मुखांनीं वाहणारा लोक-गंगेचा प्रवाह उलटवून तो पूर्वेकडे वाहवावयास लावण्याचें शास्त्रीबुवांचें सामर्थ्य केवढें अलौकिक !

मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनीं १८२६ सालींच मेटकाफ यास असें भाकित कळविलें होतें कीं, "मला असें वाटत असें कीं, आमचें साम्राज्य कांचेचेंच आहे; पण पूर्वीं व अलिकडे त्यानें जे आघात यशस्वीपणें सहन केले आहेत, ते पाहतां, तें लोखंडाचें असावें असा भास होण्याचा संभव आहे. पण माझा असा विश्वास आहे कीं तें पोलादाचें आहे. तथापि, तें जर गाफील लोकांच्या हातीं पडलें, तर मोडून पडण्याचाहि संभव आहे." ब्रिटिश अधिकारी जसे गाफील, मग्रूर व स्वार्थी राहिले, तसेच हिंदी पुढारी जागृत, संघटित व त्यागी झाले, म्हणूनच ब्रिटिश साम्राज्याचा सूर्य हिंदुस्थानांतून कायमचा मावळला.

एकादा बेशुद्ध झालेला माणूस, तोंडावर पाणी पडलें असतांना, जसा हळुहळु डोळे उघडतो, हालचाल करूं लागतो आणि शुद्धीवर येऊन, उठून उभे राहून कामास लागतो; त्याप्रमाणें पारतंत्र्यामुळें 'थंड गोळा' होऊन पडलेल्या हिंदुस्थानाच्या अंगोपांगांत चैतन्य खेळविण्याचें कार्य न्या. रानडे, राजा राममोहन राय प्रभृति प्रारंभींच्या पुढाऱ्यांनीं केलें. न्या. रानडे यांनीं आपल्या दूरदृष्टीनें देशापुढें विशाल ध्येय ठेवलें. त्या ध्येयाचें वर्णन करतांना ते म्हणतात, "आमचें मनुष्यत्व मुक्त झालें

पाहिजे, आमच्या आशा उसळूं लागल्या पाहिजेत, कर्तव्यांत कधींहि कसूर न करणारी श्रद्धा जागृत झाली पाहिजे, सर्वांशीं समदृष्टीनें व्यवहार करणारी न्यायबुद्धि प्रज्वलित झाली पाहिजे, बुद्धीवर आलेलें सर्व अभ्र वितळून गेलें पाहिजे आणि सर्व तटबंदींचें उल्लंघन करून आमच्या प्रेमाची गंगानदी वाहूं लागली पाहिजे. म्हणजेच हिंदुस्थानला नवजीवन प्राप्त होईल आणि जगांतील इतर राष्ट्रांत आपलें योग्य स्थान प्राप्त करून घेऊन हा देश आपल्या परिस्थितीवर व भवितव्यावर प्रभुत्व गाजवूं लागेल."

असें केवळ स्वप्न, नुसतें मृगजळ निर्माण करून न्या. रानडे स्वस्थ बसले नाहींत; तर त्या ध्येयाच्या प्राप्तीची प्रेरणाहि त्यांनीं निर्माण केली. ते आपल्या देशबांधवांना सांगत, "हीच अमरभूमि आहे. ही ज्यांना आपल्या दृष्टिपथांत आणतां येत असेल ते खरोखर सुखी होतात, ज्यांना त्या भूमीकडे जाण्याचा रस्ता तयार करण्याची संधी लाभते ते त्याहून सुखी होतात आणि जे या भूमीच्या पवित्र धूलीवर पदार्पण करतील आणि तिचें दर्शन घेण्यास जगतील ते तर सर्वांतच सुखी गणले गेले पाहिजेत."

महाराष्ट्राप्रमाणें बंगालहि स्वातंत्र्य-लालसेनें स्फुरण पावत होता. आय्. सी. एस्. ची परीक्षा उत्तीर्ण होऊन सरकारची बडी नोकरी करीत असलेले सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं बंगाल्यांत १८७९ सालीं 'बंगाली' नांवाचें वृत्तपत्र चालवावयास घेतलें, १८८२ मध्यें राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठीं एक विद्यालय उघडलें व पुढें एक कॉलेजहि काढलें.

महाराष्ट्रांत टिळक—आगरकरांनीं 'केसरी—मराठा' हीं पत्रें चालविलीं, न्यू इंग्लिश स्कूल काढलें व त्यांतून फर्गसन कॉलेज निघालें. याच साधन—मार्गाची दुसरी आवृत्ति बंगालमध्यें त्याच सुमारास निघाली.

त्याचप्रमाणें रामकृष्ण परमहंस व त्यांचे जगविख्यात शिष्य स्वामी विवेकानंद यांच्या 'रामकृष्ण मिशननें' हि बंगालमध्यें स्वसंस्कृतीविषयींच्या अभिमानाची ज्योत पेटविली. पंजाबमध्यें स्वामी दयानंदांनीं 'आर्य—समाज' स्थापन करून तेथील लोकांची मोठी संघटना बांधली. मद्रास प्रांतांत 'महाजन सभा' जन्मास आली व ती जनतेच्या आकांक्षा बोलून दाखवूं लागली. त्या प्रांतांत थिऑसफीचा पंथहि याच सुमारास बळावला व त्यानें लोकांमध्यें नवजीवन निर्माण केलें. महाराष्ट्र, बंगाल, पंजाब व मद्रास या चार प्रमुख प्रांतांतील जनता या वेळीं पारतंत्र्याच्या मूर्च्छेंतून सावध झाली होती आणि लोकसंग्रहाच्या बळावर स्वराज्य संपादन करण्याची हिंमत मनांत धरीत होती.



दुसरी आघाडी

एकाद्या किल्ल्याला शत्रूनें वेढा घातला म्हणजे तो वेढा उठविण्यासाठीं आंतून-बाहेरून चौफेर प्रयत्न सुरू होतात ना? तशा सर्वांगीण चळवळी हिंदुस्थानाचें पारतंत्र्य घालविण्यासाठीं १८१८ सालापासूनच सुरू झाल्या. किल्ल्याचा वेढा उठविण्यासाठीं कोणी शत्रूला दुरून येणारी रसद तोडतो, कोणी त्याच्या सैन्यांत फितुरी करतो, तर कोणी ऐन किल्ल्यावरून दारूगोळ्याचा मारा थेट शत्रु-सैन्याच्या डोक्यावर करतो. हिंदी स्वातंत्र्याच्या संग्रामांत परक्या सरकाराची रसद व कुमक तोडण्याचें

कार्य महर्षि दादाभाई नौरोजी प्रभृति थोरथोर पुढाऱ्यांनीं केलें. इंग्लंडांत जाऊन, तेथील निवडणुकीस उभे राहून, गोऱ्या जनतेचीं मतें मिळवून, दादाभाई ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद झाले. "आमच्या राष्ट्राची लढाई पार्लमेंटच्या रणांगणावरच लढली पाहिजे" असें ते म्हणत. हिंदुस्थानांतील कांहीं कांहीं शहाण्यासुर्त्या लोकांनीं इंग्लंडमध्यें जावें व आपल्या बुद्धिसामर्थ्यानें आणि वक्तृत्वकलेनें ब्रिटिश जनतेला आपल्या देशाची दुर्दशा समजावून द्यावी आणि स्वराज्याची आवश्यकता पटवून द्यावी अशी त्याची विचार-धारा असे. फार काय सांगावें ? असा इंग्लंडांत प्रचार व्हावा म्हणून खुद्द कॉंग्रेसचेंच एक अधिवेशन इंग्लंडमध्यें भरवावें अशी सूचनाहि दादाभाईंनीं १८९३ सालीं लाहोर कॉंग्रेसमध्यें अध्यक्षपदावरून केली. परतंत्र हिंदुस्थानचे धनी म्हणजे ब्रिटिश लोक. त्यांची सहानुभूति आपल्याकडे वळवावी हा त्यांचा हेतु. आंकड्यांनीं व युक्तिवादानें आपण समजूत घातली कीं, ब्रिटिश लोक आपल्याला स्वराज्य देतील असा त्यांचा विश्वास. पण ब्रिटिशांचा स्वार्थ हा त्यांच्या उदारमतवादाला खाऊन टाकण्याइतका दांडगा आहे, याची जाणीव त्यांना लवकरच झाली.

गझनीच्या महंमदानें अठरा वेळां हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून जेवढी लूट नेली नसेल, तितकी संपत्ति ब्रिटिश सरकार हिंदुस्थानांतून दरसाल नेत असे. असा सतत रक्तस्राव झाल्यावर हिंदुस्थान देश पांढरा फटफटीत पडावा यांत नवल काय ? त्याचें

दृश्य चिन्ह म्हणजे दुष्काळ. १८७६ सालापासून दुष्काळामागून दुष्काळ पडूं लागले. १८९६ या एका वर्षीं तर तीन कोटि माणसें दुष्काळाच्या खाईंत मेलीं. तरी परक्या सरकाराच्या काळजास घाम फुटेल तर शपथ! उलट, नाच–रंग, मेजवान्या–दरबार वगैरेंचा थाटमाट उडविण्यांतच हिंदुस्थानांतील गोरे अधिकारी दंग! हें पाहून दादाभाईंचा आत्मा खवळला. इंग्लंडमधील एका व्याख्यानांत तेथील जनतेला यांनीं तळमळून विचारलें, "आज तीन कोट हिंदी लोक दुष्काळांत मेले, ही गोष्ट तुम्हांला भयंकर वाटत नाहीं काय?" आणि त्या घटनेचा भयंकरपणा उघड करून त्यांनीं गोऱ्या श्रोत्यांना बजावलें, "हा दुष्काळाचा प्रश्न हिंदुस्थानाइतकाच इंग्लंडच्याहि जिव्हाळ्याचा आहे. कारण, हिंदुस्थानाची भरभराट जोंपर्यंत आहे तोंपर्यंत इंग्लंडचें सौख्य नांदेल पण हिंदुस्थानाची दुर्दशा झाली कीं इंग्लंडचें मरण तावडतोब ओढवेल!"

दादाभाईंच्या भगीरथ प्रयत्नामुळें पार्लमेंटांत असा ठराव मंजूर झाला कीं, हिंदुस्थानांतील वरिष्ठ अधिकारीवर्गाची आय्. सी. एस्. परीक्षा इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत एकाच वेळीं घेण्यांत यावी. हेतु हा कीं, त्यामुळें अधिकाधिक हिंदी तरुण सरकाराचीं वरिष्ठ स्थानें पटकावतील. 'नोकऱ्यांचें हिंदीकरण करा' असा दादाभाईंचा लकडा होता. म्हणून पार्लमेंटनें ठराव मंजूर तर केला, पण पुढें काय?—पूर्ण अंधार. हिंदुस्थानांतील गोऱ्या अधिकारी-वर्गाला हें नको होतें. 'काळ्या

आदमींना ' कलेक्टर-कमिशनरचा हुद्दा कसा द्यावयाचा ? नोकरशाहीच्या पोटांत दुखूं लागलें. बलीराजानें वामनाच्या हातावर उदक सोडण्याचें ठरविलें, पण तें उदक सोडणाऱ्या झारीच्या तोंडांतच शुक्राचार्य लपून बसले, अशी पौराणिक कथा आहे. त्या शुक्राचार्यांची भूमिका हिंदी नोकरशाहीनें घेतली. तिनें तो पार्लमेंटचा ठराव तसाच धूळ खात ठेवला. दादाभाईंनीं खूप ओरड केली, पण पालथ्या घड्यावर पाणी !

पार्लमेंटनें कांहींच दाद घेतली नाहीं असें पाहून दादाभाईंनीं पार्लमेंटच्या आईबापांकडे दाद मागितली ! हे आईबाप कोण ? तर ब्रिटिश स्त्रीपुरुष. त्यांच्याच मतावर पार्लमेंट बनत असतें. राज्य-कारभाराच्या बाबतींत इंग्लंडांतील एका मतदाराला जितका हक्क असे, तितका सगळ्या तीस कोटि हिंदी लोकांना मिळूनदेखील नाहीं. हें ओळखून दादाभाईंनीं ब्रिटिश मतदारांकडे धांव घेतली. " खरें म्हटलें तर, आमच्या दु:खाच्या वेदना तुम्हांस कळल्या पाहिजेत, कारण, असलीं दु:खें तुम्हीं पूर्वीं सोसलीं आहेत. म्हणून आम्ही तुमची मदत मागतों. यावेळीं तुम्ही आम्हांस मदत केली पाहिजे. " असा टाहो त्यांनीं फोडला. पण परदु:ख शीतळ ! ब्रिटिश जनतेनेंहि हिंदी गाऱ्हाण्यांकडे कानाडोळाच केला.

' आपल्या देशाचा कारभार आपल्या हातीं असावा असें इंग्रज लोकांप्रमाणेंच आम्हांलाहि वाटलें, तर त्यांत अप्रशस्त किंवा निसर्ग–विरुद्ध तें काय झालें ? ' असा सवाल त्यांनीं १८६८ सालीं इंग्लंडमध्यें वाचलेल्या आपल्या निबंधांत केला व इंग्रज

जनतेस ऐकविला. क्रॉफर्ड असो किंवा डफ असो, कोणीं हिंदुस्थानला कमीपणा देणारे बोल काढले किंवा लिहिले कीं, त्याचा खरपूस समाचार दादाभाई तत्काळ घेत.


एकदां लंडन येथें एक सभा भरली होती. कोनेल नांवाच्या साहेबानें आपल्या भाषणांत हिंदी लोकांची टर उडविली. दादाभाई उठले आणि त्यांनीं त्या साहेबाला खणखणीत उत्तर दिलें. ते असें स्पष्टपणें म्हणाले, "आश्वासनांची व जाहीरनाम्यांची लाज धरा आणि हिंदुस्थानांतील राज्याचें सामर्थ्य तोफांच्या गोळ्यांत किंवा समशेरीच्या धारेंत नसून लोकांच्या संतोषांत आहे, हें विसरूं नका."

हिंदुस्थानांतील ब्रिटिशांची राजवट अन्यायाची आहे, लोकांमध्यें असंतोष निर्माण करणारी आहे आणि म्हणून ती नष्ट झाली पाहिजे, असें आपलें ठाम मत दादाभाईंनीं वारंवार सडेतोड भाषेंत मांडलें आहे. वेल्बीसाहेबास लिहिलेल्या एका पत्रांत ते म्हणतात, "आमच्या नैतिक, सांपत्तिक, शारीरिक शक्तींचें शोषण करणारी ही अन्यायी राज्यपद्धति नष्ट झाली पाहिजे. हिंदुस्थानांतील लोकांत असंतोष पसरलेला आहे." पुढें ३०–४० वर्षांनीं कॉंग्रेसनें आपल्या स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेंत इंग्रजी राजवटीचे जे अनर्थ नोंदले आहेत, त्यांचें बीज ह्या उद्गारांत आढळून येत नाहीं काय?

याहूनहि अधिक खणखणीतपणें दादाभाईंनीं ब्रिटिश राज्याचे दुष्परिणाम १८९५ सालींच जगजाहीर केले आहेत. 'इंडिया' पत्रांत लिहिलेल्या लेखांत ते म्हणतात, "ज्या राज्यपद्धतीमुळें अफूच्या व्यापाराला ऊत येतो, देशांतील हजारों स्त्रीपुरुषांच्या

शरिरांत व्यसनाचें विष ओतलें जातें, मिठाच्या व्यापारावर अजस्र कराचा बोजा पडतो; जमीनमहसुलाची वसुली दंडुकशाहीनें केली जाते, कोट्यवधी लोक दारिद्र्यांत होरपळतात व लाखों जीवांचा दुष्काळांत नाश होतो, ती राज्यपद्धति अमानुष म्हटली पाहिजे. मग अशा राज्यपद्धतीमुळें जनतेमध्यें असंतोष पसरला तर त्यांत नवल कसचें ? मी तर म्हणतों कीं, आमच्या संस्थानिकांनीं इंग्रज सरकारविरुद्ध समशेर उपसली तर त्याचासुद्धां दोष या राज्यपद्धतीच्याच माथीं आहे. ”





बंडाची भाषा

प्रथम ब्रिटिश पार्लमेंट, मग ब्रिटिश जनता यांना जागें करण्याचा उद्योग दादाभाईंनीं कमालीचा केला. पण तें अरण्य-रुदन ठरलें. तेव्हां अखेरचें शस्त्र म्हणजे स्वावलंबन. त्याची कास त्यांनीं धरली. न्या. रानडे, राजा रायमोहन राय इत्यादी पुढाऱ्यांनीं पूर्वीपासूनच हिंदी लोकांची जागृति करण्यास सुरुवात केली होतीच. दादाभाईंनींहि १८५२ सालीं ‘ मुंबई इलाखा सभा ’ नांवाची संस्था स्थापन केली. पुण्यास १८६७ मध्यें ‘ सार्वजनिक सभा ’ अस्तित्वांत आली. हिंदुस्थानांतील

कलकत्ता, मद्रास वगैरे शहरांत ‘ ईस्ट इंडिया असोसिएशन, ’ ‘ महाजन सभा ’ इत्यादि संस्था जन्मास आल्या. त्यांच्या मुखानें हिंदी लोकांच्या राजकीय असंतोषास वाचा फुटली.

शिवाय, देशी भाषांत सुमारें पांचशें वर्तमानपत्रेंहि या वेळीं चालू होतीं. वृत्तपत्रें म्हणजे जनतेचे वाचस्पति !—लोकशाहींतील रणवाद्येंच तीं ! स्वातंत्र्याच्या लढ्यांत त्यांनीं मोठीच कामगिरी बजावली. याच सुमारास व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन यांनीं कडक-लक्ष्मीचा अवतार धारण केला–दडपशाहीची आग हिंदी जनतेवर पाखडली–चळवळ्या बंगाल प्रांताची फाळणी केली. तेव्हां १९०९ च्या मे महिन्यांत दादाभाईंनीं इंग्लंडमध्यें एका सभेंत जाहीर घोषणा केली कीं, “ सरकार व प्रजा यांमध्यें आतां चांगलें युद्ध जुंपलें आहे. या युद्धाचा शेवट हिंदुस्थानाला यश देणाराच होईल. कलकत्ता येथें कर्झनच्या निषेधाची पहिली सभा ज्या दिवशीं भरली; त्या दिवशींच हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा जन्म झाला. ” हें स्वातंत्र्याचें युद्ध इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही आघाड्यांवर लढविणारे दादाभाई यांनीं जनतेच्या मागण्याची तार चढवितां चढवितां ती स्वराज्यापर्यंत नेऊन भिडविली !

वय ८२ वर्षांचें झालेलें ! शरीर सुरकुतलेलें, केस पांढरे झालेले; पण स्वातंत्र्याचें प्रेम मात्र तरुणाइतकेंच जाज्वल्य राहिलेलें ! असे दादाभाई १९०६ सालीं कलकत्ता येथील कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर बसले. राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदाचा मुगुट त्यांनीं आपल्या मस्तकावर तिसऱ्यांदा धारण केला. वार्धक्यामुळें त्यांना

आपलें अध्यक्षीय भाषण नीट वाचतांहि येत नव्हतें; म्हणून ना. गोखले यांनीं तें वाचून दाखविलें. त्या भाषणांत काय होतें? नुसती आग! 'आमच्या देशाच्या कारभाराचीं सर्व खातीं आमच्या हातीं द्या. प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करा.' अशा मागण्या करतां करतां या भीष्माचार्यांच्या मुखांतून पुढील अग्नी-सारखीं तेजस्वी अक्षरें बाहेर पडलीं. "माझ्यावर निराशेचे इतके प्रसंग आले आहेत कीं, माझें अंतःकरण फुटून जाऊन मी बंड उभारलें; तर त्यांत मला आश्चर्य वाटणार नाहीं." १९०६ सालीं आणि बंडाची भाषा? आणि ती कोणाच्या तोंडून? तर इंग्लंडांत अखंड सनदशीर चळवळ करणाऱ्या वयोवृद्ध मुत्सद्याच्या तोंडून! त्यांनीं खणखणीत भाषेंत आपल्या अनुभवाचें सार सांगितलें, तें हें कीं, "सामाजिक, औद्योगिक वगैरे सर्व सुधारणांचें मूळ राजकीय सुधारणा हेंच आहे. स्वराज्याशिवाय दुसरी कोणतीहि राजकीय सुधारणा आम्हांस संतुष्ट करणार नाहीं. आमच्या आशा, आमची शक्ति, आमचा मोठेपणा— सर्व कांहीं स्वराज्यांत सांठविलेलें आहे."

दादाभाईंची ही घोषणा केवढ्या शौर्याची होती! कोंडाणा किल्ल्यावर म्हाताऱ्या शेलारमामानें पळत्या मावळ्यांना परतवून व धीर देऊन स्वतः जो पराक्रम केला; तशीच दादाभाईंची ही बहादुरी! युद्धाचीं साधनें बदललीं, तरी वृत्ति एकच कायम असते. धनुष्य-बाणाऐवजीं ढाल-तरवारी आल्या आणि त्यांची जागा बाँब-तोफा यांनीं घेतली, तरी शौर्याची भावना सैनिकांच्या

अंतःकरणांत अवश्य असतेच. हिंदी पुढाऱ्यांनीं आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत विचारांचीं शस्त्रें वापरलीं होतीं. या वैचारिक युद्धालाहि त्याग, शूरत्व, कष्ट सोसण्याची तयारी–प्रसंगीं बलिदान करण्याचीहि हिंमत–इत्यादि गुणांची गरज असते. ते गुण परतंत्र हिंदी राष्ट्रानें ठसठशीतपणें प्रगट केले. किंबहुना, स्वातंत्र्याच्या लढयामुळें त्याच्या अंगचे हे गुण जोरानें उफाळून आले.

स्वराज्य हेंच एकमेव ध्येय जसें कलकत्याच्या कॉंग्रेसमध्यें ठरलें, तसेंच त्याचें साधनहि निश्चित झालें–तें म्हणजे लोक-जागृति.

"Agitate, Agitate and again Agitate."

(चळवळ–जोराची चळवळ–अधिक जोराची चळवळ)

हाच एक मंत्र त्यांनीं राष्ट्राला पढविला. 'हिंदुस्थानाच्या अगदा कोनाकोपऱ्यांतील लोकांपर्यंत राजकीय चळवळीची लाट पोचविली पाहिजे' असा आदेश त्यांनीं सर्वांना दिला. पण चळवळ म्हणजे काय? या प्रश्नाचेंहि स्पष्ट उत्तर दादाभाईंनीं याच भाषणांत रोखठोक भाषेंत दिलें आहे. ते म्हणतात, "चळवळ करणें म्हणजे ज्ञान देणें. हिंदी लोकांना आपले हक्क काय आहेत व ते कसे मिळवावेत, याचें ज्ञान द्या आणि ब्रिटिश जनतेला हिंदी लोकांचे हक्क कोणते व ते त्यांना त्यांनीं कां द्यावें याचें ज्ञान द्या. आम्ही कांहीं बोललोंच नाहीं, तर सरकार म्हणतें, हे संतुष्ट आहेत. बरें आम्ही बोलूं लागलों, तर आम्ही चळवळे, उपद्व्यापी ठरतों. पण आम्ही आमचें मत निर्भयपणें मांडलेंच पाहिजे."

१८९६ सालीं दादाभाईंनीं वेल्बीसाहेबांस विनविलें होतें कीं, 'आम्हांस साम्राज्याची खरी भागीदारी द्या.' उत्तर?— नकार! १९०५ सालीं सर हेन्री कॉटन यांना त्यांनीं ऐकविलें कीं, "हिंदी लोकांस कोणत्या तरी प्रकारची स्वायत्तता मिळवून दिली पाहिजे." फल काय? शून्य! म्हणून त्यांनीं १९०६ सालीं कलकत्ता कॉंग्रेसमध्यें स्वराज्याची घोषणा व बंडाची भाषा उच्चारून सर्व हिंदुस्थानांत चैतन्याची वीज संचरून दिली. त्यामुळें इंग्लंडांतील ब्रिटिश मुत्सद्दी चपापून गेले. लो. टिळकांसारख्या जहाल पुढाऱ्यांना तर अपरंपार हर्ष झाला. आणि तो कां होऊं नये? त्यांनीं आपल्या स्वतःच्या अंतःकरणांत जे विचार खेळविले होते, त्यांनाच या राष्ट्र-पितामहाच्या मुखानें वाचा फुटली होती ना?

लोकांच्या सामर्थ्यावर स्वराज्याची प्राप्ति करून घेणें हें लोकमान्यांचें धोरण. त्यासाठीं ते लोकसमुदायाला बरोबर घेऊन चालत. त्यांच्यामध्यें जागृति व संघटना व्हावी, म्हणून त्यांनीं गणपति-उत्सव व शिवाजी-उत्सव सुरू केले. त्यामध्यें 'भारतीय क्रांतीचे पहिले स्फुलिंग' दिसतात, असें चिरोल या इंग्रज लेखकानें ओळखलें. पण आमच्यांतील कांहीं विद्वानांना लोकमान्यांच्या कार्यांतील हें तेज कांहीं उमगलें नाहीं. म्हणून ते त्यांना 'तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी' म्हणून हिणवीत. पण आतां काय झालें? तर विद्वानांतील विद्वान, वृद्धांतील वृद्ध आणि मुत्सद्यांतील मुत्सद्दी असे सर्वांना वंदनीय असणारे दादाभाई हेच लो. टिळकांची स्वराज्याची घोषणा व बंडाची भाषा उच्चारूं लागले! तेव्हां

हर्षाची आरोळी ठोकून लोकमान्य आपल्या 'केसरी' पत्रांत लिहितात, "स्वराज्य—लोकांनीं आपण चालविलेलें स्वराज्य—आपणांस प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा मार्ग नाहीं. असें नेटानें, स्पष्टपणें व सोप्या भाषेंत, गर्हिवरून दादाभाई यांनीं जेव्हां कॉंग्रेससभेच्या व्यासपीठावरून अखेरीस सांगितलें, तेव्हां कोणी वृद्ध देवदूत आपल्या तरुण पिढीस शेवटचा उपदेश करण्याकरितांच अवतरला आहे कीं काय, असा क्षणभर भास झाला."

या "वृद्ध देवदूता"नें तरुण टिळकांचें धैर्य, करारीपणा व लोकसंग्रह हे गुण केव्हांच ओळखले होते. १९०४ सालीं लंडनहून त्यांनीं टिळकांना पत्र पाठवून "तुमचें काम फार चांगलें झालें आहे; तुम्ही छळहि पुष्कळ सोसला." असा त्यांचा गौरव मुक्तकंठानें केला आणि आपल्या अनुभवाचें सार म्हणून सांगितलें कीं, "पुढील राजकारणाच्या क्षेत्रांत युद्ध करण्याचें आपलें शस्त्र म्हणजे राष्ट्रीय सभा हेंच आहे." हा गुरुमंत्र ध्यानीं ठेवूनच टिळक स्वातंत्र्याचे लढे लढत राहिले.



नवीं शस्त्रें

"शत्रूला साष्टांग नमस्कार घालण्यापासून त्याचें डोकें उडविण्यापर्यंत कोणत्याहि उपायानें स्वराज्य मिळविण्याची माझी तयारी आहे." अशी रण–गर्जना लो. टिळकांनीं केली. त्यांनीं स्वराज्य हेंच एक आपल्या जीविताचें ध्येय मानलें होतें. तोच त्यांचा देव होता ! त्यापायीं त्यांनीं आपलें सर्वस्व वाहिलें होतें. 'आठ आणे तयारी लोकांची दिसली, तरी बाकीच्या आठ आण्यांचा भार देवावर टाकून मी बंड पुकारीन.' अशी घोषणा ते कधीं कधीं करीत. सशस्त्र बंड हाहि

परतंत्र राष्ट्राचा हक्कच आहे असें ते मानीत. पण आपला देश ब्रिटिशांनीं निःशस्त्र केलेला आहे, याची जाणीव त्यांना होती.

जगांतील इतर राष्ट्रांचे आधुनिक इतिहास त्यांनीं वाचलेले होते. त्यावरून आपल्या दूरदृष्टीनें त्यांनीं आपल्या मनाशीं असा पक्का सिद्धांत बांधला होता कीं, लोकांची जागृति व संघटना हींच आपल्या स्वराज्य-प्राप्तीचीं अमोघ हत्यारें होत. "लोकांचा अंमल" येथें सुरू झाला पाहिजे असा धोशा त्यांनीं लावला. गोऱ्या सनदी नोकरांचा अंमल जाऊन हिंदी अधिकाऱ्यांची किंवा एतद्देशीय संस्थानिकांची सत्ता येथें अस्तित्वांत आली तरी तें खरें स्वराज्य नव्हे, हा सिद्धांत ते पुनः पुनः सांगत.


लोकांमधील चैतन्य झोंपलेलें आहे—मरगळलेलें आहे, तें जागें केलें पाहिजे यासाठीं त्यांनीं हाडाचीं काडें केलीं. १८९६ सालीं महाराष्ट्रांत भीषण दुष्काळ पडला. तेव्हांहि त्यांनीं ही लोकशक्तीच जागी करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीं ते पुणें नगरपालिकेचे सभासद, मुंबई विद्यापीठाचे सदस्य व मुंबई विधिमंडळाचे 'नामदार' अशा विविध नात्यांनीं सरकार-दरबारींहि वजन ठेवून होते. लोकांच्या हृदयांत तर 'डोंगरीच्या तुरुंग-' वासापासून त्यांनीं ठाण मांडलेंच होतें. 'सार्वजनिक सभेचीं' सूत्रें त्यांच्या हातीं आलीं होतीं.

या सर्व साधन-संपत्तीचा उपयोग लोकमान्यांनीं लोकांना आपल्या हक्कांची जाणीव देण्याकडे व त्या हक्कांच्या प्राप्तीसाठीं झगडण्याची स्फूर्ति पुरविण्याकडे केला. चुलींत विझत चाललेले

निखारे काठीनें हलवून फुलवावे व प्रदीप्त करावे, त्याप्रमाणें लोकमान्यांनीं दुष्काळाच्या निमित्तानें जनतेमधील चैतन्य खडबडून जागें केलें. सरकारानें तयार केलेल्या 'फॅमिन कोड' ची (दुष्काळाच्या कायद्याची) माहितीच लोकांना नसे, मग त्या कोडाचा फायदा घेण्याची बुद्धि कोठून येणार? व त्यासाठीं झगडण्याची वीरश्री तरी कशी उत्पन्न होणार? म्हणून टिळकांनीं 'सार्वजनिक सभेतर्फें' प्रथम त्या कोडाचें भाषांतर केलें व सहा-हजार प्रति छापून घेऊन त्या लोकांमध्यें वाटल्या. लोकांमध्येंच काय, पण गोऱ्या कलेक्टरांच्या टेबलावरहि शंभर शंभर प्रति जाऊन पडल्या! त्या पाहतांच गोरे अधिकारी रागानें लाल झाले! कारण, लोकांचें अज्ञान हीच त्यांची खरी तटबंदी. तिला टिळकांच्या या तोफगोळ्यानें खिंडार पाडलें! हें पहातांच कांहीं कलेक्टरांनीं त्या प्रति फाडल्या, कांहींनीं त्या जाळल्या, तर कांहींनीं त्या जशाच्या तशा 'सार्वजनिक सभेकडे' परत पाठविल्या!

परक्या सरकारच्या कायद्याचे कुंपणांत उभे राहूनच टिळक जनतेला चळवळ करण्यास प्रवृत्त करीत. हा तारेवरील नाच त्यांना किती कौशल्यानें करावा लागे, हें दुष्काळाच्या वेळीं दिसून आलें. "खुद्द महाराणीसाहेबांचाच असा हुकूम झालेला आहे कीं, दुष्काळांत लोकांस मरूं देऊं नका. आतां यापेक्षां आपणांस जास्त तें काय पाहिजे? आमचे पैसे सरकारजवळ आहेत व सरकार आपलें कर्तव्य करण्यास तयार आहे; मग आम्ही उपाशी मेलों, तर त्याचा दोष आमचेकडे नव्हे काय?"

असें उपरोधिक लिहून, सरकारला मोठेपणा देऊन, त्यांना त्यांच्याच शब्दांनीं बांधून, टिळक लोकांना चिथावणी देतात, " त्यांनीं फक्त एवढेंच करावें कीं, सरकारानें ज्या ज्या गोष्टी करतो म्हणून कबूल केलें आहे, तितक्या त्यांच्याकडून पुऱ्या करवून घ्याव्या." यांत बेकायदेशीर काय आहे? पण लोकांनीं सरकारवर दडपण आणण्याची चिथावणी त्यांत स्पष्ट आहे. 'दाता खरा असल्यास टिकेल, नाहीं तर त्याचा कच्चेपणा तरी अनुभवास येईल.' असा सरकारबद्दलचा संशयहि ते सूचित करतात. वेळ आली, प्रसंग ठेपला; तेव्हा ही आडपडद्याची भाषा सोडून टिळक रोखठोक भाषेनें कडाडून लिहीत कीं, " हे दिवस दांडगाईचे नाहींत, कायद्याचे आहेत." एकाच लेखांत पुनः पुनः या सिद्धांताचा उच्चार करून टिळक तो वाचकांच्या गळीं उतरवीत असत.





पहिला जय

ठाणें जिल्ह्यांतील उंबरगांव पेट्यांत खत्तलवाड नांवाचें गांव आहे. तेथील एक सभा इतिहासप्रसिद्ध झाली आहे. टिळकांच्या योजनेप्रमाणें पुण्यांतील 'सार्वजनिक सभे'चे 'मुखत्यार एजंट' गांवोगांव फिरून सरकारी कायद्याची लोकांना माहिती देत होते व त्या कायद्याचे लाभ आपल्या पदरांत पाडून घेण्यास जनतेला शिकवीत होते. त्याप्रमाणें प्रा. अच्युतराव साठे उंबरगांव येथें व्याख्यानासाठीं गेले. कोळी, वारली वगैरे दोन हजार गांवकरी मंडळी सभेस जमली. सरकारनेंहि येथें सामना देण्याचें ठरविलें. त्यांचे पोलिस तर हातांत भरलेल्या बंदुका

घेऊन उभे राहिलेच; पण त्याशिवाय फौजदार, महालकरी व असिस्टंट कलेक्टर हे अधिकारीहि तेथें दाखल झाले. कशासाठीं? तर टिळक सांगतात, "मनांत हेतु कीं, कोणी एकादा शब्द चुकून बोलला किंवा कांहीं थोडीशीं गडबड केली कीं, गोळी घातलीच!" प्रा. साठे यांनीं तीन तास अस्खलित भाषण केलें.

तीन तास तें भाषण लक्षपूर्वक ऐकत कलेक्टर उभे राहिले होते. साठे यांनीं लोकांना 'तुमचीं पिकें बुडालीं असलीं तर तुम्ही सरकारास सारा देऊं नका' असा कर-बंदीचा स्वच्छ उपदेश केला. त्यांच्यावर सरकारानें पुढें खटला भरला, पण ते निर्दोषी ठरून सुटले. या संस्मरणीय सभेचा वृत्तांत अग्रलेखांत देऊन टिळकांनीं त्याला असा लांबलचक मथळा दिला कीं, "पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यांत भरलेली रयतेची जंगी सभा." यांतील प्रत्येक शब्द हेतुपूर्ण आहे—सरकाराची क्रूरता व अन्याय ओरडून सांगणारा आहे–किंबहुना, सरकारावर रोखलेली ती एक लांब पल्ल्याची तोफच आहे! लोकमान्यांची लेखणी म्हणजे प्रभावी शस्त्र कशी असे, याचा हा उत्तम नमुनाच होय.

'एका हातांत फॅमिन रिलीफ कोड, दुसऱ्या हातांत अर्ज आणि मनांत त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय अशी जेव्हां रयतेची स्थिति होईल, तेव्हांच त्यांची या दुष्काळांत दाद लागेल' असें मार्गदर्शन करून टिळकांनीं लोकांना "शंभरदां नाहीं–हजारदां ओरडावयास" प्रवृत्त केलें. त्यामुळें लोकांचें सामर्थ्य प्रगट झालें. जनतेंतील भीति, अज्ञान व विस्कळितपणा घालवून धैर्य, जागृति

व संघटना निर्माण करण्यास टिळकांनीं दुष्काळासारख्या प्रसंगाचा चांगला उपयोग करून घेतला. “ भ्याल तितकें फसाल. न भितां, न डगमगतां, कायदेशीर रीतीनें काम चालू द्या.” अशी धीराची व कृतीची प्रेरणा ते जनतेला देत राहिले. शेवटीं “ मेलों तरी बेहेत्तर पण कायद्यानें दिलेल्या सवलतीचें पुरें माप आम्ही आपल्या पदरांत पाडून घेऊं. ” असा निर्धार लोकांमध्यें त्यांनीं भिनविला. अशा निर्धारांतूनच प्रत्यक्ष स्वातंत्र्याचे व्यापक लढे निर्माण होतात.

प्रासंगिक किंवा स्थानिक गाऱ्हाण्यांवर लोकांचे लढे उभारून त्यांची शक्ति वाढवावयाची आणि ती वाढलेली शक्ति अखेर राष्ट्राच्या स्वातंत्र्य-संपादनाच्या कामीं योजावयाची हीच जगांतील सर्व क्रांति-शास्त्रांची गुरुकिल्ली आहे. ती लो. टिळकांनीं अचूक हेरली आणि जनतेच्या हातीं दिली. तिचा उपयोग होऊन सरकारानें जनतेच्या इच्छेपुढें शरणागति स्वीकारली. ‘ जेथें पीक बारा आणे बुडालें आहे, तेथें स्वतः शेती करणारास यंदा साऱ्याची तहकुबी मिळेल.’ असा निर्णय सरकारानें जाहीर केला. लोक-सामर्थ्याचा हा विजय होय. “ लोकांच्या सोईकरितां अधिकारी-वर्ग आहे, अधिकाऱ्यांच्या सोईकरितां ब्रह्मदेवानें लोकांस जन्मास घातलें नाहीं. ” हें लोकशाहीचें तत्त्व लोकमान्यांनीं लोकांच्या व सरकाराच्या बुद्धीवर या प्रसंगीं ठसठशीतपणें ठसविलें.


स्वराज्याच्या चळवळीला सामुदायिक व लढाऊ स्वरूप द्यावें व तें सतत कायम टिकवावें यांवर टिळकांचा कटाक्ष. ते असा आदेश देतात कीं, “ इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत

सबंध वर्षभर एकसारखी चळवळ सुरू ठेवून इंग्रज लोकांस सळो कीं पळो असें केल्याखेरीज ‘ भीक नको पण कुत्रा आटप ’ या न्यायानें, यांस कांहीं तरी द्या आणि ही ब्याद या देशांतून एकदां जाऊं द्या अशा पेंचांत त्यांस घातल्याखेरीज तुम्हांस यशप्राप्ति व्हावयाची नाहीं ” तसेंच,

“ ज्याप्रमाणें कायदेशीर जुलूम लोकांवर करण्यांत येतो, त्याप्रमाणें शांततेनें, स्थिरबुद्धीनें आणि संकटास धिमेपणानें तोंड द्यावयाचें पण हार जायचें नाहीं या दृढनिश्चयानें **जुलमी हुकुमांचा प्रतिकार प्रजेस करतां येतो.**”

असा लोकशाहीचा शक्तिशाली धडा लो. टिळकांनीं जनतेस पुनः पुनः पढविला.





रणगीताचा भाग

युद्ध म्हटलें कीं त्याला सेनापती लागतो, सैनिक लागतात, शस्त्रें लागतात, निशाण लागतें आणि तसेंच लागतें रणगीतहि! हिन्दी लढ्याचें ध्येय स्वराज्य हें ठरलें. त्याचीं शस्त्रें स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हीं निश्चित झालीं. सारी जागृत जनता हेंच ह्या लढ्यांतील सैनिक; आणि दादाभाई–

रानडे–राममोहन राय–सुरेन्द्रनाथ–फेरोजशहा–गोखले–टिळक–लजपतराय–अरविंदबाबू इत्यादि सेनापती निरनिराळ्या आघाड्यांवर राष्ट्राच्या स्वातंत्र्याची लढाई खेळत होते. त्या सर्वांचें रणगीत एकच होतें; तें कोणतें ?


वंदे–मातरम् !

बंगाली कादंबरीकार बंकीमचंद्र ह्यांनीं ' आनंदमठ ' या आपल्या कादंबरींत क्रान्तिकारक संतान ' वंदे मातरम् ' हें गीत म्हणत रानावनांतून फिरत असल्याचें दाखविलें आहे. तें गीत भारताचें राष्ट्र–गीत ठरलें. स्वातंत्र्याच्या लढ्यास त्या गीतानें असंख्य तरुणांना अपार स्फूर्ति दिली. ' वंदे-मातरम् ' ह्या दोन शब्दांचा तरुण अंतःकरणांवर जादूसारखा परिणाम होत असे. स्वातंत्र्याचा तो महान मंत्र गांवागांवांतून गर्जूं लागला–घरांघरांतून घुमूं लागला. पण राम-नामाची भीति जशी भूत-पिशाच्चांना वाटते, तशी त्याची धास्ती सरकारी अधिकाऱ्यांनीं घेतली. परवांपरवांपर्यंत एखाद्या जाहीर सभेच्या शेवटीं, ' वंदे-मातरम् ' गीत सुरू झालें कीं, सरकारी अधिकारी आणि पेन्शनरसुद्धां सभागृहांतून पळ काढीत. नभोवाणीनें 'वंदे मातरम्' वर १९४७ पर्यंत बहिष्कारच घातला होता. मग १९०५–६ सालच्या त्या सुलतानशाहींत ' वंदे मातरम् ' वर सरकारचा रोष किती असेल ?

पूर्व बंगालचे गव्हर्नर फुल्लर ह्यांनीं असा हुकुमच काढला कीं, ' वंदेमातरम् 'ची घोषणा कोणीहि करूं नये. कारण त्यायोगें शांततेचा भंग होतो. हा हुकूम बेकायदा आहे असें लोकांचें

म्हणणें. त्याविरुद्ध सत्याग्रह करण्याचें पुढाऱ्यांनीं ठरविलें, त्यासाठीं बारिसाल येथें १९०६ सालीं प्रांतिक परिषद भरली. हजारों लोक जमले. विद्यार्थी व नागरिक, स्त्रिया व पुरुष रस्त्यारस्त्यांनीं 'वंदेमातरम्' च्या घोषणा करीत निर्भयतेनें हिंडूं लागले. चेंडू जितक्या जोरानें आपटावा तितक्या जोरानें तो उलट उसळी घेतो, हा अनुभव सरकाराला आला. कंसाला कृष्णाचें किंवा हिरण्यकशिपूला नारायणाचें नांव आपल्या कानावर पडावयास नको होतें; तीच वृत्ति 'वंदे मातरम्' च्या बाबतींत ब्रिटिश सरकाराची झाली होती. पण हीं तिन्ही पवित्र, शुभ, मंगल नांवें कधींच दडपलीं गेलीं नाहींत; उलट दशदिशा त्या नांवांनींच दुमदुमूं लागल्या. पाठीवर फटके बसले तरी हिंदी तरुणांच्या मुखांतून 'वंदेमातरम्'चा राष्ट्र-मंत्र प्रगट होईच!

विद्यार्थ्यांनीं चळवळींतच पडूं नये अशी मुस्कटदाबी करणाराहि एक हुकूम सरकारानें काढला. पण तो ऐकतो कोण? सर्व चळवळींच्या अग्रभागीं विद्यार्थीच खडे! 'वंदे मातरम्'चा जयघोष करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मिरवणुकीवर पोलिसांनीं लाठीमार केला, तरी तो घोष चालूच राहिला. सुरेंद्रनाथांना सरकारनें अटक केली, तरी तो घोष थांबला नाहीं. 'वन्दे मातरम्' चा हा ध्वनि रस्त्यारस्त्यावर, घराघरांतून, सभासभांतून ऐकूं येऊं लागला कीं गोऱ्या सोजीराला वाटे 'बांधो, मोरा' असेच सारे लोक म्हणत आहेत!



देवाचा अवतार

अध्यात्माच्या भूमिकेवरून राजकारण खेळावयाचें आणि राजकारणाच्या रणांगणावर सशस्त्र क्रांतीचें होमकुंड पेटवावयाचें—असा पंथहि या वेळीं देशांत बळावत चालला होता. लॉर्ड लिटन, लॉर्ड कर्झन इत्यादि अरेराव व्हाइसरॉयांनीं दडपशाहीचा कहर केला आणि लोकांना सळो का पळो करून सोडलें. त्या आगीचा प्रतिकार कोणी युक्तिवादाच्या गुलाबपाण्यानें

करूं लागले, तर कोणी लोकमताच्या दडपणानें करूं लागले. सारें राष्ट्र जागें झालें व एका निशाणाखालीं खडें झालें. ईश्वरदर्शनाचा ध्यास घेतलेले श्री. अरविंद घोष यांनींहि राजकारणांत उडी घेतली.

त्यांचा जन्म इंग्लंडमध्यें झाला. त्यांचें शिक्षणहि तेथील स्वतंत्र वातावरणांत झालेलें. स्वातंत्र्यप्रेमानें व स्वाभिमानानें त्यांच्या देहाचा कण न् कण नाचत होता. आय्. सी. एस्. परीक्षेंतहि ते उत्तीर्ण झाले. फक्त घोड्यावर बसण्यांत ते यशस्वी झाले नाहींत. या ' घोड–चुकी ' मुळें सरकारी नोकरीला ते आंचवले; पण राष्ट्रीय स्वातंत्र्याला व आध्यात्मिक मोक्षाला महान लाभ झाला. ' वंदे मातरम् ' या पत्रांतील त्यांचे लेख म्हणजे स्वातंत्र्याच्या विद्युल्लहरीच होत्या.

" तुम्ही स्वतंत्र व्हा, हा परमेश्वराचाच आदेश आहे; तुम्ही स्वातंत्र्य संपादन केलेंच पाहिजे. " हा आध्यात्मिक भूमिकेवरचा त्यांचा राजकीय संदेश भाविक बंगाली तरुणांना थरारून सोडत होता. " देशाभिमान हा देवाचा या युगांतील अवतार आहे. तो नष्ट करणें कोणासच शक्य नाहीं. ही दैवी शक्ति आपलें अवतार–कार्य पूर्ण केल्याशिवाय अंतर्धान पावणार नाहीं. " अशा आत्मविश्वासाचें वारें त्यांनीं साऱ्या राष्ट्रांत पसरून दिलें.

आकाशांतील नक्षत्राप्रमाणें तळपणारी त्यांची बुद्धि त्यांच्या लेखांतून झळकत आहे. त्यामुळें तरुण हिंदुस्थान त्यांच्या तेजानें आकर्षिला गेला व स्वातंत्र्यासाठीं लढण्यास सिद्ध झाला. " हें आमचें कार्य नसून, आमच्यापेक्षां प्रचंड अशी एक शक्ति आम्हांला

पुढें लोटीत आहे व सर्व बंधनें तुटून पडून हिंदुस्थान सर्व जगांत स्वतंत्र राष्ट्र म्हणून नांदूं लागेपर्यंत हें कार्य करीत राहण्यास ती आम्हांस प्रेरणा देत आहे." असा उत्साह अरविंदबाबू आपल्या लेखाभाषणांनीं साऱ्या देशांत निर्माण करीत होते.

'वंदेमातरम्'मधील एका लेखांत देशाभिमानाची श्रीकृष्णाशीं तुलना करतांना ते लिहितात,

"श्रीकृष्णाची वाढ ज्याप्रमाणें राजदरबारीं झाली नाहीं, किंवा ब्राह्मणाच्या पाठशाळेंत त्याचें ज्ञान वाढलें नाहीं, तर तुच्छ गणलेल्या दरिद्री व अज्ञानी जनतेच्या अज्ञात घरांत त्याची वाढ झाली; त्याचप्रमाणें हा राष्ट्रवाद संन्याशांच्या गुहेंत, फकिरांच्या वेषांत, तरुणांच्या व मुलांच्या अंतःकरणांत हळूहळू वाढत आहे. ....हा राष्ट्रधर्म म्हणजे एक अवतार आहे. त्याचा अंत होणार नाहीं. ती एक परमात्म्यानें योजलेली शक्ति आहे. ती आपलें ईश्वर-नियोजित कार्य केल्याखेरीज विश्वांतील चिच्छक्तींत जाऊन पुनः विलीन होणार नाहीं."

राष्ट्राचें साध्य व साधन कोणतें आणि त्याचें अंतिम ध्येय काय याचेंहि स्पष्ट निदर्शन त्यांनीं त्या वेळीं आपल्या लेखांत केलें आहे. तें असें—

"स्वराज्य—परकीय नियंत्रणापासून निर्भेळ असें पूर्ण स्वातंत्र्य—हें आमचें ध्येय आहे. स्वावलंबन आणि निःशस्त्र प्रतिकार हीं आमचीं साधनें आहेत. आमच्या देशभक्तीच्या ध्येयाचें अधिष्ठान

प्रेम आणि बंधुभाव हीं असून त्यांत मानवजातीच्या अंतिम ऐक्याचाहि अंतर्भाव होतो."

बंगालचे दुसरे पुढारी बाबू बिपिनचंद्र पाल. यांनीं तर संपूर्ण स्वातंत्र्याचा घोष १९०६ सालींच केला. 'वंदे मातरम्'मधील एका लेखांत ते म्हणतात, "आमचें ध्येय स्वातंत्र्य हें आहे. या स्वातंत्र्याचा अर्थ परकीय नियंत्रणाचा पूर्ण अभाव. या स्वातंत्र्याचें साधन कोणतें? तर सत्याग्रह. याचा अर्थ सरकारला कोणतेंहि खुषीचें सहकार्य देण्यास समाजानें निश्चयानें नकार देणें." हें साध्य व हें साधन– दोन्हीहि पूर्णपणें सनदशीर असल्याचा निर्वाळाहि पाल बाबूंनीं दिला होता.

संप, बहिष्कार, कर-बंदी, असहकारिता इत्यादि स्वातंत्र्याच्या बहुतेक सर्व शस्त्रास्त्रांचीं वर्णनें लो. टिळकांच्या लेखांत आढळतात. 'प्रजेचा निग्रह आणि संप यांची शक्ति कांहीं सामान्य नाहीं' असें तत्त्वज्ञान सांगून त्याचा दाखला म्हणून त्यांनीं रशियाचें उदाहरण दिलें आहे. त्या वेळीं रशियाची झारशाही जगांत गाजली होती. पण "तिलाहि मद्दयास येऊन प्रजेचें म्हणणें बरेचसें कबूल करावें लागलें." असा इतिहास सांगून टिळक लिहितात, "मुंग्यांच्या अंगांतहि हत्तीला जेरीस आणण्याचें सामर्थ्य आहे ही गोष्ट निर्विवाद सिद्ध झाली आहे! हिंदुस्थानांत अशा प्रकारें लढाई जुंपण्याचीं नुकतींच कोठें थोडींबहुत चिन्हें दिसूं लागलीं आहेत."



लाल-बाल-पाल

एकीकडे जनतेची प्रतिकार—शक्ति वाढत होती आणि दुसरीकडे सरकारी दडपशाहीची कमान चढत होती. दोन्ही दळें युद्धास सिद्ध झालीं होतीं. खलितें—प्रतिखलितें पाठविले गेले. रणशिंगें फुंकलीं गेलीं. गोळागोळीला व हाणामारीला सुरुवात होण्याची वेळ आली. त्यांतहि बंगालची रणभूमि विशेष गाजली. सुरेंद्रनाथ बानर्जी, अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल इत्यादि बंगाली पुढाऱ्यांनीं स्वातंत्र्याचें निशाण उंच उंच चढविलें होतें. क्रांतिकारकांचे गुप्त कटहि तेथें शिजत होते.

युरोपियन अधिकाऱ्यांना गोळी घालून किंवा बाँब टाकून ठार करण्यासाठीं बंगाली तरुण जिवावर उदार होत. 'वंदे मातरम्' हें रण–गीत तेथलेंच. सारा बंगाल पारतंत्र्याच्या द्वेषानें पेटला, स्वातंत्र्याच्या प्रेमानें फुलला. त्याला पाठिंबा देण्यास महाराष्ट्र व पंजाब हे प्रांत पाठच्या भावासारखे उभे होते. महाराष्ट्राचे बाळ गंगाधर टिळक व पंजाबचे लाला लजपतराय यांनीं बंगालचे बिपिनचंद्र पाल यांच्या मोहिमेला जोराची कुमक पोंचविली. म्हणून साऱ्या देशांत तेव्हां "लाल–बाल–पाल" ही त्रिमूर्ति दत्तात्रेयाप्रमाणें पूज्यता पावली.

१९०० सालीं लाहोर येथें कॉंग्रेस भरली असतां लो. टिळक व लालाजी यांची पहिली भेट झाली. एकाच राजाचे दोन आघाडीवरील दोन सेनापतीच जणुं एकमेकांना भेटले. दोघेहि समान ध्येयाचे, समान वृत्तीचे व समान कार्य केलेले. दोघेहि सिंहासारखे शूर, पोलादासारखे खंबीर आणि पर्वतासारखे अभेद्य. स्वराज्याचें अंतिम ध्येय दोघांच्याहि डोळ्यापुढें खेळे. लोकजागृतीचें स्वावलंबी साधनच दोघांनींहि हातीं धरलें होतें. परक्या सरकारवर दोघेहि सारख्याच तीव्रतेनें तुटून पडत. लोकमान्यांच्या चित्तांत शिवाजीमहाराज खेळत, तर लालाजी इटालीच्या मॅझिनीला आपला गुरु मानीत. श्रीसमर्थ रामदासांचा महाराष्ट्रधर्म लोकमान्यांनीं वाढीस लावला, तसा स्वामी दयानंदांचा 'आर्यसमाज' हा लालाजींच्या जीवनाचा विषय झाला. लालाजींनीं शिवाजी-महाराजांचेंहि चरित्र लिहिलें, यावरून त्यांच्या विचारांची दिशा


कळते. लोकमान्यांचा जसा 'केसरी', तसा लालाजींचा 'पंजाबी.' या दोन्ही पत्रांचा तेजस्वीपणा व लोकप्रियता पाहून सरकारनें त्यांच्यावर खटले भरले.

'लालाजींच्या पाठीमागें एक लाख अत्याचारी अनुयायी तयार आहेत.' अशी भुमका एका निमसरकारी वृत्तपत्रानें प्रसिद्ध केली. दुसऱ्या इंग्रजी पत्रानें अशी कंडी पिकविली कीं, लालाजींनीं हिंदी सैन्यांत फंदफितुरी केली. ब्रिटिश सरकारला लालाजी 'भयंकर शत्रु' वाटूं लागले. आपल्या सिंहासनाखालीं ठेवलेला एक प्रचंड सुरुंग असे भासूं लागले—लोकांत लालाजींचें वजन एकसारखें वाढत होतें. १९०६ सालीं ते व ना. गोखले यांचें हिंदी शिष्टमंडळ इंग्लंडला गेलें. यापुढें लालाजी मोकळे राहतील तर आपल्याविरुद्ध रान पेटवितील, लोक उठवितील अशी धास्ती सरकारी अधिकाऱ्यांनीं घेतली. त्यांनीं त्यांना उचलण्याचें ठरविलें. १९०७ सालीं सरकारनें लालाजींना हद्दपार केलें!

"लालाजींसारखा देशभक्त हद्दपार होतो आणि लॉर्ड मिंटो अजून कसा जगतो?" असे संतापाचे उद्गार लोकमान्यांनीं आपल्या एका अनुयायाजवळ काढले. सिंहगडाहून ते नुकतेच आले होते. अंगरख्याचे बंद सुटेनात म्हणून ते तोडीत हा पुरुषसिंह असें बोलला. त्यांचा क्रोध उकळूं लागला. हद्दपार करण्यापूर्वीं लालाजींना अटक करण्यासाठीं सरकारनें केवढा बंदोबस्त ठेवला होता! इतिहास–काळांत एकादा किल्ला सर करण्याइतकी जंगी तयारी सरकारनें केली होती. पोलिसांचें हत्यारबंद पथक तर

सज्ज होतेंच, पण लष्करहि खडें होतें—आणि तेंहि तोफ-खान्यासहित ! पण लालाजींची वृत्ति थेट लोकमान्यांसारखी—खवळलेल्या समुद्रांत स्थिरपणें प्रकाशत रहाणाऱ्या दीपस्तंभासारखी ! आगगाडींत, कडेकोट पोलिस-पहाऱ्यांत, अकल्पित अटकेनंतर, अज्ञात भवितव्याकडे नेले जाणारे लालाजी गाढ झोपीं गेले ! लो. टिळकांनाहि १८९७ सालीं तुरुंगात अशीच झोंप लागली असल्याचें दाजीसाहेब खरे यांना आढळून आलें ! दोघेहि सारखेच स्थितप्रज्ञ. दोघेहि खरे कर्मयोगी !

अशा थोर राष्ट्र-भक्तांबद्दल सर्व राष्ट्रालाच आदर वाटे; विशेष म्हणजे सहृदय सरकारी नोकरांनाहि ! लालाजींना आगगाडींतून पकडून नेत असतां एका मुसलमान शिपायानें एका स्टेशनावर स्वतःच्या पैशानें कांहीं केळी विकत घेतलीं व तीं लालाजींपुढें नम्रतेनें ठेवलीं. लालाजींनीं त्यांतील फक्त एक केळ घेतलें व खाल्लें. पण तेवढ्यानें त्या शिपायाचें समाधान होईना. ‘ सारीं केळें आपल्यासाठींच आहेत—तीं आपण खा ’ अशी भक्तिभावानें त्यानें प्रार्थना केली. नंतर त्यानें त्यांचे पाय घट्ट धरले व आपल्या अश्रूंनीं न्हाणिले. आपल्यासाठीं—आपल्या राष्ट्रासाठीं—राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं हालअपेष्टा सोसणारा हा नर-वीर आपला देवच आहे असें त्या शिपायास वाटूं लागलें—देशांतील सर्वसामान्य जनतेलाहि असेंच वाटे. आणि म्हणूनच सरकारला त्यांचें भय वाटे—आणि तें त्यांना नामोहरम करण्यासाठीं झटे.



चतुःसूत्री

बंगाल म्हणजे स्वातंत्र्य–युद्धांतील बालेकिल्ला ! तो जमीनदोस्त करण्याचा चंग सरकारानें बांधला. घराघरांत गुरखे शिपाई पाठवून ‘वंदेमातरं’ हें राष्ट्रगीत गाण्यास त्यांनीं मनाई केली–शाळेंतील विद्यार्थीं व कचेरींतील नोकर यांना हुकूम काढून तें गीत म्हणण्यास बंदी केली. पण तेवढ्यानें काय होतें ? पेटलेली मशाल खालीं केली, तरी तिची ज्वाला अधिकच भडकते. सरकाराची दडपशाही जों जों वाढूं लागली, तों तों अधिकाधिक लोकांना सरकाराबद्दल द्वेष व पुढाऱ्यांबद्दल भक्ति वाटूं लागली.

बंगाली जनतेची वाढती जागृति व बळकट संघटना मोडून-गाडून टाकण्यासाठीं लॉर्ड कर्झन यांनीं एक अत्यंत कुटिल व विषारी उपाय योजला. तो म्हणजे बंगालची फाळणी! ता. १६ ऑक्टोबर १९०५ रोजीं दोन बंगालांचा कारभार सुरू झाला. हिंदु-मुसल्मानांत फूट पाडून बंगालची शक्ति खच्ची करावी असा दुष्ट हेतु या फाळणीच्या बुडाशीं होता.

या योजनेची वार्ता कळतांच सारी बंगाली जनता एक झाली—एकमुखानें सरकाराचा धिक्कार करूं लागली. ‘ सुतक-दिन ’ पाळून, हरताळ पाडून व उपोषण करून तिनें आपली तप्त भावना व्यक्त केली. किसान व जमीनदार, विद्वान व अडाणा, महाराज व कामकरी असे सर्व वर्ग एकवटले आणि हा सरकारी हल्ला परतवून लावण्यासाठीं कमर कसून उभें राहिले. फाळणी रद्द करण्यासाठीं दोनशें लोकांची समिति नेमली; तींत तेरा राजे-महाराजे होते. निषेधाच्या शेंकडो तारा गेल्या; हजारों सभा भरल्या; पण मुख्य शस्त्रें जनतेनें उपसलीं तीं म्हणजे स्वदेशी व बहिष्कार.

बंगाली बाबूंनीं ‘ साहेबी पोशाक ’ टाकला व धोतर-सदरा-शाल हा राष्ट्रीय वेश धारण केला. ब्रिटिश माल न घेण्याचा निर्धार स्वयंस्फूर्तीनें बंगाली जनतेनें केला. नेमस्ताग्रणी सुरेंद्रनाथांची पांच वर्षांची नात, पण तिनेंहि परदेशी चामड्याचा बूट फेकून दिला! दुसऱ्या एका बंगाली मुलीनें आजारीपणांत विदेशी औषध थुंकून टाकलें! लो. टिळकांना आनंदाच्या उकळ्या फुटूं लागल्या.

आपल्या शंभर भाषणांनीं होणार नाहीं इतकी जागृति व संघटना या आपत्तीनें बंगाली जनतेची झाली व ती सरकाराशीं सामना करण्यास उभी ठाकली, हें पाहून त्यांना फार हर्ष झाला.

स्वदेशीचें बाळकडू साध्या रहाणीच्या महाराष्ट्राला होतें. सार्वजनिक काका खादी पेहरूनच वासुदेव बळवंतासाठीं न्याय-मंदिरांत उभे राहिले होते. जुन्या शस्त्राला नवी धार पाजावी, त्याप्रमाणें स्वदेशीच्या व्रताला बहिष्काराच्या वृत्तीची जोड देण्यांत आली. लोकमान्यांनीं लेखांचा व भाषणांचा पाऊस पाडून स्वदेशी-बहिष्काराचा प्रचार केला.


स्वदेशीचा अभिमान स्वराज्य गेल्यानंतरहि या देशांतून नाहींसा झाला नाहीं. " सार्वजनिक काका " सारखे धडाडीचे स्वदेशभक्त तर हातसुताच्या व हातमागाच्या खादीच्या पेहरावांत दिल्ली दरबारांत जाऊन उभे राहिले. त्याच्यापूर्वीं १८४९ मध्यें लोकहितवादींनीं आपल्या ‘ शतपत्रांत ’ असें स्पष्टपणें लिहून ठेवलें आहे कीं, " इंग्रजांच्या देशचें सामान बंद करावें. विलायती कापड घेऊं नये. यास्तव आपल्यास जाडीं मोठीं कापडें नेसावयास लागलीं तर काय चिंता आहे ? " या प्रश्नानें पुढें खादीवर येणाऱ्या आक्षेपाचें आधींच खंडन होऊन चुकलें ! लोकहितवादी कृतीची प्रेरणा देतात व म्हणतात, " याजकरितां सर्वांनी असा कट करावा कीं, जे आपले देशांत पिकेल तेंच नेसूं–तेंच वापरूं. " हा कट सिद्धीस नेण्याचें श्रेय पुढें म. गांधींनीं मिळविलें.

वंग-भंगाच्या संग्रामांत स्वदेशी व बहिष्कार हीं जनतेच्या हातांतील तीक्ष्ण शस्त्रें ठरलीं. साऱ्या राष्ट्रानें हीं शस्त्रें उपसल्यामुळें इंग्रजांच्या व्यापारास खो बसला. आणि व्यापार नाहीं, तर राज्य कशाला ? अशी इंग्रजांची वृत्ति. आपला व्यापार वाढविण्याचें एक साधन म्हणून ते राज्य करीत होते. त्या व्यापाराच्या नाड्याच हिंदी जनतेनें आंखडल्या. वंगभंगानें साऱ्या देशांतील वातावरण विलक्षण तापून गेलें होतें. त्याच्या वाफा राष्ट्रसभेंतून निघाल्या. १९०६ सालीं कलकत्ता येथे राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें. तेव्हां तिच्या अध्यक्षपदावरून पितामह दादाभाईंनीं स्वराज्याच्या ध्येयाचा पुकार केला व बंडाची जळजळीत भाषाहि उच्चारली. त्याचप्रमाणें 'स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण' या चतुःसूत्रीचा जन्महि याच अधिवेशनांत झाला.

इतिहासाचार्य श्री. वि. का. राजवडे यांनीं स्वदेशीवर एका मंत्राचें मजेशीर रूपक सांगोपांग बसविलें होतें. त्यांच्या दृष्टीनें, या मंत्राचा ऋषि शिवाजी, देवता देशभक्ति आणि व्यापार-स्वातंत्र्य हा छंद आहे. या मंत्राचें कीलक एकजूट हें असून 'स्वदेश' हा जप आहे. या मंत्रांत प्रतिनिधिसत्ताक सुंदर राज्यपद्धतीचें ध्यान करून बहिष्कारयोगानें समाधि लावावयाची असते असें श्री. राजवाडे यांनीं वर्णन केलें आहे.

झीज सोसूनहि स्वदेशी माल वापरावा असा ठराव संमत झाला. मेथा-प्रभृति मवाळांना हें कलम मान्य नव्हतें. पण लाल-बाल-पालांच्या राष्ट्रीय पक्षाला या वेळीं भरती आली होती.

तेजस्वी व संतप्त तरुणांमध्यें त्यागाचें व शौर्याचें वारें खेळूं लागलें. त्यांनीं स्वदेशीच्या व बहिष्काराच्या शपथा भराभर घेतल्या. देशाच्या दाही दिशा स्वराज्याच्या जयघोषानें दुमदुमून गेल्या! या प्रक्षुब्ध लोकमताला शरण जाऊन बलाढ्य ब्रिटिश सरकारला १९११ मध्यें जाहीर दरबारांत बंगालची फाळणी रद्द करावी लागली ! ' दगडावरील रेघ ' ही पाण्यावरील रेघ ठरली ! जागृत, संघटित व प्रतिकारशाली जनतेनें स्वावलंबनानें स्वराज्य-युद्धांत सरकारवर हा मोठाच विजय मिळविला.





सुरतेचा संग्राम

सुरतेचा संग्राम कांहीं विलक्षणच रंगला ! रानडे-गोखले वगैरेंचा नेमस्त पक्ष सरकारला अर्ज-विनंत्या करून, आंकडयांनीं व युक्तिवादांनीं आपलें म्हणणें पटवून देण्याची कोशीस करीत होता. त्यांचा ब्रिटिश सरकारच्या सद्भावावर अजून विश्वास होता. दादाभाईंचें अंत:करण निराशेनें फुटण्याच्या बेतास आलें, पण मेथा-वाच्छा वगैरे नेमस्त पुढाऱ्यांना मात्र सरकाराशीं गोडी-गुलाबीनें वागूनच आपल्या देशाचा उद्धार होईल असा भरंवसा होता. उलट, लाल-बाल-पाल यांच्या राष्ट्रीय पक्षाचा भर लोकांचें सामर्थ्य वाढविण्यावर होता. म्हणून ते लोकांना त्यांचे हक्क समजावून

देत व स्वराज्याच्या लढ्यांत सामील होण्यास आवाहन करीत. त्यांची हाक खेड्यापाड्यापर्यंत पोंचली आणि त्या हाकेला लाखों तरुण हृदयांनीं ओ दिली. नेमस्त पक्षाला ओहोटी लागली व राष्ट्रीय पक्षाला भरती आली. सरकारदरबारीं नेमस्त पक्षाला मान असे, किंबहुना सरकार त्या पक्षाचा उपयोग आपल्या हितासाठीं करून घेत असे.

वऱ्हाडांतील एका सभेंत नेमस्तांनीं 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताला काट मारला, तर सुरतेच्या प्रांतिक परिषदेंत बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचे ठराव गाळले. त्याबरोबरच स्वराज्य व स्वदेशी हे विषयहि काँग्रेसच्या कार्यक्रमांतून हद्दपार करावेत अशी खटपट नेमस्तांनीं चालविली. त्यासाठीं त्यांनीं १९०७ सालची काँग्रेस नागपुराऐवजीं सुरत येथें भरविण्याचें मुक्रर केलें. कारण सुरतेस नेमस्तांचें बहुमत होतें. तसेंच तेथें भरणाऱ्या राष्ट्रसभेचें अध्यक्षस्थान डॉ. राशबिहारी घोष या खास नेमस्त गृहस्थास देण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांचें हें सारें धोरण सरकाराला पोषकच ठरत होतें. देशांतील वाढती स्वराज्य-भक्ति सरकाराला नाहींशीं करावयाची होती, तरुणांची चैतन्यपूर्ण संघटना त्यांना मोडून काढावयाची होती आणि त्यासाठीं त्या तरुणांना प्रिय झालेली चतुःसूत्री त्यांना नामशेष करावयाची होती. सुरतेच्या काँग्रेसमध्यें टिळकप्रभृतींच्या राष्ट्रीय पक्षाची धूळधाण कशी होते, हें सरकारी अधिकारी डोळ्यांत तेल घालून पहात होते. पण घडलें भलतेंच !

जनतारूपी जनार्दन जागा झाला होता. तो लाल-बाल-पालांच्या त्रिमूर्तींच्या मुखानें बोलत होता. त्यांच्या मुखांतून निघणारे चतुःसूत्रीचे मंत्र लाखों लोक भक्तिभावानें ऐकत होते, मनांत सांठवीत होते, कृतींत उतरवीत होते. ता. ११ नोव्हेंबर रोजीं लाला लजपतराय यांची मुक्तता झाली. त्यांना सुरत कॉंग्रेसचे अध्यक्ष करा अशी सूचना टिळकांनीं केली आणि “ स्वार्थत्याग व देशाकरितां झीज व कष्ट सोसणें या दृष्टीनें डॉ. घोष यांच्यापेक्षां लजपतराय यांची योग्यता शंभर पटीनीं अधिक आहे ' असें खणखणीतपणें लिहिलें. कॉंग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं घोष व लालाजी या दोन पुढाऱ्यांमध्यें लढा सुरू झाला, असें वरवर पहाणाऱ्यास वाटलें; तरी तो झगडा क्षीण होत चाललेला नेमस्त पक्ष व वृद्धिंगत होणारा राष्ट्रीय पक्ष यांमध्येंच चालू होता— किंबहुना एका बाजूस सरकार व नेमस्त पक्ष आणि दुसऱ्या बाजूस जनता व राष्ट्रीय पक्ष यांचेंच युद्ध जुंपलें असें म्हटलें तरी चालेल. सुरतेचा संग्राम अपूर्व होता तो यामुळेंच.

ता. २३ डिसेंबर हा दिवस उजाडला. लो. टिळकांची स्वारी आपल्या अनुयायांसह सुरत स्टेशनावर उतरली. नेमस्त पक्षाच्या स्वागत-मंडळानें त्यांचें स्वागत न करण्याचें ठरविलें होतें. पण सारी जनताच स्वागत करण्यास पुढें आली. लोक नाहींत तर लोकमान्य कसले ? त्यांच्या स्वागतासाठीं स्टेशनवर हजारों लोकांचा तोबा ! एखाद्या विजयी वीराप्रमाणें त्यांची मिरवणूक थाटानें व उत्साहानें निघाली. अग्रभागीं घोडेस्वारांचें पथक होतें.

रस्ते सर्वत्र शृंगारलेले ! सारीं घरें उत्सुक डोळ्यांनीं फुललेलीं ! ' पूना के बादशहा ' ला पहाण्यासाठीं स्त्री पुरुषांची एकच गर्दी उसळलेली ! स्वराज्यासाठीं तपश्चर्या केलेल्या त्या महापुरुषाला प्रत्येकजण वंदन करूं लागला आणि स्वदेशीची प्रतिज्ञा घेऊं लागला. संध्याकाळीं लो. टिळकांचें जाहीर भाषण झालें—चार-पांच हजार समाज सभेला लोटला होता. राष्ट्रीय सभा सुरू होण्याआधींच राष्ट्रीय पक्षाचें कार्य धूमधडाक्यानें सुरू झालें. दुसऱ्या दिवशीं अरविंदबाबूंच्या अध्यक्षतेखालीं टिळकांनीं नव्या पक्षाचें तत्त्वज्ञान समजावून सांगितलें.

असाच सत्कार जनतेनें लालाजींचाहि केला.

मात्र, असा सत्कार जनतेनें कॉंग्रेसच्या नियोजित नेमस्त अध्यक्षांचा—डॉ. घोष यांचा—केला नाहीं. त्यांचें स्वागत केवळ स्वागत-मंडळाच्या मूठभर सभासदांनीं केलें. लोक कोणाच्या पाठीशीं आहेत, हें कॉंग्रेस भरण्याच्या आधींच स्पष्ट झालें.

कॉंग्रेस सुरू झाली ! दहा हजार लोक जमले होते. नेमस्त व राष्ट्रीय या पक्षांची झटापट पहाण्यास——म्हणजेच सरकार व जनता यांचें युद्ध अवलोकण्यास ते उत्सुक होते. ' सरशी कोणाची होते ? ' याविषयीं सर्वांना उत्कंठा वाटत होती. नेमस्त-अध्यक्षाची सूचना झाली. अनुमोदनहि मिळालें. प्रेक्षकांनीं गोंगाट-गोंधळ केला. त्यामुळें सभा तहकूब ठेवावी लागली.

दुसरे दिवशीं पुनः सभा भरली. पुनः दंगा होऊं नये म्हणून, नेमस्त चालकांनीं काठ्यालाठ्याधारी गुंड आणून मंडपांत बसविले.

टिळकांच्या कांहीं अनुयायांना आंत येण्यास मनाई करण्यांत आली. पण एकटे टिळक सर्वांना भारी होते. असंख्य चांदण्यांना व चंद्राला निस्तेज करण्यास एकटा सूर्य पुरेसा नसतो काय? शेंकडो ससे-हरिणें यांना पळ काढावयास लावण्याला सिंहाची एकच गर्जना समर्थ असते. तशी गर्जना या पुरुषसिंहानें केली आणि सारा मंडप दणाणून सोडला. अध्यक्षांची सूचना पुनः सभेपुढें आली असतां टिळक व्यासपीठाकडे धांवत गेले—स्वयंसेवकांनीं मनाई केली तरी व्यासपीठावर चढले—अध्यक्षांच्या सूचनेस विरोधी असें भाषण त्यांनीं केलें. पण तिकडे कानाडोळा करून डॉ. घोष अध्यक्षस्थानीं बसले आणि आपलें छापील भाषण वाचूं लागले.

'अद्याप तुमची निवडणूक झालेली नाहीं, मी उपसूचना मांडीत आहें' असें टिळकांनीं अध्यक्षांना ठणठणीत सुरांत बजावलें. तेव्हां साऱ्या सभेंत हलकल्लोळ माजला. आरडाओरड झाली. जोडे, खुर्च्या, काठ्या हवेंत उडूं लागल्या. सभा-मंडपाचें रणांगण बनलें!

'तुम्ही व्यासपीठावरून खालीं उतरा' असें टिळकांना कोणी ओरडून सांगितलें. त्यांनीं लगेच गर्जना केली, "मी खालीं उतरणार नाहीं. छाती असेल तर मला उचलून खालीं ठेवा." वीज कडाडावी तसें श्रोत्यांना वाटतें. 'टिळकांच्या केसाला धक्का लागला, तर येथें रक्तपात होईल!' असा इषारा ना. गोखले यांनीं आपल्या अनुयायांना दिला.

टिळकांवर सभागृहांतून जोडा फेकण्यांत आला; पण तो

लागला मेथा–सुरेंद्रनाथ या नेमस्त–नेत्यांना. मारामारी–दंगल उसळली. कांहींजण जखमी झाले, कांहीं रक्तबंबाळ झाले, कांहींना पोलिसांनीं पकडलें. मवाळ मंडपांतून पळाले; राष्ट्रीय तेथेंच धैर्यानें उभे राहिले. लो. टिळक तर 'भवितव्यतेला तुच्छ मानून, छातीवर स्वास्तिकाकार हात ठेवून, निर्भय मुद्रेनें मेरूपर्वताप्रमाणें खडे होते.' "त्यांच्या पायांच्या फटींतून जुनें मवाळ युग निघून गेलें व नवें तेजस्वी युग पुढें आलें." असें दूरदर्शी प्रेक्षकांना वाटलें. टिळकांनीं राष्ट्रसभा जिंकली, राष्ट्रावर छाप पाडली–असाच निर्णय सर्वांनीं मनोमन दिला.

तिसरें दिवशीं कॉंग्रेसच्या मंडपांतच मवाळांची परिषद भरली, पण कशी? तर दोनशें पोलिसांच्या पहाऱ्यांत. आणि ठरविलें काय? तर बहिष्काराच्या शस्त्रावरच बहिष्कार!

उलट, नव्या तेजानें नटलेल्या व ताज्या जयानें स्फुरण पावणाऱ्या राष्ट्रीय पक्षाची सभा एका खाजगी वाड्यांत भरली. तिचे अध्यक्ष होते अरविंद बाबू आणि मुख्य वक्ते होते लो. टिळक! त्या दोघांनीं चतुःसूत्रीचा जोरानें पुरस्कार केला आणि स्वावलंबनानेंच स्वराज्य मिळविण्याचा आदेश जनतेस दिला.


सुरतेची कॉंग्रेस म्हणजे भारतीय स्वातंत्र्य-लढ्यांतील राष्ट्रीय पक्षाचा एक विजय-स्तंभच! हा विजय-स्तंभ मोठ्या चातुर्यानें व धैर्यानें उभारल्याबद्दल लो. टिळकांना लवकरच एक बक्षीस मिळालें-आणि तेंहि ब्रिटिश सरकारकडून!

नेमस्ताकडून लो. टिळकांचा पाडाव होत नाहीं, उलट तेच फर्जात पावतात, हें पाहून सरकारनें आपलें अंतिम शस्त्र उघडपणें उचललें आणि—

ता. २२ जुलै १९०८ रोजीं, लो. टिळकांना वयाच्या ५२ व्या वर्षीं, सहा वर्षें काळे पाणी व हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यांत आली!!!

वार्धक्यांत हा वज्राघात होण्याच्या वेळीं स्थितप्रज्ञ योग्याप्रमाणें लो. टिळकांनीं जे धीरगंभीर उद्गार काढले, ते हिंदुस्थानाच्या इतिहासांत चिरंजीव झाले आहेत. ते उद्गार असे—

"मी एवढेंच सांगूं इच्छितों कीं, ज्यूरीनें आपला निकाल कसाहि दिला, तरी मी पूर्णपणें निर्दोषी आहें, असेंच मी मानतों. जगांतील सर्व व्यवहारांचें नियमन करणाऱ्या श्रेष्ठ शक्ति अस्तित्वांत आहेत. कदाचित् त्यांच्या मतें मी मोकळा राहाण्यापेक्षां हाल सोसण्यानेंच माझें अंगीकृत कार्य भरभराटीस पोचेल!"





न्यायाचा शिक्का

गोकुळांत श्रीकृष्ण जसा वाढत होता, तसा हिंदुस्थानांत स्वराज्याचा मंत्र लोकप्रिय होत होता. कंसानें श्रीकृष्णाला ठार करण्यासाठीं त्याच्या जन्मापासून त्याला शिळेवर आपटण्याचा प्रयत्न केला; पूतनेला पाठविलें, महाबळभट, वासरूं इत्यादि रूपांनीं राक्षसांना सोडलें, भर दरबारांत मल्ल व हत्तीहि त्याच्या अंगावर घातले; त्याप्रमाणें नानाविध सौम्य–जहाल, गुप्त-प्रगट असे प्रयत्न ब्रिटिश सरकारनें हिंदी स्वराज्य दडपून टाकण्यासाठीं केले. पण सत्पक्ष श्रीकृष्णाचा असल्यानें तो जसा

साऱ्या संकटांना पुरून उरून जीवंत राहिला, वैभवानें वाढला, राजैश्वर्य पावला आणि लोकांची मान्यताहि मिळविता झाला; त्याचप्रमाणें ‘लोकांनीं स्वतःच्या जोरावर स्वराज्य मिळवावें’ ही भावना, विघ्नांना न मानतां व विरोधाला न जुमानतां, हिंदुस्थानांत एकसारखी अंकुरत-फोफावत-मोहरतच चालली आणि शेवटीं पूर्णपणें सफलहि झाली.

स्वराज्याची प्रतिज्ञा घेतलेल्या राष्ट्रीय पक्षाला जमीनदोस्त करण्यासाठीं सरकारनें काय केलें? तर त्या पक्षाचे प्राण असलेल्या लो. टिळकांना अगदीं म्हतारपणींहि काळेपाण्याची शिक्षा दिली; पण शत्रूनें पोत्यांत बांधून समुद्रांत बुडविलें; तरी जगून-वाचून पुढें राजेपण भोगणारे भाग्यशाली पुरुष इतिहासांत आढळतातच. लो. टिळक मंडालें येथें सहा वर्षें काळेपाण्याची शिक्षा भोगून ता. १६ जून १९१४ रोजीं पुण्यास परत आले—आणि तेंहि एक रत्न घेऊन! कोहिनूर हिऱ्यापेक्षांहि अधिक तेजःपुंज व मूल्यवान असा ‘गीता-रहस्य’ नांवाचा ग्रंथ त्यांनीं त्या एकांतवासांत स्थितप्रज्ञ वृत्तीनें लिहिला. स्वराज्याची त्यांची आकांक्षा तर अणुमात्र कमी झाली नाहींच. प्रल्हादाचीच भक्ति त्यांनीं स्वराज्यावर ठेवली होती. कड्यावरून ढकललें किंवा उकळत्या तेलांत टाकलें; तरी प्रल्हादानें देवाची भक्ति जशी सोडली नाहीं; त्याप्रमाणें लोकमान्यांची स्वराज्य-भक्ति मंडालेंतील हालअपेष्टानंतरहि मुळींच ढळली नाहीं. उलट, अधिक धृतीनें व उत्साहानें ते स्वराज्याच्या लढ्यांत भाग घेऊं लागले.

पहिल्या महायुद्धाचा तो काळ ! ब्रिटिश सरकार अडचणींत सांपडलें होतें. तेव्हां लो. टिळकांनीं स्पष्टपणें जाहीर केलें कीं, “ साम्राज्याच्या गरजा, येती आमच्या काजा.” ता. २३ एप्रिल १९१६ रोजीं त्यांनीं खास स्वराज्याचाच पुरस्कार करण्यासाठीं ‘ होमरूल लीग ’ (स्वराज्य-संघ) काढली. ती काँग्रेसच्याच पंखाखालीं वाढत चालली. या स्वराज्य–संघाच्या मोहिमेंत दुसरी एक अत्यंत उत्साही, वक्तृत्वशाली, बुद्धिमान व धैर्यवंत अशी व्यक्ति पुढें आली. ती एक स्त्री होती हें विशेष–आणि ती स्त्री युरोपियन होती हें तर आश्चर्यकारकच.

ती स्त्री म्हणजे डॉ. बेझंट. होमरूल लीगमध्यें लो. टिळकांच्या बरोबरीनें त्यांनीं सेनापतिपदाची कामगिरी केली, हाल भोगले आणि यश संपादलें. स्वराज्याचा किल्ला सर करण्यांत या गोऱ्या बाईचें चातुर्य व श्रम खर्ची पडले. यापूर्वींहि कांहीं कांहीं इंग्रज गृहस्थांनीं हिंदी स्वराज्याला पाठिंबा दिला होता. खुद्द काँग्रेसचे जनकच मुळीं मि. ह्यूम हे होते. कॉटन, वेडरबर्न, ब्रॅडलॉ इत्यादि उदारधी पुरुषांनीं, हिंदुस्थानाचें मागणें न्यायाचें आहे, म्हणूनच देश-धर्म-जातीचा विचार मनांत न आणतां, ब्रिटिश सरकारशीं हिंदुस्थानाच्या बाजूनें लढा दिला. हेन्री फॉसेट यांना तर साडेसातशें पौंडांचा निधि या कार्यासाठीं हिंदुस्थाननें अर्पण केला होता. बर्कपासून सुरू झालेल्या या परंपरेंत डॉ. बेझंट यांची कामगिरी मेरूमण्याप्रमाणें शोभणारी आहे.

त्या थिऑसफी पंथामध्यें तर 'देवता' मानल्या जात. त्यामुळें त्यांना पं. मोतीलाल नेहरूसारखे वरच्या वर्गांतील अनुयायी व कार्यकर्ते पुष्कळ मिळाले. आपल्या इंग्रजी वक्तृत्वानें त्यांनीं स्वराज्याचा घोष साऱ्या देशभर उमटविला. त्यांची बहादुरी सरकाराच्या डोळ्यावर आली. त्यांच्या वृत्तपत्रांकडून सरकारानें वीस हजार रुपयांचे जामीन मागितले—आणि ते जप्तहि केले. तरीं मिसेस् बेझंट यांची स्वराज्याची मोहीम अकुंठितपणें पुढें आणि पुढेंच चालू राहिली. तें पाहून सरकार चिडलें. एक हत्यार बोथट ठरलें, तर दुसरीं त्याहून तीक्ष्ण शस्त्रें सरकाराच्या संग्रहीं होतींच. त्यांनीं बेझंटबाईंना ता. १५ जून १९१७ रोजीं स्थानबद्ध केलें; पण त्यांची स्थानबद्धतेची मुदत जसजशी वाढूं लागली, तसतशी देशांतील होमरूल-लीगची चळवळ फोफावत चालली.


या परिस्थितीचें समर्पक वर्णन भारत-मंत्री मि. मॉंटेग्यु यांनींच आपल्या रोजनिशींत अलंकारिक भाषेनें केलें आहे. तें असें— "शंकरानें रागानें आपल्या बायकोचे बावन्न तुकडे केले, अशी हिंदु-पुराणांत कथा आहे. पार्वतीच्या देहाच्या त्या बावन्न तुकड्यांकडे शंकर जेव्हां पाहूं लागले, तेव्हां त्यांना बावन्न पार्वती दिसूं लागल्या! तशीच स्थिति हिंदुस्थान सरकाराची बेझंटबाईच्या बाबतींत झाली." त्यांचें कार्य नष्ट करण्यास सरकारनें जें साधन वापरलें, त्यामुळें तें कार्य झंझावाताप्रमाणें देशभर सर्वत्र पसरत गेलें. शत्रूवर फेकलेलें हत्यार आपल्यावरच दुप्पट जोरानें उलटावें, तशी सरकाराची स्थिति झाली.

हाच अनुभव सरकारला लो. टिळकांच्या बाबतींतहि आला. काळ्या पाण्याहून परत आलेल्या लोकमान्यांवर लोकांची भक्ति विशेषच बसली. यमुनेच्या विषारी डोहांत बुडी मारून, कालियाला हुसकून लावून, विजय संपादून वर आलेला दुसरा श्रीकृष्णच जणुं काय आपण पहात आहों, असें त्यांच्या भक्तांना वाटलें. ती त्यांची भक्ति प्रगट झाली ता. २३ जुलै १९१६ रोजीं. त्या दिवशीं त्यांना साठ वर्षें पूर्ण झालीं, म्हणून त्यांचा षष्ट्यब्दि-पूर्ति-समारंभ पुणें येथें टोलेजंग स्वरूपांत साजरा झाला. दरिद्री महाराष्ट्रानें एक लाख रुपयांची थैली त्यांना अर्पण केली. सरकारनेंहि आपला नजराणा पाठविला. तो कोणता ? तर वीस हजारांचे जामीन व वीस हजारांचा जातमुचलका भरण्याची नोटीस! कारण काय दिलें ? तर टिळकांनीं बेळगांव व नगर येथें स्वराज्याविषयीं जीं दोन भाषणें केलीं, तीं राजद्रोहाचीं आहेत!

या निमित्तानें सरकारनें टिळकांवर राजद्रोहाचा तिसरा खटला भरावयाचें योजिलें. पण न्यायदेवता आंधळी नव्हती. हायकोर्टांतील न्यायमूर्तींनीं ता. ९ नोव्हेंबर १९१६ रोजीं लो. टिळकांना निर्दोषी ठरविलें. त्याबरोबरच ‘ स्वराज्याचें ध्येयहि ’ न्यायाचें ठरलें. राजसत्तेनें नसलें, तरी न्यायदेवतेनें स्वराज्यावर आपल्या मान्यतेचें शिक्कामोर्तब केलें. ‘ स्वराज्याचा रुपया बद्द नाहीं, तो खणखणीत वाजतो ’ हें या खटल्यानें सिद्ध झालें असें टिळकांनीं म्हटलें.

आणि राजसत्तेलाहि पुढेंमागें, बळेंबळें कां होईना, पण तें

पवित्र व मंगल ध्येय संमत करावेंच लागलें. ‘ हिंदुस्थानचें स्वराज्य मला दुर्बिणींतूनहि दिसत नाहीं.’ असे पूर्वीचे ब्रिटिश मुत्सद्दी तुच्छतेनें म्हणत; पण वंग-भंगाच्या चळवळीनें, चतुःसूत्रीच्या पुरस्कारानें, सुरत येथील राष्ट्रीय पक्षाच्या विजयानें आणि टिळक-बेझंट-प्रभृतींच्या त्यागपूर्वक प्रचारानें १९१९ सालीं एक चमत्कार घडला. तो म्हणजे इंग्लंडच्या बादशहांनीं ‘ स्वराज्य ’ हा संस्कृत शब्द उच्चारला ! त्या वर्षींच्या डिसेंबरांत काढलेल्या जाहीरनाम्यांत बादशहांनीं हिंदुस्थानला स्वराज्य देण्याचें आश्वासन दिलें. आमच्या स्वातंत्र्य-लढ्यांतील हा विजय विशेष महत्त्वाचा होय.





मंत्र प्रगटला

नुसत्या आश्वासनावर राजी होऊन स्वस्थ बसणारे टिळक नव्हते. स्वराज्याचा प्रत्यक्ष लाभ त्यांना हवा होता. त्यासाठीं त्यांची सारी आटाआटी. स्वराज्य शब्द उच्चारण्यास आतां न्यायदेवतेची आडकाठी नव्हती, राज्यदेवतेची हरकत नव्हती. परंतु सर्वसामान्य माणसाच्या चित्तांतील भीति कोठें जाते? टिळकांचें स्फूर्तिप्रद भाषण ऐकण्यास हजारों लोक जमत, पण स्वराज्य-संघाचे सभासद किती होत? नगर येथें दोन दिवस राहून, प्रचार

करून, खटपट करून, जेमतेम पंधरा सभासद टिळकांनीं स्वराज्य-संघाला मिळविले ! स्वामी विवेकानंदांनाहि अमेरिकेंत प्रथम तीसच श्रोते मिळाले होते म्हणतात. नदीचा आरंभ असा करंगळीएवढाच असावयाचा. टिळकांना निराशा माहीत नव्हती. जितका विरोध जास्त; तितका त्यांचा उत्साह वाढता व प्रयत्न कमालींचा. त्यांनीं स्वराज्याच्या व्याख्यानांचा पाऊस पाडला. "भाकरी कां करपली ? घोडी कां अडली ? पानें कां सडलीं ? या तिन्ही प्रश्नांचें उत्तर न फिरविल्यानें, हें एकच आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत दैन्य कां आहे ? अज्ञान कां आहे ? शेती-व्यापार खालावत कां आहे ? या सर्वांचें उत्तर 'राज्ययंत्र न फिरविल्यानें !' तें फिरवून आपल्याला स्वराज्य स्थापन करावयाचें आहे." अशा सोप्या भाषेनें, घरगुती दाखल्यांनीं पण निर्धाराच्या व कराराच्या वृत्तीनें ते स्वराज्याचा मंत्र गांवोगांव फैलावीत चालले होते. लोकांचें भय वितळत होतें. पांच महिन्यांत स्वराज्यसंघाचे सभासद साडेसहाशें झाले, एका वर्षांत ते चौदा हजारावर गेले आणि तीन वर्षांत तर तो आंकडा चाळीस हजारांवर जाऊन पोंचला ! १८० शाखा संघानें स्थापन केल्या. वर्गणी-देणगी वगैरेची रक्कम साडेतीन लाख रुपयांवर जमली.

अवघा एक पंधरवडा ! पण तेवढ्या कालांत वऱ्हाड प्रांतांतील हृदय न् हृदय हलून गेलें, राष्ट्र-प्रेमानें बहरून गेलें, स्वराज्य-भक्तीनें मोहरून आलें. सारा देशच आतां स्वराज्य-देवतेच्या भजनीं लागला होता. लो. टिळकांनीं त्या देवतेची केलेली

षोडशोपचार पूजा म्हणजे त्यांचा वऱ्हाडांतील दौरा. १९१८ सालीं ता. ५ ते २० फेब्रुआरीपर्यंतच्या कालांत, आपल्या म्हातारपणाची पर्वा न करतां, शारीरिक कष्टाची तमा न बाळगतां, मोठ्या नेटानें व उत्साहानें त्यांनीं ही "स्वराज्याची मोहीम" चालविली.

त्यांच्या कर्तृत्वाचा हा कळस होता, त्यांच्या तपस्येची ही सांगता होती, त्यांच्या जीविताची ही भैरवी होती, त्यांच्या स्वराज्य-युद्धांतील ही अखेरची लढाई होती.

त्यांचें सारें त्यागी जीवन स्मरून वऱ्हाडी जनतेनें त्यांच्यावर आपल्या भक्तिप्रेमाची संततधार धरली! स्वराज्य-संग्रामांत सरकाराचे घाव सोसून त्यांनीं बादशहाकडून स्वराज्याचा उच्चार करविला, हें जाणून साऱ्या जनतेनें त्यांचें स्वागत विजयी सेनापतीप्रमाणें केलें. गांवोगांव त्यांच्या प्रचंड मिरवणुका निघाल्या, थाटाच्या मेजवान्या झाल्या व टोलेजंग सभा भरल्या. ठिकठिकाणीं त्यांना मानपत्रें देण्यांत आलीं, थैल्या अर्पण करण्यांत आल्या व निरांजनांनीं ओवाळून सोन्यारुप्याचीं खरीं फुलें उधळण्यांत आलीं. शहरोंशहरीं घरें शृंगारलीं, देवळें पाजळलीं, हृदयें थरारलीं.

"टिळक म्हणजे स्वराज्य" असाच अर्थ जनता समजत असे. तो अर्थ जनतेला सर्वांगांनीं समजावून सांगण्यासाठीं टिळकांनीं तास-तास, दोन-दोन तास, दुपारीं तर दुपारीं, रात्रीं तर रात्रीं, तापलेल्या वाळवंटांतहि, व्याख्यानामागून व्याख्यानें

दिलीं. आणि याच वाग्यज्ञांतून राष्ट्रीयत्वाची ऋचा; स्वराज्याचा मंत्र प्रगट झाला; तो म्हणजे—

" स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळवणारच ! "

लोकमान्यांच्या मुखानें सारा देशच जणुं आपला हा निर्धार जगजाहीर करीत होता. सोन्याचें सोनेंपण सिद्ध होण्यास तें हातोड्याच्या घावाखालीं टिकावें लागतें, अग्नींतून उजळपणें बाहेर पडावें लागतें आणि कसोटीला उतरावें लागतें; त्याप्रमाणें सरकारी दडपशाहीखालीं दडपलें न गेलेलें, नेमस्तांच्या भ्रमजालांत न अडकलेलें आणि लाल-बाल-पाल या त्रिमूर्तींच्या मुखानें पावन झालेलें स्वराज्य हिंदुस्थानांतील शहराशहरांत व खेड्यापाड्यांत, रावा-रंकाच्या व पंडित-अडाण्यांच्या मनामुखांत खेळूं लागलें. स्वराज्य लोकमान्य झालें, तसेंच राजमान्यहि झालें. स्वातंत्र्याच्या संग्रामांत आपल्या राष्ट्रानें ही केवढी मजल मारली !





एकाचा अस्त, दुसऱ्याचा उदय


काय योगायोग आहे पहा ! ज्या दिवशीं लो. टिळकांचें जीवित संपलें; त्याच दिवशीं—१९२० सालच्या ऑगस्ट महिन्यांतील पहिल्या तारखेस—म. गांधींच्या असहकार-युगाचा जन्म झाला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच ' हा मंत्र लोकमान्यांच्या मुखांतून अकस्मात् प्रगट झाला. तो त्यांनीं हाडाचीं काडें करून देशाच्या कोनाकोपऱ्यांपर्यंत पोंचविला आणि प्रत्येक हिंदवासियाच्या मनांत व मुखांत घोळविला. डॉ. बेझंट, लाला लजपतराय, देशबंधु दास इत्यादि पुढाऱ्यांनीं ही स्वराज्याची जाणिव जनतेंत चांगलीच रुजविली. पण पुढें काय ?


'स्वराज्य मी मिळविणारच' असें कितीहि ठासठासून सांगितलें, तरी तें मिळणार कसें? केवळ सभा-परिषदांमध्यें भाषणें—ठराव करून का तें मिळणार? स्वार्थी इंग्रजांशीं युक्तिवाद करून व विनंति-अर्ज सादर करून का तें लाभणार? खुद्द म. गांधीनींच दहा लाख सह्यांचा अर्ज तयार करून भारत-मंत्री ना. मॉंटेग्यू यांच्याकडे स्वराज्याची मागणी केली होती.

पण हातांत आलेलें राज्य सुखासुखी कोण सोडतो? इतका विरक्त, इतका निःस्वार्थी या जगांत कोणता राज्यकर्ता असेल? "न मधुरेण प्रदास्यति" हें वर्णन दुर्योधनाप्रमाणें इतर बहुतेक सर्व राजांनाहि लागू आहे. त्यांत ब्रिटिश म्हणजे बनिया. त्याचा व्यापार हिंदुस्थानावर अवलंबून. त्यासाठीं साम-दाम-दंड-भेदानें त्यानें येथलें राज्य बळकावलें. तो तें फुकाफुकीं कसा सोडून देईल? त्याच्या हाडामांसाचीं अमेरिका; पण तेथील लोकांनाहि इंग्रजांनीं स्वराज्याचे अधिकार केव्हां दिले? तर त्यांनीं कर-बंदी करून ब्रिटिशांची नाकेबंदी केली आणि समुद्रांत त्यांचा चहा ओतून बहिष्कार घातला तेव्हांच!

हा सारा इतिहास, ब्रिटिशांचा हा सारा स्वभाव पुरेपूर जाणला गांधीजींनींच. आरंभीं दादाभाई नौरोजीप्रमाणेंच त्यांचा विश्वास ब्रिटिशांच्या भलेपणावर फार होता; पण ब्रिटिशांच्या स्वार्थी धोरणानें दोघांनाहि निराश केलें. दादाभाईंनीं वयाच्या ८२ व्या वर्षीं बंडाची भाषा काढली आणि गांधीजींनीं तर ६१ व्या वर्षीं प्रत्यक्ष बंडच पुकारलें.

" एक काळ असा होता कीं, जेव्हां मला स्वतःला ब्रिटिश प्रजाजन म्हणवून घेण्यांत अभिमान वाटत असे, पण आतां मी हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेला शाप समजतों व ती नष्ट करणें हें मी माझें जीवित-कार्य मानतों. " अशी आपली उत्क्रांति खुद्द गांधीजींनींच जगजाहीर केलेली आहे. ब्रिटिश सत्ता नष्ट करण्याचें शस्त्र त्यांनीं राष्ट्राच्या हातीं दिलें—जन्मसिद्ध हक्क असलेलें स्वराज्य मिळविण्याचें साधन त्यांनीं हिंदुस्थानाला दिलें—अर्जविनंत्यापुढचा स्वराज्य-संपादनाचा मार्ग त्यांनीं देशाला खुला करून दिला.





सत्याग्रहाची प्रयोगभूमि

"तिळा उघड" असें म्हटलें कीं अल्लाउद्दीनाची गुहा उघडत असे. तसा स्वराज्याचा दरवाजा उघडण्याचा एक मंत्र गांधीजींनीं स्वदेशाला शिकविला. हा मंत्र म्हणजे सत्याग्रह.

या मंत्राचा प्रयोग गांधीजींनीं आफ्रिकेंत केला होता व तो पूर्ण यशस्वीहि झाला होता. गांधीजी आफ्रिकेंत गेले होते बॅरिस्टर म्हणून—एक मोठा खटला चालविण्यासाठीं, पण तेथें त्यांना साऱ्या हिंदी जनतेचाच खटला चालविणें भाग पडलें—आणि त्यासाठीं आफ्रिकेंत वीस वर्षें रहावें लागलें.

आफ्रिकेंत हिंदी लोकांना गुलामांप्रमाणें राबवीत आणि पशूंप्रमाणें वागवीत. उपाहारगृहांत रहाण्यास त्यांना बंदी होती—रेल्वेच्या वरच्या वर्गांतून प्रवास करण्यास त्यांना मनाई होती—फार काय? मोठ्या रस्त्यावर चालण्यासहि आडकाठी होती. व्यापार करणें, घरें बांधणें वगैरे बाबतींतहि हिंदी लोकांना तेथें 'अस्पृश्यच' मानलें जाई. हिंदी मजुरांना तर तेथील गोरे मळेवाले व खाणीवाले गुरांप्रमाणें झोडपून काढीत!

त्यांतच आफ्रिकन सरकारनें एक नवा कायदा करण्याचें ठरविलें. त्या कायद्याप्रमाणें हिंदी लोकांना आपल्या आंगठ्याचे ठसे सरकारी कचेरींत नोंदवावे लागले असते. शिवाय प्रत्येक हिंदी माणसाला तीन पौंड वार्षिक कर द्यावा लागला असता. हिंदी लोकांच्या स्वातंत्र्यावर ही कुऱ्हाडच होती! पण तो कायदा कसा हाणून पाडावा, हें कोणालाच कळत नव्हतें. तेथील सरकार तर बेगुमान होतें. त्याला कसें वांकवावें, असा प्रश्न तेथील हिंदी जनतेपुढें उभा राहिला.

त्या प्रश्नाचें उत्तर दिलें फक्त गांधीजींनींच. त्यांनीं तेथील हिंदी लोकांना एकत्र केलें, जागृत केलें, संघटित केलें, प्रतिकारशाली केलें. त्यांनीं "नाताळ इंडियन काँग्रेस" ची स्थापना केली, दहा हजार सह्यांचा अर्ज पाठविला, तरी सरकार दाद देईना. सरकारजवळ बंदुका होत्या, तोफा होत्या, सैन्य होतें. तेव्हां आपल्याशीं कोण टक्कर देणार; अशा गुमींत सरकार होतें. पण जनता हाच जनार्दन असतो. तो एकदां जागा झाला

म्हणजे राजा-महाराजांना, बादशहा-सम्राटांना अस्मानांत फेकून देऊं शकतो.

गांधीजी एका टेकडीवर बसले होते. वेळ संध्याकाळची होती. वातावरण शांत होतें. वारे गार वहात होते; पण गांधीजींच्या अंगाची लाही लाही झाली. त्यांच्या हातांत सरकारी गॅझेट होतें. त्यांत तो काळा कायदा होता. तो वाचतांच त्यांचें सर्व शरीर संतापानें कापूं लागलें. ता. ११ सप्टेंबर १९०६ रोजीं प्रचंड सभा भरली. तीन हजार हिंदी लोक हजर होते. ‘ काळा कायदा ’ मोडण्याचें ठरलें. तशा शपथा लोकांनीं घेतल्या.

त्या वेळीं गांधीजींनीं घोषणा केली, “ मला एकच मार्ग मोकळा आहे आणि तो म्हणजे कायदा न मानणें व त्यासाठीं प्राणत्यागहि करणें. मग त्यासाठीं मीं एकटा असलों तरी बेहत्तर ! मूठभर लोकांनीं जरी प्रतिज्ञेचें पालन तंतोतंत केलें तरी आपली फत्ते होईल हें निश्चित. ” अशा प्रकारें आपले प्राण ओंजळींत घेऊन शेंकडों हिंदी लोक आफ्रिकन सरकारशीं सत्याग्रहाचा लढा खेळूं लागले. १९१३ सालीं गांधीजींच्या शांति-सेनेनें कूच केलें. त्या सेनेंत हिंदी पुरुष, स्त्रिया व मुलें मिळून दोन हजारांवर माणसें होतीं. त्यांनीं सरकारचा कायदा मोडला ! कोणतेंहि सरकार कायद्यावर आधारलेलें असतें. तो कायदाच प्रजेनें मोडला म्हणजे सरकारचा पायाच उखडला जातो.

आफ्रिकन सरकारला तसेंच वाटूं लागलें. तें चिडलें—संतापलें—बेभान झालें. त्यांनीं त्या हजारों हिंदी मजुरांना पकडलें.

तुरुंगांत टाकलें, फटके लगावले. गांधीजींनाहि तुरुंगांत सक्त मजुरी दिली. हें कळतांच खाणींतील सहा हजार कामगारांनीं संप पुकारला. सरकारनें गोळीबार केले; पण जनतेमधील प्रतिकाराचें तेज वाढतच चाललें. आठ वर्षें अशा सत्याग्रहाच्या चकमकी चालल्या होत्या.

शेवटीं सरकार शरण आलें. त्यानें तीन पौंडांचा कर रद्द केला, रेल्वेवरील काळा-गोरा भेद नष्ट झाला, आंगठ्याचे ठसे देण्याचा प्रसंग टळला.

गांधीजींच्या पहिल्या सत्याग्रह-युद्धाचा विजय झाला! सशस्त्र सरकारबरोबर लढण्याचा एक नवा मार्ग निःशस्त्र प्रजेला सांपडला! साऱ्या जगांतील गांजलेल्या–दडपलेल्या जनतेला नवीच आशा वाटूं लागली!





रक्तानें रंगलेली नीळ

आफ्रिकेच्या रणांगणावर सत्याग्रहाचा लढा गांधीजींनीं यशस्वी करून दाखविला. या अलौकिक विजयाचें गांठोडें पाठीशीं बांधून गांधीजी १९१५ सालीं हिंदुस्थानांत परत आले. स्वातंत्र्याचा दरवाजा उघडण्याची जणुं कांहीं एक किल्लीच त्यांच्या हातीं आली. साऱ्या जगाला ही वार्ता कळली. हिंदुस्थानांतील त्रस्त लोकांनाहि ही बातमी कळली. एखाद्या आजारी माणसाला गांवांत नामांकित वैद्य आल्याची माहिती आपोआपच कळते आणि मग जो तो आपलें दुखणें त्या वैद्यापुढें मांडून तें बरें करून देण्यास विनवितो. त्या वेळच्या परतंत्र हिंदुस्थानांत तर काय? अशीं दुखणीं जागोजाग होतीं.

एकदा गांधीजी मुंबईहून राजकोटला निघाले होते. नेहमीं-प्रमाणें त्यांचा प्रवास तिसऱ्या वर्गानें चालला होता. त्यांच्या अंगांत थोडासा ताप होता. गाडी वढवाण स्टेशनवर थांबली. तेथील एक शिंपी गांधींना भेटावयास आले. अेक धोतर, अेक सदरा आणि ८–१० आण्यांची टोपी—अशा साध्या वेषांत गांधीजींना त्या शिंप्यानें पाहिलें. शिंप्याचें नांव मोतीलाल. लोकसेवेची त्यांना मोठी हौस. विरमगांव येथील जकातीच्या तपासणीमुळें लोकांचे जे हाल होत, त्यांचें वर्णन त्यांनीं गांधींपाशीं केलें.

गांधीजी तापानें फणफणत होते; त्यामुळें बोलण्याची ताकद विशेष नव्हतीच. त्यांनीं एकच रोकडा प्रश्न केला, "तुम्हीं तुरुंगांत जायला तयार आहां?" मोतीलालांनीं निश्चयी स्वरांत होकार दिला. "आम्हीं अवश्य तुरुंगांत जाऊं, पण तुम्हीं आमचें नेतृत्व स्वीकारलें पाहिजे. काठेवाडी या नात्यानें तुमच्यावर आमचा पहिला हक्क आहे!" दोन वर्षें गांधीजींनीं सरकारकडे दाद मागितली, शेवटीं व्हाइसरॉयाचीहि मुलाखत घेतली आणि विरमगांवची जकात रद्द झाली! हिंदुस्थानांतील सत्याग्रहाचें हें मंगलाचरणच!!

अशीच दुसरी हाक गांधींजींना ऐकूं आली हिमालयाच्या कंठांतून. नेपाळजवळ चंपारण्य म्हणून एक भाग आहे. तो बिहार राज्यामध्यें मोडतो. याच प्रांतांत पूर्वीं भगवान् विष्णूंनीं गजेंद्रमोक्ष केला, अशी पौराणिक कथा आहे. गांधीजींना तेथील शेतकऱ्यांचा मोक्ष करावयाचा होता. खुद्द चंपारण्यांत ध्रुवानें ईश्वर-प्राप्तीसाठीं

तपश्चर्या केली होती, तशीच तपस्या तेथील शेतकऱ्यांना करावयास गांधीजींनीं लावलें. गौतम बुद्धानें प्राचीन काळीं तेथें अहिंसेचा जो उपदेश केला, तोच सामुदायिक स्वरूपांत, राजकीय ध्येयासाठीं गांधीजी करूं लागले.

चंपारण्यांतील शेतकऱ्यांची स्थिति कशी होती ? आफ्रिकेंतील हिंदी लोकांसारखीच ! तसेच अन्याय, तसेच जुलूम, तसेच छळ —आणि तरीहि सारी हिंदी प्रजा झोंपलेली—सुस्तावलेली. तिला जागें करणें, संघटित करणें व लढ्यासाठीं उभे करणें हें कार्य गांधीजींपुढें होतें. चंपारण्यांत गोरे लोक पैशाच्या हावेनें, नीळ पिकवीत—ती पिकविण्याची शेतकऱ्यांवर सक्ति करीत—कधीं कधीं त्या शेतकऱ्यांना भाले खुपसून रक्तबंबाळ करीत—गोळ्या घालून ठारहि करीत.

" इंग्लंडला जाणारी निळीची एकहि पेटी मानवी रक्तानें न डागळलेली असत नाहीं. " अशी कबुली गोऱ्या मिशनऱ्यांनींच दिलेली आहे. पण मिशनऱ्यांची भूतदया तितकीच. ते रक्ताचे डाग पुसून टाकण्यासाठीं त्या गोऱ्या मळेवाल्यांना जाब विचारण्याचें किंवा त्या मळेवाल्यांना पाठीशीं घालणाऱ्या गोऱ्या सरकाराशीं लढा खेळण्याचें धैर्य त्यांच्या अंगीं कोठलें ?


तें धैर्य दाखविलें एकट्या गांधीजींनींच. ते १९१६ सालीं लखनौ येथें कॉंग्रेससाठीं गेले होते. तेथें त्यांच्या कानावर कांहीं कार्यकर्त्यांनीं चंपारण्यांतील शेतकऱ्यांची दुर्दशा घातली. ' मला प्रत्यक्ष माहिती मिळाल्याशिवाय मी कांहींहि करणार नाहीं ' असा

सत्यनिष्ठ निर्धार गांधीजींनीं व्यक्त केला. ‘मग चला तर चंपारण्यांत.’ ते कार्यकर्ते म्हणाले. गांधीजींच्या आफ्रिकेंतील यशस्वी लढ्याचा वृत्तान्त त्यांना माहीत होता. यश मिळेपर्यंत वर्षानुवर्ष चिकाटीनें लढत रहाण्याचा गांधीजींचा गुण त्यांना ठाऊक होता. त्यामुळें ‘ गांधीजी चंपारण्यांत येणार ’ या वार्तेनें ते आनंदून गेले.

चंपारण्यांतील जनता तर शबरीप्रमाणें त्यांचें स्वागत करण्यास पुढें झाली. गांधीजी मुजफ्फरपूर येथें गेले, स्टेशनवर त्यांना पंचारतींनीं ओवाळण्यांत आलें! बिहारी लोकांनीं त्यांच्या गाडीचे घोडे सोडले व स्वतः ती गाडी ओढली ! किती प्रेम, किती भक्ति ! केवढी आशा, केवढी उत्कंठा ! ! पिढ्यानुपिढ्यांचे आपले हाल नष्ट करणारा ‘ देवच ’ आपल्यामध्यें आला आहे, अशी भावना त्यांच्यामध्यें उत्पन्न झाली. दगड होऊन पडलेल्या अहिल्येला उद्धारकर्ता राम भेटणार होता.

◆ “त्या माणसाच्या दृष्टींत जादू होती, कनवाळू प्रेम होतें व मृत्यूलाहि कवटाळण्यास न भिणारी निष्ठा त्याच्या अंगीं होती” असें गांधीजींचें वर्णन पं. जवाहरलालांनीं केलें आहे आणि म्हटलें आहे कीं, “दलितांनीं त्यांना पाहिलें व ऐकिलें–आणि त्यांचीं मृतपाय अंतःकरणें नवचैतन्यानें थरारून गेलीं.”

◆
◆ ◆



मृत्युंजयी वृत्ति

हा चमत्कार गांधीजींनीं कसा केला ? त्यांच्याजवळ कोणती जादू होती ? कोणता मंत्र होता ? कोणती जडीबुट्टी होती ? त्यांच्याजवळ एकच किमया होती आणि ती म्हणजे लोक–संघटनेची. त्यांनीं ८५० खेड्यांतील आठ हजार शेतकऱ्यांच्या तक्रारी कागदावर नोंदून घेतल्या. आरंभीं शेतकरी त्यांच्याकडे जाण्यास भीत. फार काय, सुशिक्षित वकीलवर्गहि त्यांना साहाय्य करण्यास कचरे. पण गांधीजींची चिकाटी दांडगी आणि तशीच निर्भयताहि. त्यांना सरकारनें चंपारण्यांत जाण्यास मनाई करणारा हुकूम काढला; पण तो अन्यायाचा हुकूम गांधीजींनीं मोडून टाकला. ते खेड्याखेड्यांतून हिंडले–

वैशाखाच्या रखरखीत उन्हांतूनहि हिंडले. शेंकडों शेतकऱ्यांच्या कहाण्या त्यांनीं ऐकल्या. त्या कहाण्यांत काय होतें ?

त्या गरीब बिचाऱ्या हिंदी शेतकऱ्यांवर गोऱ्या मळेवाल्यांनीं नानाविध ५५ कर लादलेले होते. कशासाठीं ? तीं कारणें हास्यास्पद आहेत. शेतकरी मेला तरी कर ! विधवेचा पाट लागला तरी कर ! आणि मुलाचें लग्न लागलें तरी कर ! हळद-तेल-दूध वगैरे वस्तूंच्या विक्रीवरहि मळेवाले कर घेत ! हिंदूचा सण आला तरी गोरे मळेवाले कर उकळीत. स्वतः हत्ती–घोडा किंवा मोटार अथवा बोट घेतली तरी ते शेतकऱ्याकडून कर हबकीत ! गोरा मळेवाला आजारी पडला तरी त्याचा भूर्दंड हिंदी शेतकऱ्याला !! आणि हे कर जे शेतकरी देणार नाहींत, त्यांना मळेवाले नाना रीतीनीं छळत. त्यांनीं कांहीं शेतकऱ्यांना झाडाशीं बांधलें आणि चामडी पट्ट्यानें फोडून काढलें. कांहीं उच्चवर्णीय हिंदूंना गुरांच्या कोंडवाड्यांत ठेवलें, तर कांहींचे हातपाय बांधून, त्यांना रखरखीत उन्हांत उभे करून, त्यांच्या डोकीवर किंवा छातीवर, जडजड ओझीं लादलीं !

काय या भयंकर शिक्षा ! आणि किती क्षुल्लक कारणासाठीं ! त्यांत कांहीं न्याय आहे का माणुसकी ? अशा अन्यायी व राक्षसी जुलुमाचें जाळें तोडून टाकण्याचा निर्धार गांधीजींनीं केला आणि चंपारण्यांतील शेतकऱ्यांनाहि तसाच निर्धार करण्यास लावलें. ही शांतिपूर्ण क्रांति होती. हा अहिंसक लढा होता.

त्याची वार्ता कानीं पडतांच गोरे मळेवाले बेचैन झाले. त्यांनीं तो लढा मोडून काढण्याचें ठरविलें. कसें ? तर हा लढा पेटविणाऱ्या

गांधीजींना ठार मारून! त्यांचा हा राक्षसी बेत गांधीजींच्या कानीं पडला. तेव्हां गांधीजींनीं काय केलें?

ते ताडकन् उठले आणि सरळ एका मळेवाल्याच्या बंगल्यावर गेले आणि त्याला छातीठोकपणें म्हणाले, "मी ऐकतों कीं, आपण मला ठार मारण्यासाठीं मारेकरी ठेवले आहेत. म्हणून कोणाला सांगितल्याशिवाय मी एकटाच आलों आहे. मला मारा."

अशा मृत्युंजयी धैर्यानें पण पूर्ण शांततेनें गांधीजी मळेवाल्यांशीं झगडले–सरकारशीं झुंजले! शेंकडों–हजारों शेतकऱ्यांचें साहाय्य त्यांना मिळालें. जनतेची ही जागृत शक्ति पाहून सरकारनें 'चौकशी समिति' नेमली. तींत गांधीजींनाहि घेतलें. दहा दहा हजार शेतकरी समितीच्या कार्यालयाजवळ जमत. समितीच्या शिफारशी-प्रमाणें सरकारनें ता. १८ आक्टोबर रोजीं असें जाहीर केलें कीं, "शंभर वर्षें चालत आलेला, सक्तीनें नीळ पिकविण्याचा, तीन कठीयांचा कायदा रद्द होईल, खंडवाढ कमी होईल व वेठ-बिगारहि नष्ट होईल."

गांधीजींच्या सत्याग्रहचा स्वदेशांतील हा पहिला विजय होय.

जसे बिहारमधले, तसेंच गुजरातमधील शेतकरीहि निर्धन, निरक्षर व जुलुमाखालीं चेंगरलेले होते. तीच दशा कोट्यवधि हिंदी शेतकऱ्यांची; पण १९१८ सालीं गुजराथमध्यें दुष्काळ पडला. खेडा जिल्ह्यांतील पिकें पार बुडालीं. सहाशें खेड्यांतील लोकांची अन्नान्न दशा झाली; पण सरकार पडलें परकी. त्याला हिंदी शेतकऱ्यांबद्दल कळवळा कोठून येणार? त्यानें उपाशीं

शेतकऱ्यांकडून सक्तीनें सारा वसूल करण्याचा सपाटा चालू ठेवला. चार लाख रुपये सारा वसूल करण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांनीं चंग बांधला. त्यासाठीं जरूर तर शेतकऱ्यांची तीन कोटी रुपयांची जमीन जप्त करण्यासहि ते तयार झाले.

शेतकऱ्यांनीं आपले दागदागिने विकले, गुरेंढोरें विकलीं, तरी सर्वांना सारा भरणें शक्य झालें नाहीं. तेव्हां त्यांच्यावर जुलूम होऊं लागला. लोकांनीं सरकारकडे मदतीसाठीं अर्ज केले, तारा धाडल्या, शिष्टमंडळें पाठविलीं; पण परकें सरकार म्हणजे परकें! त्यानें कशालाच दाद दिली नाहीं. दडपशाहीचा वरवंटा मात्र जोरजोरानें फिरविण्यास सुरवात केली. तेव्हां काय करावें हें शेतकऱ्यांना कळेना—त्यांच्या पुढाऱ्यांनाहि समजेना. त्यांनीं गांधीजींचा धावा केला. गांधीजींजवळ संजीवनी मात्रा होतीच. ह्या मात्रेचा गुण आफ्रिकेंत आला होता—बिहारमध्यें आला होता. ती मात्रा म्हणजे सत्याग्रह!

गांधीजींनीं गुजराती शेतकऱ्यांना सत्याग्रहाचा संजीवनी मंत्र पढविला. एका सभेंतच दोनशें शेतकऱ्यांनीं सत्याग्रहाची प्रतिज्ञा केली. सरकार हट्टाला पेटलें. त्यानें भयंकर दडपशाही सुरू केली; पण ती फोल ठरली. कारण आतां शेतकरी-वर्ग लढा देण्यास उभा राहिला होता, त्यामुळें सहा महिन्यांत त्यांना विजय मिळाला. सरकारनें त्यांना शरण येऊन असें जाहीर केलें कीं, "गरीब शेतकऱ्यांकडून सारा घेतला जाणार नाहीं."

◆

◆ ◆



अहिंसेचें प्रभावी शस्त्र

एकेक गड, एकेक शहर सर करीत करीत पूर्वी जसा एकादा सेनापति अखेर राजधानीवर हल्ला चढवी; तशीच चढती कमान हिंदुस्थान देशाची त्याच्या स्वातंत्र्य-संग्रामांत होती. चंपारण्यांतील शेतकऱ्यांनीं गोऱ्या मळेवाल्यांचा जुलूम नाहींसा केला, गुजरातेंतील किसानांनीं तर प्रत्यक्ष सरकारशींच सामना देऊन सारा माफ करून घेतला व बलाढ्य राज्यसत्तेवर लहानसा जय मिळविला. देशाच्या एकएका कोपऱ्यांत युद्धाच्या अशा ज्वाळा पेटत होत्या; त्यामुळें सर्व जनतेचें अंत:करण उजळून निघत होतें. तिला आपल्या हक्कांची जाणीव होत होती आणि आपल्यावरील अन्याय निवारण्याचा मार्ग दिसूं लागला होता.

सर्व देशांतच जागृतीची व संघटनेची ज्योत पेटूं लागलेली होती. तींत तेल ओतण्याचें कार्य सरकार आपल्या दडपशाहीनें करीत होतें.

१९१७ सालचा प्रसंग! होमरूल लीगच्या ऐन अमदानीचे ते दिवस! पं. मोतीलाल नेहरूहि त्या चळवळींत हिरीरीनें पडलेले. लखनौ येथें संयुक्त प्रांतिक परिषदेचें अधिवेशन भरलें असतांना त्याचे अध्यक्ष तेच होते. अध्यक्षपदावरून त्यांनीं उद्गार काढले, "येथील नोकरशाही जुलमी बनली आहे. आतां आपण इंग्लंडांतील ब्रिटिश जनतेच्या न्यायप्रियतेवरच विश्वास ठेवला पाहिजे. कारण, आपलें भवितव्य अखेर तिच्या हातांतच आहे."

हें वाक्य पुरें होतें न होतें तोंच, 'तोहि एक प्रश्नच आहे' असे विरोधाचे तीव्र उद्गार श्रोतृवृंदांतून उठले. कोणी काढले हे उद्गार? मोतीलालजींना तर तो अपमानच वाटला. त्यांनीं आपल्या डोळ्यावरील चष्मा बाजूस सारला, हातांतील हस्तलिखित भाषण खालीं टाकलें व टेबलावर त्वेषानें हात आपटीत विचारलें, "अशी शंका घेण्याची कोणाची छाती आहे?"

'माझी आहे.' अशी वीर-वाणी पं. जवाहरलालांच्या मुखांतून उसळली.

'वडिलांना शहाणपण शिकवूं पहाणाऱ्या धाडसी तरुणानें पुढें यावें आणि माझें विधान खोडून काढावें.' मोतीलालजी गरजले.

तें आव्हान जवाहरलालांनीं स्वीकारलें नाहीं; त्यामुळें वृद्ध नेहरूंचा आब राहिला, पण तरुण नेहरूंचें तेज विजेप्रमाणें सर्वांच्या डोळ्यांपुढून चमकून गेलें.

हेंच तेज आणखी दोन वर्षांनींहि पुनः एकदां जाहीर सभेंत प्रगट झालें. १९१९ मधील ता. ६ एप्रिल हा दिवस. गांधीजींच्या सत्याग्रह-संग्रामाचा प्रारंभ. त्यासाठीं देशभर हरताळ पाळण्यांत आला, प्रार्थना करण्यांत आल्या, स्वदेशीच्या शपथा घेतल्या गेल्या, उपोषण करण्यांत आलें. संध्याकाळीं भरलेल्या सभेंत मोतीलालजी म्हणाले, " या कार्यक्रमांतील स्वदेशीचा भाग मला मान्य आहे, पण उपोषणादि प्रकारांना संमति दिलीच पाहिजे असें मला वाटत नाहीं. " हें ऐकताच पं. जवाहरलालांनीं निषेधाचा ध्वनि काढला.

ते पहिल्या महायुद्धाचे दिवस होते. तेव्हां सरकारला हिंदुस्थानांतून मनुष्यबळ व द्रव्यबळ मिळेल तितकें पाहिजेच होतें. तें कसें मिळणार ? गायीचें दूध काढण्यासाठीं तिच्या सडांना गवळी पाणी लावतो, त्याप्रमाणें सरकारनें हिंदुस्थानला खूष करण्यासाठीं स्वराज्य देण्याची भाषा काढली; पण हें स्वराज्य कसलें ? ताकपीठाच्या पाण्याला दूध म्हणण्यासारखें ! भारतमंत्री मॉंटेग्यू हिंदुस्थानांत आले; देशभर हिंडले; सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांस भेटले आणि १९१८ च्या जूनमध्यें त्यांचा अहवाल प्रसिद्ध झाला.

त्या अहवालांत काय होतें ? तर प्रांतिक कारभारांतील कांहीं बिनमहत्त्वाचीं खातीं लोकांच्या हातीं दिलीं होतीं आणि दिल्लीच्या मध्यवर्ती सत्तेचा तर पत्ताच नव्हता. तेव्हां १९१८

च्या ऑगस्टमध्यें राष्ट्रसभेचें जादा अधिवेशन मुंबई येथें भरलें आणि त्यांत सर्व राष्ट्रानें एकमुखानें जाहीर केलें, 'या सुधारणा अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक आहेत.' एखाद्या साहाय्यकर्त्या माणसाला जेवावयास बोलवावें आणि त्याची बोळवण नुसत्या गूळ-पाण्यावर करावी, असें हें ब्रिटिश सरकारचें वर्तन स्वार्थी व कंजूष होतें. तें पाहून सारा हिंदुस्थान देश निराशेनें चिडला.

या निराशेंत क्रोधाची भर टाकण्यासारखें कृत्य सरकानें त्याच वर्षी केलें. तें म्हणजे रौलट-रिपोर्ट! हा १९१८ च्या जुलैमध्यें प्रसिद्ध झाला. 'त्यांत लोकमान्य टिळकांनीं सुरू केलेले गणेशोत्सव व शिवाजी-उत्सव हे क्रांतिकारक चळवळीचे श्रीगणेशा आहेत,' असें म्हटलें आहे आणि सारा देश तरवारीच्या धारेवर ताब्यांत ठेवणें जरूर आहे अशी शिफारस सरकारला केली आहे. महायुद्धाच्या वेळीं सरकारनें जे कडक कायदे तात्पुरते म्हणून केले होते, ते कायमचे करावेत असा निष्कर्ष या अहवालांत काढलेला होता. एखाद्या वाघाला पिंजऱ्यांत कोंडून चोहोंबाजूंनीं भाले लावून बंदोबस्तांत ठेवावें, तशी ही सरकारची योजना होती. सारा देश म्हणजे एक तुरुंगच बनणार होता. हें पाहून म. गांधींपासून ना. शास्त्री यांच्यापर्यंत सर्व पुढाऱ्यांनीं या रौलट-अहवालाचा कडकडून निषेध केला.

त्या वेळीं गांधीजी जिवावरील दुखण्यांतून उठले होते. अंथरुणा-वर पडल्या पडल्या त्यांनीं रौलट अहवाल वाचला. तो वाचतांच

त्यांना वाटलें, आतां लढा जुंपणार! सरकारनें हा एवढा मोठा अन्याय केला आहे कीं, त्याचा प्रतिकार करणें अवश्यच आहे. ते सरदार वल्लभभाईंना तावडतोब म्हणाले, "आपण सत्याग्रह हातीं घेतला पाहिजे. मी अंथरुणाला खिळलेला नसतों तर एकटाहि झुंजलों असतों आणि इतर लोक मागून येऊन मिळतील अशी आशा केली असती."

सारा देश कायदेभंगाच्या निशाणाखालीं उभा राहण्यास उत्सुक होता. फक्त कांहीं नेमस्तांनीं आपल्या आरामखुर्चीवर बसून कायदेभंग 'भयंकर' असल्याचें जाहीर केलें होतें; पण शेंकडों माणसें कायदेभंग करण्यासाठीं हौसेनें पुढें येत होतीं. अवघ्या पंधरा दिवसांच्या आंत एकट्या मुंबई प्रांतांतून सहाशें माणसें सत्याग्रहाचा लढा खेळण्यास पुढें आलीं. त्यांत कांहीं स्त्रियाहि होत्या. प्रांताप्रांतांतून शेंकडों स्त्री-पुरुष सशस्त्र सरकारशीं निःशस्त्र लढा देण्यास उत्साहानें पुढें सरसावले. त्या सर्वांचे सेनापति म्हणजे गांधीजी! त्यांनीं आपल्या या अहिंसक सैनिकांना अशी स्पष्ट दीक्षा दिली कीं,

◆ "कोणत्याहि स्वरूपाची हिंसा वर्ज्य माना. 'जशास तसें' हें तत्त्व टाकून द्या. द्वेषाला द्वेष, हिंसेला हिंसा, दुष्टपणाला दुष्टपणा हें धोरण सोडा आणि क्रोधाला प्रेमानें, अत्याचाराला अहिंसेनें व अपकाराला उपकारानें जिंकण्यास शिका. त्या योगें आपला हृदयपालट झाला पाहिजे, म्हणजे सरकारचाहि हृदयपालट होईल. राजकारणांत धर्माचा प्रवेश करण्याचा हा प्रयोग आहे."



ता. ३० मार्च रोजीं सर्व देशांत ' सत्याग्रह–दिन ' पाळला जावा असा आदेश गांधीजींनीं दिला. पुढें हा दिवस बदलून ता. ६ एप्रिल ठरविण्यांत आला. हा फरक दिल्लीच्या लोकांना कळला नाहीं; म्हणून त्यांनीं ता. ३० मार्च रोजींच हरताळ पाळला, उपवास केला, प्रार्थना म्हटली व सभा भरविली. हिंदु-मुसलमान सर्वांनीं एकदिलानें व एकमुखानें सरकारी दडपशाहीचा निषेध केला. पोलिसांनीं दिल्ली स्टेशनवर गोळीबार केला. त्यांत पांच लोक ठार व पंचवीस जखमी झाले.

दिल्ली स्टेशनवर एक चमत्कार घडला! तेथें एक गोरा गुरगुरला, " तो स्वामी श्रद्धानंद माझ्यासमोर आला, तर या बंदुकीनें मी त्याचा चट्दिशीं निकाल लावीन ! "

योगायोग असा कीं, त्याच वेळीं स्वामीजी त्याच प्लॅटफॉर्मवरून चालले होते. त्यांनीं ते उद्गार ऐकले. लगेच स्वामीजी पुढें झाले व आपली छाती उघडी करून म्हणाले, " मैं श्रद्धानंद हूं.

चलाओ गोली ! मैं यहांसे नहीं हटुंगा ! ” त्या महात्म्याच्या नेत्रांतील दिव्य तेज दृष्टीस पडतांच ते पोटभरू सोजीर तेथून पळाले ! गोऱ्या सोजिरांची बंदुकीची गोळी भित्री ठरली व ती बंदुकींत तशीच राहिली ! सशस्त्र सैनिकावर निःशस्त्र संन्याशानें विजय मिळविला. हे स्वामी श्रद्धानंद पूर्वी महात्मा मुनशीराम ’ या नांवानें ओळखले जात. पुढें हा महात्मा हुतात्मा ठरला.

दिल्ली ही राजधानी. तिनें आघाडी मारली. सर्व देशाच्या आधीं सरकारशीं झुंज दिली. त्यानंतर ठरल्याप्रमाणें ता. ६ एप्रिल रोजीं हिंदुस्थानांतील शहराशहरांत व खेड्याखेड्यांत ‘ सत्याग्रह-दिन ’ पाळला गेला. हरताळ-प्रार्थना-सभा असा त्रिविध कार्यक्रम सर्वत्र अमलांत आला; पण मुंबईचा उत्साह विशेष. तेथें प्रत्यक्ष कायदेभंगच करण्यांत आला. सरकारनें जप्त केलेलें वाङ्मय जाहिरपणें लोक विकूं लागले व खरेदी करूं लागले. सरकारच्या कायदे–शास्त्राप्रमाणें दोन्हीं कृत्यें म्हणजे गुन्हेच होते. अन्यायी सरकारचे जुल्मी कायदे मोडण्याचा विडाच प्रजेनें उचलला होता. कायद्याचा आदर व तुरुंगाचें भय लोकांच्या मनांतून पार नाहींसें झालें होतें. गांधीजी, सरोजिनीबाई असें थोर थोर स्त्री-पुरुष भररस्त्यावर जप्त पुस्तकें विकीत होते.

‘ हिंद स्वराज्य ’ हें गांधीजींचें पुस्तक केवढें ? अवघें चार आण्यांचें ! पण ५०–५० रुपये देऊन तें विकत घेतलें गेलें. याशिवाय मिठाचा कायदाहि तोडावा अशी सूचना गांधीजींनीं त्या वेळीं केली होती; पण तिचा अंमल व्हावयाचा होता पुढें !


गांधीजींना पंजाबांत जाण्यास मनाई झाली. हें कळतांच लोक खवळले. त्यांनीं तारा तोडल्या. अहमदाबादेस मजुरांनीं दंगा केला. एका शिपायाला ठार केलें. नडियाद शहरीं रेल्वेचे रूळहि उखडण्याचा प्रयत्न लोकांनीं केला. सरकारी इमारती जाळल्या; शस्त्रें हिसकावून घेतलीं, दुकानें लुटलीं.

पं. मोतीलाल आपल्या एकुलत्या चिरंजीवासह असहकारितेच्या चळवळींत हिरीरीनें पडले व पुढें पकडले गेले. त्या वेळीं त्यांनीं आपल्या राष्ट्रबांधवांना असा धीरगंभीर संदेश दिला कीं, " मित्रहो, आपल्या आगमनानें हे सर्व तुरुंग भरून काढा. त्याशिवाय राष्ट्रीय शक्ति तुमच्या अंगांत संचरावयाची नाहीं. "

आणि त्यांच्या पत्नी? ऐश्वर्यात वाढलेल्या व सौख्यांत नांदलेल्या सौ. स्वरूपराणी. यांनीं वीर-पत्नी व वीर-माता यांना साजेसेच उद्गार काढले. त्या म्हणाल्या, " माझे पति आणि माझा एकुलता एक पुत्र तुरुंगांत गेला, याबद्दल मला अभिमान वाटतो. हा अभिमान अंतःकरणांत जागृत झाला म्हणजे अत्यंत आनंद वाटल्याशिवाय राहत नाहीं. " त्याबरोबरच त्या माउलीनें आपलें दुःखहि व्यक्त केलें आहे. प्रांजलपणें त्या म्हणतात, " प्रियजनांच्या वियोगाचें मला कांहींच वाटत नाहीं, असें मी ढोंगीपणानें कधींच म्हणणार नाहीं. वियोगामुळें माझें हृदय अगदीं भरून गेलें आहे. कारण प्रेम ही गोष्ट मनुष्याचा अंत पाहणारी असते. तुरुंगांतल्या खडतर हालअपेष्टा सोसण्याजोगें त्यांचें शरीर नसल्यामुळें माझें अंतःकरण शतशः विद्ध होत आहे. तथापि पति आणि पुत्र तुरुंगांत गेल्याचा

मी आनंद मानावा असें माझें अंतर्मन मला सांगत आहे. सध्यांच्या दडपशाहीला जर आपण निग्रहानें व सत्याग्रहानें तोंड दिलें, तर आपण लवकरच स्वराज्य हस्तगत करूं शकूं असा मला भरंवसा वाटतो. " अशी त्यागाची व देशभक्तीची भावना श्रीमंत कुटुंबांतील अंतःपुरापर्यंतहि त्या वेळीं पसरली होती.

" गंगास्नान आणि देवपूजा यांचा जो संबंध आहे, तोच खादी आणि स्वराज्य यांमध्यें आहे " असा मार्मिक दृष्टांत पं. मोतीलालांनीं एकदा दिला होता. केवळ खादी वापरली कीं, स्वराज्य मिळेल असें कोणीच मानीत नव्हतें; पण खादीनें चित्तशुद्धि होते, स्वार्थापलीकडे दृष्टि लागते, देशबांधवांविषयीं ममत्व उत्पन्न होतें आणि स्वदेशीवर निःसीम भक्ति जडते. गंगेंत स्नान करून, शुचिर्भूत होऊन मगच काशीविश्वेश्वराच्या दर्शनास भक्तगण जातो, त्याच निर्मल व पवित्र भावनेनें सर्वांनीं राष्ट्रकार्यास वाहून घ्यावें, म्हणून खादीवर त्या काळीं भर देण्यांत आला होता. राष्ट्रांतील खेडीं व शहरें, त्यांतील अज्ञ व सुज्ञ जन, गरीब व गबर लोक-या सर्वांना त्या वेळीं खादीच्या धाग्यानें प्रेमानें बांधून टाकलें होतें.



बागेचें स्मशान केलें

अमृतसर हें पंजाबमधील एक प्रसिद्ध शहर. तेथें 'जालियनवाला बाग' नांवाची सभा भरण्याची जागा. ता. १३ एप्रिल १९१९ रोजीं पाडवा होता; त्यानिमित्त तेथें जत्रा भरली होती. खेडयापाडयांतून हजारों लोक धार्मिक भावनेनें तेथें आलेले होते. संध्याकाळीं जालियनवाला बागेंत एक सभा भरली.

ही बाग म्हणजे नुसती बखळ आहे. चोहोंबाजूंनीं अनेक-मजली इमारती आहेत. फक्त एका बाजूला शंभर फुटांपर्यंत घर नव्हतें. तेथें पांच फूट उंचीची भिंत होती. या बखळींत शिरण्याला एकच अरुंद वाट होती. तेंच त्या बागेचें 'प्रवेश–द्वार.'

त्या द्वारांतून लहानथोर स्त्रीपुरुष सभेसाठीं तेथें जमले. वीस-पंचवीस हजारांवर आबालवृद्ध नागरिक तेथें जमले. ते पूर्ण निःशस्त्र होते, शांततापूर्ण वृत्तीनें बसले होते-जशी कांहीं झाडावरचीं पांखरेंच.

पण झाडावरच्या निष्पाप पांखरांची शिकार केली जात नाहीं काय? अंगच्या शक्तीनें माजलेला व दारूचा कैफ चढलेला एकादा मदोन्मत्त शिकारी एकाद्या रानांत शिरून हातांतील बंदुकीनें चोहों दिशांना मनमानेल तशा गोळ्या झाडतो व झाडांवरील पांखरांना पटापट् ठार करतो ना? तितक्याच नाहकपणें व निर्दयपणें जालियनवाला बागेंतील निरपराध नागरिकांची निष्कारण कत्तल करण्यांत आली.

सभेच्या दाराशीं युद्धाचीं शस्त्रास्त्रें येऊन थडकलीं. जनरल डायर हा लष्करी हडेलहप्पी अधिकारी पुढें झाला. त्यानें आपल्या-बरोबर पन्नास सैनिक आणले होते. कोण होते ते सैनिक? इंग्रज? फ्रेंच? कीं जर्मन?

छेः! त्यांतील पंचवीस होते गुरखे आणि पंचवीस होते शीख! आपल्या देशबांधवांवर-निरपराधी नागरिकांवर-चार दमड्यासाठीं-गोळ्या झाडावयाला-परक्या अधिकाऱ्याच्या हुकुमानें त्यांची कत्तल करावयाला-ते तेथें खडे झाले होते. याच देशद्रोही वृत्तीनें पूर्वीं आपलें स्वराज्य गेलें. फितुरी हा जसा आपल्या रक्तांत भिनलेला एक विषजंतु आहे, तसाच हा दुसरा विष-जंतु. 'आम्ही आमच्या निष्पाप बांधवांवर गोळ्या झाडणार नाहीं.'

असा निर्धार सैनिकांनीं प्रगट करण्याचा काळ पुढें यावयाचा होता; पण जालियनवाला बागेंत, तेथील सभेंत–त्या सभेंतील बायकामुलांवर, म्हाताऱ्याकोताऱ्यांवर—

खाड् ! खाड् ! खाड !—बंदुकीच्या गोळ्या सटासट् सुटूं लागल्या. अर्ध्या मिनिटाच्या आंतच डायरनें आपलें धोरण ठरविलें. कोणताहि इषारा न देतां त्यानें अकस्मात गोळीबार करण्याचा हुकूम फर्माविला. गोळीबाराची गरज आहे कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं मुलकी अधिकाऱ्याचा सल्ला घेण्याचा कायदा आहे. तो त्यानें पायाखालीं तुडविला आणि जणुं कांहीं आपलें राज्य उलथून पाहूं पाहणाऱ्या सशस्त्र क्रांतिकारकांशींच मुकाबला आहे, अशा आविर्भावानें डायरनें एकदम गोळीबाराचा हुकूम दिला.

आकाशांतून एकाएकीं विजा कडाडून कोसळाव्या, तसें त्या सभेंतील लोकांना झालें. आपला गुन्हा काय, हेंहि त्यांना कळेना. पण परतंत्र रहाणें–आणि त्यांत निःशस्त्र रहाणें–हा केवढा गुन्हा ! त्या सर्वांची चटणी उडविण्यांत अवघड काय होतें ? दाव्याला बांधलेल्या गरीब गायांचीं मुंडकीं कसायांनीं सपासप तोडीत जावें, तितकें डायरचें काम सोपें होतें. तेथें गोळीला गोळी नव्हती ! प्रतिकार असा कांहींच नव्हता. त्याला मोकळें रान सांपडलें. एकसारख्या, बिनहरकत, सोळाशें गोळ्या त्या सैनिकांनीं लीलेनें झाडल्या !

सभेसाठीं जमलेले लोक चकित झाले, भयभीत झाले, सैरावैरा धावूं लागले. कांहीं माणसें त्या पांचफुटी भिंतीवरून उड्या

मारून जाऊं लागलीं. त्यांचा नेम बरोबर धरून त्या शीखांनीं व त्या गुरख्यांनीं त्यांच्यावर अचूक गोळीबार केला! धडाधड् माणसें खालीं पडलीं—जमिनीवर लोळूं लागलीं—कण्हूं—विव्हळूं लागलीं—ओरडूं-आरडूं लागलीं! त्यांच्या जखमांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. मुलें किंचाळूं लागलीं—बायका बेशुद्धच पडल्या. बागेच्या भिंतीच्या आंतल्या व बाहेरल्या—दोन्ही बाजूंस मृतांचे व जखमी झालेल्यांचे ढीगच्या ढीग पडून राहिले. जखमी लोकांना पाणी देण्यास, त्यांची शुश्रूषा करण्यास, तेथें कोणी जाऊं म्हणेल, तर त्यालाहि मनाई!

आणि मग? गोळीबार थांबला! कां? बंड मोडलें म्हणून? सैनिकांना देशभक्ति आठवली म्हणून? कीं डायरच्या अंतःकरणांत भूतदयेचा झरा निघाला म्हणून? छेः! छेः! गोळ्याच संपल्या म्हणून गोळीबार संपला! नाइलाज झाला त्या डायरचा! बिचारा काय करणार? इकडे गोळ्या संपल्या आणि तिकडे तोफा बेकाम बनल्या. त्यानें दोन चिलखती लष्करी गाडे तेथें नेले होते! जर्मनीपुढें जें शौर्य त्याला दाखवितां आलें नव्हतें, तें तो तेथें दाखविणार होता. पण काय करावें? त्या बागेभोंवतालचा रस्ता अरुंद होता. त्यावरून ते रण-गाडे जातचना! त्यामुळें त्या गाडयांतील तोफा असून नसल्यासारख्याच. त्यांचा उपयोग न करतांच त्या परत नेणें डायरला भाग पडलें. तथापि बंदुकींनीं आपलें काम बजावलें. त्याला समाधान वाटलें! कृतकृत्य वाटलें!!

"सभेंतील लोकांना मी एकहि गोळी झाडल्याशिवाय

हाकलून लावूं शकलों असतों." अशी कबुली डायरनें पुढें स्वतःच दिली.

'मग हा निर्दय व निष्कारण गोळीबार तूं कां केलास?'

'हिंदी लोकांवर वचक बसविण्यासाठीं' असें डायरचें उत्तर आहे, समर्थन आहे.

त्यासाठीं किंमत किती द्यावी लागली?

३७९ माणसें ठार व १२०० माणसें घायाळ!

हे आंकडे सरकारनेंच प्रसिद्ध केले आहेत. खरे आंकडे याच्या किती तरी पट असतील! त्या बागेंत निदान एक हजार तरी प्रेतें पडलीं असावींत, असा अंदाज तो प्रसंग प्रत्यक्ष पहाणाऱ्या लोकांचा आहे. पण परतंत्र माणसाचें शरीर म्हणजे माती, अशीच वृत्ति परक्या सरकारची—साम्राज्यशाहीची असते. अवघ्या दहा मिनिटांचा कारभार!—तेवढ्यांत तेथें प्रलय माजला!!

डायरला वाटलें, "आपण केवढी मर्दुमकी केली! बहादुरी गाजविली! आपलें ब्रिटिश साम्राज्य प्राण-संकटांतून वांचविलें!" पण त्या वेड्याला कळलें नाहीं कीं, त्याच्या या खाटीक-करणीनेंच ब्रिटिश साम्राज्यावर प्राण-संकट ओढवलें! या पंजाब-प्रकरणामुळेंच गांधीजींच्या अंतःकरणांतील साऱ्या सहकार्य-वृत्तीची राखरांगोळी झाली आणि ते ब्रिटिश साम्राज्याला तिलांजलि देण्यास सिद्ध झाले व त्यांनीं आपल्याबरोबर आपल्या साऱ्या राष्ट्रालाहि सज्ज केलें!

अमृतसरमध्यें शांतता झाली–अगदीं स्मशान-शांतता झाली. पण म्हणून काय सरकारची दडपशाही शमली काय? दुसऱ्या दिवसापासूनच सरकारनें त्या भागांतील जनतेचें जीवन करकचून आंवळण्यास सुरवात केली. 'मेले ते सुटले' असें वाटावयास लावण्याइतका अमानुष छळ सरकारी हस्तक सर्व पंजाबभर करूं लागले.

अमृतसर येथिल सर्व नागरिकांना पांच दिवस पाणी व वीज देण्यास बंदी करण्यांत आली. पांच जिल्ह्यांत लष्करी कायदा पुकारण्यांत आला. लष्करी कायदा म्हणजे न्यायाचा अभाव! त्या अंधारांत कोणते अत्याचार किती वेळां झाले असतील, याची कल्पनाच येणार नाहीं. नरकांत रहाणें व लष्करी कायद्याखालीं नांदणें–दोन्ही सारखेंच.

प्रत्येक इंग्रज माणसाला रस्त्यामध्यें हिंदी लोकांनीं प्रत्येक वेळीं सलाम केला पाहिजे, असा हुकूम काढण्यांत आला. सलाम चुकला कीं छळ झालाच! रस्त्यांत गोरा अधिकारी दिसला कीं, हिंदी इसमानें आपल्या गाडींतून खालीं उतरलें पाहिजे, घोड्यावरून जात असल्यास खालीं उतरलें पाहिजे; फार काय, छत्री घेऊन जात असल्यास तीहि मिटविली पाहिजे असा हुकूम झाला. हिंदी वकिलांना–बॅरिस्टरांना 'खास पोलिस' बनविण्यांत आलें व त्यांच्या-कडून हमालाचींहि कामें करवून घेण्यांत आलीं. त्यांत कोणी कांहीं चूक केली कीं, सार्वजनिक ठिकाणीं त्याला उघडे करून फटके! अटक तर शेंकडों लोकांना केली. स्पेशल कोर्टें बसविलीं. हालहाल

करून खोटे कबुलीजबाब घेतले. भयंकर शिक्षा तडकाफडकीं देण्यांत आल्या. ना साक्षी ना अपील !

कोणालाहि धरावें आणि त्याला फटके लगवावे, असा सैतानी अंमल चालू झाला. कांहींहि आगळीक केलेली नसतांना सहा मुलांना पोलिसांनीं पकडलें, एका गल्लीच्या तोंडाशीं नेलें, त्यांचे हात बांधून त्यांना उघडेनागडे केले, तेथील तिकाट्यावर चढविले आणि प्रत्येकाला तीसतीस फटके !—होय, तीसतीस फटके लगावले ! !

कसे सोसले त्या मुलांनीं ते फटके ? सुंदरसिंग नांवाचा एक कोवळा मुलगा. मजेंत खेळा-बागडावयाचें त्याचें वय. त्यानें सरकारचें काय वांकडें केलें होतें ? पण त्याला फटके खावे लागले. चार फटके बसतांच पोर बेशुद्ध पडलें ! तेव्हां एका गोऱ्या सोजीरानें त्याच्या तोंडावर पाणी मारलें. कशासाठीं ? उरलेले फटके खाण्यासाठीं. तो शुद्धीवर येतांच त्याला बाकीचे फटके मारण्यांत आले. तो पुनः बेशुद्ध पडला, पुनः त्याला शुद्धीवर आणण्यांत आलें, पुनः त्याला फटके लगावण्यांत आले— शिक्षेचें माप पुरेपूर भरण्यांत आलें. पण ही शिक्षा कां ? कोणत्या न्यायदेवतेनें त्या मुलांना गुन्हेगार ठरविलें होतें ?

पण पारतंत्र्य हें असेंच पापी, क्रूर, अन्यायी असावयाचें ! वाघालांडग्यालाहि लाजवील इतकी दुष्टता व क्रूरता साम्राज्यशाहीच्या अंगीं असते.

फटक्यांची निर्घृण शिक्षा निष्कारण खाल्ल्यानंतर तरी त्या

बालकांची सुटका झाली काय? छे: ! त्यांच्या हातांत बेड्या अडकविण्यांत आल्या. त्यांना चार पावलेंदेखील चालण्याची ताकद नव्हती, म्हणून पोलिसांनीं त्यांना, बांधून मेलेल्या जनावराप्रमाणें, ओढीत किल्ल्यावर नेलें.

आणि या सर्व राक्षसी कृत्यांचा कळस म्हणजे तो सरपटण्याचा हुकूम (Crawling Order)! लहानमोठ्या, गरीबश्रीमंत–साऱ्या माणसांनीं जनावराप्रमाणें जमिनीवरून सरपटत जाण्याचा हा हुकूम चेंगीझखान–अलेक्झांडर यांना-देखील न शोभणारा होता. असा अपमानकारक हुकूम सोडण्याला कारण काय झालें? तर—

एक ख्रिस्ती शिक्षकीण. तिचें नांव मिस् शेरवुड. ती ता. १० रोजीं सायकलवरून चालली होती. जालियनवाला बागेंतील गोऱ्यांच्या अत्याचारामुळें शहरांतील सारी हिंदी जनता खवळून गेली होती. त्यांतील कांहीं गुंडांनीं शेरवुडबाईवर हल्ला केला. तिला त्या हल्ल्यांतून सोडविलें एका हिंदी गृहस्थानेंच. पण हजारों हिंदी लोकांवर बेगुमानपणें गोळ्या झाडणाऱ्या डायरचें पित्त हें वृत्त ऐकतांच खवळलें.

'एका इंग्रज बाईचा अपमान–आणि तो या परतंत्र काळ्या आदमीकडून!' याची त्याला चीड आली. आणि ता. १९ रोजीं त्यानें असा हुकूम काढला कीं, शेरवुडबाई ज्या गल्लींतून जात होती, त्या गल्लींतून जाणाऱ्या सर्व हिंदी लोकांनीं यापुढें पोटावर पालथे पडून सापाप्रमाणें सरपटत गेलें पाहिजे. कोणी



मध्येंच गुडघा उचलला कीं, त्याच्या पाठींत लाथा किंवा बंदुकीच्या दस्त्याचे रट्टे पोलिस लगावीत. एका आंधळ्या-म्हाताऱ्या माणसालाहि सरपटत जावें लागलें—आणि सरपटतांना पोलिसाच्या लाथा खाव्या लागल्या. कांहीं गांवीं तर, हिंदी लोकांना जमिनीवर नाक घासावयास लावलें—जिभेनें जमीन चाटावयास लावलें ! !

या कोंडवाड्यांतून सुटण्यासाठीं अमृतसरचे लोक बाहेरगांवीं जाऊं म्हणतील, तर रेल्वेचीं तिसऱ्या वर्गाचीं तिकिटें देणेंच सरकारानें बंद केलें. युरोपियनांखेरीज कोणाला सायकलीवरूनहि जाण्यास मनाई करण्यांत आली. हिंदी नागरिकांच्या साऱ्या सायकलीच सरकारानें आपल्या ताब्यांत घेतल्या. बैलगाड्यांवरहि लष्कराचें नियंत्रण सुरू झालें. कांहीं स्टेशनवर लोखंडी पिंजरे ठेवण्यांत आले व त्यांत हिंदी लोकांना डांबण्यांत आलें.

लाहोरमध्यें एक लग्नाची मिरवणूक चालली होती. तींत दहापेक्षां जास्त माणसें आहेत, या सबबीवर पोलिसांनीं सर्वांना पकडलें आणि बऱ्याच जणांना फटक्यांची शिक्षा दिली ! तेथील कॉलेजवर लष्करी हुकूम लावलेला होता. तो कोणी तरी फाडला, तेव्हां पांचशें विद्यार्थी, त्यांचे प्राध्यापक व प्रिन्सिपल या सर्वांना पकडण्यांत आलें आणि डोक्यावर बिछाने घेऊन, तेथील भयंकर उन्हाळ्यांत, तीन मैल रखडावयास लावलें. त्या सर्वांना तीन दिवसपर्यंत किल्ल्यावर लष्करी पहाऱ्यांत ठेवण्यांत आलें होतें. इतर शाळाकॉलेजांतील मुलांनाहि दिवसांतून चार वेळां हजेरी द्यावयास सरकारानें लावलें. या हजेरीसाठीं लहानलहान मुलांनाहि सोळासोळा मैल पायीं जावें लागे !

शेखपुरा येथें भयंकर उन्हाळा ! १०८ वर उष्णतामान गेलेलें. तेथील ५।५, ६।६ वर्षांच्या मुलांनीं ब्रिटिशांच्या निशाणाला–युनियन जॅकला–सलाम केला पाहिजे–दिवसांतून तीनदां केला पाहिजे, असा हुकूम निघाला. त्यासाठीं तीं बालकें जात असतां कांहीं वाटेंत मूर्च्छित पडलीं, कांहीं मृत्यु पावलीं. त्या मुलांकडून सक्तीनें अशी शपथ घेतली जाई कीं, " मी कोणताहि गुन्हा केलेला नाहीं व पुढें करणार नाहीं. मी चुकलों, चुकलों; चुकलों."

एका गांवच्या नागरिकांना लाहोरला नेण्यांत आलें. कसें ? तर रेल्वेच्या मालाच्या उघड्या डब्यांत खेच्चून भरून ! चोवीस तास त्या 'ब्लॅक होल' मध्यें त्यांना डांबलें होते. त्यांना रस्त्यांतून

नेतांना हातकड्या घालण्यांत आल्या होत्या. एका गांवीं तर बायकांना काठ्यांनीं बडवून पोलिसांनीं घराबाहेर काढलें आणि शिव्या देऊन त्यांचा अपमान केला. पोलिस हे त्या वेळीं शुद्ध पशु बनले होते.

कसूर येथें तर कोणी मुलगा धडधाकट दिसला कीं, पोलिस त्याला पकडीत व फटके मारीत. तेथील ७१० लोकांना निष्कारण फटके लगावण्यांत आले. गुजराणवाला येथें तर विमानांतून बॉंब टाकण्यांत आले व मशीनगनमधून चौफेर गोळ्या झाडण्यांत आल्या.

लष्करी कोर्टानें शेंकडों लोकांना जन्मठेपीपर्यंतच्या शिक्षा तडकाफडकीं दिल्या. ना वकील, ना अपील ! अशाच पद्धतीनें एकोणीस लोकांना फांशीचीहि शिक्षा ठोठावण्यांत आली.

विशेष म्हणजे, आपल्या या पापांची वार्ता बाहेर फुटूं नये म्हणून पंजाब सरकारनें वृत्तपत्रांना बंदी केली. फार काय, प्रांतांतील लोकांस बाहेर जाण्यास व बाहेरील लोकांस आंत येण्यासहि मनाई केली.

जगाच्या इतिहासांत ज्या कांहीं अत्यंत क्रूर घटना घडलेल्या आहेत, त्यांपैकीं एक हें 'जालियनवाला बाग प्रकरण' आहे. पण त्याची वर्दी ब्रिटिश पार्लमेंटला कळली चार महिन्यांनीं आणि अमेरिकेच्या कानीं गेली आठ महिन्यांनीं ! निःशस्त्र स्त्री-पुरुषांची ही अमानुष कत्तल घडविणारे डायर-ओडवायर या अधिकाऱ्यांना ब्रिटिश सरकारनें बढती दिली, थैली दिली, त्यांचा मान-सम्मान

केला ! हे सारे अत्याचार म्हणजे हिंदी राष्ट्राच्या हृदयावर पडलेले कुऱ्हाडीचे घाव होते. सारें राष्ट्र चिडीनें व संतापानें लाल होऊन गेलें. राष्ट्रसभेनें एक 'चौकशी-समिती' नेमली. तिनें तीन महिने हिंडून १७०० लोकांच्या साक्षी घेतल्या. त्या वाचून सर्व लोकांचे डोळे उघडले आणि ब्रिटिश सत्तेचें हिडिस स्वरूप सर्वांना स्पष्ट झालें.

वचन-भंग करणें हा तर ब्रिटिशांच्या तळहाताचा मळ ! लॉर्ड क्लाइव्हच्या वेळेपासून अशी फसवाफसवी चाललेली ! पहिल्या महायुद्धाच्या वेळीं हिंदीमुसलमानांचें साहाय्य मिळावें, म्हणून इंग्लंडच्या पंतप्रधानांनीं त्यांना आश्वासन दिलें होतें कीं, 'तुर्कस्तान हा देश आम्ही अबाधित राखूं आणि खलिफाचें वैभव कायम टिकवूं.' खलिफा म्हणजे मुसलमानांचा धर्मगुरू. हिंदुस्थानांतील मुसलमानांनीं ब्रिटिश सरकारला भरपूर साहाय्य केलें. फ्रान्सपर्यंत जाऊन ते लढले, जर्मनीच्या बाजूनें लढणाऱ्या तुर्की मुसलमानांवरहि त्यांनीं शस्त्र चालविलें; पण शेवटीं काय? इंग्लंडच्या प्रधानानें आपलें वचन मोडलें, तुर्कस्तानचे तुकडे केले आणि खलिफाचें वैभव संपुष्टांत आणलें. त्यामुळें हिंदुस्थानांतील सारे मुसल्मान खवळून गेले. ता. १७ ऑक्टोबर १९१९ रोजीं सर्व हिंदुस्थानांत खिलाफतसाठीं हरताळ पाडण्यांत आला.

दिल्ली येथें ता. २४ नोव्हेंबर रोजीं 'खिलाफत-परिषद' भरली. ब्रिटिश सरकारचा जळजळीत निषेध करणारीं भाषणें झालीं. अध्यक्ष होते गांधीजी. त्यांनीं सूचना केली कीं,

‘ व्हाइसरॉय व भारतमंत्री यांनीं हिंदीमुसलमानांची बाजू ब्रिटिश सरकारपुढें मांडावी आणि त्यांनीं ती न ऐकल्यास आपापल्या जागांचे राजिनामे द्यावेत. ’ पण गांधीजींची ही सूचना ऐकली गेली नाहीं तर पुढें काय? या प्रश्नाचेंहि उत्तर गांधीजींच्या तोंडून समारोपाच्या भाषणांत येऊन गेलें. ते म्हणाले, ‘ हिंसेचा आपण केव्हांहि अवलंब करणार नाहीं, असें व्रत जी व्यक्ति किंवा जें राष्ट्र घेईल, ती व्यक्ति किंवा तें राष्ट्र एवढी मोठी शक्ति निर्माण करील कीं, तिच्यापुढें कोणीहि टिकाव धरूं शकणार नाहीं. उपयुक्ततेच्या दृष्टीनें विचार केला तरी हिंसेचा मार्ग अगदीं निष्फळ आहे. या परिस्थितींत असहाकारिता हा एकच मार्ग शिल्लक राहिला आहे. ’

‘ असहकारिता ’ हा शब्द या वेळीं प्रथमच प्रगट झाला. यापुढें हिंदी राजकारणांत पंचवीस वर्षें हा शब्द हिंदी लोकांचा रण-घोषच होऊन बसला. त्याचा जन्म सहज बोलण्याच्या ओघांत गांधीजींच्या तोंडून झाला. अशाच रीतीनें लो. टिळकांच्या मुखांतून वऱ्हाडांतील स्वराज्य-मोहिमेंत ‘ जन्मसिद्ध हक्क ’ हे शब्द स्वयंस्फूर्तीनें बाहेर पडले. त्याचप्रमाणें ‘ सत्याग्रह ’ हा शब्दहि आफ्रिकेच्या राजकारणांत प्रथम पुढें आला. राजकीय ऋषींच्या मुखांतून निघालेले हे मंत्रच होत. या एकेका शब्दांत हजारों हृदयें हलविण्याची शक्ति असते. हे नैतिक अणु-बॉंबच होत!

१९०८ सालीं बंगालची फाळणी झाल्यानंतर चिडून


गेलेल्या हिंदुस्थाननें स्वराज्य, स्वदेशी, बहिस्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीची घोषणा केली. ती ऐकतांच बंगाल थरारला. महाराष्ट्र उफाळला—सारा देश लढ्यास सिद्ध झाला. त्या आठ सालाचीच वाढविलेली आवृत्ति म्हणजे वीस साल !

परक्या सरकारचें राज्य येथें रुजलें कसें ? नांदलें कसें ? चाललें कसें ? साता समुद्रांपलीकडील मूठभर गोऱ्यांनीं क्रोडों हिंदी लोकांना जिंकलें कसें ? तर त्यांच्याच मदतीनें ! ब्रिटिशांच्या राज्यकारभाराचा गाडा हिंदुस्थानच्या भूमीवर चालू लागला, याचें कारण तो गाडा ओढण्यास स्वार्थी हिंदी लोकच पुढें आले. खेड्यांत, शहरांत, राजधानींत ल्हान-मोठ्या बहुतेक सर्व सरकारी नोकऱ्या हिंदी लोकच करीत होते. गोरे अधिकारी थोडे होते. एखाद्या गुराख्यानें शें-पन्नास शेळ्या-मेंढयांचा कळप आपल्या इच्छेप्रमाणें हांकीत न्यावा, त्याप्रमाणें हे थोडे गोरे अधिकारी हजारों हिंदी नोकरांना राबवीत होते. या राज्यकारभाराचा खर्च कोठून चालत असे ? हिंदी शेतकऱ्यानें दिलेल्या करांतूनच ! नोकर, शेतकरी, व्यापारी, वकील, आमदार इत्यादि हिंदी लोकांनींच परक्या सरकारचा डोलारा तोलून धरलेला होता. त्यांनीं आपापलें साहाय्य सरकारला देण्याचें नाकारलें तर ?

एखाद्या मोठ्या वाड्यांतील सारे खांब काढून टाकले म्हणजे तो जमीनदोस्त होणारच. तीच गत जनतेचें सहकार्य नसल्यास परक्या सरकारची होणार हें निश्चित; हा विचार मनाशीं करून गांधीजींनीं असहकारितेचा मार्ग दाखविला. त्याचा कार्यक्रम

सूचित करणारे उद्गारहि त्यांनीं त्या भाषणाच्या शेवटीं काढले. ते असे—" आपण सरकारचे किताब बाळगून ठेवण्यास किंवा सरकारची नोकरी करण्यास बांधलेले नाहीं. सरकारच्या हातून खिलाफतीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या धार्मिक प्रश्नाच्या बाबतींत आपल्या भावना तुडविल्या जात असतांना आपण सरकारला साहाय्य कसें करावें? म्हणून खिलाफतीचा निकाल आपल्या विरुद्ध गेल्यास साहाय्य बंद करण्याचा आपल्याला हक्क आहे."





असहकारितेचें नवयुग

'एक वर्षांत स्वराज्य !' या मंत्रानें सारें राष्ट्र स्फुरण पावलें. 'असहकारितेचा कार्यक्रम जनतेनें पार पाडला, तर तिला एक वर्षांत स्वराज्य मिळेल' अशी सशर्त घोषणा गांधीजींनीं केली. दीडशें वर्षें आपल्या उरावर जो पारतंत्र्याचा पर्वत बसलेला आहे, तो अवघ्या एका वर्षांत पाचोळ्यासारखा उडून जाईल, ही आशा कोणत्या राष्ट्रामध्यें चैतन्य निर्माण करणार नाहीं ? इतर देशांनीं स्वातंत्र्याची किंमत म्हणून हजारों-लाखों लोकांचें बलिदान केल्याचा इतिहास आहे. मग तेहतीस कोटी लोकांचा हा प्रचंड भरतखंड एवढा साधा त्यागहि करणार नाहीं काय ? अमृतसर येथें राष्ट्रीय सभेचें जें अधिवेशन भरलें, तें स्वातंत्र-युद्धाच्या छावणीसारखेंच दिसत होतें. त्याचे अध्यक्ष होते

पं. मोतिलाल नेहरू आणि स्वागताध्यक्ष होते स्वामी श्रद्धानंद ! छत्तीस हजार लोक अधिवेशनाला उपस्थित होते. सर्वजण परक्या सरकारविरुद्ध जळफळत होते आणि स्वराज्यासाठीं तळमळत होते. 'मारूं किंवा मरूं' अशा निश्चयानें, केशरी पोषाख अंगावर चढवून, पूर्वीचे रजपूत वीर रणांगणावर धाव ठोकीत, तेंच निश्चयाचें तेज खादीचा पांढरा पोषाख धारण करणाऱ्या कॉंग्रेस-जनांच्या डोळ्यांत खेळत होतें.

ही राष्ट्रसभा भरण्याच्या ऐन सुमारास, ता. २३ डिसेंबर १९१९ रोजीं, बादशहांनीं नव्या सुधारणांचा जाहिरनामा प्रसिद्ध केला आणि पंजाब–प्रकरणांतील कैद्यांना बंधमुक्त केलें; पण तेवढ्यानें संतुष्ट कोण होणार ? साऱ्या लोकांच्या हृदयांत अमृतसरची कत्तल अग्नीप्रमाणें जळत होती. पण लो. टिळक, बॅ. दास इत्यादि जुन्या पुढाऱ्यांनीं 'शक्य तेथें सहकार व अवश्य तेथें प्रतिकार' असें धोरण ठेवलें. 'जे तुकडे मिळाले आहेत ते पदरांत ध्या व अधिक मिळविण्याचा प्रयत्न करा' असा व्यावहारिक सल्ला लो. टिळकांनीं दिला. डॉ. बिझंट, बिपिनचंद्र पाल वगैरे पुढाऱ्यांनींहि स्वराज्याच्या सुधारणा स्वीकारण्यास संमति दिली. गांधीजींचेंहि मत तसेंच. त्या सुधारणा 'निराशाजनक' आहेत, अशी टीकाहि गांधीजींना नकोशी वाटत होती. त्यांनीं सहकार्याची उपसूचना मांडली. तिला पाठिंबा दिला बॅ. जीनांनीं ! तसाच सूर लावला पं. मालवीयांनीं !

पंजाब-प्रकरणाबद्दल या कॉंग्रेसनें नुसता खेद व्यक्त केला; पण

त्यानंतर ब्रिटिश सरकारनें खिलाफतीचा अन्याय करून १९२० च्या मे महिन्यांत हिंदी मुसलमानांना डिवचलें. ब्रिटिश सरकारचा कंजूषपणा मॉंटफर्ड-सुधारणांत, त्याचा क्रूरपणा पंजाब-प्रकरणांत आणि त्याचा विश्वासघातकीपणा खिलाफत प्रश्नांत हिंदुस्थानला ढळढळीतपणें दिसून आला; त्यामुळें त्या सरकारशीं सहकार्य करण्याची बुद्धि बहुतेक सर्व लोकांच्या अंतःकरणांतून समूळ नाहींशी झाली, एवढेंच नव्हे तर तिच्या जागीं प्रखर प्रतिकारवृत्ति फोफावूं लागली.

'सरकारचा संबंधच नको!' या एकाच भावनेनें सारें राष्ट्र भारलें होतें. राज्ययंत्रावर बहिष्कार घालण्यास जनता उत्सुक झाली होती. तेव्हां गांधीजींनीं आदेश दिला, 'सरकारी पदव्या टाका. सरकारी सन्मानाच्या जागा सोडा. सरकारची नोकरी करूं नका. सरकारला कर देऊं नका. पोलीस व लष्कर यांनींहि सरकारचे हुकूम झुगारून द्यावेत.' सर्व बाजूंनीं अशी असहकारिता करून सरकारचा कोंडमारा करण्याचा व्यूह सर्व देशानें रचला. या असहकारितेच्या मोहिमेंतील पहिली चकमक ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं उडाली. त्याच दिवशीं लोकमान्य टिळक देवमान्य झाले! स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क स्वावलंबनानें मिळविण्याचा महान् मंत्र शिकविणारे ते राष्ट्र-गुरु होते. त्यांच्या निधनाचा दिवस म्हणजे राष्ट्रीय पुण्यतिथीच!

त्या मुहूर्तावर गांधीजींनीं असहकारितेचें रणशिंग फुंकलें. त्यांतील पहिला हल्ला सरकारी पदव्यांवर होता. त्यांनीं स्वतः

' कैसर–इ–हिंद ' चें पदक व्हाइसरॉयकडे परत केलें. पुढील दीड महिन्यांत सोळा जणांनीं पदव्या सोडल्या; चौघा जणांनीं आपलीं पदकें परत केलीं; बत्तीस लोकांनीं ऑनररी मॅजिस्ट्रेट वगैरे अधिकार भिरकावून दिले आणि २४८ नोकरांनीं सरकारला रामराम ठोकला. साऱ्या जनतेंत विजेची लहर थरारून गेली. तरुणांचीं अंतःकरणें उत्साहानें थयथय नाचूं लागलीं.

१९२० च्या सप्टेंबरमध्यें कलकत्ता येथें राष्ट्रसभेचें जादा अधिवेशन भरलें. त्यांत सहा दिवस चर्चा झाली ती एका असहकारितेच्या ठरावावर. तोच एक विषय राष्ट्रापुढें जळत होता.

कोणी म्हणे, कौन्सिलवर बहिष्कार नको, तर कोणी सुचवी, ' शाळा–कोर्टांवर बहिष्कार घाला पण पायरीपायरीनें. ' पण गांधीजींना संपूर्ण बहिष्कार हवा होता–निःशेष असहकारिता हवी होती–' सैतानी ' सरकारचा काडीइतकाहि संबंध नको होता. त्यांची ही अचाट उडी राष्ट्राला झेंपणार नाहीं असें दास, मालवीय, जीना, पाल वगैरे मुरब्बी पुढाऱ्यांना वाटत होतें; परंतु गांधीजींची झेंप हनुमानासारखी सूर्यबिंब ग्रासूं पाहाणारी ! त्यांनीं असहकारितेचा तपशीलवार ठराव पुढील शब्दांनीं मांडला—

' सरकारनें दिलेल्या पदव्या, बिनपगारी अधिकाऱ्यांच्या जागा आणि स्थानिक संस्थांतील सरकारनियुक्त सभासदत्व सोडून द्यावें. गव्हर्नरची लेव्ही, सरकारी अधिकाऱ्यांनीं भरविलेले दरबार किंवा त्यांच्या मानाकरितां होणारे समारंभ यांच्यांत भाग घेऊं नये.

सरकारी, निमसरकारी अगर सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या शाळांतून व कॉलेजांतून पालकांनीं आपलीं मुलें आस्ते आस्ते काढून घ्यावीं आणि अशा शाळा व कॉलेजें यांच्याऐवजीं प्रांताप्रांतांतून राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा व कॉलेजें स्थापन करावीं.

वकील व पक्षकार यांनीं खाजगी भांडणतंटे तोडण्याकरितां सरकारी कोर्टाकडे धांव घेण्याचें क्रमाक्रमानें सोडून देऊन त्या कोर्टाच्या जागीं स्वतःचीं लवाद-कोर्टें स्थापन करावीं. लष्करी, कारकुनी व मजूरदार पेशाच्या लोकांनीं मेसापोटेमियांत नोकरी करण्याकरितां रिक्रूट किंवा उमेदवार होऊं नये.

सुधारलेल्या कौन्सिलच्या निवडणुकीकरितां उभे राहिलेल्यांनीं आपलीं नांवें उमेदवारांतून परत घ्यावीं आणि राष्ट्रीय सभेचा हा ठराव न जुमानतां जे उमेदवार उभे राहतील त्यांना मतें देण्याचें नाकारावें.

परदेशाहून येणाऱ्या मालावर बहिष्कार घालावा. त्यासाठीं चरखा व हातमाग यांचें पुनरुज्जीवन करावें.'

हा असहकारितेचा ठराव १८५५ विरुद्ध ८७९ मतें पडून राष्ट्रसभेनें संमत केला.

याच ठरावाला पुढें नागपूर कॉंग्रेसनें बळकटी आणली. पूर्वींचे सारे विरोधी पुढारी असहकारितेला अनुकूल झाले. विशेष हें कीं, नागपूर कॉंग्रेसमध्यें असहकारितेचा ठराव मांडला देशबंधु दास यांनीं व त्याला दुजोरा दिला लाला लजपतराय यांनीं.

जसे संयुक्त प्रांताचे पं. मोतीलाल नेहरु, तसे बंगालचे बॅ. चित्तरंजन दास. दोघेहि अलौकिक बुद्धिमत्तेचे व कुशल मुत्सद्देगिरीचे. वकिलींत दोघांच्याहि कमाईची कमान वर्षाला सहा लाखांपर्यंत चढलेली. पण एकदां मनाला असहकारितेचा मार्ग पटतांच उभयतांनीं त्या वकिलीवर पाणी सोडलें.

बॅ. दास यांच्या ठायीं तर देदीप्यमान प्रतिभा व प्रभावशाली वक्तृत्वहि होतें. आय्. सी. एस्. च्या परीक्षेंत उत्तीर्ण होऊनहि परक्या सरकाराच्या नोकरीचा कलंक त्यांना लागला नाहीं. कलकत्ता हायकोर्टांत त्यांनीं बॅरिस्टरीचा व्यवसाय सुरू केला, त्या वेळीं त्यांची स्थिति कफल्लकपणाची–कर्जबाजारीपणाची-नव्हे दिवाळखोरीची होती.

पण १९०८ सालीं श्रीमान अरविंद घोष यांच्यावरील क्रांतिकारक खटला सुरू झाला. तेव्हां हा ‘ बंगालचा वाघ ’ पैचीहि अपेक्षां न धरतां, अरविंदबाबूंच्या बचावासाठीं, स्वेच्छेनें व निर्भयतेनें धावून गेला. सतत आठ महिने त्यांनीं या खटल्यांत बॅरिस्टर म्हणून निर्वेतन काम केलें, किंबहुना स्वतःच्या शिरावर कर्जाचा नवा बोजाहि घेतला. अखेर त्यांना खटल्यांत यश आलें. त्यांचें तेजस्वी चातुर्य प्रभावी ठरलें आणि अरविंदबाबू निर्दोषी म्हणून सुटले. यामुळें दासबाबूंची कीर्ति सर्वत्र फाकली.


१९१७ सालापासून देशबंधु दास यांनीं स्वराज्याचा संदेश खेडयापाडयांत पोंचविण्यासाठीं जिवाचें रान केलें. त्यांना कोर्टकौन्सिलांतहि सरकाराशीं लढा द्यावा असें वाटे. त्यांच्या

लढाऊ वृत्तीला कोर्ट-कौन्सिल-कॉलेजांवर बहिष्कार घालण्याचा मार्ग रुचेना. ते नागपूर कॉंग्रेसला गेले ते म. गांधींच्या असहकारितेला विरोध करण्याचा चंग बांधूनच.

परंतु घडलें निराळेंच. गांधीजींनीं आपल्या असहकारितेच्या अंगांतील गुप्त शक्ति त्यांना पटवून दिली. शमीच्या झाडांतील तो अग्नि पहातांच दासबाबूंनीं असहकाराचें शस्त्र एकदम उचललें. आपल्या घनगंभीर आवाजांत असहकारितेचा ठराव त्यांनीं स्वतःच कॉंग्रेसमध्यें मांडला. 'वाणी व कृति यामध्यें चित्तरंजन कधींच अंतर ठेवीत नाहीं.' अशी स्वाभिमानाची घोषणा करून मासिक अर्धालाख प्राप्तीची वकिली झुगारून दिल्याची त्यांनीं गर्जना केली. त्याबरोबर हजारों अंतःकरणांत त्यागाच्या, स्फूर्तीच्या लाटा उचंबळूं लागल्या.

केवळ चित्तरंजनच नव्हे, तर त्यांचे पुत्र चिररंजन हेहि पुढें चळवळींत पडले व तुरुंगांत गेले. फार काय, त्यांच्या पत्नी वासंतीदेवी आणि त्यांच्या घराण्यांतील इतर दोन महिला यांनींहि असहकारितेच्या गंगेंत उडी झोकली आणि युवराजावर बहिष्कार घालण्याचा प्रचार केला. त्याबद्दल त्यांना अटकहि करण्यांत आली.

सरकार व कॉंग्रेस यांची लढत ऐन निकराला आली होती. इंग्लंडच्या युवराजांना हिंदी सरकारनें हिंदुस्थानांत आणलें होतें व त्यांच्या स्वागतावर कॉंग्रेसनें बहिष्कार पुकारला होता. ता. २४ डिसेंबर १९२१ रोजीं कलकत्ता येथें युवराज जाणार होते. त्याच सुमारास अहमदाबाद येथें कॉंग्रेसचें अधिवेशन भरणार होतें. त्याचे अध्यक्ष कोण ?



देशबंधु चित्तरंजन दास ! पण सरकारनें त्यांना ता. १० डिसेंबर रोजींच पकडलें. सरकाराचें हें आव्हान कॉंग्रेसनें धैर्यानें स्वीकारलें. अहमदाबाद येथें गेलेला प्रत्येक कॉंग्रेसजन हा स्वातंत्र्याच्या शांति-संग्रामांतला कडवा सैनिकच दिसत होता.

साऱ्या देशांतील वातावरण तापून गेलें होतें. नागपूर-कॉंग्रेसनें आपलें ब्रीदच बदललें. ब्रिटिशांचें अधिराज्यपद त्यांतून काढून टाकलें. कॉंग्रेसचा जणु पुनर्जन्मच झाला. हा नवयुगाचा संदेश जनतेच्या कानीं घालण्यासाठीं म. गांधींनीं शौकतअली व महमदअली या अलीबंधूसह सर्व देशभर तुफानी दौरा काढला.

साऱ्या पुढाऱ्यांच्या आणि अनुयायांच्या, शहाण्यांच्या व अडाण्यांच्या, वृद्धांच्या व विद्यार्थ्यांच्या–सर्व स्त्रीपुरुषांच्या तोंडून एकच रण-गर्जना गगनचुंबी स्वरांत अखिल हिंदुस्थानच्या वातावरणांत घुमूं लागली—

" जालिम सरकार नहीं रखना. "

केवळ अशी जळजळीत घोषणा देशांत दुमदुमली असें नव्हे, तर तिला पोषक असा रोकडा आचारहि जनतेकडून होऊं लागला. जनतेकडूनच काय, पण बडयाबडया पुढाऱ्यांकडूनहि हें असहकारितेचें व्रत स्वीकारलें गेलें. वंग-भंगानंतर आठ सालच्या चळवळीनें बंगाली बाबूंच्या अंगांवरील हॅट–कोट वगैरे युरोपियन वेष उडवून लावला होता. आतां वीस सालच्या असहकारितेच्या आंदोलनानें त्यांच्या अंगावरील गिरणीचें कापड उडविलें गेलें. नखशिखान्त खादीचा शुभ्र पेहराव हिंदुस्थानभर दिसूं लागला. एक एक जाहीर सभा म्हणजे पांढऱ्या टोप्यांचा सागरच दिसे. पं. मोतीलाल नेहरूंसारखे राजविलासी पुढारीहि खादीधारी बनले. खादी म्हणजे स्वदेशीची अंतिम सीमा-साधेपणाची पराकाष्ठा– जनतेशीं समरसता !

ही खूण अंगीं बाणल्यानें मोतीलालजींनीं आपल्या ' आनंद-भवनाचें ' सारें स्वरूपच पालटलें. पूर्वी त्यांचे कपडे रेशमी असत. ते विलायती कपडे १९२० सालीं अदृश्य झाले आणि जेथेंतेथें जाडीभरडी पण पवित्र खादी दिसूं लागली. विलायती गळपट्टे तरी त्यांचे किती होते ! ते रेशमी व रंगीबेरंगी गळपट्टे

एका सभेच्या ठिकाणीं माळेप्रमाणें लावले होते. कशासाठीं? तर परदेशीं कापडाच्या होळींत फेकण्यासाठीं! नुसत्या कपड्यांतच काय, पण त्यांच्या साऱ्या राहणींतच क्रांति झाली! ते बादशहाचे बैरागी बनले—दरिद्री नारायणाचे खरे सेवक झाले. त्यांनीं आपल्या घरांतील चाकरनोकर कमी केले, खुर्च्या–कपाटें काढून टाकलीं, कांचेचीं व चिनी मातीचीं नक्षीदार भांडीं फुंकून टाकलीं आणि गाड्या-घोडेहि विकले! त्यांनीं राष्ट्रार्पण केलें आपलें जीवन–आपलें आनंदभुवन–आपलें सारें कुटुंबच्या कुटुंब!—त्यांतीलच एक रत्न म्हणजे आपले जवाहरलाल!!

पं. मोतीलाल यांचें आरंभींचें जीवन किती विलासी व ऐश्वर्यशाली होतें, पण पुढें तें किती साधें व त्यागशील बनलें, या स्थित्यंतराचें वर्णन त्यांनीं स्वतःच केलें आहे. रामगडहून १९२१ च्या जुलैमध्यें म. गांधींना पाठविलेल्या पत्रांत मोतीलालजी लिहितात, "पूर्वीं मी थंड हवेच्या ठिकाणीं जात असें, तेव्हां माझ्याबरोबर हिंदी व इंग्रजी या दोन्ही पद्धतींचा मुदपाकखाना असे. सकाळचा फराळ झाला कीं शिकारीला जाण्याची तयारी. शिकार झाल्यावर चहा, नंतर दुपारचें चमचमीत जेवण, त्यानंतर वामकुक्षी–असा आमचा नबाबशाही मौजेचा कार्यक्रम असे.

"आतां एक पितळी कुकर व शिपाई एवढाच आमचा सरंजाम. डाळ, तांदूळ व मसाला एवढेंच भोजनाचें साहित्य. पूर्वीं आमचें सामान वाहावयाला अनेक खेचरें लागत असत, पण आतां फक्त तीन पिशव्यांनीं काम भागत आहे. पूर्वींचा मांसाहार

जाऊन त्याच्या जागीं भाज्या व फळें आलीं आहेत. आतां शिकार नाहीं, फक्त लांबलांब सहल करावयास जातों. बंदुका व रायफली जाऊन त्यांच्या जागीं पुस्तकें-मासिकें आलीं आहेत. अर्नोल्डच्या 'सॉंग सेलेश्चियल'चें माझें तिसरें वाचन चालू आहे. सध्यां मला जें मानसिक स्वास्थ्य व समाधान लाभत आहे, तसें पूर्वीं कधींच वाटलें नव्हतें. आजच्यासारखा स्वर्गीय आनंद मला कधींहि वाटला नव्हता."


अशा साधेपणानें व सेवाशील वीरवृत्तीनें सारें राष्ट्र सरकारशीं झुंजण्यासाठीं खडें झालें. सरकारी शाळा ओस पडल्या व राष्ट्रीय शाळा गजबजल्या. कौन्सिलांतून राष्ट्रीय पुढारी राजिनामे देऊन बाहेर पडले व जनतेंत मिसळूं लागले. शेंकडों वकिलांनीं कोर्टावर बहिष्कार टाकला. टिळक-स्वराज्य-फंड एक कोटि रुपयांचा जमला. वीस लाख चरखे स्वराज्याचा गुंजारव करूं लागले. सरकारविरोधी वातावरण देशांत अधिकाधिक तापूं लागलें. तें शांत करावें म्हणून बादशहाचे काका हिंदुस्थानांत आले व गोड बोलून परत गेले.

नंतर आले प्रत्यक्ष युवराज ! पण त्यांच्या स्वागतावर साऱ्या राष्ट्रानें बहिष्कार टाकला. शहरांत व खेड्यांत हरताळ पाडला गेला. युवराजांना ठिकठिकाणीं ओसाड रस्ते व परदेशी कापडाच्या होळ्या दिसल्या. मुंबई येथें तर खुद्द गांधीजींनींच होळी पेटविली ! ती पेटवितांना ते म्हणाले, "माझ्या अंतःकरणांत जो अग्नि धगधगून पेटला आहे, त्याचें केवळ बाह्य चिन्ह म्हणजे ही होळी !"

लाखों अंतःकरणांमध्यें हा अग्नि पेटलेला होता. कांहीं अति-उत्साही लोकांनीं मुंबईंत दंगल केली. सरकारनें पोलीस धाडले-घोडेस्वार लोकांच्या अंगांवर घातले—गोळीबारहि केले. त्रेपन्न माणसें ठार झालीं ! ब्रिटिश युवराजांचें आगमन हिंदी लोकांना महाग पडलें.

ता. १७ नोव्हेंबर १९२१ रोजीं युवराज मुंबईंत उतरले. त्यानंतर दोनच दिवसांनीं बंगाल सरकारनें जाहीर केलें कीं, स्वयंसेवकांचे संघ बनविणें हें बेकायदा आहे. इतर प्रांतांतहि सरकारनें स्वयंसेवकांना तुरुंगांत डांबलें. सभाबंदीचा हुकूम जारी करून व देशांत स्मशान-शांतता निर्माण करून सरकारनें युवराजांचें ' आगत-स्वागत ' केलें. सभा भरविणें किंवा संघटना करणें हे नागरिकांचे मूलभूत हक्क होत. त्या हक्कांवरच सरकारनें गदा आणली, हें पाहून सारे लोक चिडून गेले. सरकारचे हे अन्यायाचे हुकूम मोडले जाऊं लागले.

पं. मोतीलाल, पं. जवाहरलाल, लाला लजपतराय असे थोर थोर पुढारी स्वयंसेवक म्हणून पुढें आले व सरकारला धिक्कारून निर्भयतेनें तुरुंगांत गेले. देशबंधु दास तर आपल्या सर्व कुटुंबासह सरकारी हुकूम मोडून स्वयंसेवक बनले आणि कारागृहांत गेले. सरकारच्या जुलमाला व दडपशाहीला खाऊन—गिळून टाकण्याइतकी विराट शक्ति हिंदी जनतेंत निर्माण झाली. परक्या सरकारशीं लढा देण्यासाठीं जो तो अहमहमिकेनें पुढें येऊं लागला.



बार्डोलीचें रणक्षेत्र

गुजरातनें कायदेभंगाची तुतारी फुंकली. बार्डोली हा त्यांतील एक तालुका. त्याची लोकवस्ती ८७०००. त्यांची संघटना वल्लभभाईंनीं पोलादासारखी भक्कम केलेली होती. त्यांच्या बळावर गांधीजींनीं सरकारशीं लढत करण्याचें ठरविलें. ता. १ फेब्रुवारी १९२२ रोजीं त्यांनीं व्हाइसरॉयाला असा निर्वाणीचा खलिता पाठविला कीं, ' सभा-बंदी, स्वयंसेवक-बंदी व मुद्रण-नियंत्रण हे नवे निर्बंध सात दिवसांच्या आंत काढून टाका; नाहींतर मी बार्डोलींत कायदेभंग सुरू करीन!" या खलित्याला सरकारनें तुच्छतेनें उत्तर दिलें. गांधीजींनीं आपली अहिंसक लढाई सुरू करण्याचें ठरविलें. पण—

चौरीचुरा येथें लोकांनीं हिंसा केली. संयुक्त प्रांतांतील त्या गांवांत लोकांनीं एकवीस पोलिसांना जाळलें. देशांतील हें हिंसात्मक वातावरण पाहून गांधीजींनीं बार्डोलींतील कायदेभंगाची चळवळ थांबविली. लगेच सरकारनें गांधीजींना पकडलें आणि त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवला. तो आरोप ऐकून गांधीजींना काय वाटलें? त्यांनीं कोणतें उत्तर दिलें? त्यांच्या बॅरिस्टरी बुद्धीनें त्यांचा बचाव कसा केला?

गांधीजी सत्याग्रही होते. सत्य हाच त्यांचा बचाव! सत्यशील प्रल्हादाच्या निर्भयतेनें त्यांनीं न्यायाधीशाला सांगितलें,

"प्रचलित राजसत्तेविरुद्ध अप्रीति फैलावण्याचें मला वेडच लागलें आहे. मुंबई, मद्रास, चौरीचुरा इत्यादि ठिकाणच्या घटनांची सर्व जबाबदारी मी माझ्या शिरावर घेतों. त्या सर्व आततायी अत्याचारांचें चिंतन करण्यांत आणि चिंतन करतां करतां अश्रु ढाळण्यांत माझ्या रात्रींच्या रात्री गेल्या आहेत. त्यांची जबाबदारी मी टाळूं शकत नाहीं. मी विस्तवाशीं खेळ खेळत आहे याची मला जाणीव होती. तरी मी ती जोखीम पत्करली आणि मला मोकळें सोडलें तरी पुनः मी ती जोखीम पत्करीनच. अत्याचार मला नको आहेत. अहिंसा हें माझें आद्य ब्रीद आहे, अंतिम ध्येय आहे; पण मला कोणता तरी एक मार्ग पत्करणें भाग होतें. माझ्या देशाची अपार हानि करणाऱ्या राज्यपद्धतीला मी मान वांकवूं का त्या हानीचें सत्य स्वरूप माझ्या मुखानें कळतांच जनसमुदाय खवळून अत्याचार करूं लागले तो मी सहन करूं? असा प्रश्न मजपुढें होता. मी पूर्वी कहा

राजनिष्ठ व सहकारितावादी होतों, आतां सरकारविरुद्ध अप्रीति पसरविणारा निःशेष असहकारितावादी बनलों आहे. "

गांधीजींच्या या सत्यनिष्ठेचा व राष्ट्रभक्तीचा गौरव करून न्यायमूर्तींनीं त्यांना सहा वर्षें कैदेची शिक्षा सुनाविली. ती शिक्षा वयाच्या ५३ व्या वर्षीं, ता. २३ जुलै १९२२ रोजीं, स्वीकारून येरवडयाच्या तुरुंगांत गांधीजी गेले. त्यापूर्वी गांधीजींनीं आपल्या सैनिकांना कोणता संदेश दिला? तर " स्वस्थ बसूं नका आणि हिंसा करूं नका! असहकारितेचाच कार्यक्रम जनतेनें आचरणांत आणावा " असा आदेश त्यांनीं दिला.


असहकारितेच्या लढाईनें राष्ट्राला लाभ काय झाला हें राष्ट्रसभेनें पुढें जाहीर केलें. १९२१ सालीं डिसेंबरच्या शेवटच्या आठवडयांत अहमदाबाद येथें राष्ट्रसभा भरली असतांना तिनें पहिलाच ठराव असा केला कीं, "नागपूरच्या कॉंग्रेसनें अनत्याचारी असहकारितेचें तत्त्व स्वीकारल्यामुळें जनतेंत स्वाभिमान, स्वार्थत्याग आणि निर्भयपणा या गुणांची वाढ होत आहे आणि स्वराज्याच्या मार्गांत राष्ट्राचें पाऊल झपाट्यानें पुढें पडत आहे हें लक्षांत घेऊन ही सभा कलकत्त्याचा व नागपूरचा असहकारितेचा ठराव कायम करीत आहे. यापुढेंहि पंजाब व खिलाफत प्रकरणांतील अन्याय दूर होईपर्यंत आणि बेजबाबदार नोकरशाहीच्या हातांतील सत्ता हिंदी जनतेच्या हातीं येईपर्यंत प्रत्येक प्रांतानें आपल्या कार्यक्रमाप्रमाणें ही असहकारितेची चळवळ जास्त नेटानें चालवावी. "


हिंदी राष्ट्रानें चालविलेल्या स्वराज्याच्या लढाईंत १९२१ सालचें असहकारितेचें शस्त्र फारच प्रभावी ठरलें. या लढाईचें

ध्येय पारतंत्र्याचा विनाश, त्याचें निशाण म्हणजे सत्य आणि या लढ्यांतील सैनिकांच्या अंगावरील चिलखत म्हणजे अहिंसा व हातांतील शस्त्र म्हणजे असहकारिता !

* * *

असहकारितेच्या चळवळीचें यश पूर्ण निःपक्षपाती व अत्यंत स्पष्टवक्ते असे इतिहासाचार्य श्री. राजवाडे यांनीं अचूकपणें जोखलें आहे. १९२२ सालीं लिहिलेल्या एका लेखांत ते आपला निष्कर्ष असा सांगतात, “ असहकाराची मोहीम सुरू होऊन कार्य अंदाजाबाहेर सफल झालें. कित्येक हजार लोक कारागृहांत जाऊन, नोकरशाहीचे आजन्म प्रतिस्पर्धी बनले. तुरुंगांत गेलेल्या लोकांपैकीं बहुतेक चळवळे लोक होते. लेखक किंवा वक्ते किंवा स्वयंसेवक नसून नोकरशाहीचे प्रतिस्पर्धी असे लोक बहुशः लाखानें मोजावे लागतील. स्त्रियांत, मुलांत व मजुरांत असहकाराचा प्रसार बराच झाला आहे आणि हा सर्व प्रकार केवळ दोन वर्षांत घडून आला. तेव्हां भविष्यकाळीं असहकाराचा प्रसार ह्याहूनहि जास्त होईल असा अंदाज होतो. ”




स्वातंत्र्य
ONKAR



वेड लावणारा शब्द

'आई!'—एकच शब्द, पण त्यांत प्रेमाचें ब्रह्मांड सांठविलेलें आहे. हा लहानसा शब्द कानीं पडतांच कोणाचें हृदय उचंबळत नाहीं ? कोणाच्या अंत:करणांत प्रेमाच्या लहरी नाचूं लागत नाहींत ? कोणाचें मन तिच्या भेटीसाठीं वाऱ्याच्या वेगानें धांव घेत नाहीं ? दुथडी भरलेली नदी ओलांडून ईश्वरचंद्र विद्यासागर आपल्या आईच्या भेटीसाठीं धावत गेले—आणि तसेच भेटले सानेगुरुजी लहानपणीं, अनेक संकटें सोसून, आपल्या आईला !

◆

'स्वातंत्र्य ! '—किती छोटा शब्द; अगदीं आईसारखाच. पण त्यासाठीं शेंकडों राष्ट्रांतील हजारों तरुणांनीं हाल सोसले,

तुरुंग भोगले, फटके खाल्ले, अखेर प्राणार्पणहि केलें! इटली, आयर्लंड, अमेरिका—कैक राष्ट्रांनीं स्वातंत्र्यासाठीं आपलें सर्वस्व वेंचलें—शेंकडों वर्षें युद्ध चालविलें—यश मिळेपर्यंत विश्व-प्रयत्न केले.

◆

हीच स्वातंत्र्य-प्रेमाची ज्योत लाहोर—काँग्रेसनें अखिल हिंदुस्थानच्या हृदयांत पेटवून दिली. तेथें भरलेल्या राष्ट्रीय सभेंत पं. जवाहरलालांनीं राष्ट्रीय सभेचें तिरंगी निशाण फडकवितांच लक्षावधि कंठांतून हिंदी स्वातंत्र्याचा जयजयकार निनादला. तो ऐकून कोट्यवधि हिंदी अंतःकरणें थरारलीं. एकदम वीज चमकून गेल्यासारखेंच साऱ्या राष्ट्राला वाटलें. आपल्या जीवनांत नवें दालन, नवें पर्व, नवा मनु सुरू झाला असेंच प्रत्येकाला वाटलें. त्यांना ठाऊक होतें कीं, स्वातंत्र्याचें निशाण रोवणें म्हणजे कांहीं स्वातंत्र्याची प्रत्यक्ष स्थापना करणें नव्हे. त्यांना जाणीव होती कीं, आपल्या या स्वातंत्र्याच्या ध्वजाच्या डोक्यावर इंग्रजांचें युनियन जॅक नाचत आहे. पण आज ना उद्यां तें जॅक काढून, फेकून देऊन आपण आपल्या स्वातंत्र्याचा साक्षात् अनुभव घेऊं, असा आशावाद, असा निश्चय, असा आत्मविश्वास त्या निशाणाच्या द्वारें ते जगजाहीर करीत होते.

◆

दीडशें वर्षें राष्ट्रीय जीवनांतून हद्दपार झालेला तो शब्द! रात्रीं—बेरात्रीं, रानावनांत, एखाद्या गुप्त ठिकाणीं, कांहीं धाडसी तरुणांनीं, दबत्या आवाजांत कुजबुजलेला तो शब्द! आज तो

शब्द लाखों लोकांच्या कंठांतून गगनचुंबी स्वरांत निर्भयतेनें बाहेर पडला आहे—साऱ्या देशभर नाचूं लागला आहे. पूर्वी 'स्वराज्य' शब्द उच्चारण्याची चोरी होती; पण लो. टिळकप्रभृति राष्ट्रनेत्यांच्या तपश्चर्येमुळें १९१६ सालीं 'स्वराज्य शब्द उच्चारणें गुन्हा नाहीं' असें सरकारी हायकोर्टानेंच ठरविलें; पण स्वातंत्र्य? त्याचा उच्चार करणें हें कोणाला बेजबाबदारपणाचें वाटे, तर कोणाला प्राणसंकट भासे; परंतु १९२९ सालीं लाहोरच्या राष्ट्र-सभेनें स्वातंत्र्याचा जयघोष साऱ्या भरतखंडांत दुमदुमविला!

◆

'स्वराज्य नाहीं स्वदेश नाहीं धिक् त्या देहाला।
चला घालुं स्वातंत्र्य–संगरीं रिपूवरी घाला॥'

अशा स्वातंत्र्याच्या भावना पूर्वी काव्यांतून लपूनछपून प्रकट होत असत.

"लौकरी स्वातंत्र्य-भानो! भारतीं दे दर्शन। होउं तेव्हां पावन।"

अशी तळमळ तरुण हृदयांना लागलेली असे.

'आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळें हो।
ऐकायाला श्रुतीहि नसती पारतंत्र्यामुळें हो॥'

असे सुस्कारे कोणी सोडीत, तर कोणी केविलवाण्या सुरांत विचारीत—

'स्वतंत्रतेची पहांट ती येईल। उत्कर्षाचा दिन केव्हां सुचवील?'

कोणी आपल्या हातून स्वातंत्र्याची उपासना होत नाहीं, म्हणून कष्टी होऊन आपल्या धाकट्या भावास तळमळून प्रश्न करी,

“ बापू ! गड्या ध्वज उभा करशील काय ? ।
तूं देशकारण करूं झटशील काय ? ॥
बापू ! जनांत दिवटी धरशील काय ? ।
स्वातंत्र्य–देव मनसा भजशील काय ? ॥ ”

पण कल्पनेच्या दुर्बिणींतून, आशेच्या डोळ्यांनाहि, स्वातंत्र्याचा सूर्योदय दिसत नसे. त्या वेळीं भावनाशील लोक देवाचा धांवा करीत कीं,

‘ देवा, केव्हां परवशपणाची निशा ही सरून ।
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून ॥ ’

◆

प्रत्यक्ष राजकारणाच्या रणांगणावर युद्ध करण्यासाठींच जे राष्ट्रीय पुढारी उभे ठाकले होते; त्यांना तर स्वातंत्र्याचें वेडच लागलें होतें. लो. टिळक आपला कृतनिश्चय व्याख्यानांतून पुढील शब्दांनीं जाहीर करीत—

“ पारमार्थिक गोष्टींत काशीयात्रा हें जसें अंतिम साध्य इहलोकीं आहे, तसेंच राजकीय बाबतींत स्वातंत्र्य-गंगा हा अंतिम हेतु आहे. आमच्या रस्त्यावर विघ्नें आहेत; पण उमेद अशी आहे कीं, वाटेंत देह पडला तरी शेवटली वासना त्या स्वातंत्र्य-गंगेंत जाऊन स्नान करीलच करील. ”

स्वातंत्र्याचा लढा चिरडून टाकण्यासाठीं ब्रिटिश सरकार दडपशाहीचा वरवंटा जोरजोरानें फिरवी. तेव्हां लोकमान्य त्या सरकारला असें बजावीत कीं, 'स्वातंत्र्याकरितां एकदां तंटा सुरू झाला म्हणजे मग यशप्राप्ति झाल्याखेरीज तो विझत नाहीं.' कारण 'स्वातंत्र्याची ज्वाला अंतःकरणांत एकदां पेटली म्हणजे ती करड्या अमलानेंहि विझत नाहीं.'

कलकत्त्याची राष्ट्रसभा आटोपल्यावर गांधीजी 'अमृतबझार पत्रिके'चे संपादक श्री. मोतीलाल घोष यांना भेटावयास गेले. मोतीलाल मृत्युशयेवर पडलेले होते. त्या वेळीं त्यांनीं गांधीजीं-पाशीं कोणते उद्‌गार काढले? "मी तर आतां परलोकाला चाललों. तो लोक कोठेंहि कसाहि असला तरी गांधीजी, मी समाधानानें जात आहें. या साम्राज्यांतून सुटका होणार याच आनंदांत मी आहें."

या मोतीलालांप्रमाणेंच पं. मोतीलाल नेहरू हेहि पुढें जेव्हां मृत्युशय्येवर अखेरचे क्षण मोजीत पडले, तेव्हां त्यांनींहि 'शेवटची एकच इच्छा' गांधीजींजवळ प्रदर्शित केली. ती म्हणजे 'मला मृत्यु येणारच असेल तर तो स्वतंत्र भारतमातेच्या अंकावर येवो!' अशी इच्छा मनांतल्या मनांत अतृप्त ठेवून ज्या ज्या भारतीयांचे आत्मे स्वर्गांत गेले असतील, ते सर्व ता. ३१ डिसेंबर १९२९ रोजीं रावी नदीचे तीरावर खचित जमले असतील.

पं. जवाहरलालांनीं उच्चारलेली व लक्षावधि लोकांनीं उद्घोषिलेली स्वातंत्र्याची प्रतिज्ञा, त्या अंतराळांतील अतृप्त आत्म्यांनीं मनोभावानें जपली असेल यांत शंका नाहीं. चिपळूणकरांनीं आणि टिळकांनीं, दादाभाईंनीं आणि दासांनीं, रानड्यांनीं आणि लालाजींनीं—सर्व स्वातंत्र्य-भक्तांनीं त्या स्वातंत्र्याच्या ध्वजावर आनंदाचे अश्रु खास ढाळले असतील !





रावी नदीच्या तीरावर

स्वातंत्र्याचें निशाण रोवलें !

लाहोर येथें, रावी नदीच्या तीरावर, राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें असतांना, तिचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांनीं, रात्रींचे बाराचे ठोके पडतांच, सरकारला दिलेली मुदत संपल्यानें, हिंदी स्वातंत्र्याचें निशाण अस्मानांत फडफडविलें !

त्यापूर्वीं १९२७ सालीं मद्रास येथें राष्ट्रसभेचें अधिवेशन भरलें असतांना पं. जवाहरलालांनीं असा ठराव मांडला होता कीं, 'हिंदी जनतेचें साध्य संपूर्ण स्वातंत्र्य हें आहे.' या ठरावाला अनुमोदन दिलें देश-गौरव सुभाषचंद्र बोस यांनीं !

आश्चर्य असें कीं, या स्वातंत्र्याच्या ठरावाला गांधीजींची संमति नव्हती. १९२६ सालींहि स्वातंत्र्याचा ठराव राष्ट्रसभेमध्यें आला होता; पण तो फेटाळला गेला होता. कारण त्या काळीं स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं लागणारें सामर्थ्य राष्ट्रांत उत्पन्न झालें नव्हतें. एकएका स्वातंत्र्य-लढ्यांतूनच जनतेचें असें सामर्थ्य वाढत जात असतें--- मग तो लढा अपेशी झालेला का असेना ! जन-सामर्थ्याची वाढ हेंच त्याचें यश !

१९२७ सालीं ब्रिटिश सरकारनें सायमन-कमिशन हिंदु-स्थानांत पाठविलें. हिंदी लोकांना स्वराज्याचे किती जास्त अधिकार दिले असतां ते संतुष्ट होतील, याची चौकशी करण्याकरितां सरकारनें हें कमिशन नेमलें खरें; पण तें असंतोषाच्या आगींत ओतलेलें तेलच ठरलें! त्या कमिशनमध्यें सारेच गोरे लोक होते. एकाहि हिंदी माणसाला त्यांत घेतलेलें नव्हतें. या एकजात गोऱ्या कमिशनचा निषेध राष्ट्रसभेनें तर जळजळीत भाषेनें केलाच; पण डॉ. बेझंट, मि. वाच्छा वगैरे इतर पक्षांच्या पुढाऱ्यांनींहि केला. या कमिशनवर बहिष्कार घालण्यासाठीं सर्व पक्षांनीं एकजूट केली. या कमिशनच्या कार्याला गांधीजींचा पाठिंबा मिळवावा, म्हणून व्हाइसरॉय लॉर्ड अर्विन यांनीं त्यांना मुद्दाम पाचारण केलें. पण कमिशनचें कार्यक्षेत्र लक्षांत येतांच गांधीजींनीं त्याची किंमत एका वाक्यांत केली. ते व्हाइसरॉयांना म्हणाले, ' एक आण्याच्या पोस्टाच्या तिकिटानें माझ्या येण्याचें कार्य झालें असतें. '

सरकारनें एकजात गोरे कमिशन नेमून हिंदी लोकांचा एक प्रकारें अपमानच केला; त्यामुळें सारें हिंदुस्थान संतापून गेलें.

त्या संतापाचा परिणाम म्हणजे मद्रासच्या राष्ट्रसभेनें मंजूर केलेला स्वातंत्र्याचा ठराव! 'या ठरावाची शब्दयोजना निरुपद्रवी आहे; पण तो घाईनें बनविला व अविचारानें मंजूर झाला!' अशी टीका म. गांधींनीं केली. कां केली त्यांनीं अशी टीका? त्यांना काय स्वातंत्र्य नको होतें?

म. गांधीजींच्या टीकेचा आशय असा होता कीं, 'सर्व राष्ट्राच्या वतीनें बोलणारी आपली राष्ट्रसभा आहे. या महान् संस्थेनें प्रत्येक शब्द विचारानें व जबाबदारीनें उच्चारला पाहिजे, एवढेंच नव्हे तर तो आचरणांत आणण्याची शक्ति अंगीं असेल तरच तो उच्चारावा! नाहीं तर, 'जगांत आपल्या दुर्बलतेचें प्रदर्शन होतें, आपले विरोधक आपलें हंसें करतात किंबहुना आपले प्रतिपक्षी आपणांस तुच्छतेनें वागवितात. म्हणून ज्या ठरावाप्रमाणें कृति करण्याची तयारी आपल्या अंगीं नसेल, असे ठराव उथळ भावनेनें सालोसाल करीत बसूं नये.'

पण क्रोधाच्या भरांत सर्वसाधारण माणसाला इतका विवेक राहतो कुठें? त्यांतहि तरुणांच्या भावना बेफाम असतात. आणि अशा बिनहिशेबी भावनांतूनच जगांत कांहीं मोठमोठ्या क्रान्त्या घडलेल्या नाहींत काय? छत्रपति शिवाजीमहाराजांनीं ज्या वेळीं तोरणा किल्ला घेतला, त्या वेळीं प्रचंड मोंगली सत्तेशीं टक्कर देण्याइतकी तयारी त्यांच्याजवळ होती काय? बाजी प्रभूनें त्या पावनखिंडींत मुसलमानी सेनेचा लोंढा थोपवून धरला, त्या वेळीं त्याचें बळ काय होतें? आणि सर्व जगांत गाजलेली ती थर्मापिलीची घनघोर

लढाई ! अवघ्या तीनशें ग्रीक सैनिकांनीं बलाढ्य शत्रूशीं तेथें झुंज दिली ! स्वातंत्र्यासाठीं प्राणार्पण करतांना नेहमींचे हिशेब, मामुली अटकळी आणि तर्कशास्त्राचे नियम यांचा विचार करून चालतच नाहीं.

मद्रासच्या राष्ट्रसभेनें स्वातंत्र्याचा केवळ ठराव १९२७ सालीं केला. तो म्हणजे ब्रिटिश सरकारच्या निषेधाची निशाणीच होती. हा निषेध सायमन कमिशनच्या डोळ्यांना व कानांना सर्व देशभर दिसला व तो ऐकूं आला. ज्या ज्या शहरांत त्या कमिशनची वरात गेली, तेथें तेथें हरताळ पडला, काळीं निशाणें दाखविलीं गेलीं, हजारों लोकांनीं ‘ परत जा सायमन ! ’ अशा कानठळ्या बसण्यासारख्या आरोळ्या ठोकल्या ! हिंदी जनतेचा क्रुद्ध अवतार पाहून सरकार चिडलें. पोलिसांनीं लोकांवर लाठीमार केला. त्यांतील एक लाठी पं. जवाहरलाल यांच्या वृद्ध मातेच्या कपाळावर बसली ! लाहोर येथें लाला लजपतराय या राष्ट्रनेत्याच्या कपाळींहि लाठी पडली ! ती इतक्या जोरानें कीं, त्या थोर पुरुषाला मृत्युच आला ! त्यामुळें सारा देश चवताळला !

राष्ट्राच्या संतापाच्या ठिणग्या चोहोंकडे उडूं लागल्या. दिल्लीच्या विधिमंडळांत भगतसिंगांनीं बॉम्ब फेकले. व्हाइसरॉयच्या आगगाडी-खालींहि एक बॉम्ब उडाला ! सारें राष्ट्र संतापानें पेटलें होतें. राष्ट्रसभेचें अधिवेशन १९२९ च्या डिसेंबरांत लालाजींच्या लाहोरासच भरविण्यांत आलें. त्यापूर्वींच्या वर्षीं कलकत्ता येथें राष्ट्रसभेनें वसाहतींच्या स्वराज्याची मागणी केली होती आणि ती

मागणी पूर्ण करण्यास सरकारला एक वर्षाची मुदतहि दिली होती; पण सरकारनें कांहीं दाद दिली नाहीं, तेव्हां लाहोरच्या राष्ट्रसभेमध्यें संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव एकमतानें मंजूर झाला; तो मंजूर करण्याशिवाय त्या स्वाभिमानी संस्थेला गत्यंतरच नव्हतें !

‘ एक वर्षाच्या आंत, ता. ३१ डिसेंबर १९२९ च्या पूर्वी, ब्रिटिश पार्लमेंटनें आमची वसाहतीच्या स्वराज्याची मागणी पूर्ण केली नाहीं, तर राष्ट्रसभा अनत्याचारी असहकारितेची चळवळ चालू करील आणि करबंदीसारखे कार्यक्रम अमलांत आणील. ’ असा स्पष्ट इषारा कलकत्ता काँग्रेसनें ब्रिटिश सरकारला दिला होता; पण त्याचें महत्त्व साम्राज्य-सत्तेनें आंधळे बनलेल्या सरकारला कसें कळणार ? अंगद शिष्टाई करण्यासाठीं आला असतांना रावण म्हणाला, ‘ मी चौदा चौकड्यांचा राजा; मला हीं माकडें काय करणार ? ’ अशाच गुमींत ब्रिटिश सरकार गुरफटलेलें होतें. त्यामुळें हिंदी जनतेच्या अंगांतील ‘ राम ’ प्रगट झाला ! तो राम म्हणजे लाहोर येथील स्वातंत्र्य-ध्वज !

लाहोर येथें स्वातंत्र्याचा ठराव मंजूर झाला, या घटनेचे पडसाद सर्व देशभर उमटले; एवढेंच नव्हे तर, जगांतहि ते निनादले. एका आठवड्याच्या आंतच अमेरिकेंतील सीनेटर ब्लेन यांनीं तेथील लोक-सभेंत असा ठराव मांडला कीं, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यास स्वातंत्र्यप्रेमी अमेरिकेनें मान्यता द्यावी.



राष्ट्राची प्रतिज्ञा

पौर्णिमेची रात्र! ती संपतांना निसर्गांत कोणता चमत्कार दिसतो? तर पश्चिमक्षितिजावर पिवळेंपाटोळें मावळतें चंद्रबिंब, तर पूर्व क्षितिजावर तापलेल्या सोन्यासारखें लालभडक उगवतें सूर्यबिंब; असेंच उज्ज्वल दृश्य लाहोरच्या राष्ट्रसभेंत असंख्य राष्ट्र-भक्तांच्या दृष्टीस पडलें. पं. मोतीलाल नेहरू यांनीं राष्ट्रसभेच्या सिंहासनावरून उतरून, वसाहतीच्या स्वराज्याचा 'नेहरू-वृत्तांत' इतिहासांत जमा केला आणि "जो बापने नहीं कर दिखलाया सो बेटा कर दिखलायगा" अशी भविष्यवाणी, नेत्याच्या दूरदृष्टीनें व पित्याच्या वात्सल्यानें उच्चारली. त्याच वेळीं त्यांचे पुत्र पं. जवाहरलाल राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदावर आरूढ झाले आणि

त्यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचें निशाण फडकविलें! 'बापसे बेटा सवाई' पराक्रमी निघाला.

पं. जवाहरलाल म्हणजे तरुणांचे राजे. तरुणांच्या भावना व आकांक्षा, तेज व चैतन्य, त्वरा व धैर्य इत्यादि साऱ्या गुणांची मूस म्हणजे जवाहरलालजी! ते चिर-तरुण आहेत. त्यांना वार्धक्य केव्हांहि शिवूं शकत नाहीं. कोणतेंहि काम तडफेनें हातीं घेऊन त्याची तड तांतडीनें लावावयाची हा त्यांचा बाणा!

'विश्रांति? आपल्यासाठीं ती नाहीं. आपण विश्रांति घेणें म्हणजे ज्यांनीं आपल्या हातीं स्वातंत्र्याची मशाल दिली त्यांच्याशीं द्रोह करण्यासारखें होईल, आपण जें कार्य हातीं घेतलें आहे त्याच्याशीं बेइमान ठरल्यासारखें होईल, ज्यांना क्षणाचीहि विश्रांति घेतां येत नाहीं अशा कोट्यवधि देशबांधवांशीं दगलबाजी केल्यासारखें होईल.' असे तेजस्वीपणानें लखलखणारे विचार त्यांचे आहेत. 'राजे–महाराजे यांना मी ओळखीत नाहीं, व्यापारी-कारखानदार यांना मी जोखीत नाहीं.' असे आपले समाजवादी विचार त्यांनीं लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून जगजाहीर केले, आणि आपलें राजकीय तत्त्वज्ञान असें घोषित केलें कीं, 'हिंदुस्थान म्हणजे शेतकरी-कामकरी. त्यांच्या गरजा पूर्ण करून आपण जितक्या प्रमाणांत त्यांची उन्नति करूं तितक्या प्रमाणांत आपल्या कार्यास यश येईल. त्यांचा उत्कर्ष म्हणजेच राष्ट्राचा उत्कर्ष. त्यांना मातीच्या झोंपड्यांत राहावें

लागत आहे आणि उघडेंवाघडें हिंडावें लागत आहे. ही ब्रिटिश साम्राज्याच्या वैभवाची व आपल्या दैन्याची खरी कसोटीच होय.'

लाहोरच्या राष्ट्रसभेनें ता. ३१ डिसेंबर १९२९ रोजीं स्वातंत्र्याचें निशाण रोवलें. 'सभा संपली आणि आपली जबाबदारी संपली; ठराव केले आणि आपण मोकळें झालों.' अशी अंग झाडण्याची वृत्ति लाहोर काँग्रेसमध्यें कोणाचीच नव्हती. तींतील प्रत्येक शब्दाला अर्थ होता आणि त्या अर्थाला कृतीचे कोंब फुटत होते. गांधीजींनीं आपल्या 'यंग इंडिया' पत्रांत स्वच्छ लिहिलें कीं, "स्वातंत्र्याचा ठराव म्हणजे केवळ भपका नव्हे किंवा पोकळ धमकी नव्हे. राष्ट्रसभेच्या मनोवृत्तींत झालेल्या क्रांतीची ती निशाणी होय." ता. २६ जानेवारी हा दिवस साऱ्या राष्ट्रांत 'स्वातंत्र्य-दिन' म्हणून पाळला जाऊं लागला. त्या दिवशीं शहरांत व खेड्यांत, लहानमोठे, गरीब-श्रीमंत, साक्षर-निरक्षर, स्त्री-पुरुष काँग्रेसचें निशाण उभारून अशी प्रतिज्ञा घेऊं लागले कीं,

"आपल्या उन्नतीस पूर्ण वाव मिळावा यासाठीं इतर कोणत्याहि राष्ट्राप्रमाणें हिंदी लोकांनाहि स्वतंत्र असण्याचा, आपल्या श्रम-फलांचा उपभोग घेण्याचा व आयुष्यांतील आवश्यक गोष्टी मिळविण्याचा निर्वेध हक्क आहे असें आमचें ठाम मत आहे.

"तसेंच आमचें असेंहि मत आहे कीं, हे हक्क जनतेपासून हिरावून घेण्याचा व तिच्यावर जुलूम करण्याचा जर एखाद्या

सरकारनें प्रयत्न केला, तर तें सरकार बदलण्याचा किंवा नाहींसें करण्याचाहि जनतेला अधिकार आहे.

" हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेनें हिंदी लोकांचें नुसतें स्वातंत्र्यच हरण केलें नाहीं, तर गरीब रयतेला निस्त्राण करण्यावरच आपल्या सत्तेचें अधिष्ठान ठेवलें आहे व हिंदुस्थानचा आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व नैतिक अध:पात केला आहे. म्हणून हिंदुस्थानानें ब्रिटिशांचे संबंध सोडणें व संपूर्ण स्वातंत्र्य मिळविणें अत्यंत जरूर आहे असें आम्हांस वाटतें. "

सुदैव असें कीं, १९२९ सालींच इंग्लंडमध्यें मजूरपक्ष राज्यावर आला. त्याचे पंतप्रधान मि. रॅम्से मॅक्डोनॉल्ड हे हिंदुस्थानाविषयीं सहानुभूति बाळगणारे होते. त्यांनीं आपल्या पुस्तकांत हिंदुस्थानासंबंधीं उदार विचार प्रगट केले होते. मजूरपक्षाला तर साम्राज्यवाद तत्त्वत:च नापसंत होता. ब्रिटिश साम्राज्यानें हिंदुस्थानावर पारतंत्र्याचें जूं ठेवावें, हें त्या पक्षाला चुकीचें वाटत होतें.

मजूरपक्षानें नेमलेले भारतमंत्री मि. वेजवुड बेन यांना हिंदी राष्ट्रसभेबद्दल आदर वाटत होता. ते स्वत: त्या राष्ट्रसभेच्या एका अधिवेशनाला हजरहि होते. घड्याळांतील मुख्य चक्र जसें फिरतें तशीं इतर बारीकबारीक चक्रेंहि फिरूं लागतात; त्याप्रमाणें इंग्लंडांतील पार्लमेंटचीं सूत्रें मजूरपक्षाच्या हातीं येतांच हिंदुस्थानांतील व्हाइसरॉय व त्याची नोकरशाही यांची हिंदी चळवळीकडे पहाण्याची दृष्टीच बदलून गेली. तथापि हिंदी जनतेची पूर्ण स्वातंत्र्याची मागणी तत्काळ पूर्ण करण्याचें धाडस व औदार्य


मजूरपक्षहि दाखवूं शकला नाहीं. कारण व्यापार हा इंग्लंडचा प्राण व तो व्यापार हिंदुस्थानावर मुख्यत: अवलंबून. चाळीस कोटि लोकांचें गिऱ्हाईक कोणता व्यापारी सुखासुखी सोडील?

तिकडे इंग्लंडांत हुजूरपक्ष असो वा मजूरपक्ष असो, हिंदी जनतेनें आपला स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं चालविलेला यज्ञ अखंड सुरू ठेवला होता. त्यांत आपल्या द्रव्याच्या, विद्येच्या, सौख्याच्या आहुत्या लाखों लोक आनंदानें देत होते. गांधीजी समेटासाठीं पराकाष्ठेचे प्रयत्न करीत होते. कारण ते शांतताप्रिय होते; युद्धप्रिय नव्हते. त्यांचा सारा जन्म अन्यायाशीं झगडण्यांत गेला असला, तरी त्यांच्या जीवनाचें ध्येय शांतता हेंच होतें. असह-कारितेचा मंत्र त्यांनीं राष्ट्राला शिकविला असला, तरी त्यांचा जीव सहकार्यासाठींच तळमळत असे. अहिंसा हें त्यांचें दैवतच होतें. म्हणून ते ब्रिटिश सरकार व हिंदी राष्ट्र यांच्यामध्यें समेटाचा पूल बांधण्यासठीं जीवापाड झटत होते.

ता. ३० जानेवारी १९३० रोजीं त्यांनीं व्हाइसरॉयला एक खलिता धाडला आणि हिंदी राष्ट्राच्या किमान अपेक्षा म्हणून अकरा मागण्या त्यांच्यापुढें ठेवल्या. या मागण्या म्हणजे 'स्वातंत्र्याचें सारसर्वस्व' होत. या मागण्या त्यांनीं इंग्लंडचे पंतप्रधान मि. मॅक्डोनाल्ड यांच्याकडेहि पाठविल्या. तसेंच पूर्वींचे व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांनाहि गांधीजींनीं त्या सादर केल्या होत्या, त्या मागण्या अशा:—

(१) मद्यपानाची पूर्ण बंदी (२) हुण्डणावळीचा भाव १६ पेन्स. (३) जमीनमहसूल कमींत कमी शें. ५० नें कमी करणें आणि महसुलाची बाब कायदेमंडळाच्या अधिकाराखालीं ठेवणें. (४) मिठाचा कर रद्द करणें. (५) लष्करी खर्च सुरुवातीला निदान शें. ५० नें उतरविणें. (६) वरिष्ठ जागांचे पगार निमपटीनें किंवा त्यापेक्षां थोडेसे कमी इतके करून जमीन-महसुलाची भरपाई करणें. (७) परदेशी कापडावर संरक्षित जकात बसाविणें. (८) किनाऱ्यावरील व्यापार ताब्यांत ठेवण्या-विषयींचें बिल मंजूर करणें. (९) खुनाबद्दल किंवा खुनाच्या प्रयत्नाबद्दल शिक्षा झालेल्या कैद्यांशिवाय इतर सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता, किंवा मामुली न्यायमंदिरापुढें चौकशी करून सर्व राजकीय खटले काढून घेणें. १२४ अ कलमाचा व १८१८ च्या ३ रेग्युलेशनचा अंमल रद्द करणें व हद्दपार झालेल्या सर्व हिंदी इसमांना परत येण्यास परवानगी देणें. (१०) गुप्त पोलीसांचें खातें रद्द करणें किंवा लोकमताच्या नियंत्रणाखालीं आणणें. (११) सार्वजनिक हिताचें बंधन संभाळून स्वसंरक्षणासाठीं दारूगोळ्यांचीं हत्यारें बाळगण्यास परवानगी देणें.





लढ्याची अपूर्वाई

एकीकडे सरकारशीं अशा समेटाच्या वाटाघाटी चालू असतांनाच गांधीजी दुसऱ्या बाजूनें स्वातंत्र्याच्या लढ्यासाठीं जनतेची सिद्धता करीतच होते, जनतेला पारतंत्र्याच्या अनिष्ट परिणामाची जाणीव देत होते आणि तिची स्वातंत्र्याची लालसा वाढवीत होते. स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठीं विद्यार्थी, वकील, व्यापारी, सरकारी नोकर, शेतकरी, कामकरी इत्यादि वर्गांतील प्रत्येक घटकानें प्रत्यक्ष कृति काय केली पाहिजे, याचे आदेश ते सारखे देत होते. त्याप्रमाणें कायदेमंडळांतील १७२ सभासदांनीं राजीनामे दिले. समाजांतील इतर वर्गांनींहि स्वातंत्र्यासाठीं अशीच उठावणी करावी, अशी टोंचणी त्यांना गांधीजी सारखी लावीत होते.

'कांहींहि करूं, पण पारतंत्र्याच्या पिंजऱ्यांतून एकदांचे सुटूं.' अशी उतावळी सर्व जनतेची होत चालली होती. जनतेची ती इच्छा, ती आशा, तो निश्चय मूर्त स्वरूपांत उभा करण्याचें व जगापुढें मांडण्याचें कार्य गांधीजींनीं केलें. त्यांनीं त्या जागृत लोकशक्तीचें साहाय्य पाठीशीं घेऊन कायदेभंगाचें रणशिंग फुंकलें!

१९२० सालीं असहकारितेचा लढा ज्या सत्याग्रही पद्धतीनें गांधीजींनीं सुरू केला, त्याच खुल्या रीतीनें १९३० सालचा कायदेभंगाचा संग्रामहि त्यांनीं आरंभिला. या लढ्यांत कपट नव्हतें, असत्य नव्हतें व हिंसेलाहि स्थान नव्हतें. अहिंसक लढाई!— किती अलौकिक घटना! या लढ्याचें वर्णन गांधीजी पुढील नम्र शब्दांनीं करतात, "हें धर्मयुद्ध आहे आणि तें ईश्वराचें नांव घेऊनच मी चालविणार आहें. त्यांत गुप्तता नाहीं, लबाडी नाहीं, असत्य नाहीं. याची योजना ईश्वरानें करून ठेवलेली आहे आणि तें सिद्धीस नेण्यास ईश्वर समर्थ आहे. आपल्या पायांखालच्या धुळीपेक्षांहि आपण जेव्हां नम्र होतों आणि स्वतःला शून्यापेक्षां कमी किंमतीचें मानतों, तेव्हां परमेश्वर साहाय्यास धांवून येतो."

अशा निरहंकारी भूमिकेवरून गांधीजी राजकीय लढा खेळत होते आणि म्हणूनच तो एकसारखा वाढत गेला, सरकाराला अजिंक्य ठरला आणि शेवटीं यशस्वी झाला. हिंदी जनतेनें गांधीजींची अहिंसा स्वीकारली नसती आणि थोडी इकडे, थोडी तिकडे अशी फुटकळ हिंसा केली असती, तर सरकारनें दसपट-शतपट हिंसा करून, संगिनीच्या साहाय्यानें, त्या संग्रामाचीं पाळेंमुळें खणून काढलीं असतीं. बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यशाहीपुढें हिंदी प्रजा हां हां

म्हणतां पराभूत झाली असती, निश्चेष्ट पडली असती; पण गांधीजींच्या अहिंसेमुळें स्वातंत्र्याची लालसा राष्ट्राच्या कोनाकोपऱ्या-पर्यंत पोहोंचूं शकली आणि जनता उघडपणें संघटित होऊं शकली. हा गांधीजींचा स्वातंत्र्य-संपादनाचा मार्ग जगाच्या इतिहासांत अपूर्व होता.

या स्वातंत्र्य-लढ्याची अपूर्वाई किती म्हणून सांगावी! एरवींच्या युद्धांत शत्रु गाफील असतांना, रात्रीं-बेरात्रीं, आगाऊ कांहीं कल्पना न देतां, क्वचित् भलतीच हुलकावणी देऊन सेनापति आकस्मिक हल्ला चढवितो; पण गांधीजींचा सारा कारभार उघडा!— सत्याचा म्हणून निर्भयतेचा! त्यांनीं ता. ४ मार्च १९३० रोजीं एक ‘ निर्वाणीचा खलिता ’ व्हाइसरॉयच्या हातीं पोहोंचविला. पोहोंचविला तो एका इंग्रज दूताबरोबर. रेजिनॉल्ड रेनॉल्ड या नांवाचा इंग्रज तरुण गांधीजींच्या आश्रमांत राहात होता. त्याच्याबरोबर गांधीजींनीं आपल्या लढ्याची सूचना देणारें पत्र व्हाइसरॉयकडे पोहोंचविण्याचें सोंपविलें. या पत्रांत गांधीजींनीं काय लिहिलें?

“ हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेला मी शाप समजतों. हिंदुस्थान देश हा एक प्रचंड तुरुंग बनलेला आहे. लष्करी कायदाच येथें आडपडद्यानें चालू आहे. म्हणून राजद्रोह हा माझा धर्म झाला आहे. ” अशा जळजळीत शब्दांनीं परक्या राजवटीला शाप देऊन गांधीजींनीं आपल्या पत्रांत हिंदुस्थानांतील भीषण दारिद्र्याचें चित्र रेखाटलें होतें. या दारिद्र्याचें मूळ ब्रिटिश राजवटींतच आहे, हेंहि त्यांनीं दाखवून दिलें होतें.

हिंदी माणसाचें रोजचें सरासरी उत्पन्न दोन आणे आहे, तर व्हाइसरॉयचें उत्पन्न रोज सातशें रुपये आहे. याचा अर्थ एका इंग्रज व्हाइसॅरायची रोजची प्राप्ति ५००० हिंदी माणसांइतकी आहे. आणि खुद्द इंग्लंडांत काय स्थिति आहे? तेथील प्रत्येक माणसाचें सरासरी उत्पन्न दोन रुपये आहे आणि इंग्लंडच्या पंतप्रधानाचें उत्पन्न त्याच्या ९० पट म्हणजे १८० रु. आहे. प्रजाजन व राज्यकर्ता यांच्या मिळकतीचें प्रमाण इंग्लंडांत १ : ९० तर हिंदुस्थानांत १ : ५०००! ही जशी महागडी नोकरशाही, तसाच डोईजड खर्च गोऱ्या लष्कराचा! त्यामुळें हिंदी जनता भिकेस लागली आहे, उपासमारीनें हळूहळू मृत्यु पावत आहे आणि राजकीय हक्कांच्या दृष्टीनें तर गुलामच बनली आहे.

देशाची अशी दुर्दशा गांधीजींनीं आपल्या पत्रांत तळमळीनें व साधार रीतीनें रेखाटली आणि शेवटीं सरकारला आपला असा निश्चय कळविला कीं, "अशी अत्याचारी राजवट नष्ट करण्यासाठीं मी अनत्याचारी लढा पुकारणार आहें. मिठाचा कायदा मोडून मी कायदेभंग करणार आहें." या कठोर निश्चयाला नम्र समेट-बुद्धीची जोड देण्यास गांधीजी विसरले नाहींत. "ही धमकी नव्हे, सत्याग्रहांतील एक आवश्यक कर्तव्य मात्र आहे; आपण मला वाटाघाटीसाठीं बोलाविल्यास मी आनंदानें येईन." असेंहि त्यांनीं लिहिलें.

पण सशस्त्र सरकारला निःशस्त्र प्रजेच्या पुढाऱ्याची काय कदर? व्हाइसरॉयांनीं चार ओळींचें तुटक व उद्धट उत्तर

गांधीजींना दिलें. "मागितली भाकर; पण मिळाला फत्तर!" असें गांधीजींना वाटलें. शिष्टाई संपली आणि लढाई सुरू झाली.

त्या अपूर्व युद्धाचा मंगल दिन उगवला! जगामध्यें हजारों वर्षें निरनिराळ्या देशांत वेगवेगळ्या काळीं शेंकडों युद्धें झालीं; पण भारताचा हा कायदेभंगाचा संग्राम केवळ अपूर्व होता— अद्वितीय होता. टकळीशिवाय शस्त्र नाहीं, पंचाशिवाय चिलखत नाहीं व रामनामाशिवाय रणघोषणा नाहीं, अशा थाटानें या अहिंसक युद्धाचा सेनापति आपल्या छावणींतून बाहेर पडला. समुद्रांतील मीठ हाच त्यानें जिंकावयाचा किल्ला. सत्यनिष्ठा हेंच त्याचें युद्धशास्त्र! आणि त्याचे सैनिक किती? सेनापतीसकट फक्त एकूणऐंशीं!— अहमदाबादच्या सत्याग्रहाश्रमांतील सारे विद्यार्थी व प्राध्यापक! पंधरा वर्षें आश्रमांत केलेल्या त्यांच्या तपस्येची कसोटी लागण्याचाच क्षण आला. निरनिराळ्या प्रांतांतून आलेले ते आश्रमीय कार्यकर्ते अखिल भारताचेंच प्रतिबिंब होतें. त्यांच्यापैकीं दोन मुसलमान, दोन हरिजन, एक ख्रिस्ती व बाकीचे हिंदु होते. १६ ते ६१ वयापर्यंतचे स्वातंत्र्य-भक्त या शांति-सेनेंत सामील झाले होते.

युद्ध-दिनाच्या आदल्या दिवशींचा प्रसंग! साबरमती नदीच्या तीरावर अहमदाबादचे हजारों नागरिक गोळा झालेले होते. तेथें या वृद्ध व कृश सेनापतीनें आपला निर्वाणीचा संदेश सर्वांना ऐकविला. तो संदेश कोणता? तर "आपली बाजू खंबीर आहे, आपलीं साधनें शुद्ध आहेत आणि ईश्वर आपला पाठीराखा आहे. सत्याग्रह्यांना पराभव माहीत नसतो. उद्यां आपल्या युद्धास तोंड

लागेल. त्यांत यश देण्यासाठीं परमेश्वराची प्रार्थना करूं या!" इतका नम्र, इतका पवित्र, पण तरीहि इतका निश्चयाचा संदेश आजवर कोणत्या सेनापतीनें दिला असेल?

"ही माझ्या आयुष्यांतील स्वराज्याची अखेरची लढाई आहे. तींत यश न मिळालें तर मी माझ्या आश्रयांत परत पाऊल टाकणार नाहीं!" अशी भीष्म-प्रतिज्ञा गांधीजींनीं केली. त्यांनीं आपलें जीवनच पणाला लावलें. आपल्या सर्वस्वाचा जोहार करूनच ते बाहेर पडले. सिंहगडावर चढलेल्या मावळ्यांनीं परत घराकडे पळूं नये म्हणून सूर्याजीनें सारे दोर कापून टाकले; तशाच निकराच्या व निर्वाणीच्या वृत्तीनें गांधीजींनीं कायदेभंगाचें रणशिंग फुंकलें.

त्यांच्या मनानें असा ठाम निर्धार केला होता कीं, "मला हजारों अनुयायी मिळो किंवा मी एकटा असो, मी हा लढा सुरू करणारच! लढा सुरू असतांना कोठें दंगल माजली तरी हा लढा मी अखेरपर्यंत चालविणारच! या लढ्यांत यश मिळविल्याशिवाय मी कदापि राहणार नाहीं! अपयश पावून आश्रमांत परत जाण्यापेक्षां कुत्र्याच्या मोतीनें मरणें आणि कुत्र्याकडून माझीं हाडें चघळलीं जाणें मला फार बरें वाटेल!" त्यांनीं इतरांनाहि अंतिम आदेश दिला कीं, "या अखेरच्या लढ्यांत प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. सत्य-अहिंसेच्या मर्यादा संभाळून दारूचें निरोधन करा, कर-बंदी करा आणि सरकारी नोकऱ्या सोडा."



ती दांडीयात्रा!

ता. १२ मार्च १९३० चा सूर्योदय झाला! याच सूर्यानें पूर्वी एकदां प्रभु रामचंद्र अयोध्या नगरींतून बाहेर पडलेले पाहिले होते आणि लंकेंतील रावण-राज्य नष्ट होणार म्हणून आनंद मानला होता. याच सूर्यानें राजपुत्र सिद्धार्थ पाटलीपुत्र नगरांतून बाहेर पडलेला अवलोकिला होता आणि लौकरच अहिंसा शिकविणारा भगवान् बुद्ध जगाला लाभणार म्हणून संतोष मानला होता. तोच सूर्य आज, आपल्या हजारों डोळ्यांनीं, साबरमती आश्रमांतून बाहेर पडणारा अहिंसक सेनानी पहात आहे आणि संपूर्ण स्वातंत्र्य संपादण्याचा आशीर्वाद त्याला आपल्या सहस्र करांनीं देत आहे.

सकाळचे साडेसहा वाजले. गांधीजींनीं 'दांडी-यात्रेचें' प्रस्थान ठेवलें. गांधीजींच्या भालप्रदेशीं कुंकुमतिलक लावलेला होता. त्यांच्या गळ्यांत हातसुताचे हार घातलेले होते. सुवासिनींनीं त्यांना

पंचारतीनें ओवाळलें. हातांत केवळ आधारासाठीं एक उंच काठी होती. अंगावर फक्त दोन वस्त्रें. कमरेला घड्याळ लावलेलें होतें. गांधीजींसह ७९ सत्याग्रही वीर ब्रिटिशांचें राज्य झुगारून देण्यासाठीं एका गांवाहून दुसऱ्या गांवाकडे निघाले. अहमदाबाद शहरांतून दोन मैल लांब अशी ही मिरवणूक चालली. लाखों नागरिकांनीं आपल्या अंतःकरणाचीं फुलें तिच्यावर उधळलीं.

आशेनें, उत्कंठेनें, आदरानें, भक्तीनें हजारों स्त्री-पुरुष रस्त्याच्या दोन्ही बाजूंस तासन् तास उभे राहून या स्वातंत्र्य-सेनेचें स्वागत करीत होते. अहमदाबाद ते असलाली या गांवापर्यंतचा दहा मैलांचा रस्ता लक्षावधि स्वातंत्र्य-भक्तांनीं गजबजून गेला होता. सडासंमार्जनांनीं, पानाफुलांनीं, ध्वजातोरणांनीं तो शृंगारला होता. आपल्या राष्ट्राच्या इतिहासाचें आज एक नवेंच पान उघडलें जात आहे, हा अभिमान प्रत्येकाच्या मुखावर नाचत होता. ही अहिंसक सेना आपल्याला स्वातंत्र्य मिळवून देणार, असा आशावाद प्रत्येकाच्या डोळ्यांत खेळत होता. त्या शांतिसेनेचें स्वागत करण्यासाठीं गांवोगांवचे लोक सामोरे जात आणि हर्षानें शिंग–चौघडे वाजवीत.

ती दांडी-यात्रा ! साऱ्या हिंदुस्थानचें, नव्हें अवघ्या जगाचें लक्ष वेधून घेणारें तें दांडी गांव—पूर्वीचें दीप-गृह—आतां स्वातंत्र्याचा दीप लावणार. जलालपूरजवळ समुद्रकिनाऱ्यावर वसलेलें हें खेडें अकस्मात् जगप्रसिद्ध झालें. अहमदाबादपासून दांडी हें समुद्रकांठचें गांव दोनशें एकेचाळीस मैल अंतरावर आहे. हें अंतर चालून जाण्यास या स्वातंत्र्य-वीरांना चोवीस दिवस लागले.

देशांतील निरनिराळ्या प्रांतांमधून थोर थोर लोक या इतिहास-प्रसिद्ध यात्रेचें दर्शन घेण्यासाठीं आलेले होते. देशांतील देशा-बाहेरील वर्तमानपत्रांचे प्रतिनिधि तेथें हजर राहिले होते आणि या महान् क्रांतिकारक घटनेचीं शब्दचित्रें व छायाचित्रें पाठवीत होते.


खऱ्याखुऱ्या अर्थानें हें धर्मयुद्ध होतें. या युद्धाचे सरसेनापति गांधीजी असें स्पष्टच म्हणत कीं, "गरिबांना गांजणारें व पीडणारें असें राज्य चालू असतां तिकडे दुर्लक्ष करून मी बदरीकेदारच्या यात्रेला गेलों तर मोठेंच पाप होईल. असला अंमल क्षणभर चालू दिल्यास मोक्ष मिळेल कसा? ह्या अन्यायी राज्य-व्यवस्थेचा नाश करणें यांतच खरा मोक्ष आहे. परमेश्वर-प्राप्तीसाठींच हिमालयांत जायचें तर तीस कोटि प्रजेच्या अंत:करणांत काय परमेश्वर नाहीं? स्त्री-पुरुष, हिंदु-मुसलमान, ख्रिती-पार्शी इत्यादि भेद विसरून मानवजातींत वसणाऱ्या ईश्वराला भजणें हीच खरी भक्ति होय!"

या गांवांतून त्या गांवाकडे ही दांडीयात्रा चालली होती. पंढरीची यात्रा विठ्ठलाच्या दर्शनासाठीं असते, काशीयात्रेचा हेतु विश्वनाथाच्या दर्शनाचा असतो, तसें दांडीयात्रेचें साध्य कोणतें? तर स्वातंत्र्य! विठ्ठलाला तुळशीपत्र किंवा विश्वनाथाला बिल्वपत्र हें जसें पूजेचें एक साहित्य; तसें मीठ हें या स्वातंत्र्याचें साधन! स्वातंत्र्य-लढ्याचें तें केवळ निमित्तमात्र, राष्ट्रीय आकांक्षेचें तें फक्त एक प्रतीक. नाहीं तर सूर्याच्या उन्हानें, समुद्राच्या पाण्यानें आणि वाऱ्याच्या झोतानें विना-खर्च, विना-आयास आपोआप तयार होणारें मीठ तें काय आणि तेवढ्या-साठीं एवढें रण माजतें तें काय! पण प्रत्येक माणसाला ज्याची

गरज आहे अशा त्या मिठावर ब्रिटिश सरकारनें १९२३ सालीं दर मणास २॥ रु. कर ठेवलेला होता, म्हणून एक शेर मीठ घेणाऱ्या हिंदी माणसाला एक आणा कर भरावा लागत होता.

पुढें दास-नेहरूंच्या स्वराज्यपक्षानें खूप खटपट केल्यावर सरकारनें हा कर निम्मा केला, पण तेवढा तरी कां? हवा, पाणी, ऊन हीं प्रत्येकाला मोफत मिळतातच ना? तसेंच त्या तीन पंचमहाभूतापासून निसर्गतः निर्माण होणारें मीठहि प्रत्येकांस मोफत मिळावें हा राष्ट्रसभेचा आग्रह आणि म्हणून स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं निघालेल्या दांडीयात्रेचें भजन "निमक का कायदा तोड दिया" हें होतें.

साधारणपणें रोज पंधरा मैलांची मजल ही शांति–सेना मारीत असे. सोमवारी सुट्टी असे. गांधीजी पहांटे चार वाजतांच उठून आपलें लेखन करीत. एकदां कंदील विझलेला होता, स्वयंसेवक झोंपलेले होते; पण चंद्र उगवला होता. त्या 'स्वर्गीय दिव्या'च्या प्रकाशांतच हा महात्मा पहांटे लिहीत बसला—कोणाला उठविणें त्याच्या जीवावर आलें! सकाळीं साडेसहा वाजतां हें स्वातंत्र्य-पथक कूच करी. दमलेल्या स्वयंसेवकासाठीं बैलगाडी असे. पण साठी उलटलेले गांधीजी झपाझप् पुढें चालत. एकदां तर ते होडींतून नदी ओलांडून गेले. प्रार्थना व सूतकताई यांचें व्रत अखंड चाले. तसेंच सभेंत भाषण व 'यंग इंडिया' साठीं लेखन. ता. २७ मार्चच्या अंकांत त्यांनीं लेख लिहिला, "राजद्रोह हाच धर्म!' तेंच ते बोलत.



सरकारची चढाई

ज्या ज्या गांवीं दांडीयात्रेचें पाऊल पडे, तेथून तेथून पारतंत्र्यानें आपलें पाऊल उचलल्याचा भास होई. "गांधी-राज्य आलें म्हणजे ब्रिटिश राज्य गेलें." अशीच भावना सर्व जनतेची होई. स्वातंत्र्याचा संदेश खेड्याखेड्यांतून सहजच संचारला. पूर्वी कधीं नव्हती इतकी उंच देशभक्तीची लाट प्रत्येकाच्या हृदयांत उचंबळूं लागली. त्या लाटेच्या जोरामुळें गांवोगांवचे सरकारी नोकर राजिनामे देऊं लागले. दांडी—यात्रा आपल्या गांवीं येत आहे असें कळतांच कैक पाटलांनीं आपल्या नोकऱ्यांचे राजिनामे दिले. इतर कांहीं सरकारी अधिकाऱ्यांनींहि पारतंत्र्याचे पाश तोडून टाकले. अनेक खेड्यांमध्यें ब्रिटिश सत्तेचा मागमूसहि राहिला नाहीं. स्वातंत्र्याचें वातावरण तेथें खेळूं लागलें.

सुरत, नडियाद वगैरे शहरांत हजारों रुपयांच्या राशी गांधीजींच्या पायांशीं ओतण्यांत आल्या; पण गांधीजी म्हणत, "मला पैसा नको. तुम्ही खादी वापरा, दारू सोडा, ऐक्य करा, अस्पृश्यता घालवा, खेडीं स्वच्छ ठेवा!" लोकांचा उत्साह अपरंपार होता. साऱ्या हिंदुस्थानचें लक्ष दांडी-यात्रेकडे लागून राहिलें होतें. फार काय, सारें जग कान टवकारून दांडी-यात्रेचें वृत्त उत्सुकतेनें ऐकत होतें. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स वगैरे देशांतील वृत्तपत्रांतून दांडी-यात्रेचीं वर्णनें येत होतीं.

अमेरिकेंतील मीशिगनचे विद्यार्थी, कोलंबो विश्वविद्यालयाचे विद्यार्थी, कोलंबोचा तरुण संघ, कॅंडीचा तरुण संघ, पुण्याचा ख्रिस्त सेवासंघ, शांतिनिकेतनचे नेपाळचंद्र राय इत्यादि जगांतील निरनिराळ्या देशांतील, जातींतील व पक्षांतील संस्था व व्यक्ति यांनीं या अभूतपूर्व स्वातंत्र्य संग्रामावर सहानुभूतीचा व यश-चिंतनाचा वर्षाव केला. क्रान्तिकारकांच्या एका संस्थेच्या कार्य-वाहानें दिल्लीहून एक सहानुभूतिपर पत्र पाठविलें आणि 'या अपूर्व प्रयोगास संधि देण्याकरितां क्रान्तिकारक पक्ष आपली चळवळ तीन वर्षेंपर्यंत थांबवून धरील' असें आश्वासन दिलें.

एकट्या सुरत जिल्ह्यांतून १६९ राजिनामे सरकारकडे रवाना झाले आणि स्वातंत्र्य-संग्रामांत एक हजार स्वयंसेवकांची भरती झाली. तो बार्डोली तालुका तर स्वातंत्र्याचा जणुं बालेकिल्लाच! त्यांतून ७०० स्वयंसेवक पुढें आले. त्यांत सत्तर स्त्रिया होत्या व त्यांपैकीं एकीचें वय ८० वर्षांचें होतें. गंमत अशी

कीं, पूर्वी याच गुजरातमधील स्त्रिया सत्याग्रहाला भीत. त्यांचे पति सत्याग्रह करण्यास निघाले असतांना त्या त्यांना विरोध करीत, किंबहुना घरांतल्या घरांत त्यांच्याविरुद्ध सत्याग्रह करीत.

एका गांवीं तर कांहीं गुजराती महिलांनीं आपापलीं मुलें कडेवर घेऊन व दारांत उभे राहून सत्याग्रहासाठीं जाणाऱ्या पतींना अडविलें. "तुम्ही जर या चळवळींत भाग घेण्यासाठीं घरांतून बाहेर निघाल, तर मी घराच्या मागील बाजूस जाऊन आपल्या विहिरींत या मुलासह उडी घेईन व जीव देईन!" अशी धमकी त्यांनीं दिली. बिचारे नवरे! एकीकडे पत्नीप्रेम तर दुसरीकडे राष्ट्रप्रेम या कात्रींत ते सांपडले. काय करावें हें त्यांना कळेना. आपल्यापुढील पेंचप्रसंग त्यांनीं गांधीजींना कळविला. गांधीजी त्या गांवीं गेले आणि त्या गृहिणींना एकत्र आणून त्यांनीं त्यांना समजाविलें. पारतंत्र्यामुळें प्रत्येकाची दुर्दशा कशी होत आहे आणि स्वातंत्र्याचे फायदे प्रत्येकाला कसे मिळणार आहेत, याची जाणीव त्यांना गांधीजींनीं दिली व सत्याग्रह करणें हें प्रत्येक स्वातंत्र्य-भक्ताचें कर्तव्य कसें आहे हें त्या संसारी स्त्रियांच्या चित्तावर त्यांनीं ठसविलें; त्यामुळें त्यांचें हृदय-परिवर्तन झालें. गांधीजींच्या शब्दांचा जादूसारखा परिणाम झाला. सत्याग्रहाला विरोध करणाऱ्या त्याच कुटुंबिनी आतां स्वातंत्र्य-भक्त बनल्या आणि पुन्हां सत्याग्रहासाठीं निघालेल्या आपल्या पतींना निरांजनानें ओवाळून आनंदानें व प्रेमानें निरोप देऊं लागल्या. स्वातंत्र्याचें प्रेम असा विलक्षण परिणाम करणारें असतें!

प्रत्येक प्राणिमात्राच्या अन्तःकरणांत असें स्वातंत्र्य-प्रेम असतें, सद्भावना असतात, मात्र बहुतेकांच्या त्या भावना झोंपीं गेलेल्या असतात किंवा स्वार्थाच्या भाराखालीं दडपल्या गेलेल्या असतात. त्यांना हलविण्याचें, डिवचण्याचें, जागें करण्याचें कार्य टिळक–गांधींसारखे राष्ट्रनेते करीत असतात. नवसारी येथें दारूचा व्यापार करणाऱ्या पारशी लोकांच्या अन्तःकरणांतील ईश्वराला आळवितांना गांधीजींची वाणी किती तेजस्वी व प्रेरक झाली होती, हें पाहण्यासारखें आहे. अचल निश्चयानें व अलोट आत्म-विश्वासानें रसरसणारे उद्गार गांधीजींच्या मुखांतून निघाले, ते असे— " हिंदुस्थानांतून मिठाचा कर आणि दारूचा व्यापार हद्दपार करतां आला, तर तो अहिंसेचा विजय आहे. असें झालें तर हिंदुस्थानला स्वराज्याच्या वाटेवर जगांतील कोणती शक्ति अडवून धरूं शकेल ? जर अशी एखादी शक्ति असेल तर ती मला पाहावयाची आहे. मला पाहिजे तें मिळवून मी तेथून परत येईन किंवा त्या शक्तीशीं लढतांना माझें मृत शरीर महा-सागरावर तरंगूं लागलेलें तरी दिसेल ! "

अशा प्रकारें स्वातंत्र्याच्या लढ्याची कमान चढत होती—स्वातंत्र्यप्रेमी जनतेचें बळ वाढत होतें—राष्ट्रांतील वातावरण कायदे-भंगानें तापत होतें. सरकारी अधिकारी चिडून गेले होते, गोंधळून गेले होते. त्यांना या सत्याग्रही लढ्याचें स्वरूप नवीनच होतें. त्यामुळें त्याचें पारिपात्य कसें करावें हेंच त्यांना कळेनासें झालें. कोठें दंगेखोरांनीं दगड फेंकले तर त्यांच्यावर बंदुका रोखणें, बाँब

फेंकणें, तोफा डागणें हे सशस्त्र प्रतिकाराचे मार्ग इंग्रज सरकारच्या अंगवळणीं पडले होते. १८५७ सालच्या क्रांतियुद्धापासून हेच हिंस्त्र उपाय त्यांनीं योजिले होते; पण सत्याग्रहाचा लढा अहिंसेचा, शांततेचा, प्रेमाचा! त्यांत दंगल नाहीं, गडबड नाहीं कीं पोलीसांवर दगडफेंक नाहीं. उलट पोलीसांनीं जरी लाठीमार केला, तरी सत्याग्रही हात वर उचलणार नाहींत किंवा भुंवई वांकडी करणार नाहींत. अशा सभ्य, सात्त्विक बंडखोरांशीं कसें वागावें हें सरकारला कोडेंच पडलें. 'शत्रुसैन्यांत गोंधळ उत्पन्न करणें' हा युद्धशास्त्रांतील पहिला धडा आहे. तो गिरविण्यांत या कायदेभंगाच्या लढ्यानें पूर्ण यश मिळविलें.

अखेर आपल्या प्राणावरच संकट आलें आहे असें सरकारला वाटलें आणि त्यानें न्याय, सभ्यता, संस्कृति यांचें पांघरूण फेंकून दिलें व मनमानेल तशी दडपशाही देशभर सुरू केली. स्वातंत्र्या-सारखें उदात्त ध्येय आणि कायदेभंगासारखें शांततापूर्ण साधन—अशा तयारीनें सत्याग्रहाच्या रणांगणावर उभे ठाकलेल्या सुविद्य, सधन व सुसंस्कृत अशा निरपराध नागरिकांवर सरकारनें दडप-शाहीची आग ओतली. गांधीजींचे उजवे हात असलेले सरदार वल्लभभाई पटेल हे गांधीजींच्या स्वागताची तयारी करण्यासाठीं बोरसद येथें निघाले असतांना सरकारनें त्यांना ता. ७ मार्च रोजींच अटक केली आणि तीन महिन्यांची शिक्षा कोर्टानें सुनावली! या सरकारच्या आघाताचा परिणाम काय झाला? तर ता. ९ मार्च रोजीं अहमदाबाद येथें साबरमती नदीच्या कांठीं ७५००० लोक

गोळा झाले आणि त्यांनीं अशी प्रतिज्ञा केली कीं, " आमच्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देईपर्यंत आम्ही शान्त राहाणार नाहीं आणि सरकारला शांतता लाभूं देणार नाहीं ! " सरकारनें सर्व देशांत सभा-मिरवणुकींना बंदी घातली.

मथुरा येथें एका दहा वर्षांच्या मुलाच्या हातांतून एका असिस्टंट मॅजिस्ट्रेटनें राष्ट्रध्वज हिसकावून घेतला. तो ध्वज परत मागण्यासाठीं लोकांचा प्रचंड जमाव जमला असतां पोलीसांनीं प्रचंड लाठीहल्ला चढविला. बंगालमध्येंहि राष्ट्रध्वज हिसकावून घेण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांनीं कल्पनातीत क्रौर्य दाखविलें. तांदळाचीं पिकेंच्या पिकें जाळण्यांत आलीं, खाण्याच्या वस्तु सक्तीनें घेण्यांत आल्या. बिहार, उत्कल, संयुक्त प्रांत, दिल्ली, मुंबई या प्रांतांतहि दडपशाहीचें थैमान चालू झालें. गुजरातमध्यें दुकानदार सरकारी अधिकाऱ्यांना भाजीपाला विकीनात, म्हणून भाजीपाल्याची मंडईच पोलीसांनीं छापा घालून उध्वस्त केली ! कैक सत्याग्रह्यांच्या हाडांचा चुराडा झाला, तरी त्यांनीं आपल्या मुठींतील मीठ सोडलें नाहीं. कलकत्ता, कराची, पेशावर व मद्रास येथें गोळीबार झाले. लाठीहल्ले तर सर्वत्रच झाले. ते अकारण होते, असें गांधीजींनीं व्हाइसरॉयला पत्रानें कळविलें. त्या पत्रांत गांधीजींनीं अशी सूचनाहि दिली कीं, "यापुढें सरकारी मालकीच्या मिठागारावर आमचे सत्याग्रही उघड हल्ले करतील. पहिला हल्ला धारासणा येथें होईल. " हे हल्ले थांबविण्यासाठीं सरकारनें मिठावरील कर ताबडतोब रद्द करावा अशीहि विनंति गांधीजींनीं केली होती.

त्या विनंतीला सरकारनें जाब काय दिला? तर ता. १४ एप्रिल रोजीं राष्ट्रसभाध्यक्ष पं. जवाहरलालांना पकडलें, तुरुंगांत त्यांचा खटला चालविला आणि सहा महिन्यांची शिक्षा दिली!

पं. मोतीलाल पुनः राष्ट्राध्यक्ष झाले. ता. १८ रोजीं ते मुंबईस गेले असतां त्यांचें प्रचंड स्वागत झालें. दोन लाख लोकांनीं मिरवणुकींत भाग घेतला. आझाद मैदानावर त्यांना स्वयंसेवक लष्करी सलामी देणार होते; पण त्या कार्यक्रमाला सरकारनें बंदी केली. ती मोडून तेथें हजारों लोक जमले. सरकार खवळलें. पोलीसांनीं भयंकर लाठीमार केला. अडीचशेंवर लोक जखमी झाले. पं. मोतीलालांनीं सरकारला बजावलें, "अशा लाठ्यांनीं जनतेची ही चळवळ मारून टाकतां येईल अशी तुमची कल्पना असेल, तर ती चुकीची आहे. स्वतंत्र हिंदुस्थानची राज्यघटना ठरविण्यासाठीं गोलमेज परिषद भरणार असली, तर दोन समसमान दर्जाचीं राष्ट्रें या नात्यानेंच तेथें हिंदुस्थान व इंग्लंड यांच्या प्रतिनिधींची चर्चा होऊं शकेल."





सारें राष्ट्र पेटलें!

अखेर यात्रेचें क्षेत्र आलें. गांधीजी दांडी येथें जाऊन पोहोंचले. पूर्वी दांडी येथें दीपगृह होतें. आतां दांडी हें स्वातंत्र्याचें दीपगृह बनलें. दांडीच्या प्रकाशाकडे सारा देश टक लावून पाहात होता. चोवीस दिवसाच्या प्रवासानंतर व प्रचारा-नंतर सारा जन-सागर खळबळून टाकून व सरकारला खवळून सोडून, गांधीजी दांडी येथील समुद्रकिनाऱ्यापाशीं आले.

रविवार उजाडला—ता. ६ एप्रिलचा दिवस उगवला.

सकाळीं प्रार्थना करून गांधीजी व त्यांचे अनुयायी समुद्र-किनाऱ्यावर गेले. बरोबर ८॥ वाजतां गांधीजींनीं खालीं वांकून समुद्रावरील किनाऱ्यावरील चिमूटभर मीठ उचललें. त्यासरशीं "हा पहा कायदेभंग!" अशी अभिमानाची आरोळी सौ. सरोजिनी नायडू यांच्या कंठांतून निघाली! ती त्या विस्तीर्ण वाळवंटावर दुमदुमली! जगांतील किनाऱ्याकिनाऱ्यावर थडकली!!

सरकारचा एकहि पोलीस तेथें नव्हता. गांधीजींच्या पाठोपाठ सर्व सत्याग्रह्यांनीं हातांनीं मीठ उचललें व पायांनीं कायदा तुडविला.

दांडीच्यामागोमाग हिंदुस्थानांतील शहरांशहरांतून व खेड्या-खेड्यांतून मिठाचा कायदेभंग करण्यांत आला. जेथें समुद्र नव्हता तेथें जाहीर सभेंत खारट पाण्यापासून मीठ तयार करून विकण्यांत आलें. कांहीं ठिकाणीं "जंगलाचा कायदा" मोडला गेला. खुद्द गांधीजींनींहि कांहीं खेड्यांतील ताडीचीं झाडें बिनापरवाना तोडून जंगलाचा कायदेभंग केला!

ता. ६ एप्रिल रोजीं, कायदेभंगाच्या सुमुहूर्तावर, पं. मोतीलाल नेहरू यांनीं एक अपूर्व दान केलें— आपलें 'आनंद–भवन' राष्ट्राला अर्पण केलें— 'स्वराज्य–भवन' असें त्याचें नांव ठेवलें.

काँग्रेसचे अध्यक्ष या नात्यानें पं. जवाहरलाल यांनीं पं. मोतीलाल यांना उत्तर पाठविलें, "आनंदभवनाचा जुना वाडा आपण राष्ट्राला देणगी म्हणून दिल्याबद्दल मी आपले आभार मानतों. राष्ट्रीय चळवळीशीं या वाड्याचा बरींच वर्षें निकट संबंध आहे. तेव्हां हा वाडा राष्ट्राची मिळकत झाली हें योग्यच झालें. स्वातंत्र्य-संग्राम सुरू होण्याचा वेळीं ही देणगी राष्ट्रास मिळत आहे हें अगदीं उचित आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यांत 'स्वराज्य-भवना'कडून योग्य कामगिरी बजावली जाईल व हिंदुस्थान स्वतंत्र झालेला हा वाडा पाहील अशी आशा मी तूर्त व्यक्त करतों."

या गृह-दानाचा गौरव गांधीजींना कसा केला? ‘ पंडितजींनीं आपला सुपुत्रच राष्ट्रार्पण केल्यानंतर चुनाविटांची इमारत देण्याचीं काय गरज होती ? ’ असे मोजके शब्द त्यांनीं लिहिलें. साऱ्या राष्ट्रानें नेहरू पिता-पुत्रांना धन्यवाद दिले.

पं. मालवीय हे वरिष्ठ विधिमंडळाचे पंचवीस वर्षें सभासद होते. त्यांनीं आपल्या सभासदत्वाचा राजिनामा दिला. श्री. अणे, श्री. केळकर, बॅ. मुनशी, वगैरे खासदार-आमदारांनींहि राजिनामे दिले. श्री. विठ्ठलभाई पटेल हे विधिमंडळाचे पांच वर्षें अध्यक्ष होते आणि त्यांनीं तें अध्यक्षपद आपल्या कणखरपणानें चांगलें गाजविलेंहि. पण अध्यक्ष हा निःपक्षपाती असतो. तेव्हां कॉंग्रेसपक्षाशीं सहानुभूति दाखवून आपल्या जागेचा राजिनामा देणें त्यांना योग्य वाटलें नाहीं. पण पुढें सत्याग्रहाची आंच इतकी वाढत चालली कीं, त्यामुळें त्यांचा तो पोलादी निश्चयहि विरघळून गेला आणि ता. २५ एप्रिल रोजीं त्यांनीं सरकारकडे आपलें त्यागपत्र भिरकावून दिलें. त्याबरोबर त्यांनीं सरकारला असें स्वच्छ कळविलें कीं, “ या वेळीं माझी जागा अध्यक्षाची खुर्ची ही नव्हे, माझ्या देशबांधवांच्या खांद्याशीं खांदा भिडवून स्वातंत्र्य-संग्रामांत भाग घेणें हेंच माझें खरें कर्तव्य होय. तुम्ही शहाणे असाल तर गांधीजींशीं समेट करा. ”

कर्नाटकांत तीन लाख ताडीचीं झाडें तोडण्यांत आलीं. संयुक्त प्रांतांत करबंदीची चळवळ पसरली. गुजरातेंतील बोरसद गांवीं ता. १ जानेवारी रोजीं पोलीसांनीं पाण्याचीं भांडीं फोडून टाकलीं

आणि नागरिक स्त्रियांना लाठ्या-काठ्या मारीत हांकून लावलें. सरदार वल्लभभाईंची ऐंशी वर्षांची म्हातारी आई आपलें अन्न शिजवीत असतांना पोलीसांनीं तिचें चुलीवरील भांडें खालीं पाडलें.

आपल्या राहत्या घराला चोहोंबाजूंनीं आग लागावी व तिच्या ज्वाला उंच उंच भडकत जाव्या आणि त्या विझविण्यासाठीं आपण धावपळ करून पाण्याचे हपके जों जों मारावें तों तों त्या आगीचें रौद्र स्वरूप वाढतच जावें, म्हणजे त्या घरमालकाची मनःस्थिति जशी गोंधळून जाते; तशीच सरकारची वृत्ति बावरून गेली होती. त्यांच्या राज्यसत्तेला चोहोंकडून आग लागली होती. मात्र ते स्वतःच्या घरांत राहात नव्हते, तर हिंदुस्थानच्या घरामध्यें ते पाहुणे म्हणून आले, ओसरीवर राहिले आणि तेथून हातपाय पसरतां पसरतां त्यांनीं सारें घर व्यापलें! तेव्हां त्यांना तेथून निघून जाण्यास भाग पाडण्यासाठींच हा लढा चालू झालेला होता.

या लढ्यांतील सैनिकांना व सरदारांना पकडून व छळून लढा थांबवितां येईल अशी आशा सरकारला प्रथम वाटत होती; पण ती फोल ठरली. एकएका अटकेनें, एकएका छळानें चळवळीची ज्वाला अधिकाधिक उंच भडकत गेली. तेव्हां सरकारनें असा विचार केला कीं, झाडाचीं पानें व फांद्या तोडण्यापेक्षां त्याचा बुंधाच कापून टाकावा म्हणजे सारें झाड जमिनीवर आपोआप कोसळेल. या अपेक्षेनें सरकारनें गांधीजींनाच अटक करण्याची तयारी केली. पण—

गांधीजींच्या कर्तृत्वाचा परिणाम झोंपड्यांतील शेतकऱ्यापासून राजवाड्यांतील राज्यकर्त्यांपर्यंत विलक्षण रीतीनें घडून येत होता. त्याचें वर्णन पं. जवाहरलालइतकें यथार्थ रीतीनें दुसरें कोण करूं शकेल ? पंडितजी लिहितात, "महात्माजींच्या अन्तःकरणांत एका महान् निश्चयाचा अग्नि पेटलेला आहे. आपल्या दीन-दरिद्री देशबांधवाबद्दल वाटणाऱ्या त्यांच्या प्रेमाला सीमा नाहीं. त्यांच्या हृदयांत सत्य-निष्ठा धगधगीत पेटलेली आहे. त्यांच्या चित्तांतील स्वातंत्र्य-प्रेम इतरांना स्फूर्ति देणारें आहे. त्यांच्याजवळ जो कोणी जाईल तो या स्वातंत्र्य-प्रेमाच्या मंत्रानें मुग्ध झाल्याशिवाय राहाणार नाहीं. गांधीजींच्या स्पर्शानें साध्यासुध्या माणसांच्या पार्थिव जीवनांत चैतन्याचे स्फुल्लिंग फुलूं लागतात." हे चैतन्याचे स्फुल्लिंग भरतखंडाच्या कोनाकोपऱ्यापर्यंत उडाले. सीमाप्रांतांत 'खुदा-ई-खिदमदगारांची' संघटना निर्माण करणारे खान अबदुल गफारखान हे सत्याग्रहाच्या मंत्राला वश झाले. त्यांचें वाढतें तेज सरकारला सहन होईना. ता. २४ एप्रिल रोजीं सरकारनें त्यांना पकडलें. त्यांना जनता 'सरहद्द गांधी' या नांवानेंच ओळखूं लागली. सरहद्दीवरचे लढाऊ लोक बिथरणें हें आपल्यावरील फार मोठें संकट आहे हें सरकारनें ओळखलें; पण—

वाळलेल्या गवताच्या गंजीवर एक ठिणगी पडली तरी केवढा भडका उडतो ! तसाच प्रकार सरहद्दीवरील पठाणांमध्यें या स्वातंत्र्य-लढ्याच्या स्फुल्लिंगानें केला. त्या पठाणांची संघटना पोलादी ! त्यांची शिस्त अभेद्य ! मान तुटली तरी आज्ञा मोडावयाची नाहीं

असा त्यांचा बाणा ! सरहद्द गांधी हें त्यांचें दैवत ! त्यांनाच सरकारनें विना-अपराध तुरुंगांत डांबलें. हें कळतांच त्यांची उपजत वीरश्री उफाळून बाहेर आली. सरकारचा धिक्कार हिमाल्याच्या गुहागुहामध्यें दुमदुमला. स्वातंत्र्याच्या आकांक्षेचें तेज त्या पर्वतराजाच्या हिमाच्छादित शिखराशिखरावर नाचूं लागलें. राष्ट्रप्रेमाची गंगा दुथडी भरून चालली ! पठाणांचे जमाव जमूं लागले, सरकारचा धिक्कार करूं लागले, स्वातंत्र्याचा जयजयकार उठवूं लागले. ही लाट थोपविण्यासाठीं सरकारनें आपले पोलीस पाठविले, लष्कर पाठविलें, शस्त्रांनीं भरलेल्या मोटारगाड्याहि दिमतीस दिल्या. त्यांपैकीं एक सशस्त्र मोटार त्या कडव्या पठाणांनीं जाळून टाकली ! सरकारनें अखेरचें शस्त्र उपसलें. गोळीबार करण्याचा हुकूम आपल्या लष्कराला दिला. पण—

"गोळीबार ? आपल्या देशबांधवांवर गोळीबार ? आणि तो कशासाठीं ? स्वातंत्र्याच्या मागणीसाठीं ? छेः ! हें पाप होईल, देशद्रोह होईल, माणुसकीला कलंक लागेल" असें त्या सैनिकांना वाटूं लागलें. त्यांचें चित्त विचारूं लागलें, "हें पाप आपण कोठें फेडणार ? रौरव नरकांत आपणांस पडावें लागेल आणि राष्ट्रमातेचा शाप आपल्याला कायमचा बाधेल ! आपल्या माणुसकीला कलंक लावून आपल्याला माणूस म्हणून कसें जगतां येईल ? त्यापेक्षां परक्या सरकारचा हा दुष्ट हुकूम आपण मोडणेंच चांगलें. मग त्या पायीं बडतर्फी सोसावी लागली, किंबहुना प्राणास मुकावें लागलें तरी बेहत्तर ! " अशा विचारांचीं चक्रें त्या लष्करांतील


सैनिकांच्या डोक्यांत फिरूं लागली. गोऱ्या अधिकाऱ्यांनीं गोळी-बाराचे हुकूम दिले. पण दोन गढवाल पलटणींनीं ते अमलांत आणण्याचें नाकारलें! त्या पलटणींतील ते शूरवीर सैनिक हिंदु होते आणि त्यांनीं गोळ्या घालावयाच्या होत्या मुस्लीम पठाणांवर! पण हिंदु-मुसलमान हा भेदभाव स्वातंत्र्य-देवतेच्या तेजापुढें शिल्लक राहील कसा? दोघेहि देशबांधव, दोघेहि स्वातंत्र्यप्रेमी. ते दोघे एकमेकास मारतील कसें? इंग्रज सरकारचा हुकूम हिंदी सैनिकांनीं पायाखालीं तुडविला!

गढवाल पलटणीचा हा कायदेभंग म्हणजे ब्रिटिश सरकारच्या मर्मीं घाव होता. कारण परक्या सरकारचें खरें बळ म्हणजे लष्करच! तेंच फितलें म्हणजे सरकारचा सारा कारभार आटो-पला. सैन्यांतील बेदली म्हणजे सिंहासनाखालील सुरुंगच! तो प्रथम उडविण्याचा मान गढवाळ पलटणींनीं मिळविला. त्याबद्दल त्यांना सरकारनें जबर शिक्षाहि ठोठावल्या. त्या त्यांनीं आनंदानें सोसल्या. कारण त्यांच्या हृदयांत स्वातंत्र्याचा देव प्रगट झाला होता. ता. २५ एप्रिल ते ४ मेपर्यंत पेशावर शहर पठाणी जन-तेच्या ताब्यांत होतें. ब्रिटिश सत्तेचा मागमूसहि तेथें दिसत नव्हता. तें शहर परत जिंकण्यासाठीं बलाढ्य सरकारनें प्रचंड लष्कर पाठविलें, फार काय विमान-दलहि पाठविलें! आकाशांतून बॉंब टाकल्याशिवाय जमिनीवरील आपलें आसन स्थिर राहात नाहीं, अशी खात्री सरकारला पटली.

जसे सरहद्दीवरील पठाण; तसेच बंगालमधील तरुण! वृत्तीनें शूर, भावनेनें अनावर आणि त्यागाची तयारी जीव देण्या–

घेण्यापर्यंत ! रामकृष्ण–विवेकानंदांचा तो बंगाल म्हणजे उदार भावनांचें मोहोळ आहे. रामतीर्थ-अरविंदांचा तो बंगाल म्हणजे विरक्तीचें तपोवन आहे. रवींद्र–शरच्चंद्रांचा तो बंगाल म्हणजे देवी सरस्वतींच्या हातांतील कमळ आहे. ईश्वरचंद्र-प्रफुल्लचंद्रांचा तो बंगाल म्हणजे शास्त्र-संशोधनाचा आश्रम आहे. ते बॅ. चित्तरंजन दास, ते सुभाषचंद्र बोस, ते जतीन्द्रनाथ–नाना नररत्नांची माला वंगभूमीच्या कंठांत रुळत आहे. तशा कांहीं उत्साही तरुणांनीं ता. १८ एप्रिल रोजीं चितगांव येथील सरकारी दारूगोळ्याच्या सांठ्यावर निधड्या छातीनें हल्ला केला. त्यांत दोन कॉलेज-कन्यांनींहि भाग घेतला होता. सरहद्दीवर सरकारचें लष्कर फितलें गेलें; तर बंगालमध्यें शस्त्र-साहित्य लुटलें गेलें ! सरकारला वाटलें, आपला एकएक आधार खचत आहे—आपली एकएक नाडी तुटत आहे. तेव्हां यापुढें या स्वातंत्र्य-संग्रामाच्या सेनापतीला मोकळा ठेवतां कामा नये. 'छे:, या गांधीला पकडलेंच पाहिजे' दिल्लीचा बडा लाट आपल्या मनांत म्हणाला.


मध्यरात्रीची वेळ ! समुद्रकांठची शांतता. खालीं लाटा नाचत होत्या, वर तारका चमकत होत्या. गांधीजींची छावणी कराडी या गांवीं पडलेली होती. दिवसभराच्या श्रमानें थकून तो तपस्वी रात्री अकरा वाजतां झोपी गेला होता. शेजारी त्यांचे साठ सहकारीहि झोपले होते. पहांटे पाऊण वाजतां दोन मोटार-लॉऱ्या आश्रमासमोर उभ्या राहिल्या. त्यांतून पंचवीस पोलीस झटाझट उतरले. डि. मॅजिस्ट्रेट व पोलीस कमिशनर पुढें आले. जवळजवळ पळतच ते गांधीजींच्या खाटेजवळ गेले. त्यांनीं



गांधीजींच्या तोंडावर विजेच्या दिव्याचा प्रकाश पाडला. त्यामुळें ते जागे झाले. पोलीसांनीं अंगणाला गराडा घातला. पंचवीस मिनिटांत गांधीजींना घेऊन सरकारी मोटारी हालल्या. इतक्या शांतपणें जगाच्या इतिहासांत कोणत्याच सेनापतीला शत्रूनें पकडलें नसेल !

दुसरे दिवशीं गांधीजींच्या अटकेची वार्ता साऱ्या जगाच्या कोनाकोपऱ्यांना धक्के देत गेली ! मुंबईंतील पन्नास हजार कामगारांनीं हरताळ पाळला. रेल्वे-कामगारहि त्यांत सामील झाले. आफ्रिकेंतील नैरोबी येथील हिंदी रहिवाश्यांनीं हरताळ पुकारला. पनामा येथें हिंदी व्यापाऱ्यांनीं एक दिवस हरताळ पाळला. सुमात्रा येथें हरताळ पाळण्यांत येऊन व्हाइसरॉय व राष्ट्रसभा या दोघांनाहि तारा पाठविण्यांत आल्या. फ्रान्समधील वृत्तपत्रांनीं गांधीजींच्या अटकेला विशेषच महत्त्व दिलें आणि त्यांच्या चळवळीचें वर्णन सविस्तर दिलें.

खुद्द इंग्लंडांत मि. फ्रेनर ब्रॉकवे म्हणाले, "१८५७ सालच्या बंडानंतर आजपर्यंत कधींहि झाली नसेल अशी दडपशाही हिंदुस्थानांत सध्यां चालू आहे. महत्त्वाच्या दृष्टीनें पाहिल्यास हल्लीं हिंद व ब्रिटानिया यांचा जो झगडा चालला आहे, त्याला जर्मन महायुद्धाइतकेंच महत्त्व आहे." अमेरिकेंतील रे. होल्म्स, डॉ. संडरलंड वगैरे १०२ नागरिकांनीं हिंदुस्थानांतील दडपशाहीचा निषेध करणारें पत्रक काढलें व तें अमेरिकन कॉंग्रेस, हिंदी राष्ट्रसभा व ब्रिटिश सरकार यांजकडे पाठविलें. चीन, जर्मनी वगैरे राष्ट्रांतहि गांधीजींच्या अटकेमुळें खळबळ उडाली. सर्व जगभर ही कायदेभंगाची चळवळ गाजली व त्यामुळें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-प्रेमाची जणुं नौबतच दशदिशा झडली.





महाराष्ट्राचा पराक्रम

या स्वातंत्र्य-लढ्यांत महाराष्ट्र आघाडीवर तळपत होता. सोलापुरानें तर कहर केला ! तेथील नागरिकांनीं तीन दिवस हरताळ पाडला. तिसरे दिवशीं कांहीं मुलांनीं एक ताडीचें दुकान जाळलें. पोलीसांच्या मोटारी बंदुकासह फिरूं लागल्या. पुढाऱ्यांची धरपकड झाली. " आमच्या पुढाऱ्यांना सोडा. " अशी मागणी एका धीट मुलानें केली. तत्काळ त्याला एका गोऱ्या सार्जंटनें गोळी घालून ठार केलें ! लोक खवळले. त्यांनीं सहा पोलीस-चौक्या जाळल्या. त्यांत दोन पोलिसहि जाळले. कोर्टाच्या इमारतीवर रॉकेल ओतून आग लावण्यांत आली. सरकारचें माथें भडकलें. ता. ८ मे रोजीं दुपारीं १॥ वाजल्यापासून सायंकाळीं ६॥ वाजेपर्यंत सशस्त्र पोलीसांच्या दोन मोटारी भरवेगानें सर्व शहरांतून फिरूं लागल्या आणि मनमानेल तसा

गोळीबार करूं लागल्या. पंचवीस निष्पाप नागरिक निष्कारण ठार झाले. शेंकडों माणसें जखमी झालीं. ता. १२ मेपासून तर सरकारनें सोलापुरांत 'लष्करी कायदा' च पुकारला.

लष्करी कायदा म्हणजे नित्याच्या कायद्याचा अभाव. लष्करी अधिकाऱ्याची लहर हाच तेथील कायदा! न्याय नाहीं, दाद नाहीं, अपील नाहीं, कांहीं नाहीं! नागरिकांवर किती अत्याचार झालें, किती बलात्कार झालें याला सीमाच नाहीं. दहा दहा हजार रुपये दंडाच्या शिक्षा संपादकांना झाल्या. चार व्यापाऱ्यांना फांशीची शिक्षा देण्यांत आली. कॉंग्रेसचें निशाण फडकविण्यास बंदी करण्यांत आली. तरी जनतेचें धैर्य ढळलें नाहीं कीं स्वातंत्र्य-प्रेम उणावलें नाहीं. एकशेंएकत्रीस स्वयंसेवकांनीं कॉंग्रेसचा झेंडा हातीं घेऊन सोलापूर शहरांत मिरविला आणि कर्दनकाळ अशा लष्करी कायद्याचाहि बिनदिक्कत भंग केला!

महाराष्ट्राचें स्वातंत्र्यप्रेम, त्याची झुंझारवृत्ति आणि त्याचें अकुंठित धैर्य या सर्वांनीं एकदम पेट घेतला. ता. ६ एप्रिल रोजीं विलेंपार्लें येथें शेंकडों स्वयंसेवकांनीं मिठाचा कायदे-भंग केला. ता. ८ मे रोजीं विलेंपार्ल्याच्या छावणींतून १०० स्वयंसेवकांची एक तुकडी शिरोडा येथील सरकारी मिठागरावर हल्ला चढविण्यासाठीं निघाली. त्या रणक्षेत्राकडे दररोज एकएक तुकडी कूच करीत होती. ता. १२ रोजीं ५८३ स्वयंसेवकांनीं मिठाची रास फोडली आणि तीवर राष्ट्रीय झेंडा फडकविला. या कायदेभंगांत श्री. धर्मानंद कोसंबी या विद्वान बौद्धानेंहि भाग घेतला होता. एका दिवसांत एक हजार मण मीठ बेकायदा लुटण्यांत व वांटण्यांत आलें.

असाच कायदेभंग रोजरोज वाढत्या उत्साहानें होत राहिला. तो बंद पाडण्यासाठीं सरकारचे दंड, कैद इत्यादि कायदेशीर उपाय फोल ठरले. तेव्हां पोलीसांनीं 'जंगली कायदा' हातीं घेतला. स्वयंसेवकांच्या तंगड्या धरून पोलीसांनीं त्यांना फरफटत नेलें, त्यांना वर उचलून जमिनीवर आदळलें. त्यांच्या पाठीवर व छातीवर गुद्दे लगावले, ते बेशुद्ध झाल्यावरसुद्धां लाठ्यांचे तडाखे हाणले ! सरकारनें सारे रस्ते रोखून धरले. तार-ऑफिस आपल्या ताब्यांत घेतलें. दीडशें लाठीबंद पोलीस उभे केले. पण तरीहि कायदेभंगाची लाट सारखी वाढतच होती.

वडाळा येथील मिठागरावर शंभर-शंभर; दोनदोनशें स्वयंसेवक धैर्यानें चालून जात आणि पोलीसांच्या लाठी-हल्ल्याला न जुमानतां तेथील मीठ लुटून नेत व सरकारचा कायदा मोडून टाकीत. इंग्रजांचा कायदा मोडणें हें लोखंडी पहार वांकविण्यापेक्षांहि अधिक अवघड आहे, अशी सर्वसामान्य लोकांची भावना. म्हणून 'शक्तीचे अद्भुत प्रयोग' पाहण्यासाठीं लोकांची जशी गर्दी उडते, तशी हे कायदे-भंगाचे अपूर्व प्रयोग पाहण्यासाठीं स्त्री-पुरुषांचे लोट लोटत. त्यांच्या साहसप्रिय व स्वातंत्र्यप्रिय वृत्ति तेथील स्वयंसेवक-पोलीसांच्या झटापटी पहातांना उचंबळून येत. तें सरकारला नको होतें. म्हणून सरकारनें जमावबंदीचा हुकूम काढला. त्याचा परिणाम काय झाला? तर १५००० लोकांचा प्रचंड जमाव ता. १ जून रोजीं वडाळा येथील मिठागरावर चालून गेला!

तेथील किनाऱ्याच्या एका बाजूनें जशा समुद्राच्या लाटांवर लाटा येत होत्या; तशा दुसऱ्या बाजूनें स्वयंसेवकांच्या तुकडयामागून तुकडया स्वातंत्र्याचा जयघोष करीत येऊन आदळत होत्या. त्यांना अडविण्याचा प्रयत्न पोलीस करीत; पण स्वातंत्र्यप्रेमानें धुंद झालेल्या मुलांच्या 'वानर-सेना' व स्त्रियांपैकीं 'केसरी देशसेविका' पोलीसांची कोंडी फोडून पुढें घुसत आणि चिखल तुडवीत मिठाच्या खाचरापर्यंत जाऊन पोहोंचत. पोलीसांनीं सर्रास लाठी चालविली. गृहमंत्री तेथें जातीनें हजर होते व सत्याग्रही अशा निःशस्त्र नागरिकांवर बेगुमान लाठी चाललेली शांतपणें पाहात होते. दीडशें स्वयंसेवक जखमी झाले. पुढें दोन दिवसांनीं तर सत्याग्रह्यांच्या संख्येला इतकी भरती आली कीं, तो सेनासागर हटविण्यासाठीं पोलीसांच्या मदतीला लष्कर देण्यांत आलें.

मुंबई म्हणजे हिंदुस्थानचें नाक! तेथें खुट्ट झालें कीं, साऱ्या देशभर, नव्हे जगभर त्याचे आवाज उठतात. तेथें कायदेभंगाचें वारें शिरूं नये म्हणून सरकार डोळ्यांत तेल घालून जपत होतें; पण जनतेचें स्वातंत्र्यप्रेम अजिंक्य ठरलें. ता. १ ऑगस्ट दिवस म्हणजे लो. टिळकांची पुण्यतिथी. हजारों लोकांची मिरवणूक निघाली. सरकारनें तिला बंदी केली. मिरवणुकींतील हजारों लोक रस्त्यावरच बसून राहिले—रात्रभर पाऊस पडत होता तरी बसून राहिले. दुसरें दिवशीं सकाळीं बोरीबंदर स्टेशनच्या गच्चीवरून तो अद्भुत देखावा गृहमंत्री पाहून गेले. त्यांना वाटलें, "आपल्या

साम्राज्यावर केवढें हें संकट! कसेंहि करून हें संकट नाहींसें केलेंच पाहिजे!" लगेच त्यांचे पोलीस-अधिकाऱ्यांना हुकूम सुटले. पं. माल्वीय, सरदार वल्लभभाई वगैरे थोरथोर पुढाऱ्यांना अटक करण्यांत आली. आणखी शंभर महिलांनाहि पकडण्यांत आलें.

त्यांना बाजूस नेऊन उरलेल्या हजारों स्त्री-पुरुषांच्या डोक्यावर लाठीचे हल्ले पोलीसांनीं बेगुमानपणें सुरू केले. या पोलीसांना भरपूर दारू पाजली जात असे. तिच्या कैफांत ते पोलीस त्या स्वातंत्र्यप्रिय व शांतताप्रिय नागरिकांना यथेच्छ झोडपीत. नेमक्या डोक्यावर लाठीचें लोखंडी कडें हाणण्याचा हुकूमहि त्यांना होताच. तशा मर्मी आघातामुळें घेरी येऊन व रक्तबंबाळ होऊन स्वयंसेवक खालीं पडत; तरीहि पोलीस त्यांना बडवीत. "या लाठीमारापेक्षां लष्करी कायदा पुष्कळ बरा!" असे उद्‌गार बिकानेरच्या महाराजांनीं काढले. एका अमेरिकन वार्ताहरानें त्या वेळचा एक हृदयद्रावक प्रसंग वर्णन केला आहे. तो असा—

'लेंगे लेंगे स्वराज्य लेंगे' असें गीत गाणारे आणि हातांत स्वातंत्र्याचें तिरंगी निशाण घेतलेले स्वयंसेवक आझाद-मैदानावर शिस्तीनें व शांततेनें येऊन उभे राहिले. इतक्यांत लाठीबंद पोलीसहि आले. आझाद-मैदानाचें रणमैदान बनलें! लाठ्यांचे आवाज घुमूं लागले. स्वयंसेवक जखमी झाले, जमिनीवर पडले, रक्ताचे पाट वाहूं लागले. रुग्ण-गाड्या धांवूं लागल्या. शूर-वीर शीख तरुणहि पोलीसांचे घावामागून घाव सोशीत होते.

छातींत शौर्य व हातांत कृपाण असूनहि ते पोलीसांचा प्रतिकार करीत नव्हते कीं, जागचे हालतहि नव्हते! तशाच शीख स्त्रिया! एकीनें तर आपलें चिमुकलें अर्भकहि आणलें होतें. ती त्या बालकाला पोलीसांच्या लाठीहल्लयांत पुढें करणार होती—त्यांच्या अन्तःकरणांतील माणुसकी जागीं करणार होती. आतां हिंदी घोडेस्वारांची तुकडी आली. कांहीं पोलीस शीख स्त्रियांजवळ उभे राहिले आणि बाकीच्यांनीं शीख पुरुषावर लाठीप्रहार सुरू केले. शिखांचीं निळीं पागोटीं हवेंत उडालीं. त्यांचे लांब केंस मोकळे झाले. डोक्यावर लाठी आली कीं, ते स्वातंत्र्यवीर डोळे मिटून शांतपणें घाव सोशीत. कोणी बेशुद्ध पडत; शुद्धीवर येतांच पुन्हां सत्याग्रहास उभे राहात. तें त्यांचें स्वातंत्र्याचें शांति-शौर्य पाहून पोलीस चपापले. त्यांनीं आपले हात मागें घेतलें. "अशा शूरावर हल्ला करणें अशक्य आहे!" असें ते म्हणाले.

"एका सत्याग्रह्याला बेदम मारमारून तो बेशुद्ध झाल्यामुळें त्याला हॉस्पिटलमध्यें नेलें. मार पडत असतांना काठीच्या प्रत्येक घावाबरोबर 'राम' 'राम' असा शब्दोच्चार तो सत्याग्रही करीत होता. तो हॉस्पिटलमध्यें पडला असतां दुसरें दिवशीं त्याला काठीनें झोडपणारा शिपाई साध्या पोषाखांत त्याच्याजवळ गेला आणि डोळ्यांत अश्रु आणून त्यानें आपल्या अत्याचारी वर्तनाचा पश्चात्ताप जाहीर केला." सत्याग्रहाचें यश तें हेंच! सत्याग्रही माणूस आत्मक्लेशानें प्रतिपक्षाचा हृदय-पालट करतो तो असा!

समुद्र असेल तेथें मीठ; पण समुद्र नसेल तेथें? जंगलें तर सर्वत्र आहेत. त्यांतील झाडाचें पान तोडण्यास सरकारनें मनाई

केलेली आहे. ती मनाई मोडली कीं झालाच कायदेभंग! ता. २२ जुलै रोजीं संगमनेर-अकोला भागांत वीस ठिकाणीं एकाच वेळीं एक लाख शेतकऱ्यांनीं जंगलचा कायदा तोडून राखीव भागांतील गवत कापून आणलें. या कायदेभंगाच्या वेळीं दिंडया-भजनें चालूं होतीं. त्यामुळें राजकारणाला 'भगवंताचें अधिष्ठान' मिळाल्याचा भास होत होता. शेंकडों पाटलांनीं राजिनामे दिले.

नाशिक जिल्ह्यांतील बागलाण तालुक्यांतहि ता. ५ ऑगस्ट रोजीं एक लाख शेतकऱ्यांनीं जंगलचा कायदा तोडला. त्यांत दोन हजारांवर स्त्रिया होत्या. सरकार गांगरून गेलें. कैद कोणाकोणाला करावयाचें, आणि इतक्या कैद्यांना कोणत्या तुरुंगांत ठेवावयाचें, हा पेंच त्याला पडला.

सातारा जिल्ह्यांतील बिळाशी गांवांत ता. १८ जुलै रोजीं बंद भागांतील एक सागवानी सोट कापून आणून तो महादेवाच्या देवळांत रोवण्यांत आला व त्यावर राष्ट्रीय निशाण लावण्यांत आलें. तो सोट जप्त करण्यासाठीं पोलीसांनीं जंग जंग पछाडलें; पण दहादहा हजार शेतकरी जमून त्यांनीं—त्यांतहि शेतकऱ्यांच्या स्त्रियांनीं—केलेल्या सत्याग्रहापुढें पोलीसांना हात टेकावे लागले. तेव्हां चिडून जाऊन सरकारनें ता. ५ सप्टेंबर रोजीं पुण्याहून शंभर पोलीस व कोल्हापुराहून दीडशें लष्करी सैनिक बिळाशीवर रवाना केले. दिसेल त्याला मारहाण करीत या सैन्यानें चौथरा पाडला, देवळांतील मृदंग-वीणा फोडला, निशाण फाडलें आणि त्या सागवानी सोटाचे तुकडे तुकडे केले. लोक

संतापले व त्यांनीं दगड फेंकले. उलट पोलीसांनीं गोळीबार केला. दोन कोंवळ्या मुलांचे मुडदे पडले ! लाठीमारांत दीडशें लोक जखमी झाले.

अशीच निकराची झुंज पनवेल तालुक्यांतील चिरनेर या गांवानें दिली. ता. २५ सप्टेंबर रोजीं दुपारीं पांच हजार लोकांची मिरवणूक भजनी दिंडयांसह निघाली. त्यांनीं जंगल कापलें व ते परत निघाले. त्यांच्यावर पोलीसांनीं अकस्मात अकारण गोळीबार सुरू केला. पांच माणसें ठार झालीं व पन्नास जखमी झालीं. त्यांत खुद्द मामलेदारहि पोलीसांच्या गोळीला बळी पडले. वऱ्हाडांतहि श्री. अणे यांच्या पुढारीपणाखालीं हजारों शेतकऱ्यांनीं जंगलचा कायदा तोडला.





पवित्र धारातीर्थ

या कायदेभंगाच्या लढ्यानें विक्रम केला धारासणा येथें. हें या स्वातंत्र्य-संग्रामांतील धारा-तीर्थच बनलें. मुंबई-पासून दीडशें मैलांवर सुरत जिल्ह्यांत हें पवित्र रणक्षेत्र आहे. तेथें प्रचंड मिठागरें आहेत. त्यांतील मिठाचा एक कणसुद्धां सरकारला कर दिल्याशिवाय नेतां येत नसे. तसा तो नेणें म्हणजे कायदा मोडणेंच होय–आणि कायदा मोडणें म्हणजे ब्रिटिशांची राज्यसत्ता न मानणेंच होय–आणि तेंच तर जगाला दाखविण्यासाठीं हिंदुस्थान कमर कसून उभा होता. प्रांताप्रांतांत हजारों स्त्री–पुरुषांनीं रोजरोज मिठाचे कायदे मोडले, जंगलचे कायदे झुगारून दिले, मुद्रण–नियंत्रणाचे कायदे पायाखालीं तुडविले, सरकारनें जप्त केलेलें वाङ्मय जाहीर सभेंत वाचून दाखवून शेंकडों नागरिकांनीं

सरकारी कायद्याचा भंग केला. अशा नानाविध कायदेभंगासाठीं दंड, लाठ्या, तुरुंग, फटके, गोळ्या इत्यादि सर्व तऱ्हेचे हाल हिंदी जनतेनें सोसले. सुमारें पाऊण लाख लोकांना सरकारनें कैदेंत टाकलें.

किती जखमी झाले, किती प्राणांस मुकले, किती जणांचीं घरें उध्वस्त झालीं, किती जणांच्या संसारांची राखरांगोळी झाली, किती विद्यार्थ्यांचे अभ्यास बुडाले, किती तरुणांचे व्यवसाय थांबले, याची गणति कोण करणार ? पण राष्ट्राच्या जमाखर्चांत स्वातंत्र्याच्या बाजूनें ही रक्कम जमा पडलेली असणार हें खास ! आम्ही आमच्या स्वातंत्र्यासाठीं आमच्या रक्ताची किंमत दिलेली आहे. तें आम्हांला फुकाफुकी मिळालेलें नाहीं. तें ओठांवर पडलेलें जांभूळ नव्हें. केवळ ब्रिटिशांच्या औदार्याचें किंवा आंतरराष्ट्रीय परिस्थितीचें तें फळ नव्हें. जनक राजानें सीतेच्या स्वयंवरासाठीं जसा कार्मुक-भंगाचा पण लावला होता, तसाच जणुं कांहीं कायदे-भंगाचा पण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलक्ष्मीच्या स्वयंवरासाठीं परमेश्वरानें मांडला होता. तो कायदेभंगाचा पण जिंकणाऱ्या हिंदुस्थानांत ‘ राम ’ नाहीं असें कोण म्हणेल ? कायदेभंगाच्या लढ्यांतील हिंदुस्थानचा अपूर्व पराक्रम पाहून सारें जग थक्क झालें ! आणि या लढ्याचा कळस झाला धारासणा येथें.

धारासणा येथील मिठागरावर ता. २१ मे रोजीं २५०० सत्याग्रह्यांनीं हल्ला करण्याचें ठरविलें. या विराट मोहिमेचे सेनापति होते एक ६२ वर्षांचे वृद्ध मुसलमान. त्यांचें नांव इमामसाहेब. दक्षिण आफ्रिकेंत ते गांधीजींचे सहकारी होते. सत्याग्रह्यांचें

सामर्थ्य म्हणजे आत्मबल. त्यामुळें स्त्री असो, वृद्ध असो— कोणीहि त्याचा सैनिक होऊं शकतो. गांधीजींनीं आपल्याला अटक झाल्यानंतर आपली जागा घेण्यासाठीं एका वृद्ध मुसलमानाचीच नेमणूक केली होती. त्यांचें नांव आब्बास तय्यबजी. ते बडोदें संस्थानांत पूर्वीं दिवाण होते. त्यांना ता. १२ मे रोजीं अटक झाली. त्यानंतर त्यांच्या गादीवर सौ. सरोजिनी नायडू या आल्या. कार्यकारिणीच्या बैठकीसाठीं त्या अलाहाबादकडे निघाल्या होत्या; परंतु श्री. तय्यबजींच्या अटकेची बातमी कळतांच त्या धारासणाकडे वळल्या. ता. २१ मे रोजीं प्रातःकाळीं अडीच हजार सत्याग्रह्यांची शांतता—मोहीम सुरू झाली. ती पाहाण्यासाठीं हजारों लोक जमले होते. देशोदेशींचे वार्ताहर तेथें आलेले होते. भारत सेवक समाजाचे अध्यक्ष व नेमस्त वृत्तीचे कार्यकर्ते श्री. गो. कृ. देवधर, मुंबईचे एक माजी न्यायाधीश मि. हुसेन वगैरे भिन्नभिन्न वर्गांचे प्रतिनिधि तो अपूर्व रणसंग्राम पाहाण्यासाठीं तेथें उपस्थित होते.

या रण-संग्रामाचा नारळ फोडला पोलीसांच्या लाठ्यांनीं. त्यांनीं मिठागराकडे धांवणाऱ्या शेंकडों सत्याग्रह्यांवर तर लाठीहल्ला केलाच, पण हजारों प्रेक्षकांवरहि दोन तास लाठ्यांचा सतत वर्षाव केला. युरोपियन घोडेस्वार तर भरधांव धांवत व लोकांना बेगुमान पिटीत. मुलें असोत, स्त्रिया असोत, सर्वांना ते सरसहा झोडपून काढीत. कांहीं आगाऊ राजनिष्ठेचे व जादा उत्साहाचे पोलीस स्वयंसेवकाच्या अंगावरील वस्त्र फाडून, त्याला उघडेंनागडें

करून, मग लाठ्यांचे तडाखे देत—जखमी झालेले असले, बेशुद्ध पडलेले असले तरीहि देत. त्यांचे हात व तंगड्या धरून त्यांना मेलेल्या कुत्र्याप्रमाणें ते फरफटत नेत आणि मग कांटेरी झुडुपांत अगर खाऱ्या पाण्यांत फेंकून देत. त्यांच्या अंगांत कांटे, सुया, टांचण्या टोंचण्यास पोलीस कमी करीत नसत. तसेंच त्यांच्या मर्मस्थानांवर असह्य मार देण्यास ते कचरत नसत.

सरकारचे हे अमानुष अत्याचार हिंदी लोकांना पाहवत नसत, आणि ते पाहून तेथें जमलेल्या सुसंस्कृत युरोपियनांनाहि लज्जा वाटे. सशस्त्र युद्धापेक्षांहि अधिक भीषण असे ते प्रकार दिसतांच कोणाच्याहि अंगावर कांटा उभा राही. जगांतील तेराशें वृत्तपत्रांना वार्ता पुरविणाऱ्या एका संस्थेचे प्रतिनिधी मि. मिलर म्हणतात, "मी गेल्या अठरा वर्षांत बावीस देश हिंडून आलों आहे आणि तेथील गडबडी, दंगली, मारामाऱ्या, बंडें वगैरे सारे उत्पात डोळ्यांनीं पाहिले आहेत; पण धारासणा येथें जे भीषण प्रकार पाहिले तसे मला पूर्वीं कोठेंच दिसले नव्हते. कांहीं कांहीं वेळां तर पोलीस सत्याग्रह्यांचे इतके अनन्वित हाल करीत कीं, ते मला पाहावेनासे होत आणि म्हणून मला माझी दृष्टि दुसरीकडे वळवावी लागे."

अशाच तऱ्हेचे उद्गार वडाळा येथील सरकारी अत्याचार पाहून लंडनच्या एका बातमीदारानें काढले. त्यांचें नांव मि. स्लोकंब. ते म्हणतात, " सरकारचे हस्तक असे हीन प्रकार करीत असतांना पाहून मला माझा मोठा अपमान झाल्यासारखें वाटलें. त्याच इंग्रज राजकर्त्यांचा एक जातभाई म्हणून या प्रेमळ, निष्ठावंत व

भावनाशील सत्याग्रह्यांमध्यें मला उभेंच राहवेना ! काराबद्ध महात्मा ह्याच खरोखर भारताचा आत्मा आहे. त्याच्याशीं सरकारनें तडजोड करणें शक्य आहे आणि इष्टहि आहे. " स्वत: मि. स्लोकंब यांनीं पुढें अशा तडजोडीसाठीं पुष्कळ प्रयत्न केलें.

ऐन उन्हाळ्याचा तो काळ. उष्णतामान ११६ अंशांवर चढलेलें. समुद्रकांठची वाळू अग्नीप्रमाणें रसरसत होती. सूर्याचा ताप व त्या वाळूचा ताप या दुहेरी दाहामुळें त्या स्वातंत्र्य-सैनिकांच्या अंगांची लाहीलाही होत होती. पण त्या दोघांपेक्षांहि अधिक ताप देण्याचें कंकण सरकारी अधिकाऱ्यांनीं बांधलें होतें. त्यांनीं मिठागराभोंवतीं कांटेरी तारांचें कुंपण लावलें होतें. पोलीस आपल्या लाठ्या परजीत होते. गोरे घोडेस्वार आपल्या घोड्यांना टांचा मारीत होते. लष्करानें सारे रस्ते रोखून धरले होते. अशा कडक बंदोबस्तांत, त्या दाहक वातावरणांत, क्रूर प्रतिकार डोळ्यांसमोर दिसत असतांना, आपण प्रतिकारासाठीं बोटहि उचलावयाचें नाहीं; पण आपलें पाऊल या स्वातंत्र्ययुद्धांत रेसभरहि मागें घ्यावयाचें नाहीं, अशा पोलादी निर्धारानें शेंकडों सैनिक, हातांत तिरंगी निशाणें घेऊन, शिस्तीनें व शान्ततेनें, त्या मिठागरा-वर हल्ला चढविण्यास कूच करूं लागले. जिवावर उदार होऊन लढणाऱ्या त्या शान्तिसेनेच्या अग्रभागीं कोण होते ?

बालपणापासून ज्यांनीं काव्यदेवतेची उपासना केली, वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षीं इंग्रजी काव्य रचलें, पुढें आपल्या काव्य-सौंदर्यानें साऱ्या जगाला मोहित करून त्याच्याकडून 'बंगालचा

बुलबुल ' म्हणवून घेतलें आणि काव्य-कलेप्रमाणेंच वक्तृत्व-कले-नेंहि सर्वांना दिपवून टाकलें; त्या सौ. सरोजिनीदेवी नायडू ! काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मानहि त्यांना १९२५ सालींच मिळाला होता. त्या वेळीं त्या आपल्या भाषणांत म्हणाल्या होत्या, " पारतंत्र्य म्हणजे आपल्या राष्ट्रमातेची बेअब्रू आहे. तें दूर करण्यासाठीं आपण कितीहि मोठा स्वार्थत्याग केला, कितीहि भीषण यातना सोसल्या, कितीहि अचाट साहस केलें तरी तें अपुरेंच होईल ! "

जशी वाणी; तशीच करणी ! सरोजिनी तेव्हां जसें बोलल्या, तसेंच प्रसंग येतांच त्या वागल्या. कोमल काव्य-कमलामध्यें गुंगत राहणारें त्यांचें प्रतिभाशाली मन आतां रणसंग्रामाला योग्य असें प्रतिकारशाली, धैर्यशाली व निग्रही बनलें. झांशीच्या लक्ष्मीबाई-प्रमाणें स्वातंत्र्याची वीरश्री त्यांच्या अंगीं विजेप्रमाणें तळपूं लागली. जुलमी सरकारला आव्हान देत, मृत्यूला तोंड देत, शान्तिसेनेला सांगातीं घेऊन, त्या पुढें आणि पुढेंच चालल्या. त्यांना अडविण्यास सशस्त्र पोलीस आले. त्यांनीं त्यांना गराडा घातला. सरोजिनीबाई व त्यांचे सैनिक तेथेंच बसून राहिले. ते पोलीसांची पर्वा करीत नव्हते, उष्णतेची तमा धरीत नव्हते, आपल्या निश्चया-पासून ढळत नव्हते, कीं तहान-भुकेकडे लक्ष देत नव्हते. त्यांचा एकच उग्र निश्चय कीं, ' मी स्वातंत्र्य मिळविणार ! त्यासाठीं मिठागरावर चालून जाणार आणि त्या पायीं होतील ते हाल सोसणार ! ! '

आणि सर्व तऱ्हेचे हाल त्यांना सोसावयास लावण्यास सरकार सिद्धच होतें. त्या प्रखर उन्हामुळें कीं काय, इंग्रज अधिकाऱ्यांचें सारें स्त्री-दाक्षिण्य फार आटून गेलें ! नाहीं म्हणावयाला लाजे-काजेनें त्यांनीं त्या प्रतिभाशाली कवयित्रीला, राष्ट्रसभेच्या अध्यक्षाला बसावयाला खुर्ची मात्र दिली. त्या कडाक्याच्या उन्हांत घसे कोरडे पडले असतांना, त्या सत्याग्रह्यांना पोलीसांनीं नुसतें पाणीसुद्धां दिलें नाहीं. फार काय, शेजारच्या गांवकऱ्यांनीं या स्वातंत्र्य-भक्तांना देण्यासाठीं पाणी आणलें असतां त्यांचीं भांडीं मोडून फेंकून दिलीं ! तब्बल चोवीस तास असा सत्याग्रह त्या स्वातंत्र्य-कोकिळेनें व तिच्या अनुयायांनीं केला.

माघार त्यांना माहीतच नव्हती,

माघार सरकारलाच घ्यावी लागली.

सरकारनें त्यांना अटक केली आणि दूर नेऊन सोडून दिलें. धारासण्यावर सत्याग्रह्यांचे हल्ल्यावर हल्ले रोजरोज चालूच राहिले. स्वातंत्र्य-भक्तांचें शौर्य अभंग ठरलें, अजिंक्य ठरलें !





विजयस्तंभ

"स्वातंत्र्य मिळेपर्यंत मी आश्रमांत परत येणार नाहीं !" अशी भीष्मप्रतिज्ञा करून गांधीजींनीं आपला पंधरा वर्षें सांभाळलेला आश्रम सोडला आणि ता. ६ मार्च १९३० रोजीं दांडीयात्रेस प्रारंभ केला. ता. ६ एप्रिल रोजीं त्यांनीं दांडी येथें मिठाचा कायदेभंग केला. ही घटना म्हणजे राष्ट्र्व्यापी कायदेभंगाच्या सलामीची तोफच. त्यानंतर सतत एक वर्षभर नाना तऱ्हेचे कायदेभंग लाखों लोकांनीं केले. त्यामुळें जनतेमधील कायद्याचा सारा दरारा नाहींसा झाला, सरकारवरील विश्वास उडाला आणि एकंदर सगळा राज्यकारभारच विस्कळीत झाला. विशेषत: विदेशीं मालावरील बहिष्कार इंग्लंडला चरचरीत-पणें जाणवला. मँचेस्टरच्या एका पत्रानें अशी स्वच्छ कबुली दिली

कीं, “ हिंदुस्थानांतून ताजी बातमी येण्याचा अवकाश कीं, लँकेशायरचा हिंदी व्यापार आटपतो कीं काय अशी भीति वाटते. सुताच्या गिरण्या व विणकामाचीं खातीं आतांच बेमुदत बंद होत आहेत आणि हजारों कामगार बेकारांच्या संख्येंत भर घालीत आहेत. ”

खुद्द हिंदुस्थानांत सरकारच्या तिजोरीवर या चळवळीचा तीव्र परिणाम झाला. हजारों राजबंद्यांना पोसण्याचा खर्च तर सरकारच्या डोक्यावर बसलाच; पण त्याशिवाय सरकारच्या निरनिराळ्या खात्यांत तूट येत चालली. मुंबई सरकारनें आपल्या अंदाजपत्रकांत एक लाख रुपयांची शिल्लक दाखविली होती; पण या चळवळीमुळें सरकारला दीड कोटि रुपयांची तूट सोसावी लागली. त्यांचें दारुबंदीचें उत्पन्न साठ लाखांनीं घटलें, जंगलखात्याचें उत्पन्न सोळा लाख कमी आलें आणि शेतसाऱ्यांपैकीं पांच लाख रुपये वसूल होण्याचे राहिले. इतर प्रांतांतहि सरकारी तिजोरीला अशींच भोकें पडलीं. सर्व जगांत सरकारची नापत व नाचक्की किती झाली याला सीमाच नाहीं.

ही सर्व अनर्थपरंपरा ध्यानीं घेऊन आणि पुढील वाढतें संकट ओळखून इंग्लंडांतील दूरदर्शी मुत्सद्दी प्रक्षुब्ध हिंदुस्थानला संतुष्ट करण्याचा प्रयत्न करूं लागले. एका हातानें हिंदी राष्ट्राच्या पाठीवर दडपशाहीचे कोरडे ओढीत असतांनाच व्हाइसरॉय हे दुसऱ्या हातानें स्वराज्याच्या हक्कांची मेवामिठाई पुढें करीत होते. पूर्वीं सायमन-कमिशनमध्यें हिंदी लोकांचा समावेश केला नाहीं,

त्यामुळें त्या कमिशनवर बहिष्कार पडला. ती चूक सुधारण्यासाठीं इंग्रज व हिंदी पुढाऱ्यांनीं एकत्र जमावें, एका 'वाटोळ्या टेबला'-भोंवतीं समानतेनें बसावें आणि स्वराज्यासंबंधीं विचारमंथन करावें, अशी योजना व्हाइसरॉय बरेच दिवस हवेमध्यें सोडीत होते.

१९२९ सालच्या दिवाळीच्या दिवशींच व्हाइसरॉयांनीं अशी मधुर घोषणा हिंदी जनतेला ऐकविली कीं, "जबाबदार राज्य-पद्धतीचा क्रमाक्रमानें लाभ हिंदुस्थानला करून देणें आणि ब्रिटिश साम्राज्यांतील इतर वसाहतींबरोबर समान भागीदार म्हणून ठेवणें आणि अखेर वसाहतीचें स्वराज्य हिंदुस्थानला मिळवून देणें हाच ब्रिटिश सरकारचा उद्देश आहे आणि १९१७ सालच्या बादशाही घोषणेंतहि त्याचें बीज आहे." या घोषणेचा विचार सर्वपक्षीय हिंदी पुढाऱ्यांनीं केला आणि त्या सर्व पुढाऱ्यांनीं व्हाइसरॉयाची भेटहि घेतली. व्हाइसरॉयनीं 'गोलमेज परिषद" भरविण्याचें मान्य केलें; पण त्या परिषदेनें वसाहतीच्या स्वराज्याची योजना आंखावी आणि त्या परिषदेचे निर्णय ब्रिटिश सरकारनें मान्य करावेत ही कॉंग्रेसची मागणी मात्र व्हाइसरॉयानें नाकारली.

"परिषदेंत जें कांहीं बहुमतानें ठरेल तें पार्लमेंटपुढें ठेवलें जाईल." एवढेंच मोघम आश्वासन व्हाइसरॉयनें दिलें. आपल्या तोंडाला पानें पुसण्याचा सरकारचा हा कावा ओळखून लाहोर कॉंग्रेसनें स्वातंत्र्याचें निशाण फडकविलें. त्यानंतर गांधीजींनीं आपल्या अकरा मागण्या व्हाइसरॉयकडे पाठविल्या; पण त्यांनाहि व्हाइसरॉयानें वाटण्याच्या अक्षताच दिल्या.


"हिंदुस्थान देश हा एक याचक आहे, भिक्षुक आहे आणि आपण स्वामी आहोंत, दाते आहोंत." अशाच बुद्धीनें ब्रिटिश सरकार पाहात होतें. बळीराजाच्या दाराशीं गेलेला वामन हाहि याचकच होता, बटु होता, निःशस्त्र होता; पण त्यानें आपलें अंतःसामर्थ्य प्रगट करतां क्षणींच त्याला विराट् स्वरूप प्राप्त झालें आणि त्याच्या एका पावलामध्यें अखिल पृथ्वीचा समावेश झाला आणि अखेर बळी पाताळांत गाडला गेला. तीच स्थिति हिंदुस्थानची ! दरिद्री, परतंत्र व निःशस्त्र अशा हिंदभूमीच्या नुसत्या आवाजाकडे कोण लक्ष देतो ? त्या आवाजाच्या पाठीमागें कायदेभंगाच्या रूपानें जागृत जनतेची शक्ति उभी राहिली. तेव्हां ब्रिटिश सरकार जागें झालें. शक्य तितकीं सर्व दडपशाहीचीं हत्यारें वापरून त्यांनीं पाहिलीं. पण तीं बोथट ठरल्याचें सरकारला आढळून आलें. तरी 'हत्ती आपल्या वाटेनें डौलांत चालत जातो, तसा आमचा गोलमेज परिषदेचा बेत आम्ही पार पाडणार,' अशा दिखाऊ रुबाबांत ब्रिटिश सरकार वागत होतें.

'काँग्रेस न आली तर न येवो, आम्ही आमच्या योजनेप्रमाणें आगे कूच करणार' अशा पोकळ थाटांत ता. १२ नोव्हेंबर १९३० रोजीं लंडनमध्यें ब्रिटिश सरकारनें हिंदी व इंग्रज मुत्सद्द्यांची परिषद भरविली; पण रामाशिवाय रामायण तशी काँग्रेसशिवाय ही परिषद ठरली. त्या वेळीं इंग्लंडमध्यें मजूरपक्ष राज्यारूढ होता. त्याला हिंदी स्वराज्याविषयीं सहानुभूति वाटत होती. त्याला काँग्रेसच्या सहकार्याची आवश्यकता पटलेली होती. काँग्रेसशिवाय परिषद चालविणें हें जल-मंथनच होय हें त्यानें

ओळखलें आणि महात्मा गांधीप्रभृति सर्व पुढाऱ्यांना ता. २५ जानेवारी १९३१ रोजीं अकस्मात् बिनशर्त मुक्त केलें.

ता. २६ जानेवारी रोजीं, हिंदुस्थाननें आपला 'स्वातंत्र्य-दिन' दुप्पट उत्साहानें साजरा केला. व्हाइसरॉय लॉर्ड अर्विन यांनीं ता. १६ फेब्रुवारी रोजीं गांधीजींना तारेनें मुलाखतीस बोलाविलें. मुलाखत पंधरा दिवस चालली होती. चोवीस तास चर्चा झाली. शेवटीं ता. ५ मार्च रोजीं पहांटे १॥ वाजतां व्हाइसरॉयाशीं समेटाचा करार करून गांधीजी त्या राजवाड्यांतून बाहेर पडले. भारताच्या भाग्य-लक्ष्मीनें असें सन्मानाचें दृश्य त्यापूर्वीं शंभर वर्षांत पाहिलें नव्हतें !

या करारानें हिंदुस्थाननें काय मिळविलें ? तर गोलमेज परिषदेंत संपूर्ण सवतंत्र्याची मागणी करण्याचा हक्क कॉंग्रेसला लाभला, विदेशी कापडावरील बहिष्कार न्याय्य ठरला, समुद्रकांठच्या लोकांना मीठ विनाकर गोळा करण्याचा अधिकार प्राप्त झाला. मुख्य म्हणजे हिंदुस्थान आपला गुलाम आहे ही ब्रिटिश राज्यकर्त्यांची गुर्मीची भाषा मागें पडली आणि तो इंग्लंडचा भागीदार आहे अशी समानतेची भावना निर्माण झाली. अशा रीतीनें आधीं समतेचें अधिष्ठान व स्वातंत्र्याच्या मागणीचा हक्क मिळवून मगच गांधीजी गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनासाठीं लंडनला गेले. आधीं विजयस्तंभ रोवून मग रणांगणाकडे कूच करण्याची ही युद्धनीति जितकी अभिनव तितकीच गौरवास्पद आहे, नाहीं ?



क्रांतीचा उग्रमार्ग

ता. १० मे १८१८—पुणें येथील शनिवार-वाड्यावर ब्रिटिशांचें निशाण लागलें.

ता. १० मे १८५७—मीरत येथें स्वातंत्र्य-युद्धाची ठिणगी उडाली.

ता. १० मे १९०६—लंडन येथें ' अभिनव भारत ' या क्रांतिकारक संस्थेची स्थापना झाली.

ता. १० मे १९५२—पुणें येथें ' अभिनव भारत ' या संस्थेचा सांगता—समारंभ साजरा झाला.

सशस्त्र क्रांति-युद्धाच्या इतिहासांत वरील चार टप्पे महत्त्वाचे आहेत. ज्या क्षणीं शनिवारवाड्यावरून स्वराज्याचें निशाण खालीं उतरलें, त्याच क्षणीं कैक तरुणांनीं तें निशाण पुन: वर चढविण्याची प्रतिज्ञा केली. ती प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा एक प्रयत्न म्हणजे सत्तावन सालचें स्वातंत्र्य-युद्ध. त्यांत सैनिकांनीं पुढाकार घेतला असला आणि बंदुकीची चरबी हें तात्कालिक निमित्त दिसत असलें, तरी निरनिराळे संस्थानिक आणि नागरिकहि त्यांत सामील झाले होते आणि आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देणें हेंच सर्वांचें ध्येय होतें. बाहेरच्या देशांतून शस्त्रास्त्रांची कुमक मिळविण्यासाठीं इंग्लंडांत 'अभिनव भारत' संस्था जन्मास आली आणि तशाच अनेक संस्था अमेरिका, जर्मनी, जपान इत्यादि परदेशांत कार्य करीत राहिल्या.

महर्षि दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, ना. गोखले प्रभृति नेमस्तांचे सनदशीर उपाय चालूच होते. लो. टिळक, म. गांधी वगैरे पुढाऱ्यांचा स्वावलंबी मार्ग जनतेच्या पाठिंब्यानें प्रभावी होत होता आणि इतर नाना पक्षांच्या विविध साधनांनीं स्वातंत्र्य जवळ आणलें जात होतें. त्या सर्व प्रयत्नांचें संकलित फल पदरांत पडण्याची वेळ दुसऱ्या महायुद्धानें आणून दिली. 'आतां हिंदुस्थानावर दंडुकेशाहीनें राज्य करणें केवळ अशक्य आहे' अशी कबुली ब्रिटिशांच्या 'उमराव सभेनें' दिली; आणि ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारताला स्वतंत्रता लाभली. त्याचें

एक दृश्य-चिन्ह म्हणजे पुण्याच्या शनिवारवाड्यावरील ब्रिटिशांचें निशाण खालीं आलें व स्वातंत्र्याचें तिरंगी निशाण वर चढलें.

किती आनंदाचा व अभिमानाचा तो क्षण !

किती साफल्याचा व कृतार्थतेचा तो काळ !

किती पावित्र्याचा व मांगल्याचा तो मुहूर्त !

१८१८ सालीं दु:खाश्रु ढाळणाऱ्या शनिवारवाड्याच्या डोळ्यांतून तेव्हां आनंदाश्रु निघाले असतील, भारतमातेच्या अंत:करणांत हर्षाच्या लाटा उचंबळल्या असतील, नाना मार्गांनीं पण एकाच मुक्कामाकडे जाणाऱ्या शेंकडो-हजारों देशभक्तांचे आत्मे स्वत:ला धन्य धन्य मानीत असतील !

◆

एकाद्या देवतेची भक्ति कांहीं भक्त रानफुलें वाहून करतात, कांहीं भाविक श्रीमंत सोन्याच्या फुलांनीं व पंचपक्वान्नांच्या नैवेद्यांनीं करतात, तर एकादा अधीर पूजक आपली स्वत:ची जीभ कापून तीच त्या देवतेच्या चरणीं वाहतो ! अशा पूजकाचें अनुकरण किती लोक करूं शकतील ? आणि त्या पूजकाला तरी भक्तीचें सुख कितीसें मिळणार ? पण तरीहि त्याच्या नि:सीम भक्तीचें, तीव्र भावनेचें व आत्यंतिक त्यागाचें कौतुक कोण करणार नाहीं ? त्याच कोटींत बसणारे स्वातंत्र्य-देवतेचे भक्त म्हणजे सशस्त्र क्रांतिकारक.

‘ इंग्रज शस्त्रानें येथलें राज्य चालवितो, तर शस्त्रानेंच त्याच्या घातून आपलें राज्य परत घेतलें पाहिजे ’ हें त्यांचें ध्येय.

"रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?" हा त्यांचा रण-घोष.

"देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मी मारतां मारतां मरेतों झुंजेन." ही त्याची प्रतिज्ञा. त्याच्या त्यागानें, भक्तीनें, धैर्यानें कोण दिपून जाणार नाहीं?

या शस्त्राचारी पंथाच्या अगदीं उलट टोंकावर उभे राहिलेले म. गांधीहि त्यांचे हे गुण घेत असत. अहिंसा हेंच आपल्या जीवितांतील आराध्य-दैवत, असें मानणारे गांधीजी, १९३० सालच्या आपल्या अहिंसक लढ्याच्या, ऐन उत्कर्षाच्या काळांत लिहितात, "आपल्यापैकीं सर्वांत श्रेष्ठ अशा नेत्याइतकेच हे सशस्त्र क्रांतिकारक देशभक्त आहेत. त्यांनीं महान् त्याग केलेला आहे आणि धाडसाच्या बाबतींत तर, त्यांच्यावर ताण करण्यास आपल्यापैकीं कोणीच समर्थ नाहीं." क्रांतिकारकांचा निस्सीम त्याग व अतुल धैर्य हे गुण सर्वमान्यच आहेत.

रानांत जाऊन एकेका वानराची किंवा पोपटाची किंवा वाघालांडग्याची शिकार करावी; त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील एक-एका गोऱ्या अधिकाऱ्याचा बंदुकीच्या किंवा पिस्तुलाच्या गोळीनें खून केला, तर भीतीनें घाबरून जाऊन इंग्रज लोक हिंदुस्थान सोडून निघून जातील, अशी कल्पना करणें चूक आहे. इंग्रज शूर आहे; धाडसी आहे, चतुर आहे. त्यानें उभें केलेलें राज्य-यंत्र पूर्वीच्या मोंगली राजवटीपेक्षां फार निराळें होतें. ह्या यंत्रांतील एखाद-दुसरा खिळा वा स्क्रू काढल्यानें हें यंत्र बंद

पडण्यासारखें नव्हतें. एका व्यक्तीच्या गुणावगुणावर राजेशाहीचें नशीब अवलंबून असे; पण ब्रिटिश राज्यपद्धति व्यापक व शास्त्रशुद्ध होती. त्यांतील एकादा पोलीस-सुपरिंटेंडेंट किंवा एकादा मॅजिस्ट्रेट ठार होणें म्हणजे गोमेचा एक पाय तुटणें होय. लगेच दुसरा अधिकारी तेथें येई; दुसरा गेला तर तिसरा येई. शिवाय कोणत्याहि सरकाजवळ हिंसेचीं साधनें प्रचंड असतात. कोणत्याहि व्यक्तीपेक्षां वा पक्षापेक्षां किंवा संस्थेपेक्षां सरकारचें शस्त्र-बळ भारीच ठरतें.

आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सदैव पूर्ण सज्ज असणाऱ्या बलाढ्य ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं सामना तुरळक व्यक्ति फुटकळ पिस्तुलांनीं देऊं शकणार नाहींत, ही जाणीव खुद्द क्रांतिकारकांच्या नेत्यांनाहि होतीच. पण परक्या सरकारचा जाच व जुलूम असह्य झाला, राष्ट्रांत दैन्य व दडपशाही पराकोटीला पोंचली आणि ती बंद करण्याला कांहींच उपाय हातीं नाहीं, किंबहुना तिला वाचा फोडण्याचेंहि कांहीं साधन लोकांजवळ नाहीं—अशा अंधारांत, कोंडमाऱ्यांत, चिडीनें, संतापानें आपल्या जीवाची ज्योत पाजळून परक्या सरकारला दिपवून सोडणें व स्वकीय जनतेला आशेचा व धैर्याचा प्रकाश दाखविणें, एवढा उपयोग क्रांतिकारकांच्या प्रयत्नाचा झाला. साऱ्या जगाला ऐकूं जावी, अशी ती आर्त आरोळी होती. फाशीची फळी हेंच व्यासपीठ करून त्यावरून शूर—वीरांनीं केलेली ती स्वातंत्र्याची मागणी होती.

कांहीं वेळां पुण्यांतील प्लेगनें किंवा सोलापुरांतील लष्करी कायद्यानें अथवा पंजाबांतील हत्या-कांडानें हैराण झालेल्या जनतेचें दुःख जगाच्या वेशीवर टांगण्यासाठीं रँड किंवा हॉटसन् अगर ओडवायर यांचा खून करण्याचे प्रयत्न झाले; तर कांहीं वेळां लाला लजपतरायांसारख्या वृद्ध नेत्याच्या डोक्यावर लाठी मारल्याचा सूड म्हणूनहि सॉंडर्सचा प्राण घेतला गेला. बंगालच्या फाळणीनें बेभान झालेल्या कांहीं तरुणांनीं गुप्त कट केले, तर कोणी 'जगाचे कान खोलण्यासाठीं' विधिमंडळांत बॉंब टाकले. पण मुख्यत्वेंकरून क्रांतिकारकांनीं आपल्या बहुमोल प्राणांचा होम केला, तो मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठींच. ज्या स्वातंत्र्यासाठीं विद्यार्थ्यांनीं शाळा सोडल्या, वकिलांनीं कोर्टें वर्ज्य केलीं, सरकारी अधिकाऱ्यांनीं नोकऱ्या टाकल्या, व्यापाऱ्यांनीं विदेशी मालावर बहिष्कार घातला, कामगारांनीं संप केले, हरताळ पाडले, शेतकऱ्यांनीं सारा देण्याचें नाकारलें, सैनिकांनींहि वरिष्ठांचे हुकूम झुगारून दिले; त्याच स्वातंत्र्यासाठीं एकेका व्यक्तीनें किंवा थोडथोड्या व्यक्तींच्या गुप्त मंडळांनीं बॉंब-पिस्तुलांचें राजकारण केलें.





आधाडीवरील महाराष्ट्र

“ अहो, माझ्या सर्व हिंदुस्थानवासी बांधवहो ! तुमच्या कल्याणासाठीं मी माझे प्राण पणास लावीत आहें.”

अशी निर्धाराची हांक अवघ्या महाराष्ट्रांत १८७९ सालीं दुमदुमली. ही हांक कोणी दिली ?

‘ पेशव्यांचा नवा मुख्य प्रधान ’ यानें.

वासुदेव बळवंत फडके स्वतःला ही पदवी लावून घेत असत. ते मूळचे पनवेलजवळील शिरढोणचे. पुण्यास थोडेसें इंग्रजी शिक्षण घेतल्यावर, मुंबई येथें रेल्वेंत व ग्रँट मेडिकल कॉलेजांत त्यांनीं नोकरी केली. नंतर पुणें येथें त्यांना ‘कॉमिसारियट ऑफिस’मध्यें १८६५ सालीं कारकुनाची नोकरी

लागली. त्या वेळीं पुणें शहर राजकीय दृष्टीनें जागें होऊं लागलें होतें. 'थंड गोळ्याला' ऊब आणणारे न्या. रानडे तेथें १८७१ त आले. त्याच्या आदल्या वर्षींच 'सार्वजनिक सभा' जन्मास आली. तिचे एक जनक 'सार्वजनिक काका' म्हणजे गणेश वासुदेव जोशी. त्यांनीं १८७२ सालीं स्वत: सूत कातून व तें घरीं विणून खादी वापरण्याची स्वदेशीची शपथ घेतली. न्या. रानडे यांनीं स्वदेशीवर दोन व्याख्यानें दिलीं. त्यांतील मर्म ओळखून वासुदेव बळवंतांनींहि स्वदेशी वस्तु वापरण्याची प्रतिज्ञा केली. छत्री ते कधींच वापरीत नसत, कारण परदेशी. कचेरींतील टाक इंग्रजी बनावटीचा आहे असें दिसतांच त्यांनीं त्याचे तुकडे करून ते बाहेर फेकून दिले !

परक्या सत्तेचा नाश कसा करावा, याचा विचार ते अष्टौप्रहर करीत. त्याचें एक साधन म्हणून ते बंदूक उडविण्यास शिकले, तरवार फिरविण्यास व भाला फेकण्यास शिकले, घोडदौडहि करूं लागले. शिवाजीमहाराजांचा आदर्श त्यांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेवला. शिवरायानें मावळे कसे मिळविले, स्वातंत्र्य कसें स्थापन केलें, याचें चिंतन ते करूं लागले. त्यांनीं पुण्यांत शस्त्र-विद्या शिकविण्याचे वर्गहि काढले. लकडीपुलापलीकडे, निर्जन प्रदेशांत, रात्रींच्या अंधाऱ्या वेळेस, ते तरुणांना तलवारी-दांडपट्टा यांचें शिक्षण देत. तें घेण्यासाठीं लो. टिळकहि कांहीं दिवस जात. पण पुढें त्यांनीं लोकशाही-लढ्याकडेच लक्ष दिलें. मात्र वासुदेव बळवंतांचा सशस्त्र-क्रांतीचा प्रयत्न अखंड

चालू होता. ते आपल्याजवळ नेहमीं दोन-तीन बंदुका, चार-पांच तरवारी, शिवाय भाले-दांडपट्टे बाळगीत असत.

सरकारचा जुलूम जसा वाढत होता, तशीच जनतेची दुर्दशा वाढत होती. दुष्काळाचा वणवा जास्त जास्त भडकत होता. शेतसारा भरणें गरीब शेतकऱ्याला अशक्य होई; तेव्हां त्याच्यावर दडपशाही होई. ती असह्य झाली तेव्हां शेतकऱ्यांनीं दंगे केले. पुणें, नगर, नाशिक, खानदेश, सोलापूर वगैरे जिल्ह्यांत दंगे पेटले.

आधींच हिंदी शेतकरी गरीब—त्याची हातातोंडाशीं गांठ कशीबशी पडावयाची! त्यांत १८७६ च्या भयंकर दुष्काळानें खेड्यांतील लोकांना सळो का पळो करून सोडलें. सोलापूर आणि विजापूर या जिल्ह्यांत सात हजार खेडुतांनीं अन्नान्न करीत प्राण सोडले. उपासमारीमुळें रोगराई वाढली, त्यामुळेंहि तेथें चार हजार लोक मेले. सरकार पडलें परकी! त्यानें नांवाला दुष्काळीं कामें काढलीं; पण दर माणशीं दररोज फक्त अर्धा शेर धान्य दिलें जाई. एखाद्या जंगलास आग लागली असतांना शेकडों-हजारों पांखरें आर्त स्वरानें चीत्कार करीत होरपळून मरून जावींत; त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील असंख्य लोक गांवोगांव दीनपणें मृत्युमुखीं पडत. त्यांची दाद कोण घेणार? त्यांना भेटणार कोण? त्यांच्या पाठीवरून हात फिरविणार कोण? आणि त्यांना आधार देणार कोण?

वासुदेव बळवंतांनीं आपलें लक्ष त्यांच्याकडे वळविलें, नोकरींतून रजा घेतली, खांद्याला झोळी अडकविली आणि दाढीजटा वाढवून,

ऐन तारुण्यांत, एखाद्या वैराग्याप्रमाणें ते आपल्या देशबांधवांच्या समाचाराला निघाले. इंदूर—नागपुरापासून मिरज-सांगलीपर्यंत, पायीं प्रवास करून, त्यांनीं आपल्या देशबांधवांची मरणोन्मुख स्थिति आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिली.

दरिद्रि नारायणाचें साक्षात् दर्शन झाल्यामुळें वासुदेव बळवंतांचा आत्मा कळवळून गेला. ‘ देवा ! माझे प्राण घेऊन तरी या माझ्या बांधवांचें कल्याण कर. ’ अशी प्रार्थना ते करूं लागले. देवांच्या कल्याणासाठीं दधीचि ऋषीनें आपलीं हाडें दिल्याची कथा त्यांना आठवली. त्यांनीं कांहीं श्रीमंत लोकांपाशीं द्रव्याची मागणी केली; पण तिला वाटाण्याच्या अक्षता मिळाल्या. तेव्हां काय करावें असा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिला. रात्रींबेरात्रीं ते झोपेंतून उठत आणि या सर्व आपत्तींचें मूळ असलेलें ब्रिटिश सरकार कसें नष्ट करतां येईल, याचा विचार प्रहरन् प्रहर करीत. त्या विचारानें ते अगदीं वेडे होऊन गेले. त्यांनीं अखेर देशकार्यासाठीं दरवडे घालण्याचें ठरविलें. त्यांनीं शूर व इमानी असे रामोशी लोक गोळा केले. ता. २३ फेब्रुवारी १८७९ रोजीं रात्रीं पुण्याजवळच्या धामारी गांवाजवळ त्यांच्या सेनेचा पहिला छापा पडला. सावकार-जमीनदारांकडून बरीच लूट त्यांनीं मिळवून आणली.

‘ आम्हीं गरिबांच्या कल्याणासाठीं हिंडत आहों. आम्हांला दरोडेखोर समजूं नका. ’ असें मुद्दाम ओरडून सांगून हे रामोशी त्यांना धीर देत. गांवांमागून गांवें त्यांनीं लुटलीं. एका

गांवीं भर दुपारीं शस्त्रास्त्रें घेऊन हे देशभक्त दरोडेखोर शिरले. तेथें कांहीं रामोशी लोक एका बाईचे दागदागिने बळजबरीनें काढून घेत होते. ती बाई रडत-ओरडत होती. त्या वेळीं तेथें वासुदेव बळवंत आले. स्त्रीचे हाल त्यांना पहावेनात. त्यांनीं आपल्या अनुयायांना तेथून निघून जाण्यास सांगितलें. त्यांच्या दरोड्यांत जसा स्वार्थ नव्हता, तसा निष्ठुरपणाहि नव्हता.

वासुदेव बळवंतांच्या ह्या मोहिमेमुळें ब्रिटिश सरकार कावून गेलें. त्यांना पकडण्यासाठीं चार हजार रुपयांचें बक्षिस सरकारनें लावलें. उलट वासुदेव बळवंतांनीं ' पेशव्यांचा नवा मुख्य प्रधान ' या आपल्या पदवीनें जाहीरनामे लावले आणि कलेक्टर व गव्हर्नर यांना पकडण्यासाठीं पांच हजार रुपयांचीं बक्षिसें लावलीं. त्यांच्या या लुटालुटीमुळें ब्रिटिश सरकार बेचैन झालें. लंडनमधील कॉमन्स सभेंत या बंडाविषयीं प्रश्न विचारले गेले. पांचशें रोहिल्यांचें पथक उभारण्याचीहि तयारी वासुदेव बळवंतांनीं केली. सरकारचे अठराशें काळेगोरे शिपाई त्यांच्याशीं सामना देण्यासाठीं सिद्ध होते; पण त्यांना यश आलें नाहीं. तें यश परक्या सरकारला मिळालें आमच्या फितुरीमुळें! वासुदेव बळवंत गाणगापुराकडे गेल्याची कुणकुण कर्णोपकर्णीं होऊन मेजर डॅनियल या सरकारी अधिकाऱ्यास कळली. त्यानें लगेच बेचाळीस तास दौड मारून, भीमा नदी ओलांडून, एका देवळांत शिरून तेथें निजलेल्या वासुदेव बळवंतांना पकडलें. पकडल्यावर काय व्हावयाचें, तें ठरलेलेंच होतें. त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. ता. ९ जानेवारी १८८० रोजीं त्यांना त्यांच्या प्रिय

मातृभूमीच्या बाहेर नेऊन एडन येथें डांबण्यांत आलें आणि नऊ महिन्यांनीं—

ऐन मध्यरात्रीची वेळ! चोहोंकडे सामसूम. पहारेकऱ्यांचें घोरणें तेवढें ऐकूं येत आहे. तुरुंगाच्या एका कोठडीचीं दारें हालूं लागलीं. तीं प्रचंड दारें बिजागऱ्यांतून मोकळीं झालीं. तीं दारें आपल्या खांद्यावर घेऊन एक भव्य पुरुष हलके हलके त्या कोठडीपासून दूर जाऊं लागला. हा भव्य पुरुष वासुदेव बळवंताहून दुसरा कोण असणार? पण त्याच्या हातापायांतील बेड्या? त्या त्यांनीं केव्हांच मोडून-तोडून फेकून दिल्या होत्या. शक्तीच तशी होती त्यांची दांडगी! खांद्यावरून वाहून नेलेलीं दारें त्यांनीं तुरुंगाच्या तटाला लावलीं. त्यावरून शिडीप्रमाणें चढून जाऊन ते तुरुंगांतून बाहेर पडले—अन् धांवत सुटले—तें किती? पुरें बारा मैल. पण बलाढ्य सरकारापुढें एकट्या व्यक्तीचा पराक्रम किती चालणार? दुसरें दिवशीं सायंकाळीं त्यांना पकडण्यांत आलें. पुढें त्यांचा फार छळ करण्यांत आला. त्यांना क्षय झाला. अखेर तें झिजलेलें, पीडलेलें व पोखरलेलें शरीर ता. १७ फेब्रुआरी १८८३ रोजीं मृत्यूनें ओढून नेलें. राष्ट्रासाठीं मृत्यू स्वीकारणाऱ्या ह्या हुतात्म्याच्या चरित्रानें पुढें अनेक क्रांतिकारकांना स्फूर्ति दिली.

"सरणावरतीं आज आमुचीं पेटतांच प्रेतें।
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते॥"

हें कवि-वचन सत्य झालें!



जुलमाचा जाब विचारला!

ता. २२ जून १८९७ चा दिवस! साऱ्या देशांत मोठी धामधूम चालली होती. तशीच गडबड पुणें शहरांतहि उडालेली होती. कारण इंग्लंडची राणी व हिंदुस्थानची सम्राज्ञी व्हिक्टोरिया हिला राज्यावर बसून साठ वर्षें झालीं होतीं. त्यामुळें सरकार-दरबारीं हीरकोत्सवाचा थाटमाट चालू होता. हिंदी प्रजा दुष्काळाच्या वणव्यांत होरपळून निघत होती. पण ती परतंत्र. तिच्या सुखदु:खाची पर्वा परकीय सरकार कशास करतें आहे? त्यांचे नाचरंग व मेजवान्या जोरानें व मौजेनें चालू होत्या. पुण्याजवळ गणेश खिंडींत गव्हर्नर रहात असे. तेथें तर ह्या उत्सवाचा कल्लोळ उडाला होता. हिंदी लोकांच्या पैशावर गोरे अधिकारी मजा मारीत होते. रात्रीं आजूबाजूच्या डोंगरावर गवताच्या

होळ्या पेटविल्या होत्या. चतु:श्रृंगीचें शिखर पाजळलें गेलें होतें. डोळे दिपविणारें दारू-काम सुरूं होतें. फटाक्यांचे आवाज एकसारखे होत होते. गव्हर्नरच्या प्रासादावर तर झगझगीत रोषणाई केलेली होती. जणूंकांहीं दिवाळीच अवतरली होती. यथेच्छ खावें-प्यावें-नाचावें असा जल्लोश करण्यांत व मौज मारण्यांत सारे गोरे दंग व गुंग झालेले होते. आणि काळे लोक? तमासगीर वृत्तीनें हजारों 'बघ्ये' गणेशखिंडीच्या रस्त्यावर गोळा झाले होते. डोळे ताणीत होते, टाळ्या पिटीत होते. पण—

सहा पुणेरी तरुण मात्र निराळाच व्यूह रचीत होते—हातांत शस्त्रें घेऊन एका गोऱ्या अधिकाऱ्याचा खून करण्या-साठीं ते टपले होते.

कोणाचा हा खून? आणि तो कशासाठीं?

दुष्काळ तसाच प्लेगहि १८९७ सालीं पुण्याच्या पाठीस लागला. एक सैतान तर दुसरा बडा सैतान! दोघेहि सारखेच भयंकर. त्या दोघांनींहि पुणेंकरांना आपला जीव नकोसा करून टाकला; पण त्या दोघांपेक्षांहि अधिक छळ केला गोऱ्या सरकारी अधिकाऱ्यांनीं. प्लेग नाहींसा करण्यासाठीं सारीं घरें धुऊन स्वच्छ करण्याची योजना सरकारची होती. त्यासाठीं कोणाच्याहि घरांत वाटेल त्या वेळीं शिरण्याची मुभा सरकारी नोकरांना मिळाली. गोऱ्या सोल्जरांना तर काय, माकडाच्या हातीं पेटतें कोलित! तसें त्यांना हे अधिकार वाटले. ते देवघरांत घुसले व मूर्तीवर थुंकले, त्यांनीं देवांना रस्त्यावर भिरकावून दिले व

स्वयंपाक-घरांतील अन्न विटाळलें. त्यांनीं घरांतील पेट्या फोडल्या, त्यांतील दागदागिने लांबविले व त्या पेट्यांच्या होळ्या केल्या. फार काय, घरांतील स्त्रियांनाहि रस्त्यावर फरफटत नेले आणि त्यांची बेअब्रू केली. घरोघर अशी रावणशाही सुरू झाली.

सारे लोक संतापानें बेभान झाले. तेजस्वी तरुण मुठी वळवूं लागले व दांत-ओठ खाऊं लागले. नेमस्त धोरणाचें 'सुधारक' पत्रहि त्वेषानें आव्हान देऊं लागलें, "खरोखर आमच्या लोकांसारखे नामर्द लोक पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि सांपडणार नाहींत! अरे!....भागुबाईसारखे रडता काय? आडदांडास कायदा शिकवा....ज्या एका बाबतींत मनुष्याच्या मनोवृत्ति नाजूक असतात, त्या बाबतींतहि या खोंडांनीं तुम्हांला डिवचलं, तुमच्या आयाबहिणी, लग्नाच्या बायका, यांची विटंबना केली, तरी तुम्ही संथ ते संथच? धिक्कार असो असल्या समाजाला!" लो. टिळकांचा 'केसरी' तर रागानें गर्जना करीत होता.

पण असल्या नुसत्या शब्दांनीं उन्मत्त सरकारावर काय परिणाम होणार? त्याचा उन्मत्तपणा उतरविण्यासाठीं जालीम उपायच योजला पाहिजे, असें सळसळणाऱ्या रक्ताच्या तरुणांना वाटूं लागलें. त्यांचे अग्रणी दामोदरपंत चाफेकर. स्वदेश व स्वधर्म यांवर जुलूम होत आहे असें कळताच तो नष्ट करण्यासाठीं ओंजळींत प्राण घेऊन ते धांव घेत. त्यांनीं कांहीं धर्मांतरित हिंदूंना व सुधारकांना ठोक दिला होता आणि मुंबईंतील राणीच्या पुतळ्यावर डांबर ओतलें होतें व त्या पुतळ्याच्या गळ्यांत

जोड्यांची माळ घातली होती. पुण्यांत सोल्जरांनीं केलेले प्लेगच्या व्यवस्थेतील अत्याचार पाहून त्यांना त्वेष आला आणि त्या सोल्जरांचा मुख्य अधिकारी रँड याला ठार मारून त्या अत्त्याचारांचा सूड घेण्याचें त्यांनीं ठरविलें.

त्यांचे वडील कीर्तनकार होते. त्यांना त्यांचीं तीन मुलें कीर्तनांत साथ करीत. दामोदरपंत स्वतःहि कीर्तन व कविता करीत. तालमीनें त्यांनीं आपलें शरीर कमावलेलें होतें. ते रोज बाराशें दंडबैठका कादीत. पुण्याहून सिंहगडला न थांबता ते सहज पळत जात. त्यांनीं शेंदीडशें तरुणांचें एक मंडळ स्थापन केलें होतें. त्याचें नांव “ आर्य-धर्म-प्रतिबंध-निवारक-मंडळी.” त्यांनीं तरवारी, रिव्हॉल्वर इत्यादि शस्त्रेंहि जमविलीं होतीं. तीं चालविण्याचें शिक्षण गुप्तपणानें दिलें जाई. गोऱ्या सोल्जरांच्या अत्त्याचारांनीं पुण्याची प्रजा अगदीं गांजून गेली होती. तरीहि सरकारतर्फे राणीचा हीरकोत्सव चालूच आहे, हें पाहून चाफेकरांच्या अंतःकरणांतील सूडाचा अग्नि भडकला. आपले दोन बंधु व तीन सांगाती बरोबर घेऊन ते ता. २२ जून रोजीं रात्रीं गणेशखिंडींत गेले. तेथील मेजवानी झोडून सुस्तीनें व आनंदानें एकेक अधिकारी आपापल्या गाडींतून शहरांत येण्यास निघाले.

रात्रीचे बारा वाजून गेले. गोऱ्या अधिकाऱ्यांच्या गाड्यामागून गाड्या चालू झाल्या. फटाक्यांचे बार उडत होते अन् त्यांतच पिस्तुलाचे बार उडाले. रँडच्या गाडीसारख्याच दुसऱ्या गाडींत

बसलेला आयर्स्ट याच्यावर चाफेकरांचें पिस्तूल चुकून रोखलें गेलें. गोळी लागतांच तो गार्डीत पडला. नंतर रँडची गाडी आली. तिच्यावर दामोदरपंतांनीं उडी घेतली व मागील पडदा बाजूस सारून आपलें पिस्तूल त्याच्या पाठीस लावलें आणि चाप ओढला. त्यासरशीं मोठा आवाज झाला आणि रँड गार्डीत कोलमडून पडला. पुढें तो दहा दिवसांनीं मेला. याचें शासन म्हणून दामोदरपंतांना ता. १८ एप्रिल १८९८ रोजीं येरवड्याच्या तुरुंगांत फाशी देण्यांत आलें. हातांत गीता घेऊन, हरिनामाचा जयजयकार करीत, हुतात्म्याच्या धैर्यानें, आपल्या देशबांधवांवरील जुलूम नष्ट करण्याच्या हेतूनें, चाफेकर मृत्यूला आनंदानें सामोरे गेले.

" शतावधी ते जन्मा येती मरोनि जाती ना गणती।
देशासाठीं मरती त्यांसी देशपिते कीं बुध म्हणती ॥ "





'अभिनव भारताचें' स्फुल्लिंग

चाफेकरांचा गौरव करणारा फटका त्या वेळीं सर्व महाराष्ट्रांत गाजला होता. हा फटका कोणीं रचला? पंधरा वर्षांच्या एका तेजस्वी कुमारानें.

रात्रीची शांत वेळ. समोर अष्टभुजा देवीची मूर्ति. एक बारीक ज्योत खोलींतील सारा अंधार उजळून टाकीत आहे. तशीच ज्योत ह्या कुमाराच्या हृदयांतहि पेटलेली होती. प्रा. शिवरामपंत परांजपे यांनीं आपल्या "काळ" पत्रांत चाफेकरबंधूंच्या धाडसी देशभक्तीविषयीं जें लिहिलें, तें वाचल्यापासून या कुमाराच्या अंत:करणांत शोकाच्या, महत्त्वाकांक्षेच्या ज्वाला उसळूं लागल्या

होत्या. त्या सहजस्फूर्त प्रबळ भावनांना मोकळी वाट करून देण्यासाठींच कीं काय, त्यानें हा फटका रचला. सुमारें दोनशें चरणांचा हा फटका होता.

मध्यरात्र झाली तरी आपल्या मुलाच्या खोलींत दिवा जळत आहे, असें पाहून त्या कुमाराचे वडील तेथें येऊन त्याला म्हणाले, 'तात्या, काय लिहितो आहेस इतक्या रात्रीचा ?' तात्यांच्या हातांतील कागद त्यांनीं वाचले. त्यावरील तें काव्य, त्या काव्यांतील आकर्षक भाषाशैली आणि त्या भाषेच्या पोटांतील भावनेचे लोट—हें सारें पहातांच तात्यांच्या पित्याला हर्ष वाटला. पण लगेच चिंताहि वाटली. कारण त्या काळीं स्वराज्य शब्द उच्चारण्याची चोरी होती. मग एका गोऱ्या सरकारी अधिकाऱ्याला ठार करणाराचा गौरव करणें हा केवढा गुन्हा ! 'ह्या फंदांत तूं पडूं नकोस.' असा उपदेश वत्सल वडिलांनीं केला; पण परिणाम काय झाला ?

'स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चाफेकर फांसावर चढले, त्यांच्या प्राणज्योतीनें जातां जातां चेतविलेली शत्रुंजय वृत्ति, यज्ञ-कुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणें असेल तर त्याचें दायित्त्व आपल्यावरहि पडत आहे' हा विचार त्यांच्या मनांत बळावूं लागला.

चाफेकरांचें कार्य कुणी तरी चालविणें इष्ट व अवश्य असेल तर तें कार्य मींच कां चालवूं नये, हा प्रश्न त्यांच्या मनांत एक-सारखा उद्‌भवूं लागला.

त्याच अष्टभुजा देवीपुढें, वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी, रात्रीच्या प्रशांत वेळीं, मोठ्या भक्तिभावानें व दृढनिश्चयानें, विनायकराव सावरकरांनीं अशी शपथ घेतली कीं, ' देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मी मारतांमारतां मरेतों झुंजेन. '

ह्या शपथेची पूर्तता करण्यासाठीं सावरकरांनीं " राष्ट्रभक्त-समूह " ह्या नांवाचें एक गुप्तमंडळ स्थापन केलें. ' राम हरि ' हा या मंडळाच्या खुणेचा गुप्त शब्द होता. ह्या गुप्तसंस्थेची एक उघड काम करणारी शाखा होती. तिचें नांव " मित्र-मेळा." राष्ट्रीय दिन साजरे करणें; साप्ताहिक बैठकींत चर्चा करणें; वाचनालय-ग्रंथालय चालविणें; गणेशोत्सवांत मेळे काढणें; शिवाजी-उत्सव साजरा करणें वगैरे उद्योग ह्या प्रकट शाखेमार्फत चालत. पण गुप्तशाखेकडून हीं पंधरा-विशींतील मुलें क्रांतीची तयारी आपल्या बुद्धिशक्तीप्रमाणें करीत होतीं. शरीर कमावणें, डोंगर चढून जाणें, शस्त्रांचें शिक्षण घेणें, घोड्यावर बसणें, इ० सशस्त्र क्रांतीचे मार्ग हीं मुलें थोडथोडे चोखाळूं लागलीं होतीं.

१९०० सालीं वर्षारंभाच्या दिवशीं 'मित्र-मेळा' स्थापन झाला. त्याच्या अनेक शाखा महाराष्ट्रांत फैलावल्या. त्यांना एकसूत्री स्वरूप देण्यासाठीं कार्यकर्त्यांची बैठक १९०४ सालीं मे महिन्यांत नाशिकला भरली. तिनें पुढील धोरण आंखलें आणि ' मित्रमेळा ' या संस्थेला ' अभिनव भारत ' हें नवें नांव दिलें.

पुढें स्वदेशी-बहिष्काराच्या चळवळीला जोर आला. वंग-भंगामुळें सरकारविषयींचा द्वेष उतूं जाऊं लागला. कर्झनशहाच्या अरेरावी-मुळें व फटकळपणामुळें तरुण मनें चिडून गेलीं व संतापानें पेटलीं. सावरकरांच्या प्रयत्नामुळें पुण्यांत 'लकडी पुला' पलीकडे गाडीभर विदेशीं कपड्यांची रास करून तिची होळी करण्यांत आली. त्या वेळीं लो. टिळकांच्या अध्यक्षतेखालीं प्रा. शि. म. परांजपे यांचें जळजळीत भाषण झालें.

नाशिकाहून पुण्यास आलेले सावरकर लवकरच पुण्याहून लंडनला गेले. १९०५ च्या डिसेंबरांत ते बी. ए. झाले व १९०६ च्या जूनमध्यें ते इंग्लंडला बॅरिस्टर होण्यासाठीं गेले. तेथें ते बॅरिस्टर झालेहि; पण त्यापेक्षां त्यांनीं अधिक लक्ष दिलें क्रांतिकार्याकडेच !

सावरकरांनीं लंडन येथेंहि १९०७ सालीं 'अभिनव भारत' ही संस्था स्थापन केली. तेथें हिंदुस्थानच्या नाना विभागांतून शिक्षणासाठीं गोळा झालेल्या विद्यार्थ्यांना ह्या संस्थेच्या सूत्रांत गोवण्यांत आलें. सेनापति बापट, भाई परमानंद, मदनलाल धिंग्रा वगैरे तरुण स्वदेशाला स्वातंत्र्यसंपन्न करण्यासाठीं विदेशांत प्रयत्न करीत होते.

'ह्या ब्रिटिश पार्लमेंटवरच बॉंब टाकावा असें मला वाटतें. आपल्याला हें पटतें का? आपण आमचे मुख्य चालक. आपल्या अनुमतीनेंच मी पार्लमेंटवर बॉंब टाकणार.' सेनापति बापटांनीं आपली ऊर्मि बॅ. सावरकरांना बोलून दाखविली.

भारत-मंत्री मि. मोर्ले यांच्यावर पिस्तूल झाडण्याचा विचारहि त्यांनीं प्रकट केला. आतां त्यांनीं बॉंबची विद्या हस्तगत केली होती. तिचा प्रयोग पार्लमेंटवर करण्यास ते उतावीळ झाले होते; पण त्यांचे नायक विनायकराव त्यांना म्हणाले, 'नको. इतक्यांत हा प्रयोग नको.'

'कां नको ? तिकडे हिंदुस्थानांत कर्झनशाहीचा नंगानाच चालला आहे; लाला लजपतरायांना हद्दपार करण्यांत आलें आहे; बंगालचे तुकडे झाले आहेत; तरीहि आपण शांत बसावयाचें ? मला तर वाटतें, आपलें तेज दाखविण्याची हीच वेळ आहे.'

'अजून अवधी आहे. थोडे थांबा. अशा घाईमुळेंच सत्तावन्नचें स्वातंत्र्य-युद्ध फसलें. आकाशांतून तारा तुटला म्हणजे क्षणभर लख्खकन् प्रकाश दिसतो; पण पुढें सारा अंधार. तसें हें तुमचें काम होईल. तुमचें धाडस, त्याग, श्रम हें सारें फुकट जाईल.'

'मग मी आतां काय करूं ?'

'डोकें शांत ठेवा आणि भारतांत परत जा. असा क्षणाचा चमत्कार करण्याचा मोह धरूं नका. भारतांत आपल्या संप्रदायाचे अनुयायी मिळवा व जागोजाग बॉंबचा प्रसार करा. त्यांचा उपयोग करण्याची वेळ लवकरच येईल.'

'अभिनव भारत' या संस्थेचे एक तेजस्वी सभासद मदनलाल धिंग्रा हे होते; ह्या पंजाबी तरुणाचें वय २२–२३

वर्षांचें असेल. लंडन येथील एका कॉलेजांत स्थापत्य शास्त्राचा अभ्यास ते करीत होते; पण त्यांचें मन सशस्त्र क्रांतीच्या गुप्त कटांतच अधिकच गुंतलेलें असे. ते जितके हुषार तितकेच द्वाड. आणि जितके रगेल तितकेच रंगेलहि होते. साहस हा त्यांचा मोठा गुण. 'भारत-भवना'च्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या एका माळ्यासारख्या खोलींत बॉंब तयार करणें, बॉंबसाठीं लागणारीं रसायन-द्रव्यें बनविणें इत्यादि कामें गुप्तपणें चालत.

एकदां अपरात्रीं हें काम चाललें असतांना सावरकरांच्या असें लक्षांत आलें कीं, तापत चाललेलें कांचेचें भांडें आगीवरून खालीं उतरून घेण्याची तर वेळ झाली आहे व तें उतरण्याचा चिमटा तर आपणाजवळ घेतलेला नाहीं. उष्णतेची आंच अधिक लागली तर भांडें फुटेल व रासायनिक द्रव्यांचा एकदम स्फोट होऊन सर्वच बिंग बाहेर येईल, अशी भीति होती. हा प्रसंग टाळण्यासाठीं काय युक्ति योजावी हा प्रश्न सावरकरांच्या मनांत घोळत आहे, तोंच मदनलालनें बेडरपणानें हात पुढें केला व भांडें घट्ट आवळून धरून त्यानें तें चटकन् खालीं उतरून ठेवलें. तळहाताची कातडी पोळून निघाली तरी मदनलालचें त्याकडे काडीमात्र लक्ष नव्हतें.

असें अलौकिक साहस आणि तसेंच लोकोत्तर स्वातंत्र्य-प्रेमहि! १९०८ सालीं लंडनमधील एका इमारतीवर हिंदूंचा भगवा ध्वज फडकत असलेला 'अभिनव भारता'च्या डोळ्यांना दिसूं लागला. "कोणाचा हा ध्वज?" प्रत्येक सभासदाचें

मन आशेनें व कुतूहलानें प्रश्न विचारूं लागले. नेपाळच्या पंतप्रधानांचें तें निवास-स्थान आहे, असें त्यांना कळलें. नेपाळ म्हणजे स्वतंत्र राष्ट्र—भारतभूचें शिरोरत्न ! भारताच्या स्वातंत्र्य-लढ्यांत नेपाळनें साह्य करावें अशा आशयाचें एक विनंति-पत्र हिंदी क्रांतिकारकांनीं नेपाळी पंतप्रधानांकडे पाठविलें. त्यावर त्यांनीं सह्या केल्या होत्या स्वत:च्या रक्तानें ! आणि त्यांत पहिली सही होती धिंग्रांची.

तीन पौंड पांच शिलिंग किंमत देऊन व सरकारी परवानगीनें धिंग्रा यांनीं एक रिव्हॉल्वर राजरोसपणें विकत घेतलें. तें चालविण्याचें शिक्षण त्यांनीं एका बंदुक-शाळेंत घेतलें. त्यांत त्यांनीं मोठें प्राविण्य मिळविलें. ह्या शस्त्रविद्येचा मारा कोणावर करावयाचा ?

सर कर्झन वायली हा भारत-मंत्र्याचा कार्यवाह होता. हिंदी स्वातंत्र्यासाठीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत जे प्रयत्न चालू होते ते दडपून टाकण्यासाठीं वायलीच पुढाकार घेत असे. त्याच्या दडपशाहीमुळें इंग्लंडांतील हिंदी विद्यार्थी त्याचा द्वेष करीत. त्याला उडविण्याचा बेत धिंग्रांच्या चित्तांत खेळूं लागला. त्यांनीं गनिमी कावा सुरू केला. ‘ नॅशनल इंडियन असोसिएशन ’ या संस्थेचे ते सभासद झाले. वायली हाहि त्या संस्थेचा सभासद होताच. त्याला स्नेह दाखवून, विश्वास संपादून, पत्रें लिहून, गांठी घेऊन, धिंग्रा त्याच्या पोटांत शिरले; इतकें कीं हिंदी क्रांतिकारकांच्या गुप्त बातम्या आपण आणून देतों असा भास त्यांनीं वायलीपुढें उभा केला.

साध्या कविता पण त्या प्रसिद्ध केल्याबद्दल श्री. बाबाराव सावरकर यांना नाशिक येथें ता. ८ जून १९०९ रोजीं शिक्षा झाली—जन्मठेप काळ्यापाण्याची! हें वृत्त कानीं पडतांच धिंग्रांचा राग अनावर झाला. हिंदुस्थानचे व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन हे लंडन-मध्यें होते. एके दिवशीं संध्याकाळीं त्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा चालू असल्याचें धिंग्रांना कळलें मात्र, लगेच ते कर्झनला ठार मारण्यासाठीं तीराप्रमाणें वेगानें सभास्थानीं गेले; पण त्या वेळीं सभा संपली होती. दांत-ओठ खात धिंग्रा परत आले.

तो कर्झन गेला तरी हा कर्झन होताच. कर्झन वायलीला उडविण्याचा निश्चय त्यांनीं केला. ता. १ जुलई १९०९ चा दिवस. नॅशनल इंडियन ॲसोसिएशनचा वार्षिक-दिन. वसंत ऋतूचा उत्सव. रात्रीं मौजेचा कार्यक्रम होता. मदनलालांना दुसरी मौज उडवावयाची होती. तीन रिव्हॉल्वर्स व एक कट्यार घेऊन व पंजाबी पगडी घालून ते त्या समारंभास गेले. तेथें दोनशेंवर थोर थोर गोरे स्त्री-पुरुष जमले होते. सभागृहांत झगझगीत रोषणाई केलेली होती. उंचीं खाद्य-पेयें ठेवलेलीं होतीं. गप्पागोष्टींना पूर आला. रात्रीं अकरा वाजण्याच्या सुमारास समारंभ संपत चालला. आकंठ खाल्लेले व प्यालेले ते लोक घरोघर परतूं लागले. वायली धिंग्राशीं कांहीं बोलूं लागले. बोलत बोलत ते दोघे सभागृहाबाहेर आले. जिन्याखालीं उभें राहून, गुप्त बातमी सांगण्याच्या आविर्भावानें, वायलींच्या कानाजवळ तोंड नेऊन धिंग्रा बोलूं लागले. बोलतां बोलतां त्यांनीं आपलें

रिव्हॉल्वर काढलें आणि वायलीच्या मुद्रेवर नेम धरून झाडलें. वायली कोलमडला आणि मेला.

रिव्हॉल्वरचे आवाज ऐकतांच लाल काका नांवाचा पारशी डॉक्टर तेथें आला. त्याला पण धिंग्रांनीं ठार केलें. शेवटीं स्वत:ला नाहींसें करण्यासाठीं त्यांनीं रिव्हॉल्वर आपल्या मस्तकावर रोखलें; पण इतक्यांत सभागृहांतील लोक बाहेर आले व त्यांनीं धिंग्रांना धरलें. ता. २३ जुलई रोजीं तेथील न्यायमूर्तींनीं त्यांना फांशीची शिक्षा दिली. ता. १७ ऑगस्ट रोजीं, सस्मित मुद्रेनें व धीर वृत्तीनें, ते वधस्तंभाकडे चालत गेले आणि त्यांनीं स्वत:च आपली मान फांसांत अडकविली. आपल्या मायभूमी-साठीं पंचप्राणांचें बलिदान करण्यापूर्वी न्यायमंदिरांत मदनलालांनीं आपली अशी आकांक्षा प्रकट केली कीं,

" परमेश्वरापाशीं माझी इतकीच प्रार्थना आहे कीं, ती स्वतंत्र होईपर्यंत याच मातृभूमीच्या पोटीं मला पुनर्जन्म प्राप्त होवो आणि याच पवित्र कार्यांत मला पुन्हां मृत्यु येवो. "





समुद्रभेदी सावरकर

मंगळवार ता. २१ डिसेंबर १९०९ ची रात्र! नाशिक येथील विजयानंद नाट्यगृह दिव्यांनीं लकाकत होतें व प्रेक्षकांनीं फुलून गेलें होतें.

कारण मराठी नाटक-मंडळींची सम्राज्ञी अशी 'किर्लोस्कर नाटक मंडळी' तेथें आपले खेळ करीत होती. त्यांतहि तिचा हातखंडा खेळ असलेलें 'शारदा' नाटक—आणि त्यांत शारदेची भूमिका करणारे ऐन यौवनांतील बालगंधर्व! शिवाय नाशिकचे कलेक्टर जॅक्सन हेहि ते नाटक पहाण्यास येणार होते. त्यामुळें प्रेक्षकवृंदाला भरती आली होती. त्याची उत्सुकता

वाढत होती. जॅक्सनच्या आगमनाची वाट सर्वजण उत्कंठेनें पहात होते.


सर्वांत अधिक उत्कंठा होती ती एका एकोणीस वर्षांच्या तरुणाची. त्याचें नांव अनंत कान्हेरे. आपल्या खिशांत दोन रिव्हॉल्वरें ठेवून तो जॅक्सनची वाट पहात होता. जॅक्सन रात्रीं ९॥ वाजतां नाट्यगृहांत लगबगीनें आला. आपल्या खास खुर्चीवर तो बसतो न बसतो, तोंच कान्हेरे त्याच्या पाठीशीं जाऊन उभा राहिला आणि आपल्या खिशांतील भरलेलें रिव्हॉल्वर काढून त्यानें त्याच्यांवर झाडलें. लगेच समोर जाऊन जॅक्सनवर त्यानें सात गोळ्या झाडल्या आणि आत्महत्या करण्यासाठीं स्वतःस्या डोक्याकडे तें रिव्हॉल्वर रोखलें. पण तेवढ्यांत त्याचे दोन्ही हात धरले गेले आणि पुढें खटला चालून ता. १९।४।१९१० रोजीं त्याला फांशीं देण्यांत आलें.

न्यायमंदिरांत कान्हेरे यांनीं आपल्या जबाबांत आपल्या कृत्याचा हेतु स्पष्ट शब्दांत असा सांगितला, "जनतेच्या न्यायालयांतील नियम असा आहे कीं, जो हिंदी लोकांचें प्राण कवडीमोलाचे आहेत असें सुचवतो, त्या अपराध्याला देहान्ताची शिक्षा देण्यांत यावी. ती शिक्षा जॅक्सनला देण्याचें काम माझ्या अंगावर पडल्यामुळें मी ही पवित्र गोष्ट केली आहे.... इंग्रजांच्या जुलमांचा सूड उगवण्यासाठीं मी हें कृत्य केलें आहे."

हें कृत्य करण्यासाठीं कान्हेरे यांनीं जें रिव्हॉल्वर वापरलें, तें सावरकरांनीं इंग्लंडांतून पाठविलेलें होतें. अशीं वीस रिव्हॉल्वरें

त्यांनीं हिंदुस्थानांत पाठविल्याची माहिती सरकाराला मिळाली. तेव्हां सावरकरांनाच पकडण्याचा विचार सरकाराच्या मनांत घोळूं लागला; पण सावरकर त्या वेळीं आजारी पडल्यामुळें डॉक्टरांनीं त्यांस फ्रान्समध्यें जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें १९१० सालच्या जानेवारींत ते फ्रान्सला गेले. तेथें ते सुमारें दोन महिने होते; त्यामुळें त्या अवधींत ब्रिटिश सरकारला त्यांच्यावर हात टाकतां आला नाहीं. इंग्लंडमधील आपल्या सहकाऱ्यांच्या साह्यासाठीं सावरकर ता. १३ मार्च १९१० रोजीं पॅरीसहून लंडनला परत गेले—जाळ्यांत हरीण आपसुख सांपडलें! त्यांची शिकार करण्यास ब्रिटिश पोलीस आपलीं आयुधें सरसावून सज्ज होतेच. स्टेशनच्या मुशाफरखान्यांतच त्यांना वॉरंट दाखविण्यांत आलें. हिंदुस्थानांत राजद्रोही भाषण केल्याचा व खुनास मदत केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. ताबडतोब त्यांना पोलिस-ठाण्यावर नेण्यांत आलें. सुमारें तीन महिने सावरकर लंडन येथील कच्च्या कैदेंत होते. त्या तुरुंगांतून त्यांना पळवून नेण्याचा प्रयत्न त्यांच्या सहकाऱ्यांनीं केला; पण तो फसला. सावरकरांवर ज्या गुन्ह्यांचे आरोप होते ते हिंदुस्थानांत घडलेले असल्यानें त्यांची चौकशी हिंदुस्थानांतच व्हावी असा निर्णय न्यायमूर्तींनीं दिला.

ता. १ जुलई १९१० रोजीं 'मोरिया' बोटीनें ब्रिटिश सरकारनें सावरकरांस हिंदुस्थानांत रवाना केलें. मातृभूमीला भेटण्यासाठीं त्यांचा प्राण तळमळत होता; पण आतां ते चालले होते परक्या सरकारचे कैदी म्हणून, सशस्त्र पोलीसांच्या पहाऱ्यांत.



सात दिवस झाले. ' मोरिया ' आपला जलप्रवास ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणें करीत होती. ता. ७ जुलई रोजीं रात्रीं तिनें मार्सेलिस बंदरांत प्रवेश केला. तें बंदर फ्रान्सच्या राज्यांतील आहे. तेथें बोटीच्या यंत्रांत कांहीं बिघाड झाला. दुरुस्ती होईपर्यंत बोट तेथेंच रहाणार हें सगळ्यांना कळलें. बोट दुरुस्तीसाठीं धक्क्याच्या अगदीं जवळ नेण्यांत आलेली होती. या संधीचा फायदा घेण्यास साहसी सावरकरांचें कल्पक मन कसें चुकेल? आग्र्याहून शिवाजीमहाराजांनीं आपली सुटका कशी करवून घेतली, याची स्मृती त्यांना झाली. फ्रान्सच्या स्वातंत्र्य-भूमीवर आपण एकदां पाय टेकले म्हणजे त्या परदेशावर इंग्लंडच्या कायद्याचा अंमल चालणार नाहीं ही जाणीव त्यांच्या बॅरिस्टरी बुद्धीनें त्यांच्या मनास दिली. कांहींहि करून बोटींतून निसटून जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

पहांट झाली. खालीं समुद्र व वर आकाश. बोटींत सावरकरांच्या आजूबाजूला दोन धिप्पाड इंग्रज पहारेकरी निजलेले होते. आपल्याला शौचास जायचें आहे असें सावरकरांनीं सांगतांच दोघां पहारेकऱ्यांनीं त्यांस बोटींतील शौचकूपाकडे नेलें. त्यांतील एक पहारेकरी इंग्रज होता. तो सावरकरांची कांहीं वस्तु आणण्यासाठीं वर गेला. शौचकूपाबाहेर एकच हिंदी पहारेकरी होता. शौचकूपाच्या दाराला एक भिंग होतें. सावरकरांनीं आपल्या अंगावरील काळा कोट दारांतील हुकास अडकविला. त्यामुळें त्या कांचेवर काळा पडदाच सोडल्यासारखें झालें.

लगेच अंगावरील कपडे काढून सावरकरांनीं बोटींतील भोकाकडे—पोर्ट होलकडे उडी टाकली. ह्या भोकाची रुंदी फक्त १२ इंच होती आणि सावरकरांची छाती होती ३६ इंच. तरी अंगाचा संकोच करून ते त्या भोकांतून सुळकन् बाहेर पडलेच. त्या वेळीं त्यांचें सर्वांग खूप खरचटून निघालें. समुद्रांत उडी टाकतांच ते सपासप् पाणी तोडूं लागले. दहा मिनिटें पोहून, शेंदीडशें फूट पाणी तोडून, त्यांनीं बंदराचा किनारा गांठला. त्यांच्यापाठोपाठ बोटीवरील पोलीसांनींहि उड्या टाकल्या व त्यांचा पाठलाग केला. मधूनमधून ते पिस्तूलहि झाडीत.

गोळ्या चुकविण्यासाठीं मधूनमधून सावरकर बुडी घेऊन समुद्राच्या पोटांतून आपला माग काढीत होते. मोठ्या शर्थीनें ते बंदराची भिंत चढून गेले आणि त्यांचे पाय फ्रान्सच्या स्वतंत्र भूमीवर टेकले. त्यांच्यापाठोपाठ पोलीस आलेच. त्यांच्या हातीं न सांपडावें म्हणून सावरकरांनीं आपल्या भिजलेल्या व थकलेल्या देहास पळवीत नेलें. ‘ चोर ! चोर ! ’ म्हणून इंग्रज पोलीस आरडाओरड करीत त्यांच्या पाठीमागें धांवत सुटले. एका फ्रेंच पोलीसाच्या आसऱ्याला सावरकर जाऊन उभे राहिले. मग इंग्रज पोलीस आंतरराष्ट्रीय कायद्यान्वयें त्यांस पकडूं शकत नव्हते. पण कायदा गुंडाळून ठेवून व त्या फ्रेंच पोलीसास लांच देऊन, ब्रिटिश पहारेकऱ्यांनीं सावरकरांना आपल्या ताब्यांत घेऊन बोटीवर परत नेलें.

राष्ट्राराष्ट्रांमधील राजनीतीची ती पायमल्ली झाली. साऱ्या जगांत ‘ जंगलचा कायदा ’ जारी आहे, असेंच सावरकरांच्या

सहकाऱ्यांना वाटूं लागलें. त्यांच्या खटपटीमुळें हें प्रकरण हेग येथील जागतिक न्यायालयापुढें गेलें. इंग्लंड व फ्रान्स यांच्या सरकारांनीं परस्पर-करार करून सावरकरांची फेर-अटक ह्या त्रयस्थ न्यायासनापुढें विचारासाठीं मांडली. ह्या दोन राष्ट्रांच्या प्रतिनिधींशिवाय बेल्जम, नॉर्वे व हॉलंड ह्या देशांचे प्रतिनिधीहि ह्या न्यायासनावर बसलेले होते. त्यांनीं ता. २४।२।१९११ रोजीं असा निर्णय दिला कीं, "फ्रान्सच्या भूमीवर सावरकरांना पकडणें आणि त्यांना ब्रिटिश पोलीसांच्या स्वाधीन करणें हे प्रकार गैरवाजवी होत. परंतु अशा बंदीवानाला परत करावयाला लावणारा नियम आंतरराष्ट्रीय कायद्यांत नाहीं. तेव्हां ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं सावरकरांना फ्रेंच सरकारच्या हवालीं करण्याचें कारण नाहीं." ह्या निर्णयानें सावकरांना दुसरा कांहीं फायदा झाला नसला, तरी त्यांचें कर्तृत्व त्रिखंडांत गाजलें, त्यांच्या क्रांतिकारक पक्षाचें नांव जगभर दुमदुमलें आणि त्याबरोबरच हिंदी स्वातंत्र्याचा डंका साऱ्या जगभर वाजला.

या निर्णयाच्या आधींच सावरकरांना हिंदुस्थानांत आणण्यांत आलें होतें. त्यांच्यावर एकामागून एक तीन आरोपांवर खटले चालू होते. पहिल्या खटल्याचा निकालहि ता. २४।१२।१९१० रोजीं जाहीर करण्यांत आला होता. हा पहिला खटला नाशिक कटासंबंधीं होता. त्यांत सावरकरांसकट ३८ आरोपी होते. सावरकरांना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा ठोठावण्यांत आली आणि त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्याची शिक्षाहि तिच्या

जोडीला सुनावण्यांत आली. ह्या खटल्यांत सुमारें ३०० साक्षीदार असून त्याचें काम ७० दिवस चाललें होतें. दुसरा खटला ता. २३ जानेवारी १९११ रोजीं सुरू झाला. जॅक्सनच्या खुनाला मदत केल्याचा आरोप त्यांत होता. त्या आरोपाचा इन्कार तर सावरकरांनीं केलाच. शिवाय त्यांनीं असें सांगितलें कीं, 'मी एकसारखा फ्रेंच राष्ट्राच्या अधिकाराखालीं आहें. म्हणून येथील खटल्यांत मी भाग घेऊं शकत नाहीं.' तथापि न्यायमूर्तींनीं सावरकरांना दुसऱ्या जन्मठेपीची शिक्षा ठोठावली. हें ऐकतांच सावरकर धैर्यानें उद्गारले, 'माझ्या मातृभूमीचा विजय त्वरेनें नसला तरी निश्चयानें होणार आहे. पण तो आमच्या हालानें व त्यागानें होणार आहे, अशी माझी श्रद्धा असल्यानें तुमची अत्यंत कठोर शिक्षाहि न कुरकुरतां सहन करण्यास मी सिद्ध आहें!'

दोन जन्मठेपींची शिक्षा! पन्नास वर्षें काळें पाणी!!


'**शत-सूर्य-मालिकांच्या दीपावली विझाल्या**'

असेंच कोणासहि वाटून त्याच्या डोळ्यापुढें अंधेरी येण्यासारखा अघोर प्रसंग! तथापि त्यांनीं मुळींच खचून न जातां, शिक्षा ऐकतांच सावरकरांनीं 'स्वातंत्र्यलक्ष्मी कीं जय' असा घोष केला व स्वातंत्र्याच्या लढ्यांतील एक एक इंच भूमि आपण जिंकीत चाललों आहों, अशा विजयाच्या उत्साहानें ते तुरुंगांतील यमयातना सोसण्यास तयार झाले.

सावरकर हे जातिवंत कवि! पहिल्या खटल्याच्या निकालाच्या आदल्याच दिवशीं त्यांनीं एक कविता रचली व म्हटलें,

रोंविलची स्वकरीं स्वातंत्र्याचा ।
हिमालयावरि झेंडा जरतारी ॥ जननी ॥
(तरिहि तूं) मानुनि घे साची ।
अल्पस्वल्प ही सेवा अपुल्या अर्भक बालांचीं ॥

ता. ४।७।१९११ रोजीं सावरकरांना अंदमान येथील कारागृहांत कोंडण्यांत आलें. तेथें त्यांना नानातऱ्हेचे हाल सोसावे लागले. १९२१ सालीं त्या मृत्युमुखांतून ते मुक्त झाले. अलीपूर व येरवडा येथील तुरुंगांत कांहीं काळ काढल्यावर ता. ६ जानेवारी १९२४ रोजीं सावरकरांची तुरुंगांतून मुक्तता झाली. नंतरचीं १३ वर्षें त्यांना रत्नागिरीस काढावीं लागलीं. १९३७ सालीं स्वराज्य-सरकारनें त्यांना पूर्ण बंधमुक्त केलें. १९४७ सालीं त्यांनीं आपलें स्वप्न साकार झाल्याचें पाहिलें—राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाल्याचें सुख अनुभवलें. ता. १० मे १९५२ रोजीं 'अभिनव भारत' या संस्थेचा सांगता-समारंभ पुणें येथें झाला; त्या वेळीं त्यांनीं आपला स्वातंत्र्य-प्राप्तीचा आनंद पुढील शब्दांनीं व्यक्त केला, "आज आम्ही पूर्ण आनंदी आहोंत. आज माझें जीवन सफल झालें. जीवनभर ज्या कार्यासाठीं आम्ही झगडलों, तें कार्य यशाला पोंचल्याचें पाहून मला अत्यंत अत्यंत संतोष होत आहे. माझा देश स्वतंत्र झालेला पाहण्यास मी जगलों याचा मला अतिशय आनंद होतो."



बंगालची कालि-माता

क्रांतिकारकांचें जाळें सर्व बंगालभर पसरलेलें होतें. इंग्रजांच्या अंमलाखालीं प्रथम आलेला प्रांत म्हणजे बंगाल. त्यामुळें इंग्रजी भाषेचा व इंग्रजी संस्कृतीचा प्रसार तेथें विलक्षण झाला. त्या योगें राजकीय जागृति लवकर निर्माण होऊन तिच्यांतून स्वातंत्र्यप्राप्तीचे निरनिराळे प्रयत्न होऊं लागले. हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं इंग्रज सरकारनें अत्यंत कडक दडपशाही बंगालमध्यें केली. त्यामुळें चिडून गेलेले तरुण गुप्त संघटना बांधूं लागले व क्रांतिकारी कट करूं लागले. ह्या कटांत बहुधा विशीपंचविशींतील भावनाप्रधान तरुण सामील होत.

१९०६ सालीं डाका येथें स्थापन झालेली 'अनुशीलन समिति' ही सर्वांत मोठी व अधिक संघटित होती. तिच्या जवळ जवळ ५०० शाखा बंगालमध्यें निघाल्या होत्या. जिल्हा समिति, परगणा समिति इ. पद्धतशीर विभाग त्या शाखांचे पाडलेले होते. त्यांच्या स्वयंसेवकांची संख्या मोठी होती. राष्ट्रीय शाळांमध्यें त्यांचें काम सहजच सुरू होई.

१९०८ सालच्या अखेरीस सरकारनें ही 'अनुशीलन समिति' बेकायदा ठरविली व तिचे चालक पुलिन बिहारीदास यांना त्यांच्या पुष्कळ साथीदारांसह देशांतून हद्दपार केलें. त्यामुळें ह्या समितीचें काम गुप्तपणें चालू होऊन तिचें केंद्र कलकत्त्यास गेलें. तेथून ह्या समितीच्या शाखा इतर प्रांतांतहि पसरल्या गेल्या. ह्या समितीच्या सभासदांचे चार वर्ग असत. ते असे—(१) अठरा वर्षांखालील मुलें. (२) अविवाहित नवयुवक. (३) विवाहित युवक. (४) प्रौढ माणसें. यांशिवाय कार्याच्या दृष्टीनेंहि सभासदांचे चार वर्ग केले जात. ते असे—(१) विद्याध्ययन करणारीं मुलें. (२) सर्वस्वाचें बलिदान करण्यास सिद्ध असलेले नवयुवक. (३) केवळ द्रव्यसहाय्य करणारे लोक. (४) फक्त सहानुभूति बाळगणारे लोक.

या समितीच्या सभासदांना पुढील शपथा घ्याव्या लागत—(१) समितीचे नियम पालन करणें. (२) अधिकाऱ्यांचा कोणताहि हुकूम अनमान न करतां ऐकणें. (३) समितीच्या कार्याची वाच्यता न करणें. मूलभूत शपथा प्रत्येकाला घ्याव्या

लागत; पण त्याशिवाय आद्य, अंत्य, प्रथम विशेष व द्वितीय विशेष अशा चार प्रकारच्या प्रतिज्ञा असत. ह्या घेतांना पुढील-प्रमाणें शपथा घ्याव्या लागत—(१) मी समितीपासून कधींहि फुटून निघणार नाहीं. (२) मी माझ्या नेत्यापासून कांहींहि लपवून ठेवणार नाहीं. (३) त्यांना कळविल्याशिवाय मी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणार नाहीं. अशा सभासदांची संख्या बंगालमध्यें एकसारखी वाढत असल्यामुळें गांवोंगांवीं तेजस्वी संघटना बांधली जात होती. स्वराज्याच्या शपथ-विधींचीं दृश्यें गांवोंगांव दिसत.

मध्यरात्रींची वेळ. सर्वत्र सामसूम. सारे लोक झोंपलेले. पण ज्यांना पारतंत्र्यामुळें झोंप येत नाहीं, असे दोनचार तरूण रस्त्यानें झपाझप चालले होते. कलकत्ता येथील काली-मंदिरा-कडे त्यांचे पाय वळलेले होते. मंदिरांत ते जातात तों त्यांना आपल्यासारखींच दहाबारा तरुण माणसें तेथें गंभीरपणें बसलेलीं दिसतात. देवीपुढें पूजेचें सामान ठेवलेलें आहे. देवीपुढें हे नवे तरुण गुडघे टेकतात आणि आपल्या मस्तकावर तलवार व गीता ठेवून शपथ घेतात. शपथ घेण्यापूर्वीं एक दिवस उपवास त्यांनीं केलेला असतो. पावित्र्य व गांभीर्य यांनीं सारें वातावरण भरून गेलेलें असें! उदात्त भावनेनें प्रेरित होऊन ते तरुण अशी शपथ घेत कीं, ' परमात्मा, माता, पिता, रक्षक व नेता यांना साक्षी ठेवून मी अशी शपथ घेतों कीं, या समितीचें कार्य जोंपर्यंत पूर्ण झालेलें नाहीं, तोंपर्यंत हें कार्य सोडून मी जाणार नाहीं. मी

माता-पिता, भाऊ-बहीण इत्यादि आप्तेष्टांच्या प्रेमबंधनांत पडणार नाहीं. मीं सर्व कामें दृढचित्तानें व गांभीर्यानें पार पाडीन. या शपथेचें पालन जर मी न करीन तर ब्राह्मण, पिता, माता आणि सर्व देशांतील देशभक्त हे मला शापून भस्म करून टाकतील.'

असे शपथ-विधि गांवोगांवच्या देवळांतून होऊं लागले. कांहीं ठिकाणीं देवळाऐवजीं स्मशानांत हे विधि होत. कोठें कोठें देवीच्या चरणावर दोन पिस्तुलें ठेवून हा शपथ-विधि पार पडे. कांहीं तरुण स्वत:च्या रक्तानें सही करत; तर कांहीं तरुण दिव्याच्या ज्योतींत बोट ठेवून आपला सोशिकपणा सिद्ध करीत. शपथ-विधीचा हा उग्र कार्यक्रम पार पडल्यावर प्रत्येक सभासदास नवें गुप्त नांव दिलें जाई. नंतर त्याला पुढें तलवार, पिस्तुल वगैरे शस्त्रें चालविण्याचें शिक्षण दिलें जाई.

ह्या क्रांतिकारक संस्थांपुढें मुख्यत: रशियाचा आदर्श असे. रशियांत झारशाही थैमान घालीत होती. तिच्या जुलुमानें चिडलेले रशियन गुप्त कट करीत होते. त्यांची संघटना मजबूत असे. मात्र रशियांतील साम्यवादाचें ध्येय त्या वेळीं हिंदी क्रांतिकारकांच्या डोळ्यापुढें फारसें नव्हतें. कोणाला जुनें रामराज्य नव्यानें अवतरविण्याचीं स्वप्नें पडत; तर कोणाला इंग्लंडची लोकशाही रुजवण्याची आकांक्षा मोह घालीत होती. आपल्या कामांना लागणारा पैसा मिळविण्यासाठीं धनिकांच्या तिजोरीवर किंवा सरकारी खजिन्यावर दरोडे घालण्याचें तंत्र १९०६ त बंगालमध्यें सुरू झालें.

इंग्लंडमधील 'अभिनव भारत' संस्थेचे सभासद हिंदुस्थानांत परत आले ते बाँब-पिस्तुलें चालविण्याचें शिक्षण घेऊन. त्यांनीं येथें येतांच त्या शस्त्रविद्येचे प्रयोग करण्यास सुरवात केली. बंगाल व महाराष्ट्र ह्या दोन प्रांतांत तर क्रांतिकारकांचीं जाळीं जोरानें वाढत चाललीं. बंगालच्या गव्हर्नरची आगगाडी रूळावरून पाडण्याचे दोन प्रयत्न १९०७ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत झाले; पण ते दोन्ही प्रयत्न फसले.

त्यानंतर दोनच महिन्यांनीं मिदनापूरजवळ बाँबचा उपयोग करण्यांत आल्यामुळें ले. गव्हर्नरची गाडी रूळावरून पडली. त्याच सुमारास डाक्का येथील डि. मॅजिस्ट्रेट ॲलन यांच्यावर पिस्तूल झाडण्यांत आलें. ते जखमी झाले पण वांचले.

तसेंच मुझफरपूर येथील डि. मॅजिस्ट्रेट मि. किंग्जफर्ड ह्या अरेरावी अधिकाऱ्याचा प्राण घेण्याचा प्रयत्न कांहीं बंगाली तरुणांनीं केला.

रात्रीं साडेआठ वाजण्याचा सुमार. मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या बंगल्यासमोर एक गाडी उभी राहिली. ती थेट मॅजिस्ट्रेटच्या गाडी-सारखीच दिसत होती. तिच्यावर खुदीराम बोस ह्या अठरा वर्षांच्या बंगाली तरुणानें ता. ३० एप्रिल १९०८ रोजीं बाँब फेकला. सेनापति बापटांनीं फ्रान्समध्यें रशियन मुलीकडून बाँब तयार करण्याची कृति समजावून घेतली होती. त्या कृतीप्रमाणें तयार झालेला बाँब खुदीरामानें त्या गाडीवर उडविला. त्याबरोबर कानठळ्या बसविणारा आवाज झाला. तो आवाज त्या रात्रीच्या वेळीं तीन मैल लांब ऐकूं गेला !

पण दुर्दैव असें कीं, त्या गाडींत तो मॅजिस्ट्रेट नव्हताच. एका युरोपियन वकिलाची बायको व मुलगी त्यांत बसली होती. त्या दोघी स्त्रिया हकनाक प्राणास मुकल्या. नंतर किंग्जफर्डची गाडी आली आणि मग पोलीसतपास होऊन खुदीरामास पकडण्यांत आलें. रात्रभर चोवीस मैल ते पळत होते; पण त्यांना दोन सशस्त्र शिपायांनीं पाठलाग करून पकडलें. त्यांना पकडणारे गुप्त-पोलीस-खात्यांतील सब्-इन्स्पेक्टर नंदलाल बॅनर्जी यांना पुढें एका क्रांतिकारकानें पिस्तुलानें ठार केलें. खुदीरामासहि ता. ११ ऑगस्ट १९०८ रोजीं फांशीं देण्यांत आलें. हातांत गीता घेऊन हंसतमुखानें त्यांनीं मृत्यूला मिठी मारली. त्यांच्या प्रेत-यात्रेस हजारों नागरिक जमले होते. त्यांच्या चितेची रक्षा सोन्याच्या डबींत कोणी भक्तिभावानें ठेवली, तर कोणी त्यांचीं हजारों छाया-चित्रें काढून तीं विकलीं. त्यांचें चित्र असलेलीं धोतरेंहि बंगाली बांधव कांहीं काळ नेसत होते. त्यांनीं जेथें बॉंब फेकला, त्या जागीं आतां स्वातंत्र्य-कालांत त्यांचें स्मारक उभारण्यांत आलें आहे.


खुदीराम हे बंगालमधील ‘ युगांतर ’ ह्या क्रांतिकारक गुप्त संस्थेचे सभासद होते. ह्या संस्थेचें नेतृत्व श्री. अरविंद घोष यांच्याकडे होते. ते ‘ युगांतर ’ नांवाचें पत्र चालवीत असत. त्यांतून सरकारच्या जुल्मी कृत्यांवर कडक टीका ते करूं लागले. त्यांचे लेख विजेसारखे तेजस्वी असत. अरविंदबाबू-प्रभृति तीस तरुणांना पकडण्यांत आलें. माणिकतोळा बागेंतील


कट पोलीसांनीं शोधून काढला आणि कटांतील क्रांतिकारकांना कडक शिक्षा देण्यांत आल्या. अरविंदबाबूंचा बचाव करण्यासाठीं बॅ. दास आपण होऊन साह्यास आले. अरविंदबाबूंची सारी वृत्तीच धर्ममय. देशभक्ति हा त्यांचा धर्मच ! सशस्त्र क्रांति हें साधन व स्वातंत्र्यप्राप्ति हें साध्य. ते असें सांगत, "सध्यांची ही चळवळ खरी राजकीय चळवळ नव्हे; तर तो एक श्रेष्ठ प्रतीचा धर्म आहे, ती एक निष्ठा आहे. जन्मभर चालण्याचा तो एक शाश्वत मार्ग आहे.' त्यांना तुरुंगांत सर्वत्र श्रीकृष्ण दिसत असे. कोठडीसमोरील वृक्ष त्यांना दिसेना. तेथें त्यांना वासुदेव दिसूं लागला. कोठडीचे गज वासुदेवच वाटूं लागले. पहारेकरी व मॅजिस्ट्रेट दोघेहि वासुदेवच. सरकारी वकिलाच्या जागीं वासुदेव आणि ज्या खरखरींत कांबळ्यावर त्यांना निजावें लागे त्या कांबळ्यांत त्यांना वासुदेवाच्या कोमल बाहूंचाच स्पर्श होऊं लागला. 'माझ्याभोंवतीं सर्व बाजूंनीं वासुदेव उभा आहे.' असा भास त्यांना झाला. 'वासुदेवः सर्वमिति' अशी त्यांची अद्वैत वृत्ति झाली. पालबाबूसारखे इतर बंगाली नेतेहि अशाच धार्मिक वृत्तीनें स्वातंत्र्याचें आंदोलन चालवीत असत.

एकट्या बंगाल प्रांतांत १९०८ सालापासून १९३२ साला-पर्यंत ५५ सरकारी अधिकारी क्रांतिकारकांनीं ठार केले.

अरविंदबाबूंचे छोटे बंधू बारींद्रकुमार हे मोठे क्रांतिकारक नेते होते. त्यांचे वडील इंग्लंडमध्यें डॉक्टर म्हणून सरकारी नोकरींत होते. या दोन्ही भावांचे जन्म तेथेंच झाले. एक वर्षांचे असतांना

१८८१ सालीं बारींद्रकुमारांना हिंदुस्थानांत आणलें गेलें. त्यांनीं आपल्या तारुण्यांत कलकत्ता येथें स्वदेशी-बहिष्काराची चळवळ केली. 'युगांतर' हें त्यांचें पत्र म्हणजे सरकारशीं सामना करण्याचें शस्त्रच होतें. सरकारनें त्याचे एकामागून एक संपादक पकडले. १९०८ मध्यें तें बंद पडलें; तेव्हां त्या पत्राचा खप वीस हजारांपर्यंत होता. त्यानंतर बारींद्रकुमारांनीं सशस्त्र क्रांतिकार्याची उठावणी केली. 'माणिकतोळा' नांवाची त्यांची बाग होती. तो क्रांतिकारकांचा अड्डा बनला. तेथें त्यांना अनेक तरुण मिळाले. त्यांत स्वामी विवेकानंदांचे बंधु भूपेंद्रनाथ दत्त हेहि होते. या दलानें गव्हर्नरच्या गाडीवर बॉंब फेंकण्याचा प्रयत्न तीन वेळां केला; पण तीनहि वेळां तो फसला. पुढें अलीपूर कटाच्या खटल्यांत बारींद्रकुमारांना जन्मठेपेची शिक्षा होऊन अंदमानांत धाडण्यांत आलें. तेथें भाई परमानंद, सरदार पृथ्वीसिंह वगैरे लाहोर-कटांतील नेते काळ्या पाण्यावर आलेले असतांना भेटले.





बड्या लाटावर बॉंब!

त्या वेळीं हिंदुस्थान परतंत्र होतें—इंग्लंडचे अंकित होतें; त्यामुळें इंग्लंडचा आनंद तोच हिंदुस्थानचा आनंद आणि इंग्लंडचें संकट तेंच हिंदुस्थानचें संकट अशी स्थिति सरकारच्या सक्तीनें निर्माण झालेली होती. इंग्लंडचे राजे सातवे एडवर्ड १९१० सालीं मृत्यु पावले कीं, लगेच हिंदुस्थानांत शोकपर्व सुरू झालें. त्यानंतर त्यांच्या गादीवर त्यांचे ज्येष्ठ पुत्र पांचवे जॉर्ज बसले आणि त्यानिमित्त इंग्लंडांत राज्याभिषेकाचा मोठा उत्सव झाला. तसाच तो हिंदुस्थानांतहि व्हावयास नको काय? परतंत्र प्रजेच्या मनावर आपला दरारा बसविण्यासाठीं आणि तिचे डोळे आपल्या ऐश्वर्यानें दिपवून टाकण्यासाठीं सरकारनें हिंदुस्थानांतहि राज्यारोहणाचा समारंभ करण्याचें ठरविलें.

जॉर्ज बादशहा हिंदुस्थानांत आले आणि ता. १२ डिसेंबर १९११ रोजीं त्यांच्या राज्यारोहणाचा समारंभ दिल्ली येथें साजरा झाला; त्या वेळचा दिल्ली-दरबार मोठ्या थाटानें व दिमाखानें साजरा केला गेला. सरकारी अधिकारी व हिंदी संस्थानिक यांनीं मोठा थाटमाट केला; पण गरीब प्रजा?

त्यांतहि बंगालची फाळणी झाल्यानें संतापानें बेभान झालेली बंगाली प्रजा ? तिनें आपला असंतोष नाना मुखांनीं प्रकट केला होता, ब्रिटिश मालावर कडकडीत बहिष्कार टाकला होता व स्वदेशी मालाचा जोरानें पुरस्कार केला होता. तेवढ्यानेंहि ज्यांचें समाधान होत नव्हतें असे जळजळीत अंत:करणाचे बंगाली तरुण रानास्मशानांत, रात्रींबेरात्रीं, एकत्र बसून गुप्त कट करीत होते आपल्या प्राणावर उदार झाले होते आणि सरकारी अधिकाऱ्यांवर बॉंब फेकून व पिस्तूल झाडून आपला असंतोष जगजाहीर करीत होते.


सारा बंगाल म्हणजे एक ज्वालामुखी पर्वत बनला होता. तो शांत करण्यासाठीं बादशहानें दिल्लीदरबारांत अशी आनंददायक घोषणा केली कीं, " बंगाली जनतेचा असंतोष ध्यानीं घेऊन आम्हीं पूर्व व पश्चिम बंगाल एक करूं व त्यांचा एक स्वतंत्र प्रांत बनवूं. आजपासून हिंदुस्थानची राजधानी कलकत्त्याऐवजीं दिल्ली होऊन तिला पांडवकालीन इंद्रप्रस्थाचें वैभव पुन्हां प्राप्त होईल. " नवे बादशहा ! नवी राजधानी ! ! त्यासाठीं नवी नगरी वसविण्यांत आली. तिचें नांव नवी दिल्ली ! बादशहानें तिची कोनाशिला बसविली. चौदा कोटी रुपये खर्च करून व २० वर्षें खपून युरोपियन राजधानीच्या तोडीची ही नगरी उभारण्यांत आली. केवढें तिचें ऐश्वर्य ! किती तिच्या सुखसोयी ! नवी राजवट संतोषाची व शांततेची व्हावी म्हणून व्हाइसरॉयहि नवे पाठविले गेले.

पूर्वीचे व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन यांनीं हिंदी लोकांवर कडक अंमल केला होता. त्यांच्या बेगुमान दडपशाहीमुळें नामदार गोखले यांच्यासारख्या नेमस्तांनीं त्यांना औरंगजेबाची उपमा दिली होती. मग जहाल पुढारी त्यांच्यावर किती जळफळत असतील ? लाला लजपतराय यांनीं आपल्या पुस्तकांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, " हिंदुस्थानच्या राजकारणांत बॉंब व पिस्तुलें येण्यास जर कोणी कारणीभूत झालें असेल तर हे कर्झन, मॅकडोनल व सिडेनहॅम. ज्या हिंदी तरुणांनीं हीं विध्वंसक साधनें वापरलीं ते खरोखर निरपराधी होत. खरे गुन्हेगार हे कर्झन व सिडेनहॅम होत. तेव्हां हिंदी अत्याचाराबद्दल त्यांनाच खरोखर फांसावर चढविलें पाहिजे. "

अशा कडक व्हाइसरॉयच्या जागीं ब्रिटिश सरकारनें सौम्य-शीतल स्वभावाचा व्हाइसरॉय पाठविला. त्याचें नांव लॉर्ड हार्डिंज. त्यानें नव्या राजधानींत ता. २३ डिसेंबर १९१२ रोजीं मोठ्या थाटामाटानें प्रवेश केला. एका विशाल व शृंगारलेल्या हत्तीवरून बड्या लाटांची मिरवणूक दिल्ली स्टेशनापासून निघाली. हत्तीवर हौदा होता तो रुप्याचा. या मुख्य हत्तीच्या पाठीमागें संस्थानिकांच्या हत्तींची रांग झुलत होती. सरकारी प्रमुख अधिकारीहि हत्तीवरच. जणुं सम्राटाचीच स्वारी चालली आहे, असा या मिरवणुकीचा थाट होता. मिरवणूक चांदणी चौकांत आली. चौकांत माणसें चांदण्याइतकीं असंख्य होतीं. त्यांनीं व्हाइसरायाला पहातांच टाळ्यांचा गजर केला—इतक्यांत.....

धडाड् धुम् !—स्फोट झाला ! त्याचा आवाज सहा मैलांवर ऐकूं गेला. हार्डिंज यांचें शिरस्त्राण डोक्यावरून खालीं रस्त्यावर पडलें. उकळतें तेलच अंगावर पडावें, तसें व्हायसरॉयांना क्षणभर वाटलें. त्यांनीं मागें वळून पाहिलें, तर छत्र धरून उभा राहणारा हुजऱ्या ठार झाला आहे आणि त्याचें प्रेत हौद्याला बांधलेल्या दोरखंडांत अडकून लोंबकळत आहे. थोड्याच वेळांत व्हायसरॉय बेशुद्ध पडले. त्यांना शरीर-संरक्षकानें झोळींतून हत्तीवरून खालीं नेलें. हत्तीवरील दुसऱ्या हुजऱ्यालाहि तीस-चाळीस जखमा झाल्या व स्फोटाच्या आवाजानें तो कायमचा बहिरा झाला.

व्हाइसरॉयांच्या जखमा बऱ्या होण्यास पुष्कळ काळ लागला. त्यासाठीं शस्त्रक्रिया करावी लागली. त्यांच्यावर बॉंब फेकणारा माणूस पुढें सांपडला. तो अत्याचार होतांच डेहराडून येथें गेला व अत्याचाराच्या निषेधाच्या सभा भरविण्यांत पुढाकार घेऊं लागला. त्यानें आपल्याला सलाम केल्याचा उल्लेख लॉर्ड हार्डिंज यांनीं आपल्या आठवणींत केला आहे.





देशोदेशींची उठावणी

हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांत, नाना शहरीं, क्रांतिकारकांचीं गुप्त मंडळें सशस्त्र क्रांतीचे कट रचीत होतीं. त्याचबरोबर बाहेरदेशांतून शस्त्रास्त्रांची आवक पण चालू होती. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, कॅनडा, कॅलिफोर्निया, मेक्सिको वगैरे देशांत हजारों हिंदी तरुण विद्याभ्यासासाठीं गेलेले होते. त्या सर्वांची कुमक हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-लढ्यास मिळावी म्हणून १९११ सालापासून क्रांतिकारक-नेत्यांचे प्रयत्न सुरू झाले. त्यांतील प्रमुख नेते म्हणजे लाला हरदयाळ. लालाजींनीं अमेरिकेंत नवा पक्ष स्थापन केला. त्याचा स्थापना-दिन ता. १० मे १९१३. सत्तावन सालचा क्रांति–दिनहि १० मेच! त्या राजकीय मुहूर्तावर

भारतामध्यें क्रांति करण्यासाठीं 'गदर-पार्टीची' स्थापना झाली. गदर म्हणजे क्रांति. या पक्षानें 'गदर' नांवाचें एक वर्तमानपत्रहि चालविलें होतें. सान्फ्रान्सिस्को ह्या शहरांतून गदरचा पहिला अंक ता. १ नोव्हेंबर १९१३ रोजीं निघाला. हिंदी, उर्दू, गुरुमुखी, गुजराती वगैरे देशी भाषांतूनहि त्याच्या आवृत्त्या निघाल्या. तें पत्र सर्व हिंदी लोकांना मोफत वांटलें जाई.

१९१७ सालीं मार्च महिन्यांत ब्रिटिश सरकारच्या मागणीवरून अमेरिकन सरकारनें त्यांना पकडलें. त्या वेळीं त्यांना मोकळे करण्यासाठीं जामीन देण्यास मोठमोठे अमेरिकन लोकहि पुढें आले. भारंभार सोनें जामीन ठेवून त्यांची मुक्तता करण्यास धनिक लोक तयार होते. जामिनावर सुटून लालाजी स्वित्झर्लंड येथें गेले. पुढें त्यांनीं जर्मनीच्या कैसरशीं संधान बांधलें. हिंदुस्थानला स्वतंत्र करण्यासाठीं शस्त्रास्त्रांची मदत देण्याचें कैसरनें कबूल केलें. जर्मनीच्या युद्ध-समितीमध्यें लालाजींना स्थान मिळालें; परंतु पुढें जर्मनीकडून अपेक्षित साह्य मिळत नाहीं, असें पाहून लालाजी गुपचूप हॉलंडमध्यें आले.

◆

कोमागातामारू! किती विचित्र हें नांव. पण त्यानें मोठी धामधूम उडवून दिली होती. हें एका जपानी जहाजाचें नांव आहे. हें जहाज बाबा गुरुदत्तसिंह यांनीं भाड्यानें घेतलें होतें. हे शीख गृहस्थ सिंगापूरमध्यें कंत्राटदार होते. १९१३ सालीं कॅनडामध्यें जवळजवळ चार हजार हिंदी लोक होते. त्यांत

शीखच पुष्कळ होते. त्यांना आपल्या देशांतून घालवून देणारा एक कायदा कॅनडा सरकारनें केला. परतंत्र राष्ट्राचे ते पुत्र! त्यांची दाद कोण घेणार? ते हॉंगकॉंग येथें गेले. ता. ४ एप्रिल १९१४ रोजीं कोमागातामारू हॉंगकॉंगहून हललें. त्या जहाजांत ३५१ शीख व २१ पंजाबी मुसलमान होते. तें जहाज कॅनडाच्या बंदरास जाऊन पोंचलें; पण हिंदी लोकांना बंदरांत उतरण्यास कॅनडा सरकारनें बंदी केली.

मोठा तंटा सुरू झाला. कॅनडा सरकारनें आपलें पोलीसदल पाठविलें. जहाजांतील हिंदी लोकांनीं आपल्या शस्त्रांचा त्या पोलीसांवर मारा करून त्यांना पळावयास लावलें. कॅनडा सरकारचा अपमान झाला. तें खवळलें. त्यानें युद्धासाठीं दंड थोपटले. आपलें लढाऊ जहाज सामना देण्यास पाठविलें. मग तें बिचारें कोमागातामारू काय करणार? ता. २३ जुलै रोजीं तें तेथून परत गेलें. आमच्या पारतंत्र्याची ती जळती मशालच जणुं समुद्रावरून चालली होती. अनाथाला थारा कोण देणार? हॉंगकॉंगमध्यें थांबण्यासहि त्या जहाजास परवानगी नाकारण्यांत आली. लोकांजवळील पैसे संपले. खाण्यापिण्याची सामुग्री संपली. ब्रिटिश वकिलातीनें कांहीं मदत देण्याचें नाकारलें. जपान व हिंदुस्थान या सरकारामध्यें तारातारी झाली. अखेर नाइलाजानें ता. २७ सप्टेंबर १९१४ रोजीं कोमागातामारू हिंदुस्थानांत हुगळी नदीच्या संगमावर आलें.

हिंदी सरकारनें रेल्वेची खास गाडी त्यांच्यासाठीं तयार ठेवली होती. त्या दरबारी गाडींतून 'सरकारी पाहुणे' म्हणून पंजाबमध्यें

त्यांना धाडण्यांत येणार होते. पण ते वेडे शीख! त्यांना स्वातंत्र्याचें वेड लागलेलें. ते त्या खास गाडींत बसेतनाच. आपल्या टोळ्या बनवून ते कलकत्ता शहरांत हिंडूं लागले. हिंदुस्थान सरकार रागानें लाल झालें. त्यांनीं आपलें लष्कर बोलाविलें आणि त्या शिखांना सैनिकांकडून पकडलें. ते शीख सुखासुखी कसें पकडून देणार? ते स्वातंत्र्याची हवा खाऊन आले होते—संकटाचा समुद्र तरून आले होते—अमेरिकेच्चीं रिव्हॉल्वरें घेऊन आले होते. मोठा दंगा उसळला. गोळागोळी सुरू झाली. १८ शीख मारले गेले. पुष्कळांना पकडण्यांत आलें. सरकारी सैनिकहि बरेच कामास आले. पुढें त्या शिखांना सरकारनें आपआपल्या घरीं जाण्याची परवानगी दिली. कोमा-गातामारूचा हा विजयच नव्हे काय? त्यानंतर अमेरिका, फिलिपाईन्स, चीन, कॅनडा वगैरे देशांतून हिंदी लोक हिंदुस्थानांत आले. कारण त्या वेळीं महायुद्ध ऐन रंगांत आलें होतें. तेव्हां आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं 'हाच मुहूर्त, हीच वेळ!' असें प्रत्येक भारत-पुत्रास वाटत होते.

याशिवाय राजा महेंद्रप्रताप, कॉ. मानवेंद्रनाथ राय इत्यादि मातबर वीरांनीं परराष्ट्रांतून शस्त्रें आणण्याचे धडाडीचे प्रयत्न केले, पण ते सफल झाले नाहींत. गदर पक्षाच्या प्रेरणेनें सिंगापूर या नाक्याच्या ठिकाणीं ब्रिटिशांच्या हिंदी सैनिकांनीं बंड पुकारलें व सात दिवस आपली सत्ता चालविली; पण इंग्लंड, जपान व रशिया या तिन्ही सरकारांनीं एक होऊन तें बंड मोडून काढलें.

◆

'बंडासाठीं चार हजार लोक अमेरिकेंतून येथें आलेले आहेत. बंड सुरू होतांच आणखी वीस हजार हिंदी लोक येथें येऊन दाखल होतील.' अशी क्रांतीची ललकारी क्रांतिकारकांच्या एका बैठकींत दिली गेली. ही बैठक बनारस येथें बंगाली तोळा विभागांत रात्रीच्या वेळेस गुप्तपणें भरली होती. नुकतेच अमेरिकेहून आलेले विष्णुपंत पिंगळे यांनीं ती ललकारी पुकारली होती. पिंगळे हे तळेगांव-ढमढेरे येथील रहाणारे. बुद्धीनें मोठे तेजस्वी. खेळ खेळण्यांतहि पुढें. शक्ति इतकी कीं, एकदां त्यांनीं आपल्या वृद्ध वडिलांस पाठीशीं घेऊन सर्व सज्जनगड एका दमांत ते चढले. 'समर्थ विद्यालयां'च्या पहिल्या विद्यार्थ्यांपैकीं एक. विद्यालयाच्या इमारतीचा पाया खणण्यापासून खांब तासण्यापर्यंत त्यांनीं तेथील सर्व कामें केलेलीं होतीं. त्यांनीं मोंगलाईंत हातमागाचा धंदा सुरू केला; पण त्यांची आकांक्षा यंत्रज्ञ होण्याची. त्यासाठीं ते अमेरिकेस गेले. तेथें काबाडकष्टाचें काम करून त्यांनीं विद्यार्जन केलें. त्यांतील यश हाताशीं आलें असतांना युरोपांतील महायुद्धाच्या ज्वाळा भडकूं लागल्या. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि स्वातंत्र्ययुद्धाच्या ज्वाळा भडकूं लागल्या. आपल्या आईचें दास्य नष्ट करण्यासाठीं देशोदेशींचे हिंद-पुत्र, गरुडाप्रमाणें स्वातंत्र्याचा अमृत-कलश घेऊन हिंदुस्थानांत येऊं लागले. पिंगळ्यांनींहि विद्यार्जनावर पाणी सोडलें व ते स्वदेशीं परत आले.

सैन्य ही कोणत्याहि सरकारची अखेरची तटबंदी. ती उध्वस्त करण्याचें धाडस पिंगळे यांनीं दाखविलें. १९१५ च्या

फेब्रुवारींत राशबिहारी व पिंगळे अमृतसरला गेले. पुढें मीरत, आग्रा, कानपूर, अलाहाबाद, बनारस वगैरे शहरीं जाऊन पिंगळे यांनीं लष्कर फितविण्याचा प्रयत्न केला—म्हणजे हिंदी सैनिकांस हिंदी स्वातंत्र्यासाठीं लढण्याचा मंत्र दिला. बाँब सिद्ध झाले होते. शस्त्रें जमविलीं गेलीं होतीं. रेल्वे व तारायंत्रें उखडून टाकण्याची व्यवस्था झालेली होती. स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा, फार काय, स्वातंत्र्य-युद्धाची घोषणाहि लिहून काढली होती. ता. १ मार्च रोजीं सरकार हिंदी सैन्य युरोपांत पाठविणार होतें. त्याआधींच हा स्वातंत्र्य-लढा सुरू करण्याचा क्रांतिकारकांचा इरादा होता. लाहोरपासून सिंगापूरपर्यंत क्रांतीचा वणवा पेटविण्याचा प्रचंड व्यूह त्यांनीं रचलेला होता.

ता. १८ फेब्रुवारीची रात्र. लाहोर येथील मोछी गेटाजवळील एक घर. एकेक क्रांतिकारक निर्वाणीच्या धैर्यानें व गांभीर्यानें तेथें येत होता. सर्वजण जमले. राशबिहारी आले, पिंगळे आले, आणि—

पोलीसहि आले! फितुरी आमच्या पांचवीस पुजलेली! एका शिखानें सरकारला ह्या आगामी क्रांतीची वर्दी आगाऊच दिली होती. सशस्त्र पोलिसांनीं क्रांतिकारकांना गराडा घातला. त्यांचीं यंत्रें, शस्त्रें, वाङ्मय, त्यांचे युद्धाचे नकाशे, त्यांचें निशाणहि—सारें सारें कांहीं पोलिसांनीं जप्त करून नेलें. निसटले काय ते क्रांतिकारकाचे दोन प्राण—पिंगळे व राशबिहारी!


शूराला निराशा माहीत नसते. हे दोघे क्रांतिवीर बनारस येथें गेले आणि लगेच नव्या लढ्याची योजना त्यांनीं आंखली. पिंगळे


मीरतला निघाले. त्यांच्याबरोबर एक ट्रंक होती. तींत काय होते? अठरा बॉंब! कसले? एक एक बॉंब लष्कराची अर्धी पलटण नामशेष करील असा! मीरत येथील लष्करी घोडदळांतील लोक पिंगळ्यांनीं युद्धास सिद्ध केले. आणखी कार्य करण्यासाठीं पिंगळे ता. २३ मार्च १९१५ रोजीं पुन: गेले. तेथें त्यांना आमच्या नित्याच्या प्राणघातक राष्ट्रीय रोगानें गांठलें. तो रोग म्हणजे फितुरी!

सरकारला सुगावा लागला आणि त्यांनीं आपल्या छावणींत त्या अठरा बॉंबसह बसलेल्या पिंगळ्यांना अटक केली. अटकेंत त्यांचा अमानुष छळ झाला. एका खास न्यायमंडळापुढें त्यांचा खटला चालू झाला. आरोपींची संख्या ८१ होती. सशस्त्र युद्धाचा आरोप त्यांच्यावर होता. हा खटला लाहोर येथें गुप्तपणें चालला. सहा जणांना फांशी देण्यांत आलें व चाळीस जणांस काळेपाण्यावर पाठविण्यांत आलें. ता. १४ सप्टेंबर १९१५ रोजीं फांशींची शिक्षा पिंगळे यांच्या कानीं पडली आणि ते उद्गारले, 'बस्स्! इतकीच?'

ता. १६ नोव्हेंबर १९१५ हा पिंगळे यांच्या आत्म-विसर्जनाचा दिवस. सकाळीं सहाचे ठोके पडले आणि पिंगळे यांनीं धैर्यानें आपली मान स्वत:च फांसांत अडकविली. 'शेवटची इच्छा काय?' असें अधिकाऱ्यांनीं विचारलें असतांना ते शांतपणें म्हणाले, 'मला ईश्वराची प्रार्थना दोन्हीं हात जोडून करूं द्या. त्यासाठीं हातांतील बेड्या काढा.' पिंगळे यांची अखेरची प्रार्थना कोणती होती?

"मातृभूमीला स्वतंत्र करणें ही एकच माझी इच्छा होती. मी जें कांहीं केलें तें या एकाच उद्देशानें होय! कोणत्याहि जातीचा, पंथाचा अथवा व्यक्तीचा द्वेष करून अथवा स्वार्थमय आकांक्षा अंतःकरणांत बाळगून नव्हे! हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हेंच माझें अंतिम ईप्सित आहे....ज्या पवित्र कार्यासाठीं आमचे प्राण आम्हीं बलिदान करीत आहोंत, तें कार्य तूं पूर्ण कर, हीच माझी ईश्वरापाशीं शेवटची प्रार्थना आहे!"





लालाजींच्या हत्येचा सूड

आझादी और जिंदगी एक बात है।
गुलामी और मौत एक बात है॥

स्वातंत्र्य म्हणजे जीवन व पारतंत्र्य म्हणजे मरण, हें तत्त्व कोणाला कळत नाहीं? पण त्यासाठीं तळहातावर शिर घेऊन प्रयत्न करीत राहाणारा वीर विरळाच!

अशा शूरांच्या मालिकेंत शोभणारे एक पंजाबी तरुण सरदार भगतसिंग होते. त्यांचा जन्म १९०७ सालीं एका क्रांतिकारक कुटुंबांत झाला. त्यांचे एक चुलते देशाच्या स्वातंत्र्यापायीं परागंदा झालेले होते, तर दुसरे चुलते तुरुंगांत मृत्यु पावले होते. खुद्द त्यांचे वडील हेहि कारावास भोगलेले देशभक्त होते. देशभक्तीचें बाळकडूच भगतसिंगांना मिळालेलें

होतें. इंग्रजांचा द्वेष त्यांच्या घराण्यांत भरून राहिलेला होता. परक्या सत्तेचा सूड घेण्याची भावना त्यांच्या रोमरोमांत भिनलेली होती. त्या भावनेवर राष्ट्रीय वृत्तीचे संस्कार घडविणारेंच शिक्षण त्यांना मिळालें. पंजाबचे सिंह लालालजपतराय यांनीं स्थापन केलेल्या संस्थेंत त्यांनीं तीन वर्षें शिक्षण घेतलें. त्यांना स्वातंत्र्याचा ध्यास लागला. स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं आपलें जीवन अर्पण करण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यामुळें वडिलांनीं ठरविलेला विवाह त्यांनीं मोडून टाकला. संसाराच्या पाशांत ते अडकले नाहींत.

देशांतील व परदेशांतील स्वातंत्र्यभक्तांचीं व हुतात्म्यांचीं चरित्रें भगतसिंगांच्या तरुण डोळ्यांपुढें नाचूं लागलीं. छत्रपति शिवाजी-महाराज हे तर त्यांचे आदर्शच ! पुढें एकदां ते महाराष्ट्रांत आले असतांना शिवरायांच्या राजधानीचें—रायगडाचें—दर्शन घेऊन आले. एवढेंच नव्हे तर तेथील पवित्र व स्फूर्तिप्रद मृत्तिका भाक्तिभावानें आपल्या मस्तकीं लावून भगतसिंगांनीं आपली स्वातंत्र्य-संपादनाची प्रतिज्ञा दृढतर केली.

प्रत्यक्ष क्रांति-कार्यांत प्रवेश करण्यासाठीं भगतसिंग उत्सुक होते. ‘हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी’ ह्या नांवाची एक गुप्त संस्था १९२२ सालीं श्री. शचींद्रनाथ यांनीं स्थापन केलेली होती. याच संस्थेनें १९२५ सालीं काकोरीचा कट रचला होता.

काकोरी हें लखनौपासून आठ मैलांच्या अंतरावर लहानसें स्टेशन आहे. तेथें ता. ९ ऑगस्ट १९२५ रोजीं एक रोमांचकारक घटना घडली. संध्याकाळची वेळ. शहाजहांपूर स्टेशनाहून एक आगगाडी काकोरीकडे निघाली होती. तिच्यांत

रेल्वेचा खजिना असल्यानें रक्षणाकरितां सशस्त्र पोलीस होते. कांहीं गोरे लष्करी सैनिकहि होते. त्यांचे एक अधिकारी सेकंड क्लासमध्यें बसले होते. गाडी धाड्धाड् करीत चालली होती.

तीन तरुण दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत शिरले आणि त्यांनीं धोक्याची सांखळी जोरानें ओढली. गाडी उभी राहिली. उतारू लोक खिडक्यांतून काय झालें म्हणून पाहूं लागले. गार्डसाहेबहि तेथें आले; पण त्यांना पिस्तूल झाडून जमिनीवर लोळण घ्यावयास लावलें. दुसऱ्या सात क्रांतिकारकांनीं खजिन्याच्या डब्यावर हल्ला करून तिजोरी फोडण्याचा प्रयत्न केला. काळेगोरे सैनिक स्तिमित होऊन स्वस्थ बसले. मेजरसाहेबांनीं तर आपल्या खिडकीचीं दारें लावून घेऊन लखनौ स्टेशन आल्यावर तीं उघडलीं !

एवढ्या या धाडसाची फलश्रुति काय ? तर फक्त पांच हजार रुपयांची प्राप्ति. ' हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन ' या क्रांतिकारक संस्थेच्या सभासदांनीं ही लूट केली. कशासाठीं ? तर एका जहाजावरील शस्त्रांचा मोठा सांठा विकत घेण्यासाठीं. त्यासाठीं लाखों रुपयांची जरुरी होती, पण मिळाले फक्त पांच हजार रुपये! अन् त्याची किंमत किती ? तर सात जणांना काळे पाणी आणि चौदा जणांना ३ वर्षें सक्तमजुरी ! काकोरी कटाचा खटला चालविण्यासाठीं सरकारला १० लाख रुपये खर्च आला.

' हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी ' या संस्थेची एक सभा दिल्ली येथें १९२८ च्या सप्टेंबरमध्यें भरली. तींत पुढील

देशव्यापी कार्याची आंखणी करण्यांत आली. लोकशाहीप्रमाणेंच समाजवादी व्यवस्थाहि स्वतंत्र भारतांत निर्माण व्हावी, हें तत्त्व सर्वांना पसंत पडलें होतें. त्याचें द्योतक म्हणून त्या संस्थेचें नांव 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी' असें नव्यानें ठेवण्यांत आलें. तिचे सेनापती चंद्रशेखर आझाद हे ठरले. 'वंदे मातरम्'चा जयघोष केल्याबद्दल त्यांना पूर्वी १५ फटक्यांची शिक्षा झालेली होती.

ब्रिटिश सरकार हिंदुस्थानच्या डोक्यावर नव्यानव्या अन्यायाचे घण मारीत होतें. त्यामुळें लोकमत तापत चाललें होतें. इकडे काँग्रेसनें १९२७ सालीं मद्रासच्या अधिवेशनांत स्वातंत्र्याचा ठराव मंजूर केला, तर सरकारनें 'सायमन कमिशन' नेमून हिंदी राष्ट्राचा अपमान केला. हिंदुस्थानला स्वराज्याचा पुढचा हप्ता केवढा द्यावा याची चौकशी करण्यासाठीं हे कमिशन नेमलें होतें. तें एकजात गोऱ्या सभासदांचेंच होतें. त्यांत एकाहि हिंदी माणसाला सभासद म्हणून घेतलेलें नव्हतें; त्यामुळें सर्व राजकीय पक्षांनीं त्याचा निषेध केला होता. मद्रास काँग्रेसनें तर त्या कमिशनवर बहिष्कार घालण्याचा आदेश राष्ट्रास दिला. राष्ट्रानें तो तंतोतंत पाळलाहि.

ज्या ज्या शहरीं सायमन कमिशन गेलें तेथें तेथें लोक काळीं निशाणें दाखवीत आणि 'परत जा!' अशा आरोळ्या ठोकीत. शहरांत सर्वत्र शुकशुकाट असे. आवाज निघे फक्त निषेधाचा. अलाहाबाद येथें या कमिशनच्या निषेधाची प्रचंड सभा भरली. तींत पुढाकार घेतला पं. जवाहरांच्या मातेनें. कारण

त्या वेळीं पंडितजी व मोतीलाल हे तुरुंगांत होते. पोलीसांनीं सभेवर लाठीमार केला; त्यांतील एक लाठी त्या साध्वीसहि लागली. तिच्या कपाळांतून रक्त वाहूं लागलें. हें वृत्त कळल्यावर पंडितजींना वाटलें, 'आपण जर आपल्या मातेजवळ असतों तर अहिंसेचें तत्त्वज्ञान गुंडाळून ठेवून पोलीसांना प्रतिकार केला असता.' ही आपली भावना त्यांनीं आत्मचरित्रांत नोंदलेली आहे.

जें अलाहाबादला तेंच लाहोरला. तेथें हें धिक्कार व तिरस्कार पावलेलें कमिशन ता. ३१ ऑक्टोबर १९२८ रोजीं जाऊन पोचलें. स्टेशनवरच पंचवीस हजार लोकांनीं, 'सायमन, परत जा!' अशीं स्वागताची ललकारी सोडली! लोकांच्या हातांत काळीं निशाणें फडकतच होतीं. त्यांच्या अग्रभागीं लाला लजपतराय उभे होते. लोकांचा उत्साह, ऐक्य, आवेश सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत व कानांत सलूं लागला. त्यांनीं लोकांवर लाठीमार सुरू केला. खुद्द पोलीस सुपरिंटेंडेंट मि. स्कॉट यानें स्वतः लालाजींच्या छातींत तीन ठोसे बेगुमानपणें लगावले. डेप्युटी सुपरिंटेंडेंट मि. सॉंडर्स यांनींहि अत्याचार केले. या मारामुळें लालाजी आजारी पडले आणि ता. १७ नोव्हेंबर १९२८ रोजीं स्वर्गवासी झाले. 'मला दिलेले ठोसे म्हणजे ब्रिटिश साम्राज्य-शाहीच्या शव-पेटिकेला ठोकलेले खिळे ठरतील!' असे उद्गार लालाजींनीं काढले होते.

हे उद्गार खरें कोणी केले? शरपंजरीं पडलेल्या भीष्माचार्यांना तहान लागली होती. तेव्हां भूमींत तीर मारून भूगर्भांतून

पाण्याचा झरा वर आणणारा अर्जुन तेथें होता. तसा शिष्य लालाजींना लाभला. भगतसिंगप्रभृतींनीं डिसेंबरमध्यें एका घरांत जमून निश्चय केला कीं, लालाजींच्या हत्येचा सूड म्हणून स्कॉटला मारलेंच पाहिजे.

ता. १७ डिसेंबरचा दिवस. दुपारीं ४ चा सुमार. पोलीस सुपरिंटेंडेंटच्या ऑफिसांतून एक फटफटी बाहेर पडली. तिचेवर स्कॉटच बसलेला असावा अशा समजुतीनें राजगुरूंनीं पहिली गोळी झाडली. सायकलस्वार जमिनीवर आदळला. भगतसिंगांनीं त्यांवर २।३ गोळ्या झाडल्या. तो पोलीस-अधिकारी ठार झाला, पण तो स्कॉट नव्हता—सॉंडर्स होता. त्याचा हुजऱ्या छननसिंग क्रांतिकारकांचा पाठलाग करूं लागला. तेव्हां चंद्रशेखरांनीं त्याच्यावर गोळी झाडली. तो पुढें दवाखान्यांत मेला. सरकारनें सर्व प्रांतांत झडत्या घेऊन धरपकडी केल्या. सरकारनें क्रांतिकारकांना पकडून देण्यासाठीं मोठीं बाक्षिसें लावलीं. त्याहून मोठ्या बक्षिसांचे फलक भगतसिंगांनीं रक्ताक्षरांत लिहून लाहोर येथें लावले आणि आपल्या कृत्याचे पोवाडे गाणारीं पत्रकें लाहोरमध्यें फडकावलीं.

दिल्लीच्या विधिमंडळांत बॉंब फेकण्याबद्दल भगतसिंग व दत्त यांना काळेपाण्याची शिक्षा झाली. त्यानंतर त्यांच्यावर सॉंडर्सच्या खुनाचा खटला ता. १० जुलै १९२९ रोजीं सुरू झाला. त्यापूर्वीं तुरुंगांतील अन्याय दूर करण्यासाठीं भगतसिंगांनीं पंधरा दिवस उपवास केला. त्या अन्नत्यागाच्या मुदतींतच त्यांच्यावर लाहोरचा खटला सुरू झाला. इतर तुरुंगांतील बऱ्याच



राजबंद्यांनीं अन्नत्याग केला. त्यांतील जतींद्रनाथ दास हे बासष्ट दिवसांच्या उपवासानंतर मरण पावले. मग सरकारनें जागें होऊन कांहीं तुरुंग-सुधारणा केल्या.

कच्च्या कैदेंत पोलीसांनीं या क्रांतिकारकांवर जुल्म केला. न्यायाधीशहि त्यांची दाद घेईनात. तेव्हां भगतसिंग वगैरेंनीं न्यायमंदिरांत जाण्याचें नाकारून पुनः अन्नत्याग सुरू केला. ता. ८ ऑक्टोबर १९३० रोजीं न्यायाधिशांनीं भगतसिंग, राजगुरु व सुखदेव या तिघांना सॉंडर्सच्या खुनाबद्दल फांशीची शिक्षा दिली. बाकीच्या बारा क्रांतिकारकांना काळेपाण्यापर्यंत शिक्षा ठोठावल्या.

व्हाइसराय म्हणजे तेव्हांच्या हिंदुस्थानचा हुकूमशहा! त्याच्यावर बॉंब फेकण्याचे जसे कांहीं प्रयत्न झाले; तसेंच त्याचे आगगाडी उलथविण्याचे व्यूहहि रचण्यांत आले. त्या सर्वांत

अत्यंत पद्धतशीर व आधुनिक साधनांनीं सज्ज असा प्रयोग ता. २३ डिसेंबर १९२९ रोजीं चंद्रशेखर आझाद यांनीं केला. पुढें पोलिसांशीं लढतां लढतां ते धारातीर्थी मरण पावले.

◆

बंगालमधील चटगांव येथील सरकारी शस्त्रागारावर ता. १८ एप्रिल १९३० रोजीं रात्रीं एकावन्न तरुणांनीं हल्ला केला व शस्त्रें लुटलीं. यानंतर सातच महिन्यांत तेथील युरोपियन क्लबावर प्रीति नांवाच्या पदवीधर तरुणीनें दहाबारा क्रांतिकारकांसमवेत हल्ला केला. कलकत्ता विद्यापीठाचा पदवीदान-समारंभ चालला असतां बंगालच्या गव्हर्नरवर वीणादास नांवाच्या विद्यार्थिनीनें ता. ६ फेब्रुवारी १९३२ रोजीं गोळ्या झाडल्या.

मुंबईचे हंगामी गव्हर्नर हॉटसन यांचेवर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत, ता. २२ जुलै १९३१ रोजीं वासुदेव बळवंत गोगटे या विद्यार्थ्यानें गोळीबार केला. कारण सोलापूर येथें लष्करी कायद्याखालीं सरकारनें केलेला अनन्वित जुलूम! त्याचप्रमाणें १९१९ सालीं जालियनवाला बागेंत जें हत्या-कांड झालें, त्याचा सूड म्हणून, सरदार उधमसिंगांनीं, लंडन येथील एका सभेंत, सर मायकेल ओडवायर यांस गोळी घालून ठार केलें. ता. ५ जून १९४० रोजीं त्यांना फांशीची शिक्षा ठोठावण्यांत आली. ती ऐकतांच त्यांनीं घोषणा केली—

'इन्किलाब झिंदाबाद'

◆◆
◆



करेंगे या मरेंगे

१०२८ लोक ठार—३२०० माणसें जखमी;

६०२२९ सैनिकांना कैद—२६००० ना शिक्षा;

१८००० इसम स्थानबद्ध—५३८ वेळां गोळीबार;

१९२ पोलीस-स्टेशनें भस्मसात्;

४९४ सरकारी इमारतींची जाळपोळ;

३१८ रेल्वे-स्टेशनांना आगी;

३०९ पोस्ट-ऑफिसें जळालीं.

ही हानि कोणत्या युद्धांतली? कोणत्या राष्ट्रांनीं ती केली? कोणत्या शस्त्रांनीं ती घडविली? आणि किती काळांतील ही हानि?

अवघ्या पांच महिन्यांत इतकी भयंकर हानि हिंदुस्थानांत झाली. हे आंकडे ब्रिटिश सरकारचे आहेत. खरे आंकडे जास्तच असतील! एका बाजूला सर्व आधुनिक शस्त्रास्त्रांनीं सज्ज असें ब्रिटिश सरकार व दुसऱ्या बाजूला दीडशें वर्षें निशस्त्र केली गेलेली हिंदी प्रजा—यांच्यांतील हा लढा होता. ब्रिटिशांची बाजू साम्राज्याची, सामर्थ्याची व स्वार्थाची होती; तर हिंदुस्थानची बाजू स्वातंत्र्याची, सत्याची व न्यायाची होती. पोलीस व सैन्य हा ब्रिटिशांचा मुख्य आधार, तर जनता-जनार्दन हा हिंदुस्थानचा पाठीराखा.

हिंदुस्थानाला स्वतंत्र होण्याची इच्छा, तो परतंत्र झाला त्या क्षणापासूनच होती. पण ‘ स्वातंत्र्य हें आमचें ध्येय आहे ’ असा स्पष्ट ठराव १९२७ मध्यें कॉंग्रेसनें केला. हिंदी स्वातंत्र्याचें तिरंगी निशाण १९२९ मध्यें लाहोर येथें पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं उभारण्यांत आलें. लंडनमध्यें १९३१ सालीं गोलमेज परिषदेच्या वेळीं गांधीजींनीं हिंदी स्वातंत्र्याचा मुक्त कंठानें उच्चार केला. १९४२ सालीं हिंदुस्थानच्या दाराशीं महायुद्ध आलें. विजगापट्टण व कोकोनाडा या हिंदी शहरांवर जपाननें बॉंबहल्ले केले. तेव्हां जपानचा प्रतिकार परिणामकारकपणें करतां यावा, म्हणून गांधीजी वारंवार लिहूं लागले कीं, ‘ ब्रिटिश सत्तेनें हिंदुस्थानांतून आपलें ठाणें उठवावें. जपान येथें आला,

तर इंग्लंडच्या हातचा फक्त एक देश जाईल पण आमचें सर्वस्वच बुडालें असें होईल. म्हणून आम्हांला जपानचा हल्ला परतविण्याची अधिक निकड आहे.'

गांधीजींच्या मुखानें सारें राष्ट्र बोलूं लागलें.

पण सापानें आपल्या गळ्याला गराडा घातला तरी कनवटीची कवडीहि काढून न देणारे कांहीं असतातच. तीच कंजूष वृत्ति ब्रिटिश सरकारनें दाखविली. त्यांनीं क्रिप्सबरोबर स्वातंत्र्याचें गांठोडें पाठविलें; पण जपानचा हल्ला हिंदुस्थानावर होत नाहीं, असें कळतांच त्यांतील मुद्देमाल काढून घेतला. त्यामुळें अवघा हिंदुस्थान संतप्त झाला. सारें राष्ट्र एकमुखानें सरकारचा निषेध करूं लागलें. सारा समाज तुफान समुद्राप्रमाणें खवळून गेला. चोहोंबाजूंनीं गांजलेल्या जनतेच्या चित्तांत असंतोष रटरटा शिजूं लागला. प्रत्येक माणसाच्या हृदयांतील स्वातंत्र्यप्रेमाची ज्योत आतां इतकी पेटली कीं, त्या सर्व ज्योती एकमेकींत मिसळून त्या सर्वांची मिळून गगनाला स्पर्श करणारी व जगताला दिपवून सोडणारी अशी प्रचंड ज्वाला निर्माण झाली. तिचें नांव लोकांनीं ठेवलें— .... Q

Q म्हणजे **Quit India**. इंग्रजी सत्तेनें हिंदुस्थानांतून निघून जावें असा याचा अर्थ. "हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य हवें आणि आम्हीं तें मिळविणारच," हा कोट्यवधि हिंदी लोकांचा आत्मविश्वास व निर्धार त्यांत सांठविलेला आहे.

ता. ७ ऑगस्ट १९४२ चा दिवस. मुंबई येथें गवालिया टँकच्या मैदानावर हजारों स्त्री-पुरुष एकसारखे लोटत होते—

युद्धाच्या जोशानें बेहोष झालेले होते—स्वातंत्र्याच्या लालसेनें वेडे झाले होते. सैनिकांची वीरश्री सर्वांच्या मुखावर खेळत होती. आपल्या स्वातंत्र्य-युद्धांतील अखेरचा घनघोर लढा आतां सुरू होणार, ह्या अपेक्षेनें कार्यकर्त्यांचे बाहु स्फुरण पावत होते. इंग्लंड, चीन, अमेरिका वगैरे देशोदेशींचे वार्ताहर तेथें येऊन, आपलीं कलमें व कॅमेरे घेऊन सज्ज होऊन बसलेले होते. हिंदी स्वातंत्र्याचा निर्णायक लढा आतां सुरू होणार, ही त्यांना खात्री होती. त्या लढ्याचें पहिलें बिगुल वाजल्याची बातमी जगाच्या कानावर सर्वांच्या आधीं कोण घालतो, याविषयीं त्यांच्यामध्यें स्पर्धा लागली होती.

'आम्हांला स्वातंत्र्य द्या आणि आमचें सहकार्य घ्या' अशी रोकडी भाषा राष्ट्रसभेचे अध्यक्ष मौलाना आझाद यांनीं खणखणीत आवाजांत काढली.

आणि पं. नेहरू तर काय? आपल्या अंत:करणांतील आगच बाहेर ओतीत होते. १९०८ सालीं सुरतेच्या कॉंग्रेसमध्यें लो. टिळक ज्या ईर्ष्येनें, धैर्यानें व आवेशानें उभे ठाकले; तसेच जवाहरलाल ह्या सभेंत तळपले. त्यांच्या रूपानें जणूं कांहीं संतप्त असा तरुण भारतच, अस्तन्या मागें सारून, सरकारला युद्धाचें आव्हान देत होता. त्यांच्या मुखांतून असे जळजळीत उद्गार बाहेर निघाले, "माझे देशबांधव गरिबींत—भयंकर गरिबींत—काळ कंठीत आहेत. हें मानवतेचें हिडीस स्वरूप पाहिलें कीं माझा संताप अनावर होतो, रात्रींच्या रात्रीं मला झोंप येत नाहीं! सत्ता नाहीं, शस्त्र नाहीं अशा असहाय्य

स्थितींत जपान स्वारी करून आला तर काय करूं ? मी काय करूं ? स्वातंत्र्यासाठीं चालविलेला झगडा थांबविण्यास आम्ही तयार नाहीं. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं आम्ही जगत आहोंत आणि त्यासाठीं प्राणार्पण करण्याचीहि आमची तयारी आहे. हिंदुस्थानांतील मोडक्या व डळमळत्या राज्ययंत्राशीं मला कांहींहि कर्तव्य नाहीं. ''

पं. नेहरूंनींच स्वातंत्र्याचा ठराव सभेपुढें मांडला. हा ठराव म्हणजे स्वातंत्र्याचा एक विस्तृत प्रबंधच आहे. " हिंदुस्थानच्या उत्कर्षासाठीं व संयुक्त राष्ट्रांना महायुद्धांत विजय मिळण्यासाठीं, हिंदुस्थानांतून ब्रिटिश सत्तेचें तत्काळ उच्चाटन होणें अत्यंत निकडीचें आहे. तसें न झाल्यास परतंत्र हिंदुस्थान स्वत:चें संरक्षण करण्यास व जगांतील स्वातंत्र्य वाढविण्यास असमर्थ ठरेल. '' अशी भूमिका प्रारंभीं मांडून या ठरावानें जगाच्या कानावर हिंदुस्थानची आकांक्षा ठसठशीत शब्दांनीं घातली. ते ऐतिहासिक महत्त्वाचे शब्द असे होते—" स्वातंत्र्य हा हिंदुस्थानचा जन्मसिद्ध हक्क आहे. अहिंसेच्या तत्त्वावर आधारलेलें व्यापक लोक-युद्ध सुरू करण्याला ही समिति मंजुरी देत आहे. गेल्या २२ वर्षांच्या अवधींत झालेल्या सनदशीर झगडयांतून देशांतील लोकांनीं अहिंसक सामर्थ्याचा जो संचय केला, तो सारा या लोकयुद्धांत उपयोजितां येईल. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ही आशियांतील इतर सर्व परतंत्र देशांच्या स्वातंत्र्याची आगामी सूचना आणि प्रस्तावना ठरली पाहिजे. ब्रह्मदेश,

मलाया, इंडोचायना, डच इंडीज, इराण आणि इराक या देशांनाहि हिंदुस्थानच्या मागोमाग स्वातंत्र्य मिळालें पाहिजे."

या ठरावांत ध्येयवाद व व्यवहार यांची उत्तम सांगड घातलेली आहे. हिंदी स्वातंत्र्याची घोषणा होतांच प्रमुख पक्षांचें एक हंगामी मंत्रि-मंडळ बनविण्यांत येईल आणि मग स्वतंत्र हिंदुस्थान हा संयुक्त राष्ट्रांच्या बाजूनें जपानशीं युद्ध खेळेल. तें युद्ध यशस्वी होण्यासाठीं विदेशी सैनिकांना हिंदुस्थानांत रहाण्यास मुभा मिळेल. अशी तपशिलवार योजनाहि ह्या ठरावांत आंखलेली आहे; त्याचप्रमाणें हें 'हंगामी हिंद सरकार' घटना-समिती भरवील व तिच्याकडून राज्यघटना तयार करवून घेईल, असा भावी कार्यक्रमहि ह्या ठरावांत नमूद केलेला आहे. ही राष्ट्राची मागणी ब्रिटिश सरकारनें नाकारली, तर मात्र सामुदायिक लढा सुरू करण्यास ह्या ठरावानें संमति दिलेली आहे. अहिंसा हा ह्या लढ्याचा प्राण राहील, अशी सक्त शर्त त्यांत आहे. 'किसान कामगारांचें प्रजाराज्य" हें स्वतंत्र भारताचें ध्येय राहील. कारण सर्व सत्ता 'मुख्यतः त्यांचीच आहे.' असा उच्च व पुरोगामी ध्येयवादहि त्यांत गोवलेला आहे.

आपल्या या कडक औषधाला अहिंसेचें अनुपान सांगण्यास गांधीजी विसरले नाहींत. "तुमची श्रद्धा नसली तर धोरण म्हणून तरी तुम्हीं अहिंसेचें पालन कांटेकोरपणें करा!" असें त्यांनीं हिंदी लोकांना जीव तोडून सांगितलें. त्या अहिंसक लढ्याचें एक अंग म्हणूनच त्यांनीं सरकारशीं वाटाघाट करण्याची इच्छा प्रदर्शित केली. यापूर्वीं त्यांनीं जेव्हां-जेव्हां

लढे केले, तेव्हां-तेव्हां त्या लढ्यांची आगाऊ सूचना त्यांनीं दिलेली होती व लढा टाळण्यासाठीं समेटाचा मार्गहि दाखवून दिला होता. वयाच्या पंचविसाव्या वर्षांपासून म. गांधींचा सारा जन्म सतत लढे खेळण्यांत गेला; तरी त्यांचा जीव शांततेसाठीं, समेटासाठीं व सहकार्यासाठीं सदैव हपापलेला असे. व्हाइसरायांना भेटून मगच 'चले जाव' चा लढा सुरू करावयाचा असा त्यांचा निश्चय होता. पण सरकारनें त्यांचा सहकार्याचा हात झिडकारून भेटीचा दरवाजा बंद केला; एवढेंच नव्हे तर ता. ९ रोजीं ऐन पहांटेच म. गांधी, मौलाना आझाद, पं. नेहरू, सरदार पटेल वगैरे थोरथोर नेत्यांची धरपकड तडकाफडकी केली आणि त्यांना डांबून ठेवलें.

कोठें ?—राष्ट्राला कळेना ! कां ?—कोणाला कळेना !

सरकारनें त्यांना अज्ञात स्थळीं नेलें—त्यांचा ठावठिकाणा कोणासहि लागू दिला नाहीं.

आधींच जनता महायुद्धानें हैराण व संतप्त झालेली ! त्यांत तिच्या प्रिय व पूज्य पुढाऱ्यांवर सरकारनें अकस्मात् झडप घातलेली आणि त्यांच्या वास्तव्याबद्दल, प्रकृतीबद्दल गुप्तता राखलेली. मग सारें राष्ट्र बेभान झाल्यास नवल काय ? लोकांना विलक्षण चेव आला.

"जेथून तेथून पेटला सारा देश" अशी स्थिति सर्वत्र झाली. शांत दिसणारा महासागर तुफान खवळला. स्वस्थ बसलेला शेष सहस्र मुखांनीं विष ओकूं लागला. थंड भासणारा ज्वालामुखी धुळीचे, धुराचे, आगीचे लोट अस्मानापर्यंत दाही


दिशांनीं फेकूं लागला. फ्रेंच राज्यक्रांतींत मोकाट सुटलेल्या जनतेनें जें रौद्र रूप धारण केलें, त्याचें दर्शन हिंदुस्थानांतील शहरांशहरांतून व खेडयाखेडयांतून होऊं लागलें. ‘ करेंगे या मरेंगे ’ हा गांधीजींनीं दिलेला मंत्र देशभर घुमूं लागला.

सरकारचीं मर्म-स्थानें टिपून ठेचण्यांत आलीं. सरकारचा गाडा चालू द्यावयाचा नाहीं असा जणु पैजेचा विडाच जनतेनें उचलला. रेल्वे असो, पोष्ट असो, तारायंत्र असो—सरकारची सारी व्यवस्थाच खिळखिळी करून टाकण्यांत आली. फार काय ? सरकारी कचेऱ्यांतील दसरें जाळण्यांत येऊन त्यांच्या इमारती, पोष्ट-ऑफिसें, रेल्वे-स्टेशनें, पोलीस-चौक्या जाळण्यांत आल्या, किंबहुना शाळांसारख्या निरुपद्रवी संस्थांच्या इमारतीहि पेटविण्यांत आल्या. परक्या सत्तेच्या साऱ्या खाणाखुणा खणून टाकण्यांत आल्या. ब्रिटिश सरकारचें पूर्ण उच्चाटन झाल्याचा देखावा अनेक प्रांतांत दिसूं लागला. संप व हरताळ यांमुळें जीवनाच्या नाडया आंखडल्या गेल्या. कोठें बॉंब उडाले, कोठें दरोडे पडले, कोठें साहेबी टोप्यांच्या होळ्या झाल्या, कोठें रेल्वेचे पूल उडविण्यांत आले, तर कोठें सरकारी कचेऱ्यांवर, हजारों लोकांचे मोर्चे जाऊन त्यांनीं तेथील ब्रिटिश सरकारचें युनियन जॅक फेकून देऊन, स्वातंत्र्याचें तिरंगी निशाण फडकविलें. जनतेनें कैक ठिकाणीं आपलीं स्वतंत्र अशीं ‘ प्रति-सरकारें ’ स्थापलीं व महिनानुमहिने चालविलीं.

मग सरकार काय ? नंगेच बनलें ! आधींच तें परकें, त्यांत साम्राज्याची दारू प्यालेलें ! तशांत महायुद्धाचा वृश्चिक-दंश

त्याला झालेला आणि अशा स्थितींत काँग्रेसनें "चले जाव!"-चा सोटा त्याच्या डोक्यांत मारलेला; त्यामुळें त्यानें सारा ताळतंत्र सोडला. साऱ्या काँग्रेस-संस्था सरकारनें बेकायदा ठरविल्या. साऱ्या काँग्रेस-पुढाऱ्यांची गठडी एका आठवड्यांत वळली—साऱ्या मुद्रण-स्वातंत्र्याची, भाषण-स्वातंत्र्याची राख-रांगोळी केली! पोलीसांची लाठी स्त्री-पुरुषांवर बेगुमानपणें चालूं लागली. सैनिकांची बंदूक आंधळेपणानें जनतेवर आग ओकूं लागली. फार काय? लष्करी मशिनगन्स व ब्रेनगन्स हीं शस्त्रें निष्पाप नागरिकांवर मृत्यूचा वर्षाव करूं लागलीं. विमानांतून बाँबहि टाकण्यांत आले. पंचवीस हजारांवर नागरिक सरकारी अत्याचारामुळें ठार झाले, असा जनतेचा अंदाज आहे. लाखलाख रुपयांचे सामुदायिक दंड गांवागांवांवर बसविण्यांत आले. लहान लहान अपराधांसाठीं फटक्यांची शिक्षा देण्यांत येऊं लागली. साऱ्या राष्ट्राला एखाद्या तुरुंगाचें, लष्करी छावणीचें स्वरूप आलें.

अशा प्रकारें एका बाजूला रौद्र स्वरूपाचें रावणी सरकार व दुसऱ्या बाजूला जीर्णसृष्टीचा संहार करण्यासाठीं तांडव-नृत्य करणाऱ्या भगवान शंकराप्रमाणें काँग्रेस स्वातंत्र्यासाठीं सिद्ध झालेली. या दोन पक्षांच्या संघर्षांतून जे प्रसंग उद्‌भवले, ते कोणत्याहि युद्धकथेला शोभण्याइतके धैर्याचे व चातुर्याचे असून विस्मयकारक व रोमांचकारक आहेत.



रणशिंग फुंकलें

मुंबईंतील लाखों लोक ता. ९ रोजीं सकाळीं जागे झाले, ते एका अभूतपूर्व सृष्टींतच! उठून डोळे चोळून ते वर्तमान-पत्रें पहातात तों, त्यांत राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या आकस्मिक धरपकडीचें वृत्त भडकपणें छापलेलें. आपल्या डोक्यावर कोणी लोखंडी घण मारावा, तसें वाटून जनता सुन्न झाली. आदले दिवशीं रात्रीं दहा वाजेपर्यंत 'चले जाव!', 'करेंगे या मरेंगे!' 'इन्किलाब झिंदाबाद!' इत्यादि घोषणा त्यांच्या कानांत घुमत होत्या. त्याच आतां तोंडानें पुकारीत, हजारों तरुण त्याच गवालिया-टँककडे धांवत सुटले. कारण तेथें आज सकाळीं आठ वाजतां झेंडा-वंदन होणार होतें.

पण तेथें प्रत्यक्ष काय घडलें? सारें मैदान लाठीधारी पोलीसांनीं व्यापून टाकलें होतें. तरी त्यांना न जुमानतां लोकांनीं आपला तिरंगी झेंडा वर फडकविला आणि त्याला प्रणाम केला. सौ. अरुणा असफअल्ली यांचें भाषणहि झालें. पोलीसांचा लाठीमार सुरू झाला; त्यालाहि लोक दाद देईनात; म्हणून त्यांच्यावर अश्रुधूर सोडण्यांत आला. त्यामुळें चुरचुरणारे डोळे चोळीत लोक पांगले. घरोघर जातांना त्यांना काय दिसलें?

घे दगड कीं फेक दिव्यावर, धर ट्राम कीं लाव तिला आग, असें क्रांतीचें भयानक स्वरूप रस्त्यारस्त्यावर दिसत होतें. असे प्रकार सर्व दिवसभर व साऱ्या शहरभर चालू होते. मुंबापुरीचें नित्याचें यांत्रिक जीवन पार विस्कळीत झालें होतें. लोकसागरावर जणुं तुफानच माजलें होतें. एखाद्या नौकेप्रमाणें सारी मुंबापुरी डळमळत होती.

संध्याकाळीं दादरमध्यें शिवाजी-पार्कवर म. गांधी वगैरेंचीं भाषणें होणार, असें आदले दिवशीं जाहीर झालें होतें. त्या नेत्यांना तर सरकारनें अज्ञात स्थळीं नेलें होतें; त्यामुळें लोक अधिकच गोंधळले व खवळले. त्यांच्या कानीं वार्ता आली कीं, संध्याकाळच्या सभेंत सौ. कस्तुरबा भाषण करणार आहेत; पण त्यांनाहि अटक करण्यांत आली. तरी दुपारपासूनच लोक शिवाजी-पार्ककडे लोटत होते. संध्याकाळीं दोन लाखांवर समाज जमला. त्यांचें स्वागत करण्यास सशस्त्र पोलीस उभे होतेच. आधीं लाठीमार व नंतर अश्रुधूर यांचा सर्रास उपयोग त्यांनीं केला; पण

स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचें चिलखत नागरिकांच्या अंगांत होतें; त्यामुळें त्यांनीं ते सारे सरकारी अत्याचार आनंदानें सहन केले.

शेजारच्या घराघरांतून, माड्यामाड्यांतून बसलेल्या लोकांनीं रुमाल, टॉवेल, कपडे यांचा पाऊस पाडला. त्यांच्या आधारानें लोकांनीं अश्रुधुरापासून आपले डोळे बचावले व ते तेथेंच उभे राहिले. सर्व शहरांत त्या दिवशीं पोलीसांनीं पंधरा ठिकाणीं गोळीबार केला. त्यांत आठ माणस ठार व १६९ जखमी झालीं. सुमारें १५० लोकांना अटक झाली. ३४ पोलीस व ११ पोलीस-अधिकारी जखमी झाले. ता. १३ पर्यंत अवघ्या चार दिवसांत एक हजार लोकांना अटक झाली. ता. १० रोजीं १० ठिकाणीं पोलीसांनीं गोळीबार केला आणि ५ ठिकाणीं तर लष्करानेंहि गोळ्या झाडल्या. सोळा लोक ठार झाले व ११४ जखमी झाले.

◆

लाठी असो, गोळी असो, अश्रु-बॉंब असो—कशालाहि जनता डरली नाहीं; उलट ती त्वेषानें पुढेंच आली. एके दिवशीं दादर स्टेशन जाळण्याचा प्रयत्न लोकांनीं केला; तर दुसरें दिवशीं माटुंगा स्टेशनावर हल्ला चढविला. त्यांनीं तारा तोडल्या, दिवे फोडले, पोलीस-चौक्या जाळल्या, सरकारी कचेऱ्या वेढल्या. कॉर्पोरेशनचें कामकाज तहकूब झालें. ट्राम बंद—बस् बंद—आगगाड्या बंद—कॉलेजें बंद—शाळा बंद—गिरण्या बंद—अशी खीळ लोकांनीं सर्व सार्वजनिक व्यवहारांना घातली.

सरकारचा कैवार घेणाऱ्या ‘टाइम्स ऑफ इंडिया’ पत्राच्या कार्यालयास आग लावण्यांत आली. दोन लाख रुपयांची नुकसान

झाली. सप्टेंबरपासून ठिकठिकाणीं बॉंबचे स्फोट होऊं लागले. कोर्टांतहि बॉंब उडाले. ३७५ बॉंब-स्फोट दोन महिन्यांत झाले. सरकारनें वृत्तपत्रांच्या मुसक्या बांधल्या, तर कॉंग्रेस-भक्तांनीं शिळा-प्रेसवर लाखों पत्रकें काढून क्रांतीच्या कार्यक्रमाचा प्रचार केला. ह्या प्रचाराला अद्ययावत् साधनांचीहि जोड देण्यांत आली. तें साधन म्हणजे ध्वनिक्षेपक यंत्र. 'कॉंग्रेस कॉलिंग' हे शब्द शहराशहरांतील रेडिओवर रोजरोज ऐकूं येऊं लागले. कॉंग्रेसचें हें 'रेडिओ-स्टेशन' कोठें आहे, याचा पत्ता पोलिसांना तीन महिनेपर्यंत लागला नाहीं. स्वतंत्र रेडिओ, स्वतंत्र छापखाना—अशीं प्रचाराचीं साधनें मुंबईच्या 'कृति-समिती' जवळ सज्ज होतीं. मुंबापुरींत नाहीं काय? द्रव्यबळ आहे—मनुष्यबळ आहे—ज्ञानबळ आहे—उत्साहबळ आहे—आणि सर्वांच्या शिरोभागीं आहे स्वातंत्र्य-भक्तीचें बळ! हीं स्वातंत्र्य-भक्ति लहानसहान पोरासोराकडूनहि किती अद्भुत चमत्कार घडविते!

"आझाद मैदान" हें स्वातंत्र्याचें "रण-मैदान" च बनलें होतें. समुद्राला नाना दिशांनीं नाना नद्या येऊन मिळाव्या, त्याचप्रमाणें निरनिराळ्या रस्त्यांवरून लोकांच्या मिरवणुका, तिरंगी झेंडे नाचवीत व स्वातंत्र्याच्या घोषणा पुकारीत, आझाद मैदानावर येऊन थडकत होत्या.

ही कोणाचीं मिरवणूक? शिखांची! ही गिरणी-कामगारांची! अन् ही पहा हिंदुमुसलमानांची संयुक्त मिरवणूक!

आणि ती पहा तिकडे विद्यार्थ्यांची !—जणुं कांहीं फेस टाकीत व घोष करीत येणाऱ्या समुद्राच्या एकापेक्षां एक उंच लाटाच ! त्या लाटा फुटतात खडकावर आणि मानवी लाटा फुटल्या पोलिसांच्या लाठ्यांवर ! लाठी बोथटली, तेव्हां पोलिसांनीं छडी-मार सुरू केला. छडी पांगुळली, तेव्हां घोडेस्वार लोकांच्या अंगावर धावून आले—घोड्यांच्या टापांखालीं स्वयंसेवकांना चिरडूं लागले. तशीच चेंगरली गेली कृष्णाकुमारी. तरी तिनें आपल्या हातांतील स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा कांहीं सोडला नाहीं.

सबंध मुंबई प्रांतांत दोन वर्षांत पन्नास हजारांवर लोकांना अटक करण्यांत आली. केवळ तिरंगी झेंडा लावला म्हणून कांहीं स्वातंत्र्य-भक्तांना २।२ वर्षांच्या सक्तमजुऱ्या देण्यांत आल्या. स्वतंत्र रेडिओ चालविल्याबद्दल एका स्वयंसेवकाला ४ वर्षें व दुसऱ्याला ५ वर्षें अशा बेसुमार शिक्षा ठोठावण्यांत आल्या—जणुं लष्करी कायदाच तेथें जारी होता.

◆

ता. ९ ऑगष्ट रोजीं सूर्योदयापूर्वींच नागरिकांना वार्ता कळली कीं, मुंबई येथें आपल्या राष्ट्रीय नेत्यांना पकडण्यांत आलें आहे. चौकाचौकांत, दुकानादुकानांत, घराघरांत बोललें जाऊं लागलें, ‘ हा आमच्या राष्ट्राचा उपमर्द आहे. ’ या भावनेला वाचा फोडण्यासाठीं संध्याकाळीं पुणें येथील कॉंग्रेस-भवनांत सभा भरविण्याचें ठरलें.

दुपारपासून शेंकडों नागरिक त्या दिशेनें उत्कंठेनें चालूं लागले. गांधी-टोप्या घातलेल्या हजारों नागरिकांची मिरवणूक काँग्रेस-भवनकडे निघाली. पुढाऱ्यांविरहितहि चळवळ चेतूं लागली. हें पाहून सरकारी अधिकाऱ्यांचीं माथीं भडकून गेलीं. त्यांनीं आपले पिवळे डगलेवाले हस्तक काँग्रेस-भवनाकडे धाडले. त्यांच्या हातांत लाठ्या व बंदुकाहि होत्या. कशासाठीं होत्या त्या?

ते खादीधारी निःशस्त्र लोक! टकळीविना दुसरें शस्त्र त्यांच्याजवळ नाहीं आणि स्वातंत्र्याच्या घोषणेशिवाय दुसरी रणगर्जना त्यांच्या मुखांत नाहीं. तरी परतंत्र प्रजा एका विचारानें एकत्र येणें, परक्या सरकारला प्राण-संकटासारखें वाटलें. त्यामुळें त्यांच्या पोलिसांनीं काँग्रेस-भवनापुढें जमलेल्या दहा हजार निरपराध नागरिकांवर एकदम लाठ्यांचा पाऊस पाडला. तरी लोक हटेनात. त्यांच्या अंगांत क्रांतीचें वारें शिरलेलें. ते सभा भरवूं लागले. पोलिसांची लाठी लुळी पडली.

लाठी लुळी पडली, म्हणून बंदुकीची गोळी पुढें आली. निःशस्त्र नागरिकांवर पोलिसांनीं गोळीबार केला. दाभाडे नांवाचा तरुण तेथल्या तेथेंच ठार झाला! पोलिसांनीं पन्नास लोकांस अटक केली. सरकारनें सभा-मिरवणुकींना बंदी घातली.

बंदी घातली म्हणून काय झालें? दुसऱ्याच दिवशीं विद्यार्थ्यांनीं निर्भयतेनें व मोठ्या उत्साहानें मिरवणूक काढण्याचें ठरविलें. मिरवणूक सकाळीं इंजिनिअरिंग कॉलेजपासून निघाली. निरनिराळ्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे लोंढे मुख्य प्रवाहास येऊन

मिळाले. कॉलेजें ओस पाडण्याचें विद्यार्थ्यांनीं स्वयंस्फूर्तीनें ठरविलें. सर परशुरामभाऊ कॉलेजपुढें मिरवणूक आली. आजूबाजूचे हजारों नागरिक तरुणांचें तें स्वातंत्र्य-प्रेम पहाण्यासाठीं गोळा झालेले होते. पण पोलिसांचें साम्राज्य-प्रेम—किंवा पोटाचें प्रेम—प्रबळ होतें. त्यांनीं त्या स्वातंत्र्य-प्रेमी तरुणांवर जोरानें लाठी चालविली. गोऱ्या पोलीस-अधिकाऱ्यांनीं तर गोळीबार केला. मोटारसायकलीवरील पोलीस-प्रमुखानें एका ध्वजधारी विद्यार्थ्यास रस्त्यावरच गोळी घालून ठार केलें. विद्यादेवीच्या मंदिरासमोर निष्पाप रक्ताचे पाट वाहिले. सारा विद्यार्थीवर्गच काय, पण पुण्यांतील सारे नागरिक खवळून गेले.

शाळा-कॉलेजांत आतां जातो कोण ? आपोआपच बहिष्कार पडला. ता. १७ पर्यंत विद्यालयें बंद ठेवल्याचें अधिकाऱ्यांनीं जाहीर केलें. रस्त्यारस्त्यावरील तारा तोडण्याचा, पोलीस-चौक्या जाळण्याचा, पोष्ट-पेट्या फेकून देण्याचा धुमाकूळ शहरभर उसळला. सरकार जों जों अधिक दडपशाही करूं लागलें, तों तों जनतेच्या धैर्याची ज्योत जास्त जास्तच भडकूं लागली. स्त्रियांच्या अंगींसुद्धां स्वातंत्र्याचें तेज लखलखूं लागलें.

लक्ष्मी-रोडवर गोखले हॉलसमोरची एक तिमजली इमारत. तिच्यावर तिरंगी ध्वज डौलानें फडकत आहे व हिंदी स्वातंत्र्याचा अढळ निर्धार दशदिशांना निवेदन करीत आहे. तें दृश्य पहातांच गोऱ्या पोलिस-अधिकाऱ्याचें पित्त खवळलें. तो तळमजल्यावरील दुकानांत आला. ‘काढ निशाण तें खालीं !’ तो तेथील नोकरावर

गुरगुरला. 'तें आमचें नाहीं.' असे शब्द नोकराच्या तोंडून निघतांच त्याला त्यानें गचांडी मारली.

दुसऱ्या मजल्यावरील सज्जांत डॉ. सौ. ताराबाई लिमये उभ्या होत्या. त्या धीटपणें खालीं आल्या. त्यांचा सारा पेहराव खादीचा होता. त्यांनीं शांतपणें अधिकाऱ्यांस विचारलें.

'काय पाहिजे आपल्याला?'

'हें निशाण खालीं काढा.'

'कां म्हणून?'

'ह्या निशाणानेंच जिकडे तिकडे रक्तपात होत आहेत.'

'शक्य नाहीं! तें अहिंसेचें निशाण आहे. तें मी कधींच काढणार नाहीं!'

'मग मी तुम्हांला गोळी घालीन.' हातांतील पिस्तूल पुढें करीत तो गोरा गुरगुरला.

'खुशाल गोळी झाडा! निशाण खालीं येणार नाहीं.' स्वातंत्र्याची तारका लखलखली.

तें तेज पाहून साहेब दिपला. तरी दांतओठ खात तो गरजला, 'मी निशाणावर गोळी झाडीन.' पण गोळी न झाडतांच तो निघून गेला. तिमजल्यावरील तें तिरंगी निशाण जोरजोरानें फडकूं लागलें—दशदिशांच्या कानांत आपल्या विजयाची वार्ता सांगूं लागलें.

◆

सौ. तिखे व सौ. माटे!—या दोन गृहिणींचीं शरिरें रक्ताच्या थारोळ्यांत पडलीं. कोणता होता त्यांचा अपराध?

विश्राम-बाग वाड्याजवळील आपल्या घरांत दुसऱ्या मजल्यावरील सज्जांत उभ्या राहून त्या पहात होत्या. काय पहात होत्या त्या?


साऱ्या पुणें शहराला रणांगणाचें स्वरूप आलेलें होतें—रस्तोरस्तीं रणगाडे धांवत होते—इंग्रज व अमेरिकन सैनिक दौडत होते. ता. १२ रोजीं दुपारीं १२ वाजण्याची वेळ—दहा चिलखती रणगाडे शहरांत फिरत होते. आप्पा बळवंत चौकांत तर ब्रेन गन्स ह्या भयानक तोफाहि नेण्यांत आल्या: ती अकारण चाललेली धांवपळ पहाण्यासाठीं लोक जमले. या दोन सुवासिनीहि दुपारचें कामधाम आटोपून जिज्ञासेनें जिन्यांत येऊन उभ्या राहिल्या. तोंच सूं सूं करीत ब्रेनगनच्या गोळ्या येऊन त्यांच्या शरिरांत घुसल्या. जागच्या जागीं त्या ठार झाल्या! तिसरीहि एक सुवासिनी जखमी झाली. चौफेर गोळीबार चालला होता. दोनतीन फर्लांगापर्यंत घरांच्या भिंतींवर गोळ्या आदळत होत्या. जोशी नांवाचे गृहस्थ नाहक प्राणास मुकले. १७ माणसें जखमी झालीं.

हा भयंकर गोळीबार सरकारनें कां केला?

स्वातंत्र्यासाठीं आतुर झालेल्या जनतेला दडपण्यासाठीं—तिला भयभीत करण्यासाठीं—तिच्यावर आपला दरारा बसविण्यासाठीं.

पण झालें उलटच! लोकांची भीतीच जणुं ठार झाली. धैर्याला भरती आली. स्वातंत्र्य-प्रीति नाना रूपांनीं प्रकट होऊं लागली. साहेबी टोप्यांच्या होळ्या जागोजाग होऊं लागल्या. फर्ग्युसन कॉलेजजवळ चर्चिलचा पुतळा करून जाळण्यांत

आला. फर्ग्युसन व स. प. कॉलेजांत बॉंबचे स्फोट होऊं लागले. लष्करांतील कॅपिटल सिनेमांत गोरे सैनिक चित्रपट पहात असतांना बॉंब उडाले. त्यामुळें पांच सैनिक ठार झाले. पुढें पुढें तर लॅंड रेकॉर्डस, इन्कमटॅक्स वगैरे सरकारी कचेऱ्यांना आगी लावण्यांत आल्या आणि त्यांतील महत्त्वाचीं दप्तरें जाळण्यांत आलीं. सारे रस्ते, साऱ्या भिंती ' चले जाव ' च्या गर्जना करीत उठल्या.





प्रति-सरकार

एका खेड्यांतील चावडी. रात्रीं दहानंतरची वेळ. सारीं कामेंधामें आटोपून, डोक्यावर मुंडासें व खांद्यावर घोंगडें ठेवून एक एक शेतकरी येऊं लागला. हां हां म्हणतां चावडी-पुढील पटांगणांत दोनतीन हजार गांवकरी जमले. ग्यासच्या दिव्यांचा ढणढणीत उजेड चोहोंकडे पसरला होता. मध्यभागीं तीन गांधी-टोपीवाले तरुण गंभीर मुद्रेनें बसले होते. हायकोर्टांतील न्यायमूर्तींचीच जबाबदारी जणूं त्यांच्यावर पडलेली होती. चार आरोपींना तेथें आणण्यांत आलें. त्यांनीं चळवळीची माहिती सरकारला पुरवून फितुरी केली होती—कांहीं क्रांतिवीरांना पकडून देण्यासाठीं पोलिसांना मदत केली होती. ते आरोप त्यांना स्पष्टपणें सांगण्यांत आले. त्यांची कैफियत ऐकण्यांत आली. त्या

तिघां ' न्यायमूर्तींनीं ' खलबतें केलीं आणि शिक्षा सुनावली, ' ह्या दोघांचें नाक व कान कापून टाका आणि त्या दोघांना पत्र्या ठोका ! '

लगेच शिक्षा अंमलांत आली. ' प्रति-सरकारचा ' अंमल सातारा जिल्ह्यांत कैक महिने चालू राहिला. तें पत्री मारण्याची शिक्षा देई; म्हणून त्याला ''पत्री-सरकार'' असेंहि म्हटलें जाई. स्वातंत्र्य-विरोधी लोकांवर जबरदस्त दहशत या प्रति-सरकारनें बसविली. सातारा जिल्ह्यांतून लष्करांत शिपायांची मोठी भरती होई. तिलाहि या चळवळीनें आळा बसला. चळवळ्या लोकांना पकडणें पोलिसांना मुष्कील झालें. 'भूमिगत' कार्यकर्त्यांचा सुगावा लागण्यासाठीं त्यांच्या नातेवाईकांना पोलिस 'भरमाप्पा' व 'सुंदरी' यांचा प्रसाद देत. भरमाप्पा म्हणजे पोत्यांत घालून मारणें आणि सुंदरी म्हणजे चाबकानें बडविणें. काशीबाई हणबर नांवाच्या स्त्रीचा मुलगा भूमिगत होता. त्याचा पत्ता सांगावा म्हणून काशीबाईचा पोलिसांनीं पाशवी छळ केला.

◆

माध्यान्हाची वेळ. घराघरांत चुली पेटलेल्या. एका शेतकऱ्याच्या झोपडींत घरधनीण भाकरी भाजीत बसली होती. ती एकटी होती—विधवा होती. दार वाजलें म्हणून तिनें पाहिलें तों—

धापा टाकीत घाम गाळीत एक तरुण इकडे तिकडे पहात उभा आहे.

'काय पाहिजे?' तिनें विचारलें.

'लपायला जागा.' दबत्या आवाजांत उत्तर आलें.

'कोण तुम्हीं?'

'गांधीबाबांचे लोक आम्हीं.'

तिच्या मनांत कल्पना चमकून गेली. तिनें आपल्या बाजेवरील अंथरुणाकडे बोट दाखविलें आणि म्हटलें, 'हं, निजा इथं'

फारसा विचार न करतां तो बाजेवर निजला. त्याच्या अंगावर तिनें घोंगडें घातलें आणि आपल्या कपाळाला कुंकूं लावलें.

इतक्यांत खाड्खाड् बूट आपटीत पोलीस आले, फरारी माणसाला शोधूं लागले. 'हा कोण?' असें त्यांनीं बाजेकडे बोट दाखवून दरडावून विचारलें. बाईनें निर्भयतेनें उत्तर दिलें, 'हे माझे कारभारी; हिवतापानं आजारी पडलेत नव्हं का?'

अशा किती तरी गमती अन् किती तरी हिकमती!

◆

किती दुःखाचा प्रसंग! प्रत्यक्ष मृत्यूच ओढवलेला ना? घरांतील बायकापोरें गळे काढून रडत होतीं. तशा हलकल्लोळांत चौघांनीं खांदा दिला व तिरडी उचलली. प्रेतयात्रा झपाझप चालली होती. तीं सारीं दुःखी माणसें स्मशानांत जाऊन पोंचलीं. तिरडी खांद्यावरून उतरली, जमिनीवर ठेवली. दोऱ्या तोडल्या. तिरडीवरील प्रेत वर उचललें. आणि काय आश्चर्य!—

त्या प्रेताच्या खालीं निजलेला एक जिवंत तरुण ताडदिशीं उठून उभा राहिला. लगेच त्यानें आपले कपडे झाडले आणि सर्वांना हात जोडून तेथून त्यानें पलायन केलें.

त्या 'भूमिगत' क्रांतिकारकाला पकडण्यासाठीं साऱ्या गांवाला पोलिसांनीं वेढा दिला होता. त्यांच्या हातावर तुरी देऊन तो पसार झाला, तरी त्याची दाद पोलिसांना नव्हती. ते घरा-घरांतून मारे शिरत होते—शोधत होते—आणि हताश होत होते.

जनतेची सहानुभूति ही ह्या क्रांतिकारकांची मोठी ढाल होती. जनतेला त्यांच्याबद्दल सहानुभूति कां वाटत होती? तर 'चले जाव!' चा लढा म्हणजे आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा अखेरचा लढा आहे अशी तिची श्रद्धा होती.

◆

सातारा जिल्ह्यांतील एक लहानसें गांव. वडूज हें त्याचें नांव. तें तालुक्याचें ठिकाण. तेथील मामलेदार-कचेरीवर हल्ला चढविण्याचा व्यूह आसपासच्या गांवांनीं रचला. त्या गांवांतील तरुण ता. ९ सप्टेंबर रोजीं वडूज येथें येऊन गोळा झाले. सुमारें ५०० लोकांचा मोर्चा निघाला. ना अंगांत चिलखत, ना हातांत शस्त्र! स्वातंत्र्य-प्रेम हेंच त्यांचें चिलखत आणि सत्याग्रह हेंच त्यांचें शस्त्र! जगांतील कोणत्याहि सैनिकाइतकी मृत्युंजयी वृत्ति त्यांची होती.

वेरळा नदी ओलांडली. चाराचारांच्या रांगा शिस्तींत चालूं लागल्या. सर्वांच्या अंगावर शुद्ध खादीचा गणवेष. प्रत्येकाच्या गळ्यांत खादीची पिशवी. त्या पिशवींत भगवद्गीता व स्वत:चे कपडे. अग्रभागीं चालणाऱ्या तिघांच्या हातांत झेंडे. आणि त्यांच्या छातीवर छोटीं तिरंगी पदकें. त्यांवर ध्येय-वाक्य कोरलेलें—"करेंगे या मरेंगे!"

ही स्वातंत्र्य-सेना पुलापाशीं आली. मामलेदार-कचेरी दिसूं लागली. कचेरीच्या मैदानांत सशस्त्र पोलीस उभे असलेले दिसूं लागले. मामलेदार पुढें आले व जमिनीवर एक रेषा ओढून म्हणाले, "ही रेघ ओलांडाल तर मराल. तुम्हीं मरायला तयार आहांत काय ?"

"होय ! आम्हीं मरण्यास तयार आहोंत. करेंगे या मरेंगे हें आमचें ध्येय-वाक्यच आहे."

मोर्चांतील लोक शांतपणें खालीं बसतात न बसतात, तोंच सरकारी तोंडांतून हुकूम व पिस्तुलांतून गोळ्या एकदमच बाहेर पडल्या. पांच लोक जागच्या जागीं ठार झाले ! साठ लोक जखमी झाले. त्यांतील दोघे दवाखान्यांत मेले. रक्ताचीं थारोळीं जागोजागीं दिसूं लागलीं. पोलिसांनीं त्या निशस्त्र सत्याग्रह्यांवर दीडशें-दोनशें तरी गोळ्या झाडल्या. जखमी झालेल्या लोकांना पोलिसांनीं पाणीदेखील देऊं दिलें नाहीं.

लोक बोळाबोळांतून धावूं लागले; पण पोलिसांनीं ते बोळ आगाऊच दगडांनीं बुजवून टाकले होते. पुढें रस्ता बंद ! आणि मागें पोलिस-इन्स्पेक्टर पिस्तूल सरसावून पाठलाग करीत असलेला. पोलिसांनीं बोळाबोळांत शिरून त्यांना लाठीचे तडाखे दिले—कांहीं जणांना बेडया ठोकून तुरुंगांत पाठविलें. गांवांत कर्फ्यू ऑर्डर पुकारण्यांत आली. पण जनतेचें धैर्य अभंग राहिलें, स्वातंत्र्य-प्रेम अभेद्य राहिलें.



रणदेवतेचीं दर्शनें

ब्रिटिश राज्याची नांवनिशाणीहि उरूं न देतां जनतेनें कांहीं ठिकाणीं आपलीं स्वतंत्र राज्येंहि स्थापन केलीं. सातारा, बलिया, गाजीपूर, तामलुक, कंटाई वगैरे ठिकाणीं "प्रति–सरकारें" अल्पकाळच पण सुव्यवस्थित व पद्धतशीर-पणें चाललीं.

संयुक्त प्रांतांतील बलिया जिल्हा अत्यंत जागृत व संघटित. हरताळ–मिरवणूक, लाठीमार–गोळीबार, रेल्वे-स्टेशनें–पोलिस-स्टेशनें जाळणें, कचेऱ्या–तुरुंगांवर हल्ले करणें इत्यादि चळवळींचे सारे प्रकार तेथें घडले. सरकारी दडपशाहीनेंहि साऱ्या फणा काढल्या. पण विशेष म्हणजे ता. १६ पासून ता. २२ पर्यंत

तेथें पूर्ण "जनता-राज्य" सुरू झालें. त्यासाठीं लोकांनीं दीड लाख रुपयांचा निधी जमविला व नव्या सरकारच्या खजिन्यांत तो भरला.

◆

गाजीपूर जिल्ह्यांतहि तीन दिवस 'प्रजा-राज्य' चालू होतें. अलाहाबादमध्येंहि तीच स्थिति. तेथील सरकारी अत्याचारांना विटून एका मुसलमान डेप्युटी कमिशनरनें राजीनामा दिला.

बंगालमधील तामलुक जिल्हा म्हणजे एक स्वतंत्र काँग्रेस राज्यच होतें. स्वतंत्र कोर्टें व स्वतंत्र तुरुंग. तेथील टपालाची व्यवस्थाहि जनतेकडेच. सरकारी अधिकाऱ्यांस कैद करून प्रति-सरकारच्या तुरुंगांत टाकलेलें! त्यांत तेरा ब्रिटिश सैनिकहि होते. १९४२ च्या ऑगस्टपासून १९४४ पर्यंत "प्रति-सरकारचा" कारभार चालूं होता. या सरकारनें आपली स्वतंत्र "विद्युद्-वाहिनी" सेनाहि तयार केली होती. हें "प्रति-सरकार" मोडण्यासाठीं इंग्रज सरकारला कठोर दडपशाही करावी लागली. बंदुका, मशिनगन्सहि त्यांनीं चालविल्या. विमानांतून बॉंबहल्लेहि झाले. सात हजार लोकांना पकडण्यांत आलें. विशेष म्हणजे डेप्युटी कमिशनरनें गोळीबाराचा दिलेला हुकूम शिपायांनीं साफ नाकारला. शेंकडों शिपायांनीं आपल्या नोकऱ्यांचे राजीनामेहि दिले.

कंटाई येथेंहि "प्रति-सरकार"चा अंमल चालू होता. तो मोडून काढण्यासाठीं सरकारनें १२।१३ जणांस अटक केली,

६।७ जणांना जखमी केले, सहासातशें माणसांना शिक्षा ठोठावल्या आणि तेरा वेळां गोळीबार करून ७५ माणसें ठार केलीं.

बंगाल म्हणजे सशस्त्र क्रांतीचें माहेरघर ! त्याची राजधानी कलकत्ता. येथें तागाच्या तीन गिरण्यांत हरताळ पडला. ठिकठिकाणीं बॉंबस्फोट झाले. लोकांनीं विलिंग्डन विमान-तळावर हल्ला केला. ता. १४ ऑगस्ट ह्या एका दिवशीं मिरवणुकीवर गोळीबार करून इंग्रज सरकारनें शंभर नागरिकांचे प्राण घेतले, असें अमेरिकन वार्ताहरानें जाहीर केलें.

सिल्हट हा जिल्हा शिस्तशीर व संघटना-कुशल. त्यांतील सुमारें सातशें वकिलांनीं सरकारी कोर्टावर बहिष्कार घातला. त्यांच्या मागोमाग दोन हजार नोकरांनींहि बहिष्कार घातला. शंभर मौलवी हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचा प्रचार करण्यासाठीं हिंडूं लागले. साठ "स्वराज्य-पंचायती" गांवकऱ्यांमधील तंटेबखेडे तोडून गांवाचा कारभार पाहूं लागल्या.

◆

पंडित कुंझरू हे नेमस्त नेते. त्यांनाहि सरकारी अत्त्याचार ऐकवेनात. त्या अत्त्याचारांचे नमुने त्यांनीं प्रत्यक्ष दिल्लीच्या विधि-मंडळांत मांडले. १९४२ च्या सप्टेंबरमध्यें त्या विधि-मंडळांत भाषण करतांना ते म्हणाले,

'संयुक्त प्रांतांतील एक खेडें. तेथें एक मातबर इसम रहात होता. तो सरकारला दर वर्षीं शेतसारा म्हणून तीन-चार हजार रुपये देत असे. त्यानें सरकारला युद्धकार्यासाठीं बरींच माणसें व पैसा जमवून दिला. त्याचें चीज करण्यासाठीं सरकारनें

त्याला ऑनररी मॅजिस्ट्रेट बनविलें. पण असा माणूससुद्धां सरकारच्या ऑगस्ट–अत्याचारांतून सुटला नाहीं.

ता. २४ ऑगस्टचा दिवस! चार गोरे अधिकारी शें-दीडशें हिंदी सैनिकांसह त्या खेड्यांत घुसले. तेथील सर्व पुरुषांना त्यांनीं घराबाहेर उभें केलें. नंतर हे वीर घराघरांत शिरले आणि त्यांनीं त्यांतील स्त्रियांकडून दागदागिने हिरावून घेतले. कैक घरांना त्यांनीं आगी लावल्या. नंतर ते त्या अटकबंद पुरुष-वर्गाकडे वळले. दोघादोघा सैनिकांनीं एकएकाला फटके लगावले. शेवटीं दुकानें लुटीत लुटीत हें पेंढार निघून गेलें.'

◆

सरकारच्या अकारण व अमानुष अत्याचारांना विटून बंगालचे अर्थमंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांनीं आपल्या जागेचा राजीनामा १९४२ च्या नोव्हेंबर महिन्यांत दिला. आपल्या त्यागपत्रांत सरकारी अत्याचारांचें वर्णन करतांना ते लिहितात,

" मिदनापूर जिल्ह्यांत सरकारनें जी दडपशाही चालविलेली आहे, ती जर्मन सैनिकांच्या कृत्यांइतकी हिंस्र आहे. शेंकडों घरें जाळलीं गेलीं. शेंकडों स्त्रियांच्या अब्रूची राख-रांगोळी झाली. त्यांतच ऑक्टोबरचें भयंकर वादळ आलें. एका खेडयांतील एका सद्‌गृहस्थानें अधिकाऱ्यांना विनंति केली. ' आमच्या नावा आम्हांला परत द्या. निदान एक नाव दोन तास चालविण्याची मला परवानगी द्या. म्हणजे पुराच्या संकटांत सांपडल्यामुळें घरांच्या छपरांवर व झाडांच्या फांद्यावर बसलेल्या स्त्रीपुरुषांना मी सुरक्षित जागीं आणून ठेवतों. ' पण छे! सत्तांध

अधिकारी माणुसकी विसरले. त्यांनीं त्या गृहस्थाला नाव चालविण्यास परवानगी नाकारली. आणि—आणि त्या घरांवरील व झाडांवरील तीं गरीब माणसें पुराच्या पाण्यानें वाहून गेलीं—मृत्यूच्या मुखांत लोटलीं गेलीं."

मद्रासकडे रेल्वेचा विध्वंस मोठ्या प्रमाणांत झाला. गाड्या पडल्या, पूल उखडले, स्टेशनें जळालीं. आंध्रमधील भीमावरम् येथें सत्तर लोकांवर सरकारनें खटले भरले आणि सोळाजणांना फांशीची शिक्षा ठोठावली.

गंतूर येथें मद्रासचे गव्हर्नर विद्यापीठाच्या पदवी-दान-समारंभासाठीं गेले. त्यांना रस्त्यावर, स्टेशनावर, विद्यापीठांत सर्वत्र काळीं निशाणें दाखविण्यांत आलीं. एर्नाकुलम् येथें तर गव्हर्नरांचें भाषण ज्या मंडपांत व्हावयाचें होतें, तो मंडपच भाषणापूर्वीं कांहीं मिनिटें जाळून खाक करण्यांत आला.

आसाम म्हणजे देशाची सीमा. त्याचें रक्षण करण्यासाठीं डोळ्यांत तेल घालून सरकार बसलेलें! पण लोकांनीं तेथेंहि स्टेशनें जाळलीं, गाडया उलटविल्या, सरकारी कोठारें लुटलीं. ता. २६ नोव्हेंबर रोजीं गोहत्ती स्टेशनजवळ एक लष्करी आगगाडी पाडण्यांत आली. दीडशें सैनिक ठार झाले. नंतर तेथें लष्करी राज्य सुरू झालें. श्री. कौशल कुंजर या धार्मिक वृत्तीच्या तरुणास, कांहींहि अपराध नसतांना, केवळ रेल्वे-अपघाताच्या आरोपावरून, ता. १५ जून १९४३ रोजीं फांशीं देण्यांत आलें.

खानदेश म्हणजे साने-गुरुजींचा प्रदेश. त्यांतील कण न् कण कॉंग्रेसमय, स्वातंत्र्यमय, चैतन्यमय. अडाणी शेतकऱ्यांत, लहान पोरांत, भोळ्या बायाबापड्यांतहि जगृति झालेली व क्रांतीची ज्योत पेटलेली. ती ज्योत विझविण्यासाठीं पोलिसांनीं आपल्या लाठ्या आणि बंदुका बेगुमानपणें चालविल्या.

नंदुरबारचे चार कुमार! उत्साहाचीं केवळ कारंजींच! तिरंगी झेंडे घेऊन, आपल्या मातृभूमीचें गीत गात गात, तिच्या स्वातंत्र्याचे घोष करीत, बाल विद्यार्थ्यांचा घोळका आनंदानें चालला होता. सोळा सोळा वर्षांचे अभिमन्यु होते ते सारे!

पोलीस आडवे आले. त्यांनीं तिरंगी झेंडे फेंकून देण्यास त्या लहान मुलांना सांगितलें. मुलें लहान असलीं, तरी त्यांची स्वातंत्र्य-भक्ति मोठी होती. ध्रुवाच्या निर्धारानें त्यांनीं आपल्या हातांतले झेंडे घट्ट धरले—उंच केले—हवेंत फडफडविले! त्यांच्या धैर्याचें कौतुक कोण व कसें करणार?

पोलिसांनीं तें केलें—पण बंदुकीच्या गोळ्या झाडून! एका पंधरा वर्षांच्या बालिकेवरसुद्धां पोलिसांनीं बंदूक रोखली. तो अत्याचार एका सोळा वर्षांच्या मुलास पहाववेना. तो पोलीस-अधिकाऱ्यापुढें जाऊन म्हणाला, 'भ्याडाप्रमाणें बायकांवर शस्त्र कां धरतां? शूर असाल तर माझ्यावर गोळी झाडा.' असें म्हणून त्यानें आपली छाती पुढें केली. केवढें धैर्य! केवढें औदार्य! त्याचें चीज पोलिसांनीं काय केलें?

पिस्तुलांतील गोळी त्याच्या छातींतून आरपार निघून गेली. तो खालीं पडला, पण त्याच्या हातांतील ध्वज कांहीं सुटला

नाहीं. त्याच्या अंगांतून भळभळा रक्त वाहूं लागलें. त्याच्या तोंडांतून ' पाणी ! पाणी ! ' असे विव्हळ शब्द बाहेर पडले.

" ध्वज सोड म्हणजे पाणी देतों, " लांडगा गुरगुरला.

" नको तुझें पाणी ! मी तडफडून मरेन. पण....ध्वज.... सोडणार....नाहीं ! "

आणि त्या कुमाराचे प्राण गेले; पण हातांत तिरंगी निशाण राहिलें ! त्या अमर कुमाराचें नांव शिरीषकुमार !! चिरंजीव झाला तो भारतीय इतिहासांत ! श्रियाळ, चिल्या, ध्रुव, प्रल्हाद यांसारखीं तीं चार बालकें स्वातंत्र्य-युद्धांत हुतात्मे बनलीं. त्या चौघांचें स्मारक नंदुरबार येथें अभिमानानें उभें आहे.

◆

तेरा वर्षांचा मुलगा. त्याचें नांव ध्रुव. डॉ. टागोरांच्या " शांति-निकेतन " मधील विद्यार्थी. बिहारमधील एका गांवच्या मिरवणुकींत तो गेला. मिरवणुकीवर गोळीबार होऊन आठ माणसें मेलीं. ध्रुव बाळहि गोळी लागून दवाखान्यांत मृत्यू पावला. त्याचे पिताजी डॉक्टर होते. त्यांना सरकारनें तुरुंगांत टाकलें.

याहिपेक्षां लहान बालकालाहि इंग्रजांच्या दडपशाहीचा जहरी घुटका घ्यावा लागला. भागलपूर येथील पोलिसांनीं एका भूमिगत कॉंग्रेस-भक्ताच्या मुलास कैद केलें. त्याचें वय किती ? दीड वर्षें ! पूर्ण चार दिवस त्या अर्भकाला त्याच्या मातेपासून दूर ठेवण्यांत आलें.

बनारस जिल्ह्यांत तर सामुदायिक दंड वसूल करण्यासाठीं एका घरांतील आई-बापांच्या डोळ्यासमोर, त्यांचें दीड वर्षांचें बालक पोलिसांनीं आगींत उलटें टांगून जाळलें !

बिहारची राजधानी पाटणा. तेथील सरकारी कचेरीवर हजारों लोक चालून गेले. तेथें सशस्त्र गुरखे सज्ज होते. त्यांच्या मोठ्या अधिकाऱ्यानें गुरकावून विचारलें, 'काय पाहिजे आहे तुम्हांला ?'

'कचेरीवर तिरंगी झेंडा लावायचा आहे आम्हांला !' एका छोट्या विद्यार्थ्यानें गरजून उत्तर दिलें.

'कोण झेंडा लावूं इच्छितो, त्यानें पुढें यावें.'

एक, दोन, तीन……अकरा विद्यार्थी छाती पुढें काढून त्या अधिकाऱ्यापुढें निर्भयतेनें जाऊन उभे राहिले. त्या अकराहि विद्यार्थ्यांच्या छातींत गोळ्या घालून सैनिकांनीं त्यांना ठार केलें. लोकसमुदायावरहि गोळ्यांचा पाऊस पडला. तरी त्यांतून आवाज उठला, 'इन्किलाब झिंदाबाद !' आणि त्या चिरायु होणाऱ्या क्रांतीचा तो तिरंगी झेंडा त्या सेक्रेटरिअेटवर अखेर चढलाच ! तीन दिवस पाटणा शहरांत जनतेचें राज्य चालू होतें. तें मोडून टाकण्यासाठीं सरकारनें दहा हजार गोरे सैनिक त्या शहरावर सोडले. त्यांचेंच राज्य कांहीं काळ तेथें चालू राहिलें.

◆

साऱ्या जगाच्या इतिहासांत सरकारी कृष्ण-कृत्यांनीं कुप्रसिद्ध ठरलेलीं जीं गांवें आहेत, त्यांमध्यें अष्टी व चिमूर या गांवांची

गणना होते. मध्यप्रांतांतील हीं दोन गांवें ! लोकवस्ती पाहिली तर सहासात हजारांच्या आंतबाहेर. पण तेथें सरकारी अधिकाऱ्यांनीं अत्याचारांचा असा कांहीं कहर केला कीं, प्रत्यक्ष महायुद्धांत सांपडलेल्या शहरावरहि तसा होणार नाहीं.

हिंदुस्थानांतील इतर लाखों गांवांप्रमाणेंच अष्टी येथें ता. २२ ऑगस्ट रोजीं लोकांनीं तिरंगी झेंडा घेऊन मिरवणूक काढली. मिरवणुकीच्या अग्रभागीं महिला होत्या. पोलीस-कचेरीसमोर मिरवणूक अडविण्यांत आली. तरी लोक पुढेंच चालले. पोलिसांनीं लाठी चालविली आणि नंतर चौफेर गोळीबार ! स्त्रियाहि खूप जखमी झाल्या. तें पाहून कांहीं तरुणांचें रक्त सळसळलें. त्यांनीं पोलिसांवर हल्ला केला. पांच पोलीस ठार झाले; बाकीचे पळाले. पोलीस-कचेरीवर तिरंगी निशाण फडकलें. त्यासाठीं सहा नागरिकांच्या प्राणांचें मोल द्यावें लागलें. पण तेवढ्यानें भागलें नाहीं.

अर्ध्या रात्रींच ब्रिटिश सैनिकांची तुकडी अष्टीवर चाल करून निघाली. तेथें येतांच तिनें दिसेल त्यास मारण्यास सुरवात केली. दिवस उजाडला. सैनिकांनीं गांवांतील सर्व पुरुष-मंडळींना घराबाहेर काढलें आणि कोंडवाड्यांत गुरें कोंडावीं, त्याप्रमाणें त्यांना एके जागीं डांबून ठेवलें. हा “ माणसांचा कोंडवाडा ” एक महिना चालू होता. आणि मग सैनिकांनीं घरांची लुटालूट केली—स्त्रियांच्या अब्रूची माती माती केली ! बाहेरची मदत येण्यास त्यांनीं बंदी केली—आंतली बातमी बाहेर जाण्यास मनाई केली.

साऱ्या जगाचेच संबंध तोडून टाकले. सहा गांवकऱ्यांना फांशीची शिक्षा सुनावली. तिच्याविरुद्ध पुढें सर्व देशभर तक्रारी झाल्या. तेव्हां दोघांना फांशी व चौघांना काळे पाणी अशा शिक्षा झाल्या.

याहून अधिक दुर्दशा चिमूरच्या कपाळीं आली. ता. १२ ऑगस्ट म्हणजे नागपंचमीचा दिवस! सणाच्या उत्साहानें गांवकऱ्यांनीं मोठी प्रभातफेरी काढली. तीनचारशें स्त्रियांनीं व शंभर मुलांनीं तींत भाग घेतला. फेरी शांततेनें चालली होती. तरी तिरंगी निशाण पहातांच अधिकाऱ्यांचें माथें भडकलें आणि त्यांनीं एकदम गोळीबार सुरू केला. किती पुरुष, किती स्त्रिया, किती मुलें ठार झालीं! हा अकारण संहार पाहून कांहीं तरुण गांवकरी पोलिसांवर तुटून पडले. पांच पोलीस ठार झाले आणि बाकीचे पोलीस पळाले.


लोकांनीं सडकेवर झाडें तोडून टाकलीं आणि पूल उडवून दिला. तरीहि ता. १९ रोजीं दोनशें सशस्त्र गोरे सैनिक व पन्नास हिंदी सैनिक यांसह जिल्हा मॅजिस्ट्रेट चिमूर येथें गेला. जातांच त्यानें गांवांतील बड्या लोकांना घराबाहेर काढून जोरानें बडविलें. सर्व पुरुषवर्गाला गिरफ्तार केलें. साऱ्या स्त्रिया एका घरांत भीतीनें थरथरत एकत्र बसल्या. तरी रावणाचे व कीचकाचे ते दूत तेथें घुसले आणि त्यांनीं माणुसकीची राख-रांगोळी केली! दोन दिवस हे राक्षसी प्रकार चालले होते. अखेर एक म्हातारी, पिस्तुलांच्या पहाऱ्याला न जुमानतां, मॅजिस्ट्रेटपाशीं जाऊन पोचली. तिनें करुणा भाकली, 'आया-बहिणींची तरी लाज राखा हो!'



'हें संकट गांववाल्यांनींच ओढवून घेतलें आहे,' तो अधिकारी खेकसला व जुल्म चालूच राहिला. सरकारनें एक लाख रुपयांचा सामुदायिक दंड बसविला. तो सक्तीनें व लूटमारीनें वसूल करण्यांत आला. तब्बल सात आठवडे हें "पोलिसी राज्य" चिमूर येथें चालू होतें. चार हजार माणसांना पकडण्यांत आलें. त्यांतील दोघेजण तुरुंगांत व सातजण बाहेर मेले. बाकीच्या सत्तर माणसांना जालीम शिक्षा ठोठावण्यांत आल्या. या सर्व अत्याचारांची वार्ताहि आरंभीं बाहेर पडूं दिली जात नव्हती. पण हळूंहळूं ही कुणकुण आजूबाजूस पसरली. तरी उपयोग काय ? तेथें जाण्यास सर्वांस मनाई !

ह्या घनदाट अंधारांत आपल्या तपश्चर्येचें तेज पसरविणारा एक महापुरुष निघाला. त्याचें नांव प्रा. भनसाळी. गांधीजींच्या आश्रमांतील ते एक त्यागी, निष्ठावंत, अबोल कार्यकर्ते आहेत.

ते आपले प्राण ओंजळींत घेऊन चिमूरकडे निघाले. पोलिसांनीं त्यांना अडविलें आणि वर्ध्यास परत पाठविलें. पुनः ते तेथून निघाले व परत त्यांना सोडण्यांत आलें. ६७ दिवस त्यांनीं उपोषण केलें. गांधीजींनीं तुरुंगांतून त्याविषयीं सरकारला लिहिलें. सारें राष्ट्र खवळून उठलें. शेवटीं सरकारनें चौकशी करण्याचें मान्य केलें. सत्याग्रह सफळ झाला.





साथींचें साहस

'पळाले ! बाबू जयप्रकाश तुरुंगांतून पळाले ! !' ही बातमी साऱ्या वृत्तपत्रांत मोठ्या अक्षरांनीं झळकली. हिंदी प्रजा व हिंदी सरकार दोघेहि चकित झाले. जयप्रकाश नारायण हे बिहारचे एक महान सुपुत्र. गांधीजींचा चंपारण्यांतील सत्याग्रह बिहारी जनतेनें यशस्वी करून दाखविला. बिहार म्हणजे राजेंद्रबाबूंची कर्मभूमि! त्या प्रांतांतील राजकीय जागृतीची ज्योत ह्या वेळीं जोरानें भडकली. एक हजार पोस्ट-ऑफिसें जनतेनें नष्ट केलीं. पांच हजारांवर सरकारी संस्थांवर हल्ले झाले. सरकारनें १२२ ठिकाणीं गोळीबार केला आणि १३१४ नागरिकांना ठार केलें.

हांजीपूर येथें तर फ्रेंच-राज्यक्रांतीच अवतरली. तेथील तुरुंगावर तीन हजार लोकांनीं हल्ला चढविला. त्यांतील शंभर

कैदी पळून गेले. सीतामढी येथील तुरुंगावर दहा हजार लोक चालून गेले. त्यांना हटविण्यासाठीं पोलिसांनीं अश्रु-धूर सोडला. तरीहि नागरिकांनीं तुरुंगावर तिरंगी झेंडा फडकविलाच!

दिवाळीचे दिवस! स्वातंत्र-युद्ध देशांत चालू असलें, तरी घरोघर दिवाळीचा सण कमीअधिक प्रमाणांत साजरा होत होता. कोणाचे वडील तुरुंगांत गेलेले, कोणाचे भाऊ जखमी तर कोणाचीं मुलें ठार झालेलीं! तरी आपलीं फुटलेलीं अंत:करणें एका हातानें दाबून धरून व दुसऱ्या हातानें डोळ्यांतील आंसवें पुसून जनता दिवाळीचा सण गोड करून घेत होती. तुरुंगांतहि हा उत्सव चालू होताच—हजारीबाग तुरुंगांत तर फारच उत्साहानें! बिहारचे पंतप्रधान श्रीकृष्णसिंह वगैरे थोर थोर नेते त्या तुरुंगांत राजबंदी होऊन आलेले होते. त्यांनीं दिवाळीची धामधूम उडविली. सारे कैदी तुरुंगाच्या दाराजवळील पटांगणांत, अधिकाऱ्यांच्या परवानगीनें एकत्र जमून गंमत-जंमत करीत होते, गाणीं गात होते, मजा मारीत होते. तुरुंगाच्या आघाडीस हा प्रकार; पण पिछाडीस?

तुरुंगाच्या उंच उंच तटबंदीवर चढून पांच राजबंदी पलायन करीत होते. भिंतीवरून उडी मारतांना त्यांतील प्रमुख नेत्याला मोठी जखम झाली. तेव्हां एका साथीदारानें त्यास खांद्यावर घेऊन अंधारांतून पळ काढला. त्या नेत्याचें नांव जयप्रकाश नारायण. त्यांच्यासाठीं जवळच एक मोटार उभी होती. त्यांतून ते रांची येथें गेले. तो दिवस ता. ११ नोव्हेंबर १९४२ हा होता. रांचीच्या पुढें जंगल होतें. त्या जंगलांतून

ते पांच राजबंदी पायीं गयेस जाण्यास निघाले. चार दिवस तर त्यांच्या पोटांत अन्नाचा एक कणहि गेला नाहीं. पांचव्या दिवशीं जंगलांतील फळें मात्र त्यांना मिळालीं.

अशा हालअपेष्टांतून जाऊन ते गयेस पोचले. पुढें तें मुंबईस गेले. तेथें त्यांनीं साथी अच्युत पटवर्धन यांच्याशीं खलबतें केलीं. अच्युतराव हे सातारच्या 'प्रतिसरकारचीं' सूत्रें खेळवीत होते. त्याचप्रमाणें डॉ. राम मनोहर लोहिया व सौ. अरुणा असफअल्ली हेहि देशांतील भूमिगत चळवळीचे सूत्रधार होते. या चौघा नेत्यांनीं सरकारशीं मुकाबला देण्याच्या योजना आंखल्या. कार्यकर्त्यांना शिक्षण देण्यासाठीं शिबिर उघडण्याचें ठरविलें. तें नेपाळमध्यें १९४३ च्या एप्रिल महिन्यांत उघडण्यांत आलें. तेथें कार्यकर्त्यांना लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली.

ह्या चार समाजवादी नेत्यांच्या गुप्त कटाची कुणकुण इंग्रज सरकारच्या कानीं गेली. तेव्हां त्यांनीं नेपाळ सरकारला इषारा दिला. तेवढ्यावरून नेपाळ सरकारनें जयप्रकाश, लोहिया वगैरे पांच नेत्यांना हनुमान नगरमध्यें तुरुंगांत डांबलें. या राजबंद्यांना घेऊन जाण्यासाठीं इंग्रजांची फौज नेपाळच्या सरहद्दीवर आली.

'उद्यां नेपाळ सरकार जयप्रकाशबाबूंना इंग्रज सरकारच्या हवालीं करणार' ही बातमी गांवभर पसरली. आपल्या नेत्याला बंधमुक्त करण्यासाठीं कांहीं कार्यकर्ते तुरुंगाकडे गेले. त्यांतील कांहीं जणांनीं तुरुंगांत प्रवेश करवून घेऊन तेथें आग लावली. "आग! आग!!" करीत बहुतेक सारे शिपाई तिकडे

धांवले. दुसऱ्या कार्यकर्त्यांनीं दुसऱ्या बाजूनें जाऊन, एकदोन शिपायांस ठार मारून आपल्या नेत्यांना बंधमुक्त केलें. तुरुंगा-बाहेर दहाबारा हजार लोक जमले होते. त्यांनीं तुरुंगाचे दार फोडलें आणि आंत घुसून दिवे मालविले. तुरुंगांत अंधारच अंधार! त्या अंधारांतून स्वातंत्र्याच्या तेजस्वी ज्योती बाहेर पडल्या. जयप्रकाशबाबू आपल्या साथीदारांसह तेथून बाहेर पडले. त्यांनीं सरकारला दुसऱ्यांदा चकविलें. नंतर ते सर्व देशभर फिरत राहिले. क्षणाचीहि विश्रांती न घेतां स्वातंत्र्याचा लढा चालवीत राहिले—त्यामुळें त्यांची प्रकृति बिघडली. म्हणून ते काश्मिरला जाण्यास निघाले; पण वाटेंतच अमृतसर येथें सरकारनें त्यांना पकडलें आणि लाहोरच्या किल्ल्यांत स्थानबद्ध करून ठेवलें.

दुसऱ्या महायुद्धांत स्टॅलिनग्रॅडचें जें महत्त्व, तेंच 'चले जाव!' च्या लढ्यांत अहमदाबादचें, असें म्हणतात. अहमदाबाद म्हणजे गांधीजींची तपोभूमि व वल्लभभाईंची कर्मभूमि! हजारों मजूर तेथील गिरण्यांत काम करीत असतात. १९१८ सालीं तेथील मजुरांसाठीं गांधीजींनीं उपोषण केलें होतें. तेथील 'मजूर-महाजन-संस्था' देशांत अपूर्व आहे. हजारों मजुरांनीं स्वयंस्फूर्तीनें हरताळ पाडला आणि तो साडेतीन महिने कायम टिकविला. हिंदुस्थानांत ही घटना अद्वितीय होती. गिरणी-मालकांनींहि मजुरांच्या ह्या राष्ट्रकार्यास, ह्या स्वातंत्र्य-सेवेस सढळ हातानें मदत केली; म्हणून त्या नवकोट—नारायणांनाहि, दरिद्र—नारायणाबरोबर, पोलिसांनीं हल्ले करून चोप दिला.

ता. १० रोजीं गुजरात कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं एक मिरवणूक काढली. पोलिसांनीं कॉलेजची आघाडी–पिछाडी रोखून धरली. कॉंग्रेसचा ध्वज एका तरुणानें आपल्या हातांत धरला होता. त्याला पोलिसांनीं गोळी घातली. पडतां पडतां त्यानें आपल्या हातांतील झेंडा दुसऱ्या विद्यार्थ्याजवळ दिला. पोलिसांनीं झेंडा हिसकावण्याचा प्रयत्न पुन: पुन: केला; पण विद्यार्थ्यांची बहादुरी व शिताफी मोठी ! झेंडा कांहीं पोलिसांच्या हातीं लागला नाहीं. तेव्हां पोलिसांनीं लाठीमार सुरू केला, अश्रु-धूरहि सोडला. सुमारें तीन हजार विद्यार्थी पोलिसांच्या माऱ्याला तोंड देत होते. नंतर इतर हजारों विद्यार्थी त्या स्वातंत्र्य-भक्तांच्या समूहांत सामील झाले. ते पोलिसांना अनावर वाटूं लागले. तेव्हां सरकारनें लष्कर पाठविलें. सातशें सैनिक लॉऱ्यांतून भरभरून आले. त्यांनीं भयंकर लाठीमार सुरू केला. तरी ते विद्यार्थी जमिनीवर बसून राहिले. तेव्हां त्यांना सैनिकांनीं कुत्र्याप्रमाणें ओढून फेकून देण्यास सुरवात केली. युद्ध-नीति नाहीं, सभ्यता नाहीं, साधी माणुसकीहि नाहीं—अशा रीतीनें सरकार स्वातंत्र्य-भक्तांशीं सामना देत होतें.

आणि दुसऱ्या दिवशीं तर काय ? महायुद्धांतील रणगाडे व मशिनगन्स हेंच सरकारनें तेथें आणले—त्या नि:शस्त्र मजुरांवर वचक बसविण्यासाठीं ते साऱ्या शहरभर फिरविले-नुसते फिरवलेच नव्हे तर बेभानपणें वापरलेहि ! आठ वेळां गोळीबार झाला. १४ नागरिक प्राणस मुकले. एक हजारांवर लोकांना पकडण्यांत आलें. चारशेंवर स्वातंत्र्य-सैनिकांस शिक्षा देण्यांत आल्या.

रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्या नागरिकांसहि पोलिसांनीं हाणमार केली. सारे बाजार, साऱ्या शाळा चारचार महिने बंद झाल्या. नगरपालिकेच्या नोकरांनींहि चार महिने हरताळ पाडला. ब्रिटिशांचें राज्य तेथें चालू आहे कीं नाहीं, याचा संशय येण्या-सारखी परिस्थिति निर्माण झाली.

खेडा जिल्ह्यांतहि पोलिसांनीं गोळीबार केला. उलट लोकांनीं पोलिसांवर हल्ला केला. डाकोर येथें पोलीस पेंचांत सांपडले. छोटाभाई नांवाच्या कार्यकर्त्यानें लोकांना समजावलें, शांत केलें, म्हणूनच पोलीस वांचले. ह्या उपकाराची फेड पोलिसांनीं कशी केली? दुसरी पोलीस-तुकडी आली आणि तिनें छोटाभाईसच गोळी घालून ठार केलें. त्यांनीं वांचविलेले पोलीस त्यांच्यावरील हल्ला शांतपणें पहात होते.

◆


बिहारमधील जमशेटपूर हें मजुरांचें मोठें केंद्र. तेथील टाटांच्या पोलादी कारखान्यांत तीस हजार कामगार काम करतात. त्यांनीं ता. ९ ऑगस्टपासून हरताळ पाडला आणि तो तेरा दिवस पूर्ण शांततेनें चालविला. तें त्यांचें स्वातंत्र्य-प्रेम पाहून २८ पोलीस आपल्या नोकरीचा राजीमामा देऊन स्वतंत्र झाले. ५६ पोलिसांना सरकारनें सक्तमजुरीच्या शिक्षा सुनावल्या.

ता. ६ सप्टेंबरचा दिवस. जमशेटपूरमधील पंधरा हजार लोक मिरवणुकीनें तुरुंगाच्या दाराशीं उभे राहिले. तेथें कॉंग्रेसच्या कांहीं पुढाऱ्यांना डांबलेलें होतें. त्यांच्यावर जुलूम होत असल्याच्या बातम्या पसरल्या होत्या; म्हणून लोकांनीं तुरुंगापुढें उभे राहून

उच्च स्वरानें मागणी केली, ‘ आमच्या नेत्यांचें दर्शन आम्हांला घडवा ! ’ संघटित जनतेची मागणी फेटाळणें त्या अधिकाऱ्यांना शक्य नव्हतें. त्यांनीं पुढाऱ्यांना बाहेर आणलें. त्यांची प्रकृती ठीक असल्याचें बघून जनतेनें आनंदानें जयघोष केला, त्यांना पुष्पहार घालून मानपत्रहि दिलें. अधिकारी समजूतदार असल्यानें केवढा अनर्थ टळला !

महाडच्या मोर्च्यांत वसंत दाते यांनीं आत्मबलिदान केलें. भाई कोतवाल हे तर कर्जतच्या डोंगरावरून पोलिसाशीं बंदुकीनें सामना देत देत ता. १ जानेवारी १९४३ रोजीं धारातीर्थी पतन पावले. खानदेशांतील दोनशें भिल्ल तिरकामठ्यांनीं सरकारशीं लढूं लागले. पोलिसांच्या गोळीबारांत २५।३० भिल्ल कामास आले.

संस्थानांतील जनता म्हणजे दोन तुरुंगांमध्यें कोंडलेली. तरी म्हैसूर, कोल्हापूर, ग्वाल्हेर, बडोदें वगैरे संस्थानांमधील जनतेनें बाहेरच्या चळवळीस साथ दिली. म्हैसूर संस्थानांतील सतरा कारखान्यांमधील ३२८०० मजुरांनीं दोन आठवडे हरताळ पाडला. “ भद्रावती आयर्न वर्क्स ”मधील तीन हजार मजुरांनीं एक महिना हरताळ पाडला. बंगलोरमधील चार कापड-गिरण्यांतील तेरा हजार मजूर संपावर गेले. कोल्हापूर संस्थानांतील गारगोटी-लुटीचा हल्ला रोमांचकारक होता. तुरुंगांतून पळून जाऊन, पुलावरून आगगाडी जात असतां, बेड्यासह उडी टाकणारे वीर सह्याद्रीच्या कुशींतून अनेक निघाले.



चलो दिल्ली!

"सुभाषबाबू गुप्त झाले! —सुभाषबाबूंचें अज्ञातस्थळीं प्रयाण!!" अशा वार्ता ता. २६ जानेवारी १९४१ च्या सर्व वृत्तपत्रांत ठळकपणें झळकल्या. सारें जग थक्क झालें; ब्रिटिश सरकार संत्रस्त झालें.

आग्र्याहून सुटका करून घेणारे शिवाजीमहाराज, एडनच्या कारागृहांतून पलायन करणारे वासुदेव बळवंत, मार्सेलसजवळ आगबोटींतून उडी घेणारे सावरकर, हजारीबाग तुरुंगांतून निसटून जाणारे जयप्रकाश—ह्या सर्व हिंदी स्वातंत्र्य-वीरांचा साहसी इतिहास सरकारी अधिकाऱ्यांना माहीत होता आणि म्हणूनच त्यांनीं सुभाषबाबूंना वीस वर्षांत अकरा वेळां तुरुंगांत

टाकलें होतें. १९४० सालींहि ते तुरुंगांतच होते. तेथें त्यांनीं अन्नत्याग सुरू केला. म्हणून त्यांना बंधमुक्त करणें सरकारला भाग पडलें; तरी त्यांच्यावर सक्त पहारा होताच.

ता. ५ डिसेंबर रोजीं सुभाषबाबू सुटले. ते आजारी आहेत असें जाहीर झालें. ते एका खोलींत ध्यानस्थ बसूं लागले; त्यामुळें घरांतील मंडळींनाहि ते भेटूं शकत नसत. या एकान्तवासाचा फायदा घेऊन, पठाणाचा वेष पेहरून, ता. १६ जानेवारी १९४१ रोजीं, रात्रीं ८ वाजतां, सुभाषबाबू कलकत्ता येथील आपल्या बंगल्यांतून बाहेर पडले. मोटारीनें चाळीस मैल जाऊन त्यांनीं रेल्वेस्टेशन गांठलें. दुसऱ्या दिवशीं ते पेशावरला पोचले. आणि पुढें एकसारखीं किती देशान्तरें! किती वेषान्तरें!

देशगौरव सुभाषचंद्र बोस! आय्. सी. एस्. ची परीक्षा वरच्या श्रेणींत उत्तीर्ण झालेले! क्रांतिकारकांच्या कटाचे सूत्रधार! राष्ट्रीय कॉंग्रेसचे दोनदां अध्यक्ष! 'पुरोगामी पक्षाचे' संस्थापक. पण आज?

झियाउद्दिन या नांवानें, पठाणी वेषांत, बहिऱ्यामुक्याचें सोंग घेऊन, रानावनांतून, डोंगरदऱ्यांतून काबूलला जाण्यासाठीं ते पायीं निघाले. बरोबर फक्त एक पंजाबी तरूण. अफगाणिस्तानांत दोन महिने ते राहिले. तेथून मोटारनें रशियाच्या सीमेपर्यंत ते गेले आणि रेल्वेनें प्रवास करून ता. २० मार्च रोजीं त्यांनीं मॉस्कोमध्यें प्रवेश केला. तेथील सत्ताधाऱ्यांशीं भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटी करून, आठ दिवसांनीं ते

जर्मनींत जाऊन थडकले. बर्लिन येथें हिटलरशीं संधान बांधून त्यांनीं हिंदी स्वातंत्र्य-लढयाला साह्य मिळविलें.

कोठें जर्मनी व कोठें जपान! पृथ्वीचीं दोन टोकेंच जणूं! पण सुभाषबाबू १९४३ च्या एप्रिल महिन्यांत जर्मनीहून निघाले आणि तीन महिने, समुद्राच्या पोटांतून, मृत्यूशीं झुंजत झुंजत, पाणबुडींतून प्रवास करीत, ता. २० जून १९४३ रोजीं, जपानमध्यें टोकिओ येथें जाऊन पोंचले! पूर्व दिशेकडून हिंदुस्थानांतील ब्रिटिश-सत्तेवर हल्ला करावा आणि त्यासाठीं सशस्त्र सैन्य उभारावें, ही त्यांची योजना. हिंदुस्थानांत चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याला पोषक अशी "दुसरी आघाडी" उघडण्यासाठीं ते जिवावर उदार होऊन जपानमध्यें गेले. ही "दुसरी आघाडी" ते लढले; ते जर्मनी किंवा जपान यांचे अंकित म्हणून, हस्तक म्हणून, गुलाम म्हणून मुळींच नाहीं! ब्रिटिशांच्या त्या दोन शत्रूंची कुमक घेऊन, स्वतःच्या बळावर, स्वाभिमान कायम ठेवून, त्यांनीं आपलें स्वतःचें स्वतंत्र सरकार स्थापलें, स्वतंत्र सैन्य उभारलें, स्वतंत्र निशाण फडकविलें, स्वतंत्र राष्ट्रीय बँक उघडली, एवढेंच नव्हे तर स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या हिंदुस्थानाची व्यवस्था ठेवण्यासाठीं "पुनर्घटना-खातें" हि चालू केलें!!

"चलो दिल्ली!" ही वीरवाणी नभोवाणीवर ऐकून त्या वेळीं कोणा हिंद-पुत्राचें शरीर रोमांचित झालें नसेल? ते नेताजी, त्यांचा तो "जय हिंद", त्यांचें तें व्याघ्रचित्र, त्यांचें तें

मोर्चा-गीत—त्यांतील एकएका शब्दानें हिंदी अंतःकरणें थरारून गेलीं, फुलून आलीं.

" तुम हमको खून दो।
मैं तुमको आझादी दूँगा ॥ "

[तुम्हीं मला आपलें रक्त द्या, मी तुम्हांला स्वातंत्र्य देतों.]

ही नेताजींची प्रतिज्ञा सिंगापुरांतील लाखों तरुणांच्या अंतःकरणांत विजेप्रमाणें तेज पसरवीत होती. ते तरुण आपल्या रक्तानें अर्ज लिहून देत होते. हजारों स्त्री-पुरुष चरखायुक्त तिरंगी झेंडा खांद्यावर टाकून पुढील रण-गीत गगनभेदी स्वरांत गात होते:—

कदम कदम बढा ए जा। खुशी का गीत गाये जा
यह जिंदगी है कौम की। तो कौम पै लुटाये जा
तू शेरे हिंद आगे बढ। मरने से फिर भी तू न डर
आसमाँ तक उठा के सिर। जोशे वतन बढाये जा !
चलो दिल्ली पुकार के। कौमी नीशाँ सम्हाल के
लाल किल्ले गाड़ के। लहराये जा लहराये जा।

ही दिव्य आशा, ही वीरश्री, ही सर्वस्व-बलिदानाची तयारी साध्यासुध्या हिंदी माणसांच्या अंतःकरणांत सुभाषबाबूंनीं कशी निर्माण केली ? अशी कोणती जादू त्यांच्यापाशीं होती ? असें कोणतें आमिष त्यांनीं त्यांना दाखविलें ?

" विश्वास असूं द्या. गडद अंधकार असो कीं प्रखर सूर्यप्रकाश असो, दुःखाचे डोंगर कोसळोत अथवा आनंदाच्या

लहरी येवोत, यातना भोगाव्या लागोत अथवा विजयानंदाचा वर्षाव होवो. सर्व वेळीं मीं तुमच्याबरोबरच असेन." ही त्यांची जादू!

"तूर्त तहान, भूक, यातना, सक्तीची चाल आणि मृत्यु यांखेरीज मी तुम्हांला कांहींहि देऊं शकत नाहीं." हें त्यांनीं दाखविलेलें आमिष!

मातींतून माणसें व माणसांतून वीर निर्माण करणारा एक मंत्र सुभाषबाबूंना माहीत होता. तो म्हणजे, "तिथें, त्या नदीपलीकडे, त्या अरण्यापलीकडे, त्या टेकड्यापलीकडे, दूर अंतरावर आपली मातृ-भूमि आहे. ती तुम्हांला हांक मारीत आहे. रक्त रक्ताला बोलावीत आहे. उठा! चला, शस्त्रें उचला! दिल्लीवर कूच करा!"

हिंदुस्थानचें स्वतंत्र सरकार? होय. ता. २१ ऑक्टोबर १९४३ रोजीं सिंगापूर येथें सुभाषचंद्रांनीं हिंदुस्थानचें राष्ट्रीय सरकार स्थापन केलें. कॉंग्रेसचा तिरंगी झेंडा तेथें फडकला. या सरकारचे पंतप्रधान, युद्ध-मंत्री व परराष्ट्रमंत्री खुद्द सुभाषचंद्रच होते. सेनापती नेमण्यांत आले. इतर मंत्रीहि नेमण्यांत आले. ता. ५ जुलै १९४३ रोजीं सुभाषचंद्रांनीं "आझाद हिंद फौजेची" उभारणी केली होती. त्यांत पन्नास हजारांहून अधिक हिंदी लोक सामील झाले होते. ब्रिटिशांच्या लष्करांत पोटासाठीं राबणारे हिंदी सैनिक, स्वातंत्र्याच्या मंत्रानें मोहून क्षणार्धांत आझाद हिंद-फौजेंत दाखल होत. शेंकडों स्त्रियाहि या स्वातंत्र्य-युद्धांत भाग घेण्यासाठीं पुढें आल्या. कॅ. लक्ष्मी स्वामिनाथन् ह्या

त्यांच्या प्रमुख ! "झांशीची राणी-पलटण" उभारण्यांत आली. हिंदी ललना विजेप्रमाणें तळपूं लागल्या. ह्या "आझाद हिंद-सरकार"ला जपान, जर्मनी, इटली, चीन, ब्रह्मदेश, आयर्लंड इ. नऊ राष्ट्रांनीं मान्यता दिली.

◆ जसा माणसांचा तसाच पैशाचाहि पाऊस सुभाषचंद्रांवर पडला. रंगून येथील एका सभेंत त्यांच्या एका पुष्पहाराला सात लाख रुपये किंमत येत होती. पण एका लक्षीपुत्रानें आपली सर्व जिंदगीच्या जिंदगीच त्या स्वातंत्र्य-मालेसाठीं अर्पण केली !

◆ एक चांदीची फुलदाणी ! तिची किंमत काय असणार ? ती एका नोकरानें सुभाषबाबूंना नांग येथील सभेंत नजर केली. तेवढेंच त्याचें ऐश्वर्य होतें. त्या फुलदाणीचा लिलांव सुभाषबाबूंनीं सभेंत केला. एक लाख पांच हजार डॉलर्स इतकी किंमत त्या फुलदाणीला आली. स्वातंत्र्य-प्रेमाची किमया अशी आहे.

◆ रंगूनच्या विमानतळावर एक मोटार आली. त्यांतून नेताजी बाहेर आले. तेथें जमलेल्या शेंकडों हिंदी लोकांनीं त्यांचा जयजयकार केला; पण नेताजींची मुद्रा खिन्न दिसत होती. एका धनिक व्यापाऱ्यानें नेताजींच्याजवळ जाऊन हलक्या आवाजांत विचारलें, "नेताजी, आपल्याला कसली चिंता तर नाहीं ?"

"चिंता आहे वीस लाख रुपयांची !" नेताजींनीं गंभीरपणें उत्तर दिलें. "माझ्या सैनिकांवर आणीबाणीचा प्रसंग ओढवला

आहे. गवतपाला खाऊन त्यांना रहावें लागत आहे. उपाशी पोटीं त्यांना लढावें लागत आहे. हें मला पहावत नाहीं. त्यांच्यासाठीं वीस लाख रुपये मला कोण देणार ? ”

विमान निघण्याला दहाच मिनिटें अवधि होता. तेवढ्यांत त्या व्यापाऱ्यांनीं आपापसांत देणग्यांचे आंकडे टाकले. ते वीस लाखांचे वर भरले. ती यादी पाहून, मुक्त हास्य करीत सुभाष-बाबू विमानानें शोनानला गेले !

◆ शोनान म्हणजे दक्षिणेकडचा दिवा ! सिंगापूर स्वतंत्र झाल्यानंतर त्याला सुभाषचंद्रांनीं हें स्वतंत्र नांव दिलें. तसेंच अंदमान व निकोबार हीं बेटें त्यांच्या अंमलाखालीं येतांच, “ शहीद बेटें ! ” व “ स्वराज्य बेटें ! ! ” असें त्यांनीं त्यांचें नामकरण केलें व तेथें तिरंगी ध्वज फडकविले. तसेच तिरंगी ध्वज दिल्लीच्या लाल किल्ल्यावर फडकविण्यासाठीं सुभाषबाबू आपल्या रक्ताचें पाणी करीत होतें. त्यांचें स्वतंत्र भारताचें स्वप्न त्यांच्या डोळ्यासमोर साकार झालें असतेंहि; पण दुर्दैव ! ता. १६ ऑगस्ट १९४५ रोजीं ते टोकिओकडे जाण्यासाठीं विमानानें निघाले; पण ता. १८ ऑगस्ट रोजीं त्यांच्या विमानास अपघात झाला. विमान जमिनीवर कोसळलें आणि अकस्मात् पेटलें. त्यांत ह्या अलौकिक स्वातंत्र्य-सैनानींचें शरीर जळून भस्मसात् झालें. त्यांचें युद्धमय, तेजस्वी, स्वातंत्र्य-प्रेमी जीवन अजरामर झालें !

‘ चले जाव ! ’ च्या चळवळीनें बहुसंख्य जनता ब्रिटिश सरकारावर संतप्त झाली—तिलांजली देण्यास तयार झाली; पण परक्या सरकारचा बालेकिल्ला म्हणजे त्याचें लष्कर ! त्या

लष्करांतहि स्वातंत्र्याचें वारें सुभाषबाबूंनीं संचरविलें. त्यांच्या "आझाद सेनेंतील" एकएका सैनिकाचे चारचार, आठ-आठ नातेवाईक ब्रिटिशांच्या नोकरींत होते. ते साहजिकच ब्रिटिशांविरुद्ध उठले.

◆

आणि १९४६ सालीं आरमारी दलानेंहि बंड पुकारलें. मुंबई येथें शेंकडों नाविकांनीं सैनिकांवर खुशाल गोळ्या चालविल्या. त्याला निमित्त होतें वैयक्तिकच; पण या नाविकांच्या बंडानें ब्रिटिश सत्तेला एक जोराचा तडाखा दिला यांत शंका नाहीं. अवघे पांचच दिवस हें खलाश्यांचें बंड टिकलें; पण तेवढ्या काळांत अधिकाऱ्यांचें धाबें दणाणून गेलें. साऱ्या मुंबई शहरांत जणूं अराजकच होतें. मुंबई हें अखिल राष्ट्राचें नाक. तेंच कापलें जात आहे, असें ब्रिटिश सरकारला वाटलें. इंग्लंडांतील मुत्सद्दीहि कावरेबावरे झाले.

महायुद्ध संपलें होतें. कॉंग्रेसचे पुढारीहि तुरुंगांतून सुटले होते. अशा वेळीं, ता. १८ फेब्रुवारी १९४६ रोजीं सोमवारीं, मुंबई बंदरांतील 'तलवार' नांवाच्या बोटीवरील एक हजार नाविकांनीं संप पुकारला आणि त्याला धार येण्यासाठीं अन्नसत्याग्रहहि सुरू केला. कशासाठीं? गोऱ्या नाविकांकरितां हिंदी खलाशांचा तिप्पट खर्च पगार, अन्न वगैरे बाबतींत होई. कपडे, रजा वगैरे गोष्टींतहि अशीच विषमता असे. ती हिंदी लोकांना अपमानकारक वाटे. ती दूर करण्यासाठीं त्यांनीं हा संप पुकारला. त्यांनीं आपल्या मागण्या अधिकाऱ्यांकडे पाठविल्या.

पण त्यांना उत्तर काय मिळालें? तर "तुम्हीं हमालाची अवलाद आहांत; कुत्र्यांची अवलाद आहांत." अशा शिव्या आणि वर एका संप-पुढाऱ्याला अटक!

ब्रिटिश अधिकाऱ्यांचें हें उन्मत्तपणाचें वर्तन बंदराबंदरांतून कळविण्यांत आलें. कारण ठिकठिकाणच्या जहाजांना संदेश देणारीं बोटीवरील यंत्रें हिंदी नाविकांच्याच हातीं होतीं. त्यांनीं आपल्या संपाचा डंका देशभर वाजविला; त्यामुळें कलकत्ता, कराची वगैरे बंदरांतील जहाजांवरहि हिंदी नाविकांनीं सहानुभूतिपर संप पुकारले.

"तुम्हीं जर आमच्यावर किनाऱ्यावरून गोळीबार केला, तर 'नर्मदा' तोफा डागील." असा खणखणीत इषारा बंडवाल्यांनीं सरकारला दिला. 'नर्मदा' हें एका लढाऊ जहाजाचें नांव. अशा वीस लढाऊ जहाजांवर हिंदी नाविकांचें मुंबईंत वर्चस्व होतें. पंधरा-वीस हजार नाविक संपांत सामील झाले. त्यांनीं काम बंद ठेवलें. "रिकामें मन म्हणजे सैतानाचें सदन!" ह्या न्यायानें संपवाल्यांचे चाळे सुरू झाले. त्यांच्या बाणेदार व लढाऊ वृत्तीला संघटित करणारा व योग्य वळण लावणारा नेता त्यांना भेटला नाहीं. त्यांचेपाशीं होता फक्त ब्रिटिशांचा द्वेष! म्हणून ते मुंबई शहरांत घुसले—ब्रिटिशांचीं दुकानें लुटूं लागले व ब्रिटिश सोजिरांचा पाठलाग करून त्यांना मारहाण करूं लागले. ब्रिटिशांचें युनियन जॅक निशाण जेथें दिसेल, तेथें त्यांनीं खालीं ओढलें. सर्व आरमारी बोटींवर तिरंगी निशाण फडकूं

लागलें आणि आरमारी मोटारीवर ' जय हिंद ! ' चे फलक झळकूं लागले. बोटी-बोटींवर " चले जाव " च्या घोषणा करण्यांत येऊं लागल्या.

गुरुवारीं तर सतत आठ तास साक्षात् युद्धच झालें. तोफा-बंदुका वगैरे शस्त्रें नाविकांच्या हातीं होतीं आणि सरकार तर सदैव सशस्त्रच असतें. दोन्हीं दळांमध्यें तुमुळ युद्ध माजलें. नाविकांना चीड येणारी आणखी एक गोष्ट घडली. ती अशी कीं, आदले दिवशीं रात्रीं ते आपापल्या बराकीमध्यें गेले असतांना सरकारनें त्यांच्यावर सशस्त्र पहारा ठेवला. त्यांतहि हिंदी सैनिक काढून गोरे सैनिक पहाऱ्यासाठीं ठेवले. नाविकांना जणुं कैदखानाच मिळाला. सकाळीं नऊ वाजल्यापासून बंदरांतील बोटीवरून नाविक-बंडखोर ब्रिटिशांच्या लष्करावर गोळ्यांचा वर्षाव करीत होते. उलट ब्रिटिश लष्करहि त्यांच्यावर गोळ्यांचा पाऊस पाडीत होते. ही गोळागोळी दुपारीं साडेचारपर्यंत चालली.

दिल्लीचे गोरे अधिकारी मुंबईस धावले. हें " बंड मोडण्या-साठीं सरकार सर्व शक्ति खर्च करील—जरूर पडल्यास संपूर्ण आरमारहि बेचिराख करील. " अशी धमकीहि त्यांनीं दिली. शुक्रवारीं मुंबईंतील जनतेनें संपूर्ण हरताळ पाडला. बंडवाले जोरावले. गुंडांचेंहि फावलें. नाक्यानाक्यावर लष्करी मोटारी जळूं लागल्या, पोलीस-चौक्या पेटूं लागल्या व ट्रामबसेसना आगी लागल्या. पोष्ट वगैरे सरकारी कचेऱ्या व बँका यांतील कागदपत्र रस्त्यावर जाळण्यांत आलें व पोलिसांचे रस्ते अडविले गेले.

रेशनदुकानें लुटलीं गेलीं, गिरण्यांना व स्टेशनांना आगी लागल्या. लालबाग-विभागांत तीस हजार मजुरांच्या जमावानें पोलिसांना गराडा घातला. तेथें गोळीबार झाला—गिरणगांवांतहि झाला—अनेक ठिकाणीं, अनेक वेळां झाला. काळबादेवी भागांत तर लष्करानें दोन ठिकाणीं मशिनगन्सहि चालविल्या. जणूं युद्ध-कुंडच मुंबई शहरांत पेटलें.

संपाचे पुढारी काँग्रेस-नेत्यांकडे मार्गदर्शनासाठीं आले. सरदार वल्लभभाई पटेलांनीं त्यांना असें आश्वासन दिलें कीं, " तुमच्या मागण्या पुऱ्या व्हाव्यात म्हणून काँग्रेस प्रयत्नांची पराकाष्ठा करील. नाविकांच्या धैर्याबद्दल आम्हांला आदर वाटतो." त्याबरोबरच त्यांनीं असा सडतोड सल्लाहि दिला कीं, " तुम्हीं आपलीं शस्त्रें खालीं ठेवा आणि अधिकाऱ्यांना बिनशर्त शरण जा. " बंडखोरांचें धाडस अपूर्व होतें; पण तें बेशिस्त होतें. त्यांचें स्वातंत्र्य-प्रेम अलोट होतें; पण तें पद्धतशीरपणें प्रकट झालें नव्हतें. म्हणून त्यांच्या बंडाचा शेवट शरणागतींतच झाला.

शनिवारीं सकाळीं बंड खलास झालें. या बंडांत २५० वर लोक ठार झाले, १२५० वर माणसें जखमी झालीं आणि ३९६ नाविकांना अटक झाली. हें बलिदान यशस्वी झालें नसलें, तरी त्यानें एवढेंच सिद्ध केलें कीं, आरमारी-दलांतहि हिंदी स्वातंत्र्याचें वारें शिरलें आहे. आंग्ल-सत्ता ही समुद्राची स्वामिनी. तिचा सारा जीव आपल्या आरमारावर. तोहि आधार खचत चालल्याची ललकारी बंडखोर नाविकांनीं दिली. त्यांना

वर्ण–वैषम्य नको होतें, पारतंत्र्य नको होतें, त्यांच्या हातांत तिरंगी निशाण होतें व तोंडांतून "जय हिंद" चा घोष बाहेर पडत होता. "चले जाव" चें वारें त्यांच्या अंगांतहि प्रथमच संचरलें होतें.

◆

अस्मानी व सुलतानी, दोन्हीं तऱ्हेचीं संकटें या काळांत बंगाली जनतेवर कोसळलीं. एकीकडे जनतेचीं विध्वंसक कृत्यें तर दुसरीकडे सरकारचे राक्षसी अत्याचार! एकदां वादळानें कहर उडविलेला तर एकदां दुष्काळानें जीव नकोसा केलेला. १९४३–४४ या सालांत बंगालमध्यें भीषण दुष्काळ पडला. व्यापाऱ्यांनीं साठेबाजी करून १५० कोटी रुपयांची नफेबाजी केली, लीग-मंत्रिमंडळानें गाफिलगिरी केली आणि ब्रिटिश सरकारनें कमालीची हयगय केली, किंबहुना तें आपल्या नाच-मेजवान्या–शर्यतींत दंगच्च राहिलें. किड्यामुंग्यांच्या जिवा-इतकीहि किंमत हिंदी नागरिकांच्या प्राणाला कोणी दिली नाहीं. कलकत्त्याच्या भररस्त्यावरसुद्धां अन्नान्न करीत मेलेल्या माणसांचीं प्रेतें दिसूं लागलीं—त्यावर गिधाडें खुशाल ताव मारीत होतीं.

"असें उपाशी मरण्यापेक्षां बंगाली लोकांनीं मोर्चे काढून व्हाइसरॉयाच्या राजवाड्याच्या दगडी भिंतीवर आपलीं डोकीं कां नाहीं फोडून घेतलीं?" असा वैतागाचा सवाल म. गांधींनीं बंधमुक्त झाल्यावर केला; पण केवळ उपाशी, निराश, दीनदुबळी प्रजा संघटित होऊं शकत नाहीं, प्रतिकार करूं शकत नाहीं,

क्रांति घडवूं शकत नाहीं. तिला ध्येयवादी, लढाऊ व संघटना-कुशल असा नेताच मिळावा लागतो. काँग्रेसचे सारे पुढारी तुरुंगांत असल्यामुळें बंगाली जनतेला असा नेता लाभला नाहीं; त्यामुळें हताशपणें, अगतिकपणें, दिवसादिवसाला झिजत झिजत, झुरळा-पालीप्रमाणें बंगाली लोक या दुष्काळांत खाक झाले.

किती लोक मेले? 'पंधरा लाख!' असें सरकारचे वुड-हेड कमिशन म्हणतें; पण कलकत्ता विद्यापीठाचे प्रतिनिधी ३४ लखांचा आंकडा सांगतात! आणि जे अभागी बांधव जिवंत राहिले, त्यांच्या पाठीमागें कॉलरा, मलेरिया वगैरे रोगांच्या साथी लागल्या. यामुळें हैराण झालेल्या जनतेच्या चित्तांत इंग्रज सत्ते-विषयींचा द्वेष शिगेस पोचला.

१९४२ च्या स्वातंत्र्य-लढ्याचें वैशिष्ठ्य हें कीं, त्यांत सेनापतीशिवाय सेनाच लढत राहिली. पुढाऱ्यांशिवाय जनतेनें चळवळ चालविली. काँग्रेस व समाजवादी नेत्यांवर सरकारनें अचानक झडप घालून त्यांना तुरुंगांत डांबलें. कम्युनिस्ट पक्षानें तर ह्या लढ्यास विरोध केला, मुस्लीम-लीग अलग राहिली, शिखांनीं बहिष्कार घातला, डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यांनीं स्पर्शहि टाळला आणि हिंदु-सभेनें तर हा लढा देशाचें दुर्दैव मानला व पुढें फाळणी झाली म्हणून 'स्वातंत्र्य-दिन' हा सुतकदिन असा पाळला. जनतेनेंच स्वयंस्फूर्तीनें, सुचेल त्या मार्गानें, हा लढा नेटानें, निकरानें चालविला.

ह्या लढयाचें हिंसक धोरण गांधीजींच्या तत्त्वज्ञानांत न बसणारें होतें. तरी त्या हिंसेची जबाबदारी त्यांनीं सरकारच्या अत्याचारा-वरच टाकली आणि ऑगष्टचा ठराव अढळ असल्याची घोषणा पुन:पुन: केली.

पं. नेहरू तर काय ? बंधमुक्त होतांच त्यांनीं दिल्लीच्या सभेंत जाहीर केलें, " ह्या लढ्यांतील कृत्यांची सर्व जबाबदारी मी माझ्या शिरावर घेण्यास तयार आहें. कारण त्याला योग्य अशी परिस्थिति निर्माण करण्यांत माझा हात होता. सरकारचें आव्हान जनतेनें स्वीकारलें नसतें, तर मला दु:ख झालें असतें. पण तें स्वीकारून जनतेनें आपल्या अंगचें नवेंच तेज दाखविल्या-मुळें मला हर्ष व अभिमान वाटतो. "

पुढें ह्या लढ्याला यश येऊन स्वतंत्र भारतासाठीं घटना-परिषद भरविण्यांत आली; तेव्हां तिच्यांत स्वातंत्र्याचा ठराव पं. नेहरूंनीं मांडला. त्याला पाठिंबा देतांना श्री. पुरुषोत्तमदास टंडन म्हणाले, " १९४२ चा लढा हाच खरोखर ह्या घटना-परिषदेचा विधाता आहे. या लढ्यानें ब्रिटिशांचे डोळे उघडले आणि त्यांना वाटूं लागलें, आतां आपण हिंदुस्थानांत राहूं शकत नाहीं. "

खुद्द इंग्लंडमध्यें, लॉर्डांच्या सभेंत, अशी कबुली दिली गेली कीं, " ह्यापुढें दंडुक्याच्या जोरावर हिंदुस्थानवर राज्य चालविणें आम्हांला मुळींच शक्य नाहीं. "

लोक विटले, सैन्य फितलें, पोलीस उलटले, आरमार चालून आलें. मग ब्रिटिश-सत्तेचा हिंदुस्थानांत दीडशें वर्षें पसरलेला

कालिया जिवंत राहील कशाच्या जोरावर ? त्यानें आपल्या दडपशाहीच्या साऱ्या विषारी फणा पुनःपुनः जमिनीवर आपटून पाहिल्या; पण त्यामुळें आपल्याला केवळ रक्त मात्र ओकावें लागतें, असें पाहून हा पारतंत्र्याचा कालिया हिंदुस्थानच्या डोहांतून १९४७ च्या ऑगस्टमध्यें पार निघून गेला.






पूर्वेकडील तारा

'पूर्वेच्या क्षितिजावर नव्या ताऱ्याचा उदय झाला.' असें वर्णन पं. नेहरूंनीं भारतीय स्वातंत्र्याच्या जन्मकालाचें केलें.

हा तारा हिंदुस्थानचें पिढ्यानुपिढ्यांचें भाग्य उजळविणारा आहे.

हा तारा सर्व आशिया खंडाचें भवितव्य प्रकाशीत करणारा आहे. किंबहुना—



हा तारा अखिल मानवजातीला अंधारांतून प्रकाशाकडे, युद्धांतून शांततेकडे आणि असत्यांतून सत्याकडे नेणारा मार्ग दाखविण्यास समर्थ आहे. कारण—

या ताऱ्याचें तेज म्हणजे हिंदुस्थानांतील असंख्य मुत्सद्द्यांच्या विद्वत्तेचें तेज आहे, अगणित देशभक्तांच्या स्वार्थत्यागाचें तेज आहे, ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांच्या प्राणज्योतींचें तेज आहे.

या ताऱ्याच्या उदयासाठीं कोटी कोटी भारतीयांनीं जे संकल्प केले ते आज सिद्धीस गेले, जे नवस केले ते फळास आले, जे प्रयत्न केले ते यशस्वी झाले.

हा तारा उदयास येण्यापूर्वीं हजारों स्वातंत्र्य-भक्त अंधारांत चाचपडत चालले, ठेचाळत गेले, रक्ताळले तरी पुढें आणि पुढेंच चालले. त्या सर्वांच्या डोळ्यांतील आकांक्षेचें एकवटलेलें तेज अंगीं धारण करूनच हा तारा ता. १४ ऑगस्ट १९४७ रोजीं रात्रीं बरोबर १२ वाजतां उदयास आला.

त्याच्या आधीं एक तास दिल्ली येथें घटना-परिषद भरली. "आकाश कोसळो, धरणी दुभंगो, पण आम्हीं स्वतंत्र भारतासाठीं राज्यघटना तयार करणारी परिषद राजधानींत, खेडयांत, जंगलांत, कोठेंहि पण भरवूंच भरवूं! आणि तडीस नेऊंच नेऊं!" अशी भीष्म-प्रतिज्ञा सरदार पटेलांनीं केली होती. ती पूर्ण झाली व ता. १४ रोजीं रात्रीं घटना-परिषदेच्या सर्व सदस्यांनीं अशी शपथ घेतली कीं,

"ह्या पुरातन भूमीला जगामध्यें हक्काचें स्थान प्राप्त व्हावें आणि तिनें जगाच्या शांततेकरितां व मानवाच्या कल्याणाकरितां झटावें, म्हणून मी माझें जीवित अत्यंत नम्रपणें हिंदुस्थानच्या व हिंदी जनतेच्या सेवेकरितां अर्पण करीत आहे."

शपथ घेण्यापूर्वीं सर्व सभासद हुतात्म्यांच्या स्मृतीकरितां दोन मिनिटें उभे राहिले!

त्या रात्रीं दिल्ली नगरी बहुमोल अलंकारांनीं नखशिखांत नटलेल्या राजकन्येसारखी दिसत होती. सर्वत्र विजेच्या दिव्यांचा लखलखाट पसरलेला होता. ठायींठायीं शोभेची दारू उडत होती. जणूं दिवाळीच अवतरली होती! आणि दुसरे दिवशीं जसा कांहीं पाडवाच उगवला. घराघरांवर गुढया उभारलेल्या दिसूं लागल्या. जिकडे पहावें तिकडे तिरंगी झेंडे! हिंदी स्वातंत्र्याचीं डौलदार निशाणें!

सकाळीं मंत्र्यांचा शपथविधी झाला. स्वतंत्र भारताचे मंत्री मिरवणुकीनें घटना-परिषदेच्या सभागृहाकडे गेले. लाखों लोकांनीं

त्यांचा, म. गांधींचा व भारतीय स्वातंत्र्याचा जयजयकार मुक्त कंठानें केला. सर्व जगांतील राष्ट्रांचे यशाचे संदेश आले होते. ते राजेंद्रबाबूंनीं वाचून दाखविले. घटना-परिषदेचें वातावरण 'वंदेमातरम्‌नें' भरून गेलें, 'जनगणमन' नें दुमदुमून गेलें. तिरंगी राष्ट्रध्वजाला ३१ तोफांची सलामी देण्यांत आली.

झेंडावंदनाला पांच लाख लोक जमले होते आणि वर आकाशांत विमानें भ्रमण करीत होतीं—पूर्वींप्रमाणें हिंदी नागरिकां-वर बाँब टाकण्यासाठीं नव्हे, तर त्यांच्या ध्येय-चिन्हाला, स्वातंत्र्य-प्रतीकाला, तिरंगी झेंडयाला, मान-वंदना करंण्यासाठीं !

निसर्गानेंसुद्धां या मंगल घटनेचें स्वागत केलें आणि हर्षभरानें आकाशांत सुंदर इंद्रधनुष्य उभारलें. स्वर्गीं गेलेल्या हिंदपुत्रांनीं आपल्या स्वातंत्र्य-संपन्न मायभूमीला नजराणा म्हणून पाठविलेलीं तीं हिरेपाचूंचीं कंकणें होतीं काय ?

आणि तो इतिहासप्रसिद्ध लाल किल्ला! त्यावर तिरंगी निशाण फडकविण्याची लालसा हृदयीं बाळगूनच सुभाषबाबू स्वर्गीं गेले होते. त्यासाठींच त्यांनीं 'चलो दिल्ली' हा घोष रानावनांतून व दऱ्याखोऱ्यांतून घुमविला. त्यांचे 'आझाद सैनिक' लाल किल्लयांत आले, परंतु ब्रिटिशांचे कैदी म्हणून! त्यांच्यावर लाल किल्लयांत खटले चालले. त्या खटल्यांत त्यांचे जे वकील म्हणून आले, त्यांत पं. जवाहरलाल, बॅरिस्टराचा आपला जुना झगा घालून बसले. आतां तेच त्या लाल किल्लयावर तिरंगी निशाण चढवीत होते—सुभाषबाबूंची मनीषा पूर्ण करीत होते. सुभाषचंद्रांच्या

स्मृतीला कृतज्ञतेनें अभिवादन करूनच त्यांनीं आपल्यापुढें जमलेल्या सातआठ लाख लोकांना हिंदी स्वातंत्र्याचा उज्ज्वल इतिहास व उज्ज्वलतर ध्येय समजावून सांगितलें.

दिल्लीच्या ' लाल किल्लयावर ' स्वातंत्र्याचा झेंडा फडकविण्याचा मान कॉंग्रेसला मिळाला असला, तरी पूर्वीं नेमस्तांनीं व जहालांनीं, क्रांतिकारकांनीं व समाजवाद्यांनीं, रॉयवाद्यांनीं व सुभाषवाद्यांनीं जे जे प्रयत्न स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं म्हणून केले, त्या सर्वांची नोंद राष्ट्रीय हिशोबांत जमेच्या बाजूस झालेली आहे. यापुढें स्वातंत्र्यांत नांदणाऱ्या भारताच्या पिढ्यान्‌पिढ्या त्या सर्व प्रयत्नांचें कृतज्ञ भावानें स्मरण ठेवतील यांत शंकाच नाहीं. ते दादाभाई नौरोजी व ते राजा राममोहनरॉय आपल्या स्वतंत्र भारताला मुक्त कंठानें आशीर्वाद देत असतील; ते न्यायमूर्ति रानडे व ते लोकहितवादी भारतीय स्वातंत्र्यावर आनंदाश्रूंचा अभिषेक करीत असतील; ते मालाकार चिपळूणकर व ते लो. टिळक येथील प्रजेस प्रेमानें आशीर्वाद देत असतील; ते सुरेंद्रनाथ बॅनर्जी व ते नामदार गोखले भारताच्या स्वतंत्र राज्यघटनेला धन्यवाद देत असतील; ते फडके, ते चाफेकर, ते खुदीराम–ते मदनलाल, ते कान्हेरे–ते कर्वे, ते पिंगळे–ते राजगुरु, ते भगतसिंग–ते उधमसिंग, ते सुभाषचंद्र आणि त्यांची ती आझाद सेना–इत्यादि हुतात्म्यांनीं स्वातंत्र्यलक्ष्मीचा जयजयकार केला असेल आणि गांधीजी, लालाजी व मालवीयजी–सरोजिनीबाई व बेझंटबाई, अलीबंधु व सावरकरबंधु आणि हिमूकलानी व बाबू गेनू–अशा असंख्य लहानमोठ्या स्वातंत्र्यभक्तांना आपल्या प्रिय

व पूज्य भारतमातेच्या मस्तकावर स्वातंत्र्याचा राजमुकुट चढलेला बघून किती हर्ष, किती धन्यता वाटत असेल !

याच हर्षाच्या, साफल्याच्या व संतोषाच्या भावनेनें सर्व भारतीयांनीं हा दिवस साजरा केला, झेंडे चढविले, दिवे लावले, कमानी उभारल्या. जणुं कांहीं भरत-भूमीनें आपल्या स्वातंत्र्य-लढ्याचे विजय-स्तंभच शहरोंशहरीं व गावोगांवीं उभे केले. त्या वेळीं कोट्यवधी कंठांतून आशा-गीत स्फुरूं लागलें,

विजयी विश्व तिरंगी प्यारा । झेंडा ऊंचा रहे हमारा ॥

